ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : यशवंतराव चव्हाण जीवन-दर्शन

लेखक : पंजाबराव रामराव जाधव

प्रकाशक : कर्मवीर प्रकाशन, पुणे

प्रकाशन वर्ष : १९७०

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२१

# यशवंतराव चव्हाण
# जीवन-दर्शन

**डॉ. पंजाबराव रामराव जाधव**
एम्. ए., एल्एल्. बी., पीएच्. डी.
ॲडव्होकेट, हायकोर्ट

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

923.2
Cha-Jad
7974

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00964

कर्मवीर प्रकाशन, पुणे

कर्मवीर प्रकाशन, पुणे १६

# यशवंतराव चव्हाण जीवन-दर्शन

डॉ. पंजाबराव रामराव जाधव
एम. ए., एल्एल्. बी., पीएच्. डी.
ॲडव्होकेट, हायकोर्ट

ग्रंथ संग्रह

कर्मवीर प्रकाशन, पुणे १६

प्रकाशक :

जीवनराव पंजाबराव जाधव
कर्मवीर प्रकाशन
चतुःशृंगी पायथा,
सेनापती बापट पथ, पुणे-१६
दूरध्वनी क्रमांक ५८२६६


मुद्रक :
म।५४४४
य. गो. जोशी,
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणे ३०

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मूल्य १५ रुपये

प्रकाशन तिथी : १२ मार्च १९७०
श्री. यशवंतराव चव्हाण जन्म दिन

# हिन्दवी स्वराज्य संस्थापक



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्य-स्मृतीस सादर समर्पण

अखिल हिंदवी स्वराज्याची प्रेरणा याच शिवरायांनी आपणांस दिली. स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांचे संरक्षण आणि संवर्धन कसे करावे हा धडा शिवरायांनीच आपणांस शिकविला. सतीचे पावित्र्य राखून, दलितांचे दैन्य हरून, दुःखितांचे अश्रू पुसून जाणता नवसमाज निर्मिण्याचा महान ध्यास शिवरायांनी घेतला.

तीच...अगदी तीच परंपरा चालविण्याचे अखंड व्रत यशवंतराव आपणही अंगिकारलेले दिसत आहे. दीप्ती, धृती आणि तृप्ती या त्रयीने युक्त असा नवसमाज निर्मिण्याचे सामर्थ्य शिवराया आणि भवानी माता आपणांस दिल्याशिवाय कसे राहील !

# संपादकीय मनोगत

हिंदवी स्वराज्यसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी जेथून भारतीय जनतेस स्वातंत्र्यसूर्याचे अपूर्व दर्शन घडविले, अशा या महान महाराष्ट्रात स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषेच्या संरक्षणासाठी मराठे वीरांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन नवा इतिहास घडविला. याच भूमीत आद्य समाजसुधारक महात्मा ज्योतिराव फुले यांनी परंपरागत सामाजिक विषमतेविरुद्ध सर्वांगीण सुधारणेचे रणशिंग फुंकले आणि सार्वजनिक सत्य-धर्माचे लोण महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यातून पसरविले. सत्य-शोधकी विचारप्रवाहाची गंगा गरिबांच्या झोपडीपर्यंत पोचविण्याचे भगीरथ कार्य राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी येथेच केले. " स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच " हा महामंत्र लोकमान्य टिळकांनी याच भूमीत दिला. शिक्षण हा सर्व सुधारणांचा पाया आहे हे प्रत्यक्ष कृतीने सिद्ध करून शिक्षण-प्रसाराचा उत्तम मळा पिकविणारे कर्मवीर भाऊराव पाटील सुद्धा याच पवित्र भूमीत जन्मास आले. त्यांनी स्थापिलेल्या रयतशिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष म्हणून महाराष्ट्राचे मान्यवर नेते व भारताचे ख्यातनाम गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचाही जन्म याच महान महाराष्ट्रात झाला. कर्मवीरांच्या विशाल विद्या-वटवृक्षाच्या सान्निध्यात मला ज्ञानार्जनाची सुसंधी मिळाली हा माझ्या जीवनातील एक अपूर्व योग होय.

महाराष्ट्राच्या या शिक्षण भगीरथाच्या अविस्मरणीय आठवणी संग्रहित करण्याचा माझा दृढ निश्चय पार पडला व " कर्मवीर भाऊराव पाटील जीवन-दर्शन " हा स्मृति-सार ग्रंथ गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांना अर्पण करण्याची सुप्त इच्छा या साहित्य-निर्मितीच्या प्रसंगाने साकार झाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्वर्गीय स्फूर्तीने मी पुणे विद्यापीठात डॉक्टरेटची पदवी संपादन केली, तथापि माझे मन मला काही स्वस्थ बसू देईना. शैक्षणिक क्षेत्रातील कर्मवीर भाऊराव पाटलांचे माझ्यावरील संस्कार मला आजन्म विद्यार्थीदशेची दीक्षा देत आहेत. त्याचप्रमाणे राजकीय क्षेत्रात श्री. यशवंतराव चव्हाण यांना मी विसरू शकत नाही. राजकारणाचा विद्यालयीन जीवनापासून मी अभ्यासक असल्यामुळे आजपर्यंत त्यांच्या-संबंधी विविध प्रसंगी प्रसिद्ध झालेली बरीच माहिती वाचण्याचा योग आला. यशवंतरावजींच्या दीर्घ तपश्चर्येचे यथार्थ दर्शन ग्रंथाच्या स्वरूपात मराठी वाचकांना घडवावे या प्रबल विचाराने प्रेरित होऊन मी या साहित्यिक कार्यास प्रारंभ केला. भारतातील विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींशी पत्रव्यवहार करून यशवंतराव चव्हाण

जीवन-दर्शन या ग्रंथाकरिता लिखाण मागविले. भारतातील बहुतेक वृत्तपत्रांनी माझी निवेदनें प्रसिद्ध केली व या साहित्यनिर्मितीच्या विधायक कार्याला सक्रिय सहकार्य दिले, याबद्दल त्यांना धन्यवाद देणे माझे आद्य कर्तव्य आहे.

श्री. यशवंतराव चव्हाण यांनी आजपर्यंत विविध विषयांवर जे मूलगामी विचार अनेक प्रसंगांच्या निमित्ताने व्यक्त केले आहेत, ते चिरंतन स्वरूपाचे आहेत, अशी माझी खात्री झाली. यशवंतरावजी ही एक व्यक्ती नसून तो एक महान विचार आहे, हीच भावना भारतीयांच्या मन-मंदिरात निर्माण झाली आहे. वास्तविक पाहता देशाची उंची वाढते ती केवळ त्यातील मोठमोठे पर्वत व नद्या यांच्यामुळे नव्हे, तर तेथील क्रियाशील विचारवंतांच्या तपश्चर्येमुळे होय. महान पुरुषांची जीवन-ज्योत इतरांना आशेचा किरण दाखविते. सामान्य माणूस स्वकर्तृत्वाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करू शकतो हा विचार प्रत्यक्ष कृतीने सिद्ध करणारे श्री. यशवंतराव चव्हाण निराशावादाने खंगलेल्या मानवांना कार्यप्रवृत्त केल्याशिवाय राहणार नाहीत. श्री. यशवंतरावांचे आजपर्यंतचे उज्ज्वल यशोदर्शन मराठी वाचकांना यथार्थतेने घडावे या उद्देशाने मी हा साहित्यिक प्रयत्न त्यांचा ५६ वा वाढदिवस साजरा करून आरंभिला. गेल्या एक वर्षात या निमित्ताने विविध क्षेत्रांतील विचारवंत व्यक्तींशी पत्रद्वारे तर कधी प्रत्यक्ष भेटून संपर्क साधला. विशेष समाधानाची गोष्ट ही की, प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट झालेल्या व्यक्तींनी उत्स्फूर्त सद्भावनेने आपापले उद्बोधक लेखन माझ्याकडे पाठविले तसेच काहींनी मुलाखतीतून सांगितलेले विचार प्रसिद्ध करण्यास अनुमती दिली, याबद्दल मी त्यांचा अंतःकरणपूर्वक आभारी आहे.

साहित्यिक क्षेत्रातील माझे मार्गदर्शक कै. आचार्य अत्रे यांची मला या प्रसंगाने सद्गदित अंतःकरणाने आठवण होते. " कर्मवीर भाऊराव पाटील जीवन-दर्शन " हा संशोधनात्मक स्मृतिसार ग्रंथ त्यांना फार आवडला. " भारतीय बहुजन-समाजाचा सांस्कृतिक इतिहास " मी लिहीत असताना त्यांनी मला जे जिव्हाळ्याचे मार्गदर्शन केले त्याचे स्मरण झाले म्हणजे मला आचार्यांच्या थोर अंतःकरणाची आठवण होते. " यशवंतराव चव्हाण जीवन-दर्शन " हा प्रातिनिधिक स्वरूपाचा साहित्यिक ग्रंथ मी लिहीत आहे, त्यासाठी आपला लेख हवा आहे, असा आग्रह मी धरला होता व तो त्यांनी मान्यही केला होता. तथापि परमेश्वरास हे मान्य नव्हते. प्रस्तुत ग्रंथास लेख न देताच आचार्य आपल्यातून निघून गेले, याबद्दल मला अत्यंत विषाद वाटतो. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू कै. हरिभाऊ पाटसकर यांचेही स्मरण या प्रसंगी झाल्याशिवाय राहत नाही. श्री. यशवंतरावांच्याबद्दल त्यांच्या मनात फार आदर होता. " पंजाबराव ! यशवंतराव चव्हाण यांचे जीवन-दर्शन तुम्ही लिहीत आहात, हा अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. " दादासाहेबांनी या कार्याचे असे कौतुक करून मला जे प्रोत्साहन दिले ते मी कधीतरी विसरणे शक्य आहे काय ?

हिन्दी साहित्यातील सुप्रसिद्ध विद्वान डॉ. भगीरथ मिश्र, सागर विद्यापीठ ( मध्यप्रदेश ) यांचा उल्लेख मला या ठिकाणी अवश्य केला पाहिजे. त्यांच्या मार्गदर्शनाचा मला बहुमोल लाभ झाला. " पीएच्. डी. हे साध्य नसून ते एक साधन आहे आणि तुमच्या संशोधनकार्याचा त्यामुळे पाया घातला गेला आहे. तथापि संशोधनात्मक साहित्यिक कार्याचा कळस सरस्वतीमंदिरावर अजून तुम्हास चढवावयाचा आहे. म्हणून अविरत श्रमानें चिरंतन स्वरूपाचे कार्य करून दाखविण्याची पात्रता संपादन करीत राहणे तुमचे जीवनकार्य असले पाहिजे " असा संदेश देणारे माझे गुरुदेव डॉ. भगीरथ मिश्र म्हणजे आपल्या राष्ट्राची वैचारिक क्षेत्रातील थोर संपत्ती आहे, अशी माझी बालंबाल खात्री झाली. साहित्यसंशोधनासाठी संपूर्ण भारत व सिलोन फिरण्याचा मला अपूर्व योग लाभला. त्यामुळे या सबंध प्रदेशातील विदेशी मिशनऱ्यांच्या कार्यपद्धतीचा मला सखोल अभ्यास करता आला. " हिंदी भाषा तथा साहित्य को ईसाई मिशनरियों का योगदान " या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर अखिल भारतात प्रथम-प्रबंध प्रस्तुत करण्याचा मला मान मिळाला, याबद्दल मी डॉ. भगीरथ मिश्र यांना शतशः धन्यवाद देतो. श्री. यशवंतराव चव्हाण जीवन-दर्शन या ग्रंथासंबंधी त्यांनी अत्यंत जिव्हाळ्याने वरचेवर चौकशी करून हा प्रातिनिधिक ग्रंथ राष्ट्रभाषा हिंदीतून प्रसिद्ध करण्याची सूचना केली. यावरून या ग्रंथाचे अखिल भारतीय महत्त्व किती आहे याचा मला अंदाज घेण्यास बहुमोल साहाय्य झाले.

यशवंतरावजींच्या सर्वस्पर्शी जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणाऱ्या बहुमोल लेखांचा माझ्यावर नुसता वर्षाव झाला. आजपर्यंतच्या त्यांच्या क्रान्तिकारी जीवनातील अविस्मरणीय आठवणींनीही एकच गर्दी केली. इतकेच नव्हे तर यशवंत-काव्य-सुमनांनी माझी अभ्यासिका दरवळून गेली. यशवंतरावांनी अनेक भाषणांतून व लेखांतून वेळोवेळी व्यक्त केलेल्या विचारांनी मला मोहित केले. भारतातील मान्यवर नामदार, खासदार, आमदार इत्यादि राजकीय क्षितिजावर चमकणाऱ्या अभ्यासू विचारवंतांनी आपले विचार लेखनबद्ध करून या ग्रंथासाठी सादर केले, त्यामुळे यशवंतरावजींचे राजकीय जीवनच नव्हे तर इतर क्षेत्रातील त्यांचा दूरगामी दृष्टिकोन समजण्यास मोठेच सहाय्य झाले. भारतातील विविध विद्यापीठांच्या विद्वान मंडळींनी आपल्या सूक्ष्मदर्शकातून यशवंतरावजी कसे दिसतात याचे यथार्थ दर्शन घडविले. मराठीच्या वाङ्मयउद्यानात विहार करणाऱ्या साहित्यिकांनी आपली पवित्र भावांजली मुक्त हस्तानें लालित्यपूर्ण भाषेत व्यक्त केली. गतकाळातील अविस्मरणीय स्मृतींच्या रूपाने स्मृतिकारांनी यशवंतरावांच्या स्फूर्तिदायक भूतकालाचे जागते चित्र उभे केले. प्रस्तुत ग्रंथातील यशवंतरावजींच्या विचारमंथनाने त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान समजण्यास निश्चित साहाय्य झाले आहे. अशी ही बहुरंगी साहित्यिक कलाकृती मराठी वाचकांना सादर करताना माझ्या सौभाग्यवतीने जे सहकार्य दिले त्याबद्दल तिचे आभार मानण्यास शब्द अपुरे पडतात. पत्नी-स्तुतीचा दोष पत्करूनही तिचे या ठिकाणी अंतःकरणपूर्वक

आभार मानणे मी माझे पवित्र कर्तव्य समजतो. हा ग्रंथ तयार करण्यासाठी तब्बल एक वर्षाचा कालावधी लागला. या काळात तिने प्रत्येक बाबतीत मला कमालीचे सहकार्य दिले. पुढील शिक्षणाकरिता अमेरिकेला जाण्यासाठी मला मिळालेला पासपोर्ट तिने आपल्याजवळ ठेऊन घेतला. "अगोदर आपल्या यशवंतरावजींचे साहित्य प्रकाशात आणा" हा महामंत्र माझ्या कानी सारखा निनादत ठेवला; त्यामुळे अंगीकृत कार्य तडीस नेण्याची माझी जिद्द शुद्ध पक्षातील चंद्राप्रमाणे उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेली आणि हे अवाढव्य व्यापाचे कार्य मी अखंड उत्साहानें करीत राहिलो.

प्रस्तुत ग्रंथात माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांचे सर्वस्पर्शी चरित्र-दर्शन दिग्दर्शित करण्याचा मी प्रयत्न केला आहे. राजकीय क्षेत्रातील मानकऱ्यांचे मनोगत या विभागात एकूण अकरा नेत्यांनी आपले विचार ओजस्वी भाषेत व्यक्त केले आहेत. शुभेच्छा-संदेशात्मक राष्ट्रनेत्यांचे सद्‌विचार या विभागात अखिल भारतीय कीर्तीच्या नामवंत सहा नेत्यांचे मुलाखतीतून मिळालेले विचार समाविष्ट करण्यात आले आहेत. तदनंतर भारताच्या विविध विद्यापीठांतील बारा मान्यवर विद्वान संशोधकांनी आपल्या सूक्ष्म–दर्शकातून पाहिलेले श्री. यशवंतराव चव्हाण आणि त्यांच्या गतिमान जीवनासंबंधी सबल प्रमाणावर व्यक्त केलेले निष्कर्षात्मक विचार यांनी हा विभाग संपन्न केला आहे. यानंतरच्या विभागात संपादकीय क्षेत्रातील तेरा नामवंत संपादकांचे अनुभवसंपन्न लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. याशिवाय श्री. यशवंत-राव चव्हाण यांच्या विविध जीवन-पैलूवर यथार्थ प्रकाश टाकणारे समाजाच्या विविध थरांतील मान्यवर व्यक्तींचे भावपूर्ण लेखन सादर करण्यात आले आहे. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन–मंदिरातील अविस्मरणीय स्मृतिगंध देणाऱ्या त्यांच्या सान्निध्या-तील एकवीस स्मृतिकारांनी चिरंतन आठवणी पाठवून हा विभाग अत्यंत मनोरंजक आणि उद्‌बोधक असा केला आहे. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या क्रांतिकारी आणि रोमांचकारी जीवनावर उत्स्फूर्त काव्ये रचणाऱ्या सात कवींनी त्यांना गौरव-गीतांजली अर्पण केली आहे. आजपावेतो श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या संबंधाने उपलब्ध साहित्यसागरा-तून निवडक असे विचारांचे मोती संग्रहित करून विचारमंथन या सदरात गुंफण्यात आले आहेत. यशवंतरावजींच्या बाल्य कालापासून आजपर्यंतच्या अनेकविध ऐतिहासिक प्रसंगांच्या अनुरोधाने त्यांच्या बावन्नकशी नेतृत्वाची घेतलेली अत्यंत आकर्षक अशी बावन्न बोलकी दुर्मिळ छायाचित्रे या ग्रंथात समाविष्ट करण्यात आली आहेत. आणि त्या चित्रांतील भावदर्शक सूक्ष्म छटा शब्दांकित केलेली माझ्या कल्पनासृष्टीतील बोलकी भाष्ये वाचकांपुढे रसग्रहणार्थ मी ठेविली आहेत.

साहित्याच्या नानाविध अंगांनी समृद्ध असा हा विशालकाय संग्रहणीय ग्रंथ मराठी वाचकांना सादर करताना मला अपूर्व आनंद होत आहे. प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट केलेले राजकीय नेते, विद्यापीठातील विद्वान, साहित्यक्षेत्रातील मानकरी, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, अविस्मरणीय आठवणी सांगणारे स्मृतिकार, उत्स्फूर्त

काव्य रचणारे कवी आदि कलाकारांचे हार्दिक आभार मानणे माझे पवित्र कर्तव्य आहे. अनेक विचारवंत व्यक्तींनी श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यासंबंधी अनुकूल तथा प्रतिकूल लेखन पाठवून त्यांच्या जीवनाचे तुलनात्मक अध्ययन करण्याची सुवर्णसंधी त्यांनी मला प्राप्त करून दिली याबद्दल मी त्यांचा अंतःकरणपूर्वक आभारी आहे.

यशवंतरावजींच्या कार्यासंबंधाने लिहिलेल्या साहित्याच्या विविध स्वरूपातील लेखांचा माझ्यावर नुसता पाऊस पडला. आलेले सर्वच लिखाण प्रसिद्ध करणे आवाक्याबाहेरची गोष्ट वाटू लागली. त्यामुळे संपादकीय कर्तव्याचे पालन करताना अनेक लेखांचा सारांश काढणे अगदी अपरिहार्य होते. एकच मुद्दा अनेक लेखकांच्या रचनेत दृष्टोत्पत्तीस आल्याने मूळ लेखातील मजकुरात बरीच काटछाट करणे अत्यंत आवश्यक होते. तथापि लेखकाच्या मूळ उद्देशाला बाधा येऊ नये अशा रीतीने त्यांच्या लेखनाचा संक्षेप करण्याचा मी प्रयत्न केला आहे. संबंधित लेखक माझी अडचण सहृदयतेने समजावून घेतील अशी मी आशा करतो. या ग्रंथात प्रसिद्ध न झालेले असे बरेचसे साहित्य द्वितीय खंडात प्रसिद्ध करण्याचा माझा मनोदय आहे.

हा प्रातिनिधिक ग्रंथ तयार करताना पुण्यातील ब्लॉकमेकर श्री. व्ही. जोशी, चित्रकार श्री. खाजगीवाले व मुद्रक श्री. यशवंतराव जोशी व श्री. माधवराव जोशी यांनी व्यक्तिगत लक्ष घालून ग्रंथ पूर्ण करण्यास जे सहकार्य दिले याबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो. याव्यतिरिक्त माझे मेव्हणे श्री. रावसाहेब कृष्णाजी खर्डे पाटील, मित्रवर्य श्री. धनराज रामचंद्र गांधी व श्री. ए. के. घोरपडे यांनी या साहित्यिक कार्याला जे बहुमोल सहकार्य दिले याबद्दल मी त्यांचा शतशः ऋणी आहे.

या ग्रंथाचे अध्ययन सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातून, शाळा-कॉलेजातून, विद्यापीठे व राज्यशासनातील विविध शाखांतून व्हावे. भारताला ललामभूत झालेले श्री. यशवंतराव चव्हाण यांचे यथार्थ दर्शन घडून त्यांच्यापासून प्रचलित तरुण पिढीस स्फूर्तीची प्रेरणा मिळावी. तरुणांची अमर्याद शक्ती भारतीय नवसमाज-निर्मितीच्या कार्याला कारणी लागावी. भारत हे एक लोकशाही समाजवादी राष्ट्र या नात्याने विश्वात ख्याती पावून, भारतीयांच्या जीवनात मानवी मूल्यांचा उच्च आदर्श निर्माण व्हावा, ही सदिच्छा व्यक्त करून हे संपादकीय मनोगत जनता-जनार्दनाच्या पवित्र चरणी सादर समर्पण करतो.

पंजाबराव जाधव

# अनुक्रमणिका


| शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ छत्रपति शिवाजी महाराज | सादर समर्पण | |
| २ संपादकीय मनोगत | डॉ. पंजाबराव रामराव जाधव | तीन |
| **चरित्र दर्शन** | | |
| ३ यशवंतराव चव्हाण चरित्र-दर्शन | डॉ. पंजाबराव रामराव जाधव | १ |
| *राजकीय रणक्षेत्रातील मानकऱ्यांचे मनोगत* | | |
| ४ संस्कारांचे सामर्थ्य | नामदार श्री. यशवंतराव चव्हाण | ३३ |
| ५ आदर्श व्यक्तिमत्व | नामदार श्री. वसंतराव नाईक | ४१ |
| ६ महाराष्ट्राचा सह्याद्री | पद्मभूषण श्री. वसंतरावदादा पाटील | ४४ |
| ७ सच्चा देशभक्त | नामदार श्री. अण्णासाहेब शिंदे | ४७ |
| ८ पुरुषार्थाची प्रेरणा | नामदार श्री. शंकरराव चव्हाण | ४९ |
| ९ लोकनेत्याची वैशिष्ट्ये | नामदार श्री. भिकाजी खताळ | ५१ |
| १० संघर्षातील नेतृत्व | नामदार श्री. व्यंकटराव हिरे | ५३ |
| ११ एकमेव आशास्थान | नामदार श्री. शिवाजीराव पाटील | ५५ |
| १२ माणूस मंत्र्याचे मनोगत | खासदार श्री. अनंतराव पाटील | ५८ |
| १३ लोकशाहीचा जागरूक रखवालदार | आमदार श्री. शरद पवार | ६१ |
| १४ समाजवादी व्यक्तिमत्व | आमदार श्री. मारोतराव तुमपल्लीवार | ६३ |
| *राष्ट्रनेत्यांचे संदेशात्मक सद्विचार* | | |
| १५ माझ्या शुभेच्छा | डॉ. वराहगिरी व्यंकटगिरी | ६७ |
| १६ शुभसंदेश | डॉ. गोपालस्वरूप पाठक | ६९ |
| १७ जुगजुग जियो | श्री. जगजीवनराम | ७० |
| १८ अढळ स्थान | श्री. दयानंद बांदोडकर | ७१ |
| १९ नवे नेतृत्व | श्री. जयप्रकाश नारायण | ७२ |
| *संशोधकांच्या सूक्ष्मदर्शकातून दिसणारे श्री. यशवंतराव चव्हाण* | | |
| २० सर्वस्पर्शी व्यक्तिमत्व | डॉ. वि. भि. कोलते | ७५ |
| २१ सामान्यांचा उद्धारक | डॉ. डी. सी. पावटे | ८२ |
| २२ जीवन-सागरातील दीपस्तंभ | डॉ. हरिभाऊ पाटसकर | ८४ |
| २३ लोकमान्य नेता | डॉ. पी. व्ही. चेरियन | ८७ |
| २४ शिक्षणप्रेमी नेतृत्व | डॉ. दादासाहेब घोगरे | ८९ |
| २५ शब्द व शस्त्र राखणारा नेता | डॉ. गजानन श्रीपत खैर | ९२ |
| २६ रसिक साहित्यिक | डॉ. प्रभाकर माचवे | ९४ |

| शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| २७ लोकसंग्राहक नेता | डॉ. प्र. चिं. शेजवलकर | ९७ |
| २८ शिबिरातील दर्शन | डॉ. सरोजिनी बाबर | ९९ |
| २९ तेथे कर माझे जुळती | डॉ. सौ. कमलाताई मोरे | १०१ |
| ३० भारताचा भाग्यविधाता | डॉ. बी. एन्. सावंत | १०३ |
| ३१ एकमेव नेतृत्व | डॉ. दत्तो वामन पोतदार | १०५ |
| *यशवंत–साहित्य सरोवरातील कमल–पुष्पे* | | |
| ३२ इथं जाहला सुंदर संगम तीन अमोल गुणांचा | पद्मभूषण प्रा. ना. सी. फडके | १०९ |
| ३३ संपन्न व्यक्तिमत्व | प्रा. मा. का. देशपांडे | ११५ |
| ३४ राष्ट्रधुरीण राज्यकर्ता | प्रा. स. शं. देसाई | ११८ |
| ३५ खंदा मुत्सद्दी | पद्मश्री बाळासाहेब पाटील | १२१ |
| ३६ आगळे व्यक्तिमत्व | श्री. वामनराव सावंत | १२३ |
| ३७ व्यक्ती नव्हे शक्ती | श्री. विश्वनाथराव वाबळे | १२६ |
| ३८ सामान्यातील असामान्यत्व | श्री. य. ल. सांबारे | १२८ |
| ३९ घट्ट ओठांचा निग्रही नेता | श्री. रामभाऊ जोशी | १३० |
| ४० मजबूत नेतृत्व | श्री. पां. वा. गाडगीळ | १३३ |
| ४१ महाराष्ट्रातील बुद्धिशक्ती | श्री. ह. रा. महाजनी | १३६ |
| ४२ दिल्लीतील महाराष्ट्राचा मान | श्री. द्वा. भ. कर्णिक | १३८ |
| ४३ मराठी भाषिकांचे आशास्थान | श्री. ग. त्र्यं. माडखोलकर | १४० |
| ४४ उज्ज्वल भवितव्य | प्रा. सदानंद रेगे | १४२ |
| *यशवंत–जीवन-सृष्टीतून वाहणाऱ्या विचार–सरिता* | | |
| ४५ बहिरी ससाणा | प्रा. द्वा. वा. केळकर | १४५ |
| ४६ अदृश्य सान्निध्य | श्री. मधुकर केचे | १४७ |
| ४७ लक्षवेधी प्रश्नांचे सूचक उत्तर | श्री. हरि पिराजी धायगुडे | १४८ |
| ४८ अस्पृश्यांचा आधार | श्री. शंकरराव खरात | १५१ |
| ४९ पोपटकंठी सिंह | कॅप्टन श्री. मा. कृ. शिंदे | १५३ |
| ५० सिंडिकेट-इंडिकेट संघर्ष | प्रा. एन्. पी. नागपुरे | १५५ |
| *यशवंत–जीवन मंदिरातील चिरंतन स्मृती–गंध* | | |
| ५१ राजकीय सहयात्री | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | १५९ |
| ५२ कर्तृत्ववान स्नेही | उद्योगपती श्री. शंतनुराव किर्लोस्कर | १६१ |
| ५३ साहित्य प्रीती | श्री. धोंडो वासुदेव गद्रे | १६२ |
| ५४ क्रांतिकारक राजकारणी | सौ. लीलाबाई भगवानराव पवार | १६३ |

| | शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ५५ | संयमी व विदग्ध नेता | श्री. गोपीनाथ तळवलकर | १६४ |
| ५६ | अमृताच्या वेली अमृताची फळे | कवी सोपानदेव चौधरी | १६६ |
| ५७ | एक मऱ्हाठे व्यक्तिमत्व | श्री. गोपाल नीलकंठ दांडेकर | १६८ |
| ५८ | प्रेस उभा राहिला ! | श्री. राम निसळ | १६९ |
| ५९ | दिल्लीतील महादजी शिंदे | श्री. का. न. केळकर | १७० |
| ६० | नेता ऐसा मिळे आम्हाला | मेजर श्री. शिवाजीराव शेळके | १७१ |
| ६१ | रसिक मनाची तन्मयता | श्री. ग. ना. आंबेकर | १७३ |
| ६२ | मराठ्यांचे स्फूर्तिस्थान | श्री. बाळ जगन्नाथ पंडित | १७४ |
| ६३ | आमचे मैत्रीचे संबंध | श्री. बापूसाहेब भापकर | १७५ |
| ६४ | राजकारणी संत | भाई माधवराव बागल | १७६ |
| ६५ | वऱ्हाडातील भाष्ये | श्री. भवानीशंकर पंडित | १७७ |
| ६६ | समन्वयवादी नेतृत्व | श्री. वामन नारायण देशपांडे | १८० |
| ६७ | प्रसंगावधान | श्री. वसंतराव शा. वैद्य | १८१ |
| ६८ | तरुणांचे स्फूर्तिस्थान | श्री. बापूजी साळुंखे | १८२ |
| ६९ | सच्चा समाजवादी नेता | श्री. रामचंद्रराव भांगरे | १८५ |
| ७० | सैनिकी शिक्षण | प्रा. गो. ध. टेकाळे | १८६ |
| ७१ | पानशेत प्रलयातील देवमाणूस | श्री. न. शं. जमदग्नी | १८७ |
| ७२ | माझिया माहेरा जा | सौ. ज्योत्स्ना भोळे | १८८ |
| ७३ | थोर माणुसकीची साक्ष | सौ. शिरीष पै | १८९ |
| | *यशवंतराव चव्हाण गीत – गौरवांजली* | | |
| ७४ | औक्षवंत व्हा ! | पद्मश्री ग. दि. माडगूळकर | १९३ |
| ७५ | यशवंत तुम्ही जयवंत तुम्ही ! | श्री. नागेश मोगलाईकर | १९३ |
| ७६ | हाक देशाची ती येता ! | श्री. इब्राहीमअली वारणे | १९४ |
| ७७ | सचिवोत्तम | श्री. भालचंद्र ल. रानडे | १९५ |
| ७८ | तुम्हास नमित अमित जनता ! | सौ. मीराबाई कागदे | १९६ |
| ७९ | मराठा वीर चालला पुढे ! | प्रा. या. ब. हणमंते | १९७ |
| ८० | स्नेह-भावांजली | महाराष्ट्र कवी यशवंत | १९९ |
| | *यशवंतराव चव्हाण साहित्य सूर्याची प्रभावी विचार-प्रकाश-किरणे* | | |
| ८१ | विचार मंथन | श्री. यशवंतराव चव्हाण | २०१ |


卐 卐 卐

# यशवंतराव चव्हाण

## चरित्र–दर्शन

# प्रस्तावना

प्रस्तुत संग्रहांत मुंबई नभोवाणी केन्द्रावरून ध्वनिक्षेपित झालेलीं सात साहित्यविषयक भाषणें समाविष्ट केलीं आहेत. सात वेगवेगळ्या वाङ्मय प्रकारांच्या क्षेत्रांतील लेखकांनी आपापल्या लेखनविषयक प्रयोगांच्या स्वरूपाची यांत चर्चा केली आहे.

साहित्यनिर्मितीचें मूळ शोधणें हें कांहीं दृष्टींनी नदीचें मूळ शोधण्याइतकें कुतूहलजनक असतें, आणि कोणच्याहि लेखकाच्या साहित्याचा संभव कसा होतो हें जितकें कुतूहलजनक तितकेंच त्याला वेगवेगळीं वळणें कशीं मिळतात, कां दिलीं जातात, हेंहि पाहणें अगत्याचें असतें. साहित्यविषयक प्रयोग म्हणजे मानवी गतिमानतेचें व त्या गतीच्या दिशेचें एक सूक्ष्म पण स्पष्ट दर्शकचिन्हच असतें. मानवी कल्पना व ध्येयें यांच्या इतिहासांत साहित्यक्षेत्रांतील प्रयोगांना कधीं तरी फार महत्वाचें स्थान द्यावें लागेल हें निश्चित्. साहित्यांतील प्रयोगशक्ति ही मनुष्याच्या मनाची व अभिव्यक्तीची झेंप वाढवण्याचें एक प्रमुख साधन आहे. साहित्यकाराची प्रयोगशील प्रतिभा नवनवे अनुभव घेत असते व त्या अनुभवांना अनुरूप असें नवें अभिव्यक्तीचें माध्यम निर्माण करीत असते. जिच्यामधें अशी शक्ति असते तीच प्रतिभा नववस्तुनिर्माणक्षमा. या निर्मितीच्या प्रक्रियेमध्यें इतिहासकाराला वास्तव व वाङ्मयीन जीवनाचें दुहेरी प्रतिबिंब आढळणें शक्य आहे, नव्हे, तसें अपरिहार्य आहे. साहित्यकार आपल्या प्रयोगांत कशापासून तरी वेगळा होऊं पहात असतो, साचेबंद झालेल्या रूढ परंपरेंत त्याचा अनुभव बसत नाहीं. तो अनुभव स्वतःची वाणी किंवा स्वतःचा घाट घेऊन त्याच्या मनःसृष्टींत उदय पावतो. रूढ प्रतिमांत किंवा रूढ आकारांत त्याला बसवण्याचा प्रयत्न केला तर त्यांतील प्राणच जाण्याचा संभव असतो. अशा निर्मितीचा नवेपणा कशामधें आहे आणि तिच्या मुळाशीं काय आहे याचें विश्लेषण करूं लागलें म्हणजे स्वाभाविकपणेंच रूढ परंपरेचें स्वरूप व नव्याकडे खेंचणाऱ्या अनुभवाचें, आंतरिक आकांक्षेचें स्वरूपहि स्पष्ट होतें.

प्रस्तुत संग्रहांत देखील असें द्विविधदर्शन घडून येईल. नाटक, कादंबरी लघुकथा, लघुनिबंध, व्यक्तिचित्रें, विनोदी लेख व कविता या वेगवेगळया वाङ्मयप्रकारांमधें आजच्या नामवंत लेखकांनी कांहीं प्रयोग केले कां, तें जाणतेपणीं केले काय, ते कोणत्या कारणांमुळे केले, या प्रश्नांचा उहापोह याच लेखकांनी आपापल्या दृष्टीनें केलेला संग्रहांत आढळेल. हीं भाषणें म्हणजे एकापरीनें त्या त्या लेखकानें केलेलें सिंहावलोकनच आहे. त्यांच्या प्रवासाच्या प्रारंभीं किंवा त्यांच्या नवनिर्मितीच्या पाहिल्या अनुभवाच्यावेळीं त्यांनी येथें व्यक्त केलेल्या सर्व कल्पना त्यांच्या मनांत इतक्या स्पष्टपणें उभ्या असतीलच असें नाहीं. नाटकासारखें कांही वाङ्मयप्रकार निश्चित तंत्रविषयक कल्पनांवर आणि योजनांवर आधारित असतात, तर काव्यासारखें कांही प्रकार अनुभवांच्या मंथनांतून अभावितपणें नवें रूप व नवा आकार घेऊन अवतरतात–रसिकांइतकेच कवीलाहि ते चकित करतात. ही सापेक्षता लक्षांत घेतली तरी या भाषणांचें महत्व व सत्यत्व यांना बाध येत नाहीं. निर्मितीच्या वेळीं कांही अंशीं अबोधपणें मनांत वागत असलेल्या कलावृत्तींना या सिंहावलोकनांत स्पष्ट स्वरूप मिळालें आहे.

या संग्रहित भाषणाच्या सात वक्त्यांपैकीं कोणाचीहि रसिक व वाङ्मयप्रेमी महाराष्ट्राला आज नव्यानें ओळख करून देण्याची आवश्यकता नाही. श्री मामासाहेब वरेरकर यांचीं नाटकें आणि कादंबऱ्या आज तीस चाळीस वर्षें महाराष्ट्राच्या परिचयाचीं आहेत. त्यांच्या नाटकांनीं मराठी रंगभूमीच्या ढासळणाऱ्या संसाराला फार मोठा आधार दिला. अनेक तऱ्हांनीं त्यांत जोम उत्पन्न करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. एकांक-प्रवेशी नाटकें लिहून तीं नटसंचाच्या पचनीं पाडण्यांत, संगीत नाटकांतील पदांचीं संख्या कमीं करण्यांत, स्वगत भाषणांची हकालपट्टी करण्यांत त्यांना नाट्यसृष्टींतील जुन्या परंपरेंतील व्यक्तींशी बरीच लढत ध्यावी लागली. संस्कृत नाटकें व शेक्सपीअरी नाटकें यांच्या आदर्शाकडून मराठी रंगभूमीला इब्सेनचा नाट्यादर्शाकडे वळवण्याचा त्यांनी सुव्यवस्थित प्रयत्न केला. मराठी नाटकाचा आशय आणि तंत्र या दोहोंच्याहि दृष्टीनें श्री० मामा

# यशवंतराव चव्हाण चरित्र-दर्शन

म. द. वा. पोतदार
7974
923/2/Char-Jād
15/- 7/10/93

डॉ. पंजाबराव जाधव, एम्. ए., एल्एल्. बी , पीएच्. डी. ॲड्व्होकेट, पुणे.

महान महाराष्ट्राचे मान्यवर नेते व विशाल भारताचे ख्यातनाम गृहमंत्री नामदार श्री. यशवंतराव चव्हाण म्हणजे लोकशाही समाजवादाचा धन्वंतरी, विशाल दृष्टिकोन असलेला व समतोलबुद्धीचा राजकारणधुरंधर, कर्तबगारीचा कुतुबमिनार. यशवंतराव म्हणजे भारतीय क्षितिजावर झळकणारा देदीप्यमान तारा, अपूर्व आकर्षणाचा लोहचुंबक, निर्भयतेचा महामेरू. पावित्र्याचा महासागर, उत्साहाचा नायगारा व चैतन्याचा महासिंधू होय. यशवंतराव म्हणजे यशवंतांचे राव, लोकादरास पात्र झालेला लोकोत्तर लोकाग्रणी, पुरोगामी ध्येयवादी विचारांची शक्ती, नवविचारांची डोळस प्रेरणा, संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश मिळवून देणारा महाराष्ट्राचा थोर पुरुष होय. त्यांच्या ठिकाणी शिवरायांचे शुद्ध चारित्र्य व संघटनाचातुर्य, लोकमान्य टिळकांची विद्वत्ता, महात्मा गांधीची शांतवृत्ती, पंडित जवाहरलालजींचे मानवतावादी विचार, लालबहादूर शास्त्रींचा तडजोडवादी दृष्टिकोन. देशगौरव नेताजींचे अलौकिक धाडस, महात्मा फुल्यांचा त्याग, मानवेंद्रनाथ रॉय यांचा ज्वलंत ध्येयवाद व राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक क्रांतीची जाज्वल्य महत्त्वाकांक्षा आपणाला एकवटलेली आढळून येते.

## कृष्णेच्या कुशीतील कर्तृत्ववान बाल यशवंतराव चव्हाण—

अशा या कर्तबगार पुरुषाचे पूर्व चरित्र अत्यंत उद्बोधक आहे. १९१२ सालच्या सुमारास यशवंतरावांचे वडील बळवंतराव चव्हाण सातारा जिल्ह्याच्या खानापूर तालुक्यातील विटे या गावी राहात होते. भारतातील बहुसंख्य शेतकऱ्यांची आज जी अवस्था आपण पाहातो तशीच यशवंतरावांच्या वडिलांची गरिबीची परिस्थिती होती. एका सब्जज्जाच्या घरी बळवंतरावांनी घरच्या दुधाचा रतीब सुरू

केल्यामुळे त्यांची ओळख झाली. जमिनीच्या तुटपुंज्या उत्पन्नातून बळवंतरावांच्या वाढत्या कुटुंबाचा खर्च भागेना म्हणून त्यांनी जज्जसाहेबांजवळ नोकरीची विनंती केली. त्यांनी सहानुभूती दाखवून बळवंतरावांना आपल्या कोर्टात बेलीफ म्हणून नोकरीस ठेवले. विस्यास चार वर्षे नोकरी झाल्यावर त्यांची बदली कऱ्हाड कोर्टात झाली. त्यावेळीं त्यांना ज्ञानदेव, गणपतराव, यशवंतराव असे तीन मुलगे व राधाबाई ही एक मुलगी होती. यशवंतरावांचा जन्म ता. १२ मार्च १९१३ साली देवराष्ट्रे या त्यांच्या आजोळी झाला. त्यांचे मामा दाजी घाटगे हे तेथे शेती करून आपली उपजीविका करीत असत. त्यांच्या प्रेमळ-छायेतच यशवंतरावांचे बालपण गेले.

दक्षिण महाराष्ट्रात १९१८ साली प्लेगची महाभयंकर साथ पसरली. त्यामुळे या साथीत अनेक कुटुंबे मृत्युमुखी पडली. बळकट शरीरयष्टीच्या बळवंतरावांचीही तिने आहुती घेतली. चव्हाण कुटुंबावर अक्षरशः आकाश कोसळल्यासारखे झाले. यावेळी कैलासवासी बळवंतरावांचा ज्ञानदेव चौदा वर्षांचा, गणपतराव दहा वर्षांचा आणि बाल यशवंतराव अवघे पाच वर्षांचे होते. यशवंतरावांची आई विठाबाई मोठ्या धीराची बाई होती. तशा असह्य दुःखातही तिने आपल्या मुलांना काही उणे पडू दिले नाही. ज्ञानदेवाच्या नोकरीसाठी ती स्वतः सातारला जिल्हा न्यायाधीशांस भेटावयास गेली. त्यांनी विठाबाईस दिलासा दिला व आठ दिवसांतच ज्ञानदेवाची बेलीफ म्हणून कऱ्हाडला नेमणूक केली. मातोश्री विठाबाईने मोठ्या धैर्याने कौटुंबिक अडचणींना तोंड देऊन संसाराचा गाडा पुढे रेटला.

यशवंतरावांचे मराठी चौथीपर्यंतचे शिक्षण देवराष्ट्रे येथील प्राथमिक शाळेत झाले. नंतर त्यांच्या शिक्षणाची सोय कऱ्हाडला झाली. ते उत्तम रीतीने मराठी सातवी पास झाले. पुढे शिक्षण घेण्याची त्यांची तीव्र इच्छा दिसून आल्यामुळे त्यांना १९२७ साली टिळक हायस्कूलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांचे मधले बंधू गणपतराव हे एक अत्यंत महत्त्वाकांक्षी तरुण होते. त्यांना फक्त मॅट्रिकपर्यंतच शिक्षणाचा लाभ झाला होता. आपली शिक्षणात राहिलेली अपुरी इच्छा पूर्ण करण्यासाठी निदान धाकट्या बंधूला त्याच्या इच्छेप्रमाणे आपली अखेरची शक्ती असेपर्यंत शिक्षण दिले पाहिजे ही एकच महत्त्वाकांक्षा त्यांनी आपल्या उराशी बाळगली होती. पेहेलवान म्हणून त्यांनी आपल्या तरुणपणी सातारा जिल्ह्यात चांगलाच नावलौकिक मिळविला होता. ते यशवंतरावांना आपल्याबरोबर तालमीत नेत असत. लहानपणी यशवंतरावांना तालमीची व कुस्तीची जी आवड निर्माण झाली तिचे सारे श्रेय गणपतरावांनाच द्यावे लागेल. शाळेत यशवंतरावांचा रुबाब पेहेलवानी थाटाचा असे. त्यांना गणपतरावाप्रमाणेच धोतर व फेटा बांधण्याची मोठी हौस असे. कुस्तीच्या छंदाबरोबरच अभ्यासातही ते तल्लखबुद्धीचे म्हणून ओळखले जात.

१९३० सालच्या सुमारास महात्मा गांधींच्या असहकार चळवळीने सबंध भारत दणाणून टाकला. अनेक भारतीय क्रांतिकारक तरुणांनी ब्रिटिशांच्या पाशवी

सत्तेविरुद्ध सशस्त्र क्रांतीचे रणशिंग फुंकिले. इंग्रज सरकारने हजारो सत्याग्रहींना तुरुंगात डांबून ठेवले होते. देशात सर्वत्र ब्रिटिशांच्या शोषणवृत्तीमुळे असंतोष पसरला होता. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे पडसादही महाराष्ट्रात सर्वत्र उमटत होते. सत्यशोधक चळवळ ही सामाजिक विषमतेविरुद्ध वैचारिक क्रांती होती. स्वतः गणपतराव हे कट्टर सत्यशोधक होते. त्यांच्या चळवळ्या जीवनाचा बाल यशवंतरावावर परिणाम होणे अगदी स्वाभाविक होते. कारण भोवतालच्या सर्व घटनांची नोंद घेण्याइतके त्यांचे मन संवेदनाक्षम बनले होते. कृष्णेच्या पाण्याचे आणि कऱ्हाडच्या मातीचे गुण यशवंतरावांच्या ठिकाणी वाढत्या वयाबरोबर विकसित झाले. त्यांचे थोरले बंधू ज्ञानदेव यांनी त्यांच्या हृदय-मंदिरात ज्ञान-ज्योत प्रज्वलित केली. यशवंतरावांच्या ज्ञानप्राप्तीच्या यशात ज्ञानदेवांचा फार मोठा वाटा आहे.

यशवंतराव टिळक विद्यालयात इंग्रजी चौथीत शिकत असताना घडलेला हा अविस्मरणीय प्रसंग आहे. एकदा वर्गशिक्षक श्री. शेणोलीकर गुरुजींनी सर्व विद्यार्थ्यांना विचारले की, तुम्ही कोण होणार ? कोणी लोकमान्य टिळक, कोणी कवी यशवंत तर कोणी क्रिकेटियर होणार म्हणून सांगितले. यशवंतरावांनी “ मी यशवंतराव चव्हाण होणार ” असे छाती काढून ताठ मानेने उत्तर दिले. गुरुजींनी आश्चर्याने तोंडात बोटच घातले. स्वतःच्या अंगच्या कर्तृत्वाने मी मोठा होण्याचा प्रयत्न करणार आहे, हाच त्यांचा आत्मविश्वास या उत्स्फूर्त उद्‌गारांतून गुरुजींना दिसून आला. याची साक्ष म्हणूनच की काय टिळक हायस्कूलच्या आवारातील लिंबाच्या झाडावर तिरंगी झेंडा लावून यशवंतराव आपल्या सहकारी मित्रांबरोबर झेंडावंदन करीत असत. या प्रकरणी शिक्षणाधिकाऱ्याने यशवंतरावांना विचारले की, “ हे ध्वजवंदन कोणाच्या परवानगीने करता ? ” त्यावेळी त्यांनी “ स्वयंस्फूर्तीने ध्वजवंदन करतो.” असे निधड्या छातीने सांगितले. या निर्भीड उत्तराने तो शिक्षणाधिकारी चाटच पडला. यशवंतरावांनी बेडरवृत्तीने झेंडावंदनाची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेऊन टिळक हायस्कूलवर येऊ पाहणारे सरकारी गंडांतर टाळले. तथापि या प्रकरणी त्यांना अठरा महिन्यांचा सश्रम कारावास भोगावा लागला. विद्यार्थी दशेतील अशा या कोवळ्या वयात यशवंतराव पुणे येथील येरवडा तुरुंगात शिक्षा भोगीत होते. कारागृहात आचार्य भागवत यांचे त्यांना सान्निध्य लाभले. बालवयातील या तुरुंगवासाने त्यांच्या भावी कर्तबगारीचा पाया घातला गेला.

येरवड्याच्या तुरुंगातून सुटका झाल्यावर यशवंतरावांनी पुन्हा आपला विद्याभ्यास सुरू केला. हायस्कूलमध्ये असताना त्यांचे मराठी, इतिहास व गणित हे विषय फार चांगले होते. त्यांची स्मरणशक्ती तीव्र असल्यामुळे एकदा वाचलेला मजकूर ते सहसा विसरत नसत. हायस्कूलमध्ये असताना त्यांना लेखनाचाही नाद होता. दारूच्या दुष्परिणामासंबंधी बाजी नावाची एक हृदयद्रावक कथा त्यांनी लिहिली होती. १९३० सालानंतर कऱ्हाडात गाजलेल्या सुप्रसिद्ध छत्रपती मेळ्याची पदे

यशवंतरावांनीच रचली होती. मेळ्यात आणि नाटकात लहानपणी त्यांनी अनेक वेळा कामे केली. शालेय जीवनात ते कवी होते हे सांगूनही खरे वाटणार नाही. राष्ट्रीय वृत्तीनेच प्रेरित होऊन त्यांनी कविता आणि गाणी रचली. ते तरुण असताना कुस्त्या करीत; परंतु केवळ पेहेलवानी पेशात धुंद झाले नाहीत. त्यांच्या काव्यगुणा-संबंधीही तसेच म्हणावे लागेल. पेहेलवानी उमदेपणा जसा आजही त्यांच्या ठिकाणी आढळून येतो तसा कविमनाचा मोकळेपणा त्यांच्याशी सहज चर्चा करताना नेहमी पाहावयास मिळतो.

यशवंतरावांवर विद्यार्थीदशेत कौटुंबिक जबाबदारी जरी पडली नाही तरी घरच्या गरिबीची जाणीव त्यांच्या मनाला नेहमी कष्टी करीत असे. त्यामुळे यशवंतराव मराठी शाळेतील शिक्षणापासून आपल्यावरील अभ्यासाची जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडीत असत. शालेय अभ्यासाबरोबर इतर वाचनाचाही त्यांना छंद होता. वक्तृत्वकलेत तर त्यांनी अनेक वेळा प्राविण्य मिळविले होते. १९३० साली पुणे येथे विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्वस्पर्धा आयोजित करण्यात आली होती. श्री. न. चिं. केळकर, श्री. श्री. म. माटे आणि श्री. शि. ल. करंदीकर या स्पर्धेचे परीक्षक म्हणून होते. यशवंतरावांना ग्रामसुधारणा हा विषय देऊन दहा मिनिटे बोलावयास वेळ दिला. त्यांच्या भाषणाचे परीक्षकांना इतके कौतुक वाटले की, त्यांनी आणखी दहा मिनिटे वेळ देऊन यशवंतरावांना बोलावयास सांगितले. आनंदाची गोष्ट ही की, ते या वक्तृत्व-स्पर्धेत सर्वप्रथम आले व त्यांना दीडशे रुपयांचे पारितोषिक मिळाले. तथापि या बक्षिसाचा उपभोग त्यांना आपल्या मनाप्रमाणे घेता आला नाही, ही दुःखाची गोष्ट होय. असहकाराच्या चळवळीत सक्रिय भाग घेतल्याबद्दल त्यांना तुरुंगाची शिक्षा व दंड झाला होता. त्या दंडाच्या वसुलीत त्यांच्या वक्तृत्वाचे हे मानधन हिरावून नेले गेले.

१९३४ साली यशवंतरावांनी मॅट्रिकची परीक्षा पास केली आणि ते पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरला गेले. राजाराम कॉलेजमध्ये शिकत असताना प्रा. ना. सी. फडके यांच्या तर्कशास्त्र शिकविण्यावर ते फार खूष असत. डॉ. बाळकृष्णांचे ते आवडते विद्यार्थी होते. यशवंतराव कोल्हापूरला ज्या चाळीत राहात होते तेथे चोरी झाली आणि इंटरची फी भरण्यासाठी घरून कसेबसे पैसे आणले होते तेही चोरीस गेले. आता काय करावे म्हणून ते खोलीत दुःखी होऊन बसले. इतक्यात त्यांचे मित्र गौरीहर सिंहासने तेथे आले. त्यांना घडलेला सारा प्रकार समजला. मित्रप्रेमा-मुळे त्यांनी इंटरच्या परीक्षेची फी भरली व यशवंतरावांची काळजी दूर केली. इंटर-मध्ये ते उत्तीर्ण झाले. कऱ्हाडचे राजकारण करून शिवाय त्यांनी कोल्हापूरला बी. ए. पर्यंत मजल गाठली. १९४० साली पुणे येथील लॉ कॉलेजमधून त्यांनी एल्‌एल्. बी. ची परीक्षा पास केली. नंतर वकिली व्यवसायाची सनद काढली आणि १९४२ साली कऱ्हाड येथे वकिलीचा व्यवसाय सुरू केला.

यशवंतरावांनी परीक्षा हे ध्येय मानले नाही. परंतु व्यावहारिक जगासाठी परीक्षेतील यश साध्य केले पाहिजे, याची त्यांना जाणीव होती. ज्ञानार्जनाचे खरे रहस्य त्यांनी समजून घेतले. केवळ घोकंपट्टी करून पोपटपंची करण्याची त्यांची वृत्ती नसे. स्वतंत्र विचाराच्या अध्ययनपद्धतीमुळे यशवंतरावांची प्रतिभा अधिक प्रज्वलित होत असे. त्यांना नवनवे विचार सुचू लागत. त्यामुळेच यशवंतरावांच्या बोलण्यात चमक असते व जनमनाला त्यापासून स्फूर्ती मिळते. त्यांनी आपल्या उपजत गुणांची जोपासना किती काळजीपूर्वक केली आहे ते पाहण्यासारखे आहे. ते जे वाचन करतात त्यावर मनन करतात. त्यांचे वाचन फापटपसाऱ्याचे नसते. त्यांनी एखादे पुस्तक हातात घेतल्यावर ते सहज त्यावर नजर टाकतात. त्या पुस्तकाचा आशय काय हे प्रथम ध्यानात घेतात. पुस्तक वाचता वाचता त्यातील महत्त्वाचा विचार आत्मसात करण्याचा प्रयत्न करतात. विचारांचा धागा कोठे तुटला तर ते तसेच पुढे जाणार नाहीत. पुन्हा मागची पाने चाळून तो सांधून घेतील. अशा तऱ्हेने पुस्तक वाचल्यावर त्यासंबंधी स्वतंत्र बुद्धीने व चिकित्सक पद्धतीने आपले मत बनवून नंतर ते पुस्तक हातावेगळे करतील. ज्ञानार्जन करणाऱ्या विद्यार्थ्यांना यशवंतरावांची ही अध्ययनपद्धत मार्गदर्शक ठरणारी आहे.

## भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिवीर यशवंतराव चव्हाण—

यशवंतरावांच्या देशभक्तीचा जन्म त्यांच्या लहानपणीच भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतून झाला. तिचा परिपोष महात्मा ज्योतिराव फुले, कार्ल मार्क्स, मानवेन्द्र रॉय, महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या तत्त्वप्रणालीमधून झाला आहे. माध्यमिक शिक्षण घेत असताना " माझी जन्मठेप " या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पुस्तकाचा त्यांच्या तरुणमनावर मोठा प्रभाव पडला. त्यांच्या या क्रांतिकारक विचारसरणीच्या प्रेरणेने यशवंतराव आपले तरुणपणचे मित्र श्री. राघूअण्णा लिमये यांच्यासह सावरकरांना भेटण्यासाठी कऱ्हाडहून रत्नागिरीस पायी चालत गेले होते. सावरकरांच्याजवळ क्रांतिकारक नेतृत्वाचा प्रदीप असला तरी तो लोकशाही समाजवादास पोषक नाही, असे थोड्याच कालावधीत त्यांचे मत झाले. इतिहासाकडे केवळ मार्गदर्शक म्हणून पाहिले पाहिजे व भारताचा नवा इतिहास घडविण्याची जबाबदारी आपण पत्करली पाहिजे, या महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन ते कार्यास लागले.

बेचाळीसच्या भारतीय काँग्रेसच्या मुंबई येथील बैठकीस यशवंतराव आपल्या सहकाऱ्यांसह उपस्थित होते. महात्मा गांधींच्या चले जाव ठरावास याच अधिवेशनात मान्यता मिळाली. सरकारने वर्किंग कमेटीच्या सर्व पुढाऱ्यांना त्याच रात्री अटक केली. दुसरे दिवशी देशभर हरताळ, सभा यांनी भारतीय वातावरण दुमदुमून गेले. कऱ्हाडची जनता यशवंतरावांच्या आगमनाची मोठ्या आतुरतेने मार्गप्रतीक्षा करीत होती. ते भूमिगत क्रांतिवीराच्या नवीन रूपात प्रगट झाले. त्यांनी सांगितले, " ही चळवळ

तुरुंगभरतीची नाही. करू किंवा मरू या ईर्षेने हा स्वातंत्र्यलढा लढवायचा आहे. ब्रिटिश सत्तेविरुद्ध आपणांस आम जनतेची क्रांती करावयाची आहे. या क्रांतीच्या होमकुंडात प्रसंगी स्वतःचीही आहुती द्यावी लागेल, एवढी ज्यांची तयारी असेल त्यांना मी काय करावयाचे ते सांगेन." यशवंतरावांच्या या वादळी विचाराने भारावलेल्या चाळीस पन्नास विद्यार्थ्यांनी शाळा सोडली व ते प्रत्यक्ष चळवळीत सामील झाले. क्रांतिकारक उठावाची प्रेरक शक्ती म्हणून काही महिन्यांतच यशवंतरावांना पकडून देण्यासाठी ब्रिटिश सरकारने एक हजार रुपयांचे बक्षीस लावले.

क्रांतिवीर नाना पाटील यांना ग्रामीण भागातील प्रचाराचे प्रभावी तंत्र आत्मसात असल्यामुळे बेचाळीसच्या लढ्याच्या उठावाला त्यांचा फार मोठा उपयोग झाला. त्यांचे नाव जनतेच्या जिभेवर नाचू लागले. यशवंतरावांना फलटणला अटक होईपर्यंत प्रतिसरकार चळवळीचे नेतृत्व त्यांच्याकडेच होते. क्रांतिवीर नाना पाटलांच्या बद्दल यशवंतरावांना कमालीचा आदर असे. १९४६ साली सातारा जिल्ह्यातील सर्व भूमिगत कऱ्हाड तालुक्यातील कोणेगावी प्रगट झाले. त्यावेळी क्रांतिसिंह नाना पाटलांचा भव्य सत्कार यशवंतरावांनी घडवून आणला होता. सातारा जिल्ह्यातील ही महान शक्ती त्यांना टिकवावयाची होती. तथापि कुंडलगटाची अरेरावी इतकी वाढली की, नाना पाटलांच्या नावाचा दुरुपयोग होऊन दहशतवादी प्रवृत्तीने हैदोसदुल्ला घातला. अशा वेळी भूमिगतांची दहशतवादी वृत्ती नाहीशी व्हावी म्हणून यशवंतरावांनी प्रयत्न केला आणि सातारा जिल्ह्यात काँग्रेस जिवंत ठेवली.

यशवंतरावांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले शिक्षण पूर्ण करून वकिलीची सनद घेतली. कायद्याचा व्यासंग ठेवण्याची अभ्यासू वृत्ती, प्रभावी वक्तृत्व आणि राजकीय जीवनामुळे सर्वत्र झालेला परिचय यांच्या जोरावर त्यांनी अवघ्या सहा महिन्यांच्या आत आपल्या वकिली व्यवसायाचा चांगला जम बसविला. आपल्या मुलाचे लग्न व्हावे अशी वृद्ध मातोश्री विठाबाईची इच्छा होती. आईच्या इच्छेला मान देऊन यशवंतरावांनी आपल्या सहचारिणीची निवड केली. १९४२ सालच्या मे महिन्यात फलटणच्या मोरे घराण्यातील वेणूताई या सुकन्येशी त्यांचा मोठ्या थाटात विवाह झाला. सुखी संसाराचे सुखस्वप्न सौभाग्यवती वेणूताईंनी आपल्या मनात खचितच रंगविले असेल. मातोश्री विठाबाईंना तर केवढी धन्यता वाटली असेल. तथापि यशवंतरावांना मात्र देशाची हाक सतत बेचैन करीत असे. वकिलीचा व्यवसाय की स्वातंत्र्य लढा यातील द्वंद्वाने त्यांच्या मनात काहूर माजले. शेवटी मायभूमीच्या हाकेला त्यांनी ओ दिली आणि स्वातंत्र्यलढ्यासाठी ते भूमिगत झाले.

यशवंतराव भूमिगत असताना त्यांच्या कुटुंबियांना पोलिसांचा अमानुष त्रास भोगावा लागला. त्यांना हजर होण्यास भाग पाडावे म्हणून पोलिसांनी सौ. वेणूताईंना अटक केली. मधले बंधू गणपतराव यांनाही अटक करून डांबून ठेवण्यात आले. अशा वेळी थोरले बंधू ज्ञानदेव यांचे ऑपरेशन झाले व दुर्दैव असे की, त्यातच त्यांना

मृत्यू आला. अगदी आकाश फाटल्यासारखे झाले. अशाही बिकट परिस्थितीत त्यांनी धीर न सोडता मोठ्या धैर्याने इंग्रजी अधिकाऱ्यांना दे माय धरणी ठाय करून सोडले. मित्रांच्या शक्तीवरच यशवंतरावांनी प्रचंड विरोधाला आणि कित्येक संकटांना धीमेपणाने तोंड दिले. जीवनातील सर्व तऱ्हेच्या प्रतिकूल परिस्थितीवर त्यांनी धैर्याने मात केली. या यशाचे मूळ कारण त्यांच्या क्रांतिकारी वैचारिक नेतृत्वात आणि अभ्यासू राजकारणात आहे. स्वातंत्र्य-चळवळीतील त्यांची असाधारण कामगिरी भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखी आहे.

यशवंतरावांना तीन विरोधी शक्तींशी लढा द्यावा लागला. इंग्रज हे त्यांचे बाहेरील जबरदस्त शत्रू तर महाराष्ट्रातील सरंजाम वर्ग व स्वतःला सुशिक्षित म्हणविणारा समाज अशा दोन परंपरागत वर्चस्व संपादन करणाऱ्या शक्ती त्यांच्या नेतृत्वाला आव्हान करणाऱ्या होत्या. ते एका सामान्य शेतकऱ्याच्या कुटुंबातील म्हणून हिणविण्याचा कुत्सित प्रयत्न दोन्ही वर्गांकडून केला गेला. तथापि यशवंतरावांनी मोठ्या मुत्सद्देगिरीनें केव्हां अशा वर्गाशी सहकार्य करून तर प्रसंगी त्याच्याशी दोन हात करून लोकशाहीत निर्माण होणारे नवे नेतृत्व संघटित केले. त्यांचे कित्येक मित्र विरोधी पक्षात गेले असले तरी त्यांची मैत्री कायम आहे. कारण एकमेकांना समजून घेण्याची व समजूत देण्याची प्रवृत्ती त्यांच्या ठिकाणी आहे. त्यांच्या ठिकाणी मित्रप्रेम जसे अमर स्वरूपात पाहावयास मिळते तसेच त्यांच्याजवळील राजकीय ध्येयवाद व पक्षनिष्ठा विशुद्ध स्वरूपात दिसून येतात. यशवंतरावांच्या व्यक्तिगत चारित्र्य-शुद्धतेबद्दल त्यांचे शत्रूही खुल्या दिलाने ग्वाही देतात.

## निवडणुकींच्या राजकारण-रथाचे सारथी यशवंतराव चव्हाण—

१९४६ सालच्या सार्वजनिक निवडणुकीनंतर यशवंतराव खेर मंत्रिमंडळात गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. त्यावेळी त्यांचे वय अवघे बत्तीस वर्षांचे होते. त्यांच्यावर राज्यकारभाराची जेवढी जबाबदारी होती त्याहून अधिक पक्षसंघटनेची होती. महात्मा गांधींनी स्वातंत्र्याच्या चळवळीचे लोण बहुजनसमाजापर्यंत पोचविले. त्यापूर्वी या राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप फक्त मूठभर पुढारलेल्या व श्रीमंत वर्गापुरतेच मर्यादित होते. महात्मा गांधींच्या सत्याग्रहाच्या अभिनव तंत्राने सामान्य माणसालाही स्वातंत्र्याच्या लढ्यात सामील होण्याची संधी मिळाली. त्यांनी कॉंग्रेसला लोकशाही समाजसंघटनेचे विराट स्वरूप दिले. त्यांच्या या नव्या दृष्टीमुळे देशभक्त केशवराव जेधे यांच्यासारखे सत्यशोधक समाजाचे पुढारी त्यांच्या असंख्य अनुयायांसह गांधीजींच्या चळवळींत सहभागी झाले. बहुजनसमाजातील हजारो कार्यकर्त्यांनी त्यावेळी कॉंग्रेस प्रवेश केला. यशवंतरावांना या गोष्टीमुळे अत्यंत समाधान वाटणे अगदी स्वाभाविकच होते. कॉंग्रेसच्या राष्ट्रीय धोरणातूनच आपण मागासलेल्या बहुजनसमाजाचे हित करू शकू अशी त्यांची बालंबाल खात्री झाली होती.

सेहेचाळीसची सार्वत्रिक निवडणूक झाली खरी; पण जेव्हा मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रश्न आला तेव्हा बहुजनसमाजातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना योग्य प्रमाणात अधिकाराच्या जागा मिळाल्या नाहीत. त्यांची खेर महाशयांनी घोर निराशा केली. बहुजनसमाजाची उपेक्षा झाली या समजुतीतून १९४७ साली महाराष्ट्रात शेतकरी-कामकरी पक्षाची स्थापना झाली. या नवीन पक्षाला अत्यंत त्यागी आणि अनुभवी नेतृत्व मिळाले. केशवराव जेधे व शंकरराव मोरे यांच्या नेतृत्वाखाली बहुजनसमाजातील बहुतेक पुढारी मंडळी एकत्र आली. भारताच्या राष्ट्रीय राजकारणाचे प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्रात असा स्वतंत्र पक्ष काढून त्याचे द्वारा बहुजनसमाजाचे हित साध्य होईल असे यशवंतरावांना वाटत नव्हते. शेवटी शेतकरी कामगार पक्षात पुढाऱ्या-पुढाऱ्यांत लहान-मोठेपणाची भांडणे सुरू झाली आणि त्या पक्षातील बहुतेक सर्व पुढारी मंडळी परत काँग्रेसमध्ये भाऊसाहेब हिरे व यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जमा झाली.

देशभक्त केशवराव जेधे व शंकरराव मोरे यांनी १९४७ साली काँग्रेस सोडल्यावर भाऊसाहेब हिरे यांनी काँग्रेसची पडती बाजू सावरण्याचा अहोरात्र प्रयत्न केला. जेधे–मोरे यांच्यासारख्या मुरलेल्या पुढाऱ्यांची पोकळी भरून काढणे काही सोपे काम नव्हते. अशा आणीबाणीच्या प्रसंगी भाऊसाहेब यशस्वी झाले तर महाराष्ट्रातील काँग्रेस यशस्वी झाली, या जाणिवेने यशवंतरावांनी भाऊसाहेबांचे नेतृत्व स्वीकारून काँग्रेसनिष्ठा टिकविण्यासाठी जिवाचे रान केले. १९५० साली पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली नासिकला काँग्रेसचे अधिवेशन भरविण्यात भाऊसाहेब हिरे यांचाच पुढाकार होता. यशवंतरावांनी भाऊसाहेब हिऱ्यांना सर्वप्रकारे साथ दिली. तथापि त्यांच्या नेतृत्वातील उणीवा यशवंतरावांना माहीत असल्यामुळे त्यांनी पक्षातील हितशत्रूंपासून अत्यंत सावधगिरीने आपली पावले उचलली. नव्या मुंबईराज्याच्या पक्षनेतेपदी जेव्हा यशवंतरावांची निवड झाली तेव्हा भाऊसाहेबांनी विधायक दृष्टिकोनातून यशवंतरावांचे नेतृत्व स्वीकारले व आमरण काँग्रेसची सेवा केली. भाऊसाहेबांनी अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगी महाराष्ट्रातील काँग्रेस संघटना मजबूत करण्याचे भगीरथ प्रयत्न केले ही त्यांची एक मोठी ऐतिहासिक कामगिरी म्हणावी लागेल.

१९५२ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत यशवंतरावांनी अखिल महाराष्ट्रात तुफानी दौरा केला. आपल्या प्रभावी वक्तृत्वाने महाराष्ट्रात काँग्रेसला मोठे यश मिळवून दिले त्यानंतर त्यांचा मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात समावेश झाला. त्यांनी पुरवठा खात्याचा कारभार मोठ्या हिमतीने चालवून केंद्रीय अन्नमंत्री रफी महमद किडवाई यांना आपली कार्यक्षमता पटवून दिली. स्थानिक स्वराज्यमंत्री असताना त्यांनी स्वतः युरोप, अमेरिकेतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराविषयी सखोल वाचन केले. भारतात आपल्या परिस्थितीला अनुरूप कोणता बदल करता येईल याचा त्यांनी विचार केला. ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया असल्यामुळे व

त्यांचा विस्तारही मोठा असल्यामुळे ग्रामपंचायतीची संघटना आवश्यक वाटून यशवंतरावांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या सहकार्याने मुंबईराज्य ग्रामपंचायत संघाची स्थापना केली. १९५४ साली ग्रामपंचायत परिषदेच्या अधिवेशन प्रसंगी ते म्हणाले की, " ग्रामपंचायती केवळ खेडेगावचा कारभार चालविणाऱ्या यंत्रणा नव्हेत तर त्यांच्यावर खेडेगावातील समाजजीवनाचे सर्व तऱ्हेचे कल्याण करण्याची जबाबदारी आहे. ग्रामपंचायतींनी ग्रामीण जीवनाच्या आर्थिक व सामाजिक समतेसाठी झटावे. लोकशाही कारभाराचे प्रत्यक्ष शिक्षण घेण्याची ही पाठशाळा आहे. ग्रामपंचायतींनी आपसातील तंटे न वाढविता देशाला चांगले पुढारी पुरविले पाहिजेत. "

यशवंतरावांनी नवी वैचारिक दृष्टी आपल्या कारभारात आणली. पुरोगामी ध्येयवादी प्रशासक म्हणून त्यांनी सर्वत्र नावलौकिक मिळविला. मुंबई राज्याचा मुख्यमंत्री होण्याचा मान त्यांना वयाच्या अवघ्या बेचाळीसाव्या वर्षी मिळाला, ही एकच गोष्ट यशवंतरावांच्या अद्वितीय कर्तबगारीची साक्ष देण्यास पुरेशी आहे. संयुक्त महाराष्ट्राबाबतची यशवंतरावांची भूमिका मेरूपर्वताप्रमाणे अचल होती. त्यांची राजकीय दृष्टी अभ्यासू असल्यामुळे त्यांची नेहरू-निष्ठा वैचारिक स्वरूपाची आहे. ते नेहरूंना भारतीय संस्कृतीचे प्रतीक मानतात. नेहरू म्हणजे लोकशाहीचा आत्मा अशी त्यांची धारणा आहे. नेहरू म्हणजे एक व्यक्ती नसून भारताची पुरोगामी शक्ती आहे, म्हणूनच नेहरू-निष्ठा म्हणजे भारत-निष्ठा आणि लोकशाही-निष्ठा होय. यशवंतरावांना महाराष्ट्राचे जवाहर म्हणून सारा महाराष्ट्र ओळखतो तो याच कारणासाठी होय.

१९५५ सालच्या महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सभेत संयुक्त महाराष्ट्राबद्दलची आपली भूमिका त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितली. ते म्हणाले, " संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाकडे केवळ तात्त्विक दृष्टीने न पाहता त्याच्या विविध अंगांनी पाहिले पाहिजे. ज्या तत्त्वासाठी काँग्रेस झुंजली आहे त्या तत्त्वास अनुसरून असलेले मार्ग व साधने अवलंबून काँग्रेसच्या शिस्तीच्या चौकटीत राहून आपणांस संयुक्त महाराष्ट्राचे उद्दिष्ट गाठावयाचे आहे. ज्यायोगे काँग्रेस संघटना दुबळी होईल असे कोणतेही कृत्य करणे हे देशाच्या एकतेस, दृढतेस व सामर्थ्यास विघातक आहे. संयुक्त महाराष्ट्राचे ध्येय गाठण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मन वळविणे आणि हृदयपरिवर्तन करविणे हेच आपले मार्ग आहेत. लढा, मोर्चा आणि संप यासारख्या मार्गांना आमच्या योजनेत स्थान मिळू शकणार नाही. या बाबतीत काँग्रेसजनांनी आपल्या मनात पूर्णपणे स्पष्ट असले पाहिजे. "

१९५६ च्या ऑक्टोबरमध्ये लोकसभेने विदर्भासह विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना करण्याच्या बाजूने आपला कौल दिला. १९५६ च्या १ नोव्हेंबरला विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना होऊन ते या राज्याचे मुख्य मंत्री झाले. १९५७ मध्ये नोव्हेंबर महिन्याच्या ३० तारखेला प्रतापगडावर शिवस्मारकाचे उद्घाटन पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते झाले. यावेळी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने द्विभाषिक निषेध मोर्चा निघाला होता. या परिस्थितीत राजकीय

वातावरण फार गरम झाले होते; परंतु श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या कुशल नेतृत्वामुळे तप्त झालेले वातावरण शांत झाले.

१९५८ च्या सप्टेंबर महिन्यात त्यांची अखिल भारतीय काँग्रेसच्या वर्किंग कमिटीवर नियुक्ती झाली. १९५९ च्या ऑगस्ट महिन्यात त्यांनी फार महत्त्वाचा निर्णय घेऊन काँग्रेसश्रेष्ठांना तो कळविला. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्याबाबतचा तो निर्णय होता. " द्विभाषिक राज्याचा कारभार यशस्वी होत असला तरी राज्यातील जनतेत एकात्मतेची भावना निर्माण झाली नाही म्हणून मुख्य मंत्री या नात्याने यापुढे या द्विभाषिक प्रांताचा कारभार मी चालवू शकणार नाही. " असे यशवंतराव म्हणाले. याचा परिणाम काँग्रेसश्रेष्ठींवर झाला. द्विभाषिक मुंबई राज्याच्या पुनर्रचनेबाबत विचार होऊन मुंबईसह मराठी प्रदेशाचे एक व गुजरात प्रदेशाचे दुसरे अशी दोन राज्ये निर्माण करण्याचा निर्णय काँग्रेसश्रेष्ठींनी नेमलेल्या नऊ सदस्य समितीने घेतला. महाराष्ट्रातील लोकांच्या कित्येक शतके अपूर्ण राहिलेल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण झाल्या. त्यांच्या भाव-भावना साकार झाल्या. भारतीय जनतेचे हृदयसम्राट महामंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांनी अमृताने भरलेला महाराष्ट्राचा सुवर्णकलश श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हाती दिला. १ मे १९६० रोजी नवे महाराष्ट्रराज्य अस्तित्वात आले. मुख्य मंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची कारकीर्द अविस्मरणीय अशीच झाली.

## सत्ता-सुदर्शनचक्रधारी यशवंतराव चव्हाण—

वर्षानुवर्षे संथपणाने चालणारा इतिहासाचा प्रवाह क्षणार्धात अशा काही वेगाने उफाळून वाहू लागतो की, त्यामुळे व्यक्तीचे, समाजाचे आणि राष्ट्राचे जीवन आमूलाग्र बदलून जाते. यशवंतरावजींच्या नेतृत्वामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांत नेत्रदीपक क्रांती झाली आहे. या क्रांतीमागे त्यांनी वेळोवेळीं प्रदर्शित केलेल्या महत्त्वाच्या विचारांचेही प्रचंड बळ उभे आहे. लोकशाही आणि राष्ट्रीय एकता यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्याच नव्हे तर सबंध भारताच्याही उत्कर्षाचे विचार त्यांनी आपल्या भाषणातून मांडलेले आहेत. भारताचे भावनात्मक ऐक्य आणि त्याचा आर्थिक विकास यावर आपणा सर्वांचे भवितव्य अवलंबून आहे. भारताच्या सध्याच्या विशिष्ट परिस्थितीत त्यांच्या दृष्टीने शिक्षणाला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. सहकार हा भारताच्या आर्थिक विकासाचा त्यांनी पाया मानला आहे. त्यांना इतिहासाची दूरदृष्टी लाभलेली आहे. विविध प्रश्नांच्या अंतरंगात शिरून त्यांचे मूळ शोधणारी तत्त्वचिंतक वृत्ती त्यांच्याजवळ आहे. लोकशाही समाजवाद आणि मानवता या मूलभूत मूल्यांवर त्यांचा अढळ विश्वास आहे. त्यांच्या विचारांचे, भावनांचे आणि प्रेरणांचे स्वच्छ प्रतिबिंब त्यांच्या विविध भाषणातून उमटलेले असून भारताच्या उत्कर्षाशी ते एकरूप झाले आहेत. त्यांचे तादात्म्य हीच त्यांच्या जीवनाची सर्वात मोठी प्रेरणा आहे.

१९६० साली सांगली येथे सत्कार समारंभाच्या प्रसंगी महाराष्ट्राच्या जीवनातील जे सामाजिक प्रश्न आहेत त्यासंबंधाने बोलताना ते म्हणाले, " जातीयवादाच्या विषारी विचारापासून आपण महाराष्ट्राला मुक्त केले पाहिजे; जातीयवादाचा हा विचारच समूळ नष्ट केला पाहिजे; तेव्हाच महाराष्ट्राचे सामाजिक मन एकजिनसी होईल. परंतु हे कार्य एका दिवसात होऊ शकणार नाही. महाराष्ट्रातील विचारवंत माणसांनी विचारपूर्वक प्रयत्न केल्याशिवाय हे घडून येणार नाही. महाराष्ट्राच्या निमित्ताने निर्माण होणारे राज्य हे मराठा राज्य आहे की मराठी राज्य आहे ? असले प्रश्न उभे करणे ही भंगलेले मन सांधण्याची प्रक्रिया नाही. परंतु अशा तऱ्हेचा प्रश्न उभा करून जातीय आणि संशयाचे वातावरण निर्माण करण्याचा कुणी प्रयत्न केला तर मला त्यांना जरूर सांगावयाचे आहे की, हे मराठा राज्य मुळीच होणार नाही. जोपर्यंत माझ्या हातात सत्तेची सूत्रे असतील तोपर्यंत मी हे राज्य एका जातीचे होऊ देणार नाही. ते तसे होत आहे असे वाटले तर महाराष्ट्राच्या कल्याणाकरिता कदाचित् मला एका बाजूला हटावे लागले तरी मी हटण्याचा प्रयत्न करीन. ' मराठा ' हा शब्द जातिवाचक नाही. आचार्य अत्र्यांनी आपल्या वर्तमानपत्राला ' मराठा ' हे नाव दिले ते काय तो शब्द जातिवाचक म्हणून दिले ? ' मराठा ' शब्दामागे महाराष्ट्राच्या एकजिनसी जीवनाची भावना आहे. ' मराठा ' शब्दाचा हाच अर्थ आम्हांला अभिप्रेत आहे आणि म्हणून मराठी राज्य हे कोणा एका जमातीचे राज्य मुळीच होता कामा नये, या गोष्टीवर माझा जरूर विश्वास आहे. त्यातले पहिले पथ्य असे आहे की, आपण संशयाने एकमेकांकडे पाहावयाचे नाही. संशयाचे वातावरण निर्माण झाले तर ते आपल्या हाताने दूर केले पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे गुणांची पूजा झाली पाहिजे. निवडणुका, राज्यकारभार तसेच सामाजिक महत्त्वाच्या कामात गुणांना महत्त्व दिले पाहिजे. गुणांची पूजा होणे अत्यंत जरूर आहे आणि याच भावनेचा पाठपुरावा आपणांकडून झाला पाहिजे. भंगलेले मन सांधण्याचे माझ्या मताने हेच दोन उपाय आहेत. "

नवबौद्धांच्या प्रश्नासंबंधाने यशवंतराव चव्हाण यांचे पुढील विचार अत्यंत मननीय आहेत. ते म्हणतात की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजात नवी जागृती निर्माण केली आहे. अनेक बुद्धिमान व कर्तृत्ववान तरुणांचा एक नवा वर्ग त्यांनी त्या समाजातून निर्माण केला आहे. एवढ्या मोठ्या संख्येने तुमच्या-आमच्या बरोबर जो समाज महाराष्ट्रात वावरला आणि ज्याला आपण अस्पृश्य म्हणून बाजूला फेकून दिले त्या समाजाचा स्वाभिमान आज जागृत झाला आहे. ह्या समाजात जे कर्तृत्ववान आणि बुद्धिमान लोक आहेत त्यांना आपण आता जवळ केले पाहिजे, आपलेसे केले पाहिजे. ' आम्हांला कुणाची सहानुभूती नको आहे, आमचा जो हक्क आहे तो आम्हांला मिळाला पाहिजे आणि आम्ही तो मिळविणार आहोत. ' या जिद्दीने काम करण्याची कुवत त्यांच्यात निर्माण झाली आहे. तिचे आम्ही स्वागत केलेपाहिजे. "

महाराष्ट्रातील बहुजनसमाजाच्या संबंधाने त्यांचे खालील उद्‌गार मोठेच उद्‌बोधक वाटतात. ते म्हणतात की, " शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार कराल तेव्हा सबंध महाराष्ट्रामध्ये पसरलेल्या काळ्या जमिनीतून नवीन संपत्ती काढणाऱ्या, शेतीतून सोने निर्माण करणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांचे चित्र तुमच्या डोळ्यांपुढे आले पाहिजे. बहुजनसमाज याचा अर्थ आपली एक जमात आणि आपले काही पाव्हणेरावळे असा जर कोणी करीत असतील तर ती चुकीची कल्पना आहे, हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. ही जाणीव जर आमच्या विचारांच्या पाठीमागे नसेल तर आमचे निर्णय चुकीचे येतील. कारण कोठलाही विचार हा क्रियाशील होण्यापूर्वी तो भावनेने समजून घ्यावा लागतो आणि जर भावना अपुरी असेल किंवा चुकीची असेल तर तीतून येणारा निर्णय, तीतून येणारा विचार हा अपुरा आणि चुकीचा असण्याची शक्यता असते. ब्राह्मण-ब्राह्मणेतर, मराठा-मराठेतर, अमका-अमकेतर असा विचार करण्यापेक्षा सगळ्या लोकांची, एकजिनसी कार्यकर्त्यांची सेना आम्हांला उभी करावयाची आहे, ही भावना आमच्यात असली पाहिजे आणि त्या दृष्टीने प्रयत्न करण्याची आपण खटपट केली पाहिजे. "

हल्लीच्या शिक्षणपद्धतीतून त्यांनी काढलेला निष्कर्ष तरुणांना खचितच मार्गदर्शक ठरणारा आहे. याबाबतीत ते म्हणतात की, " आजपर्यंत आम्ही ज्या तऱ्हेचे शिक्षण घेतले ते शिक्षण चांगले असेल, योग्यही असेल, परंतु त्यामुळे आमच्यात नोकरीपेशाची मनोवृत्ती निर्माण झाली आहे. आम्हांला असे सांगण्यात येते की, आमची बुद्धीच-आमचा पिंडच-नोकरीपेशाचा आहे. मला ही गोष्ट मंजूर नाही. आजपर्यंत आम्ही नोकऱ्या केल्या अशी कल्पना करू या. परंतु नोकऱ्या सुद्धा आम्हांला ब्रिटिश राजवटीतच कराव्या लागल्या. आम्ही महाराष्ट्रातले लोक तोपर्यंत शेती करीत होतो, जमले तर राज्य करीत होतो, नाही तर परस्परांशी भांडत होतो. परंतु हे नोकरी करण्याचे तंत्र, हे पेन्शनीचे वेड आमच्या डोक्यात ब्रिटिश राजवटीने भरविले. तेव्हा आमची बुद्धीच तशी आहे हे एक थोतांड आहे. आम्ही आमच्या मनातून ते काढून टाकले पाहिजे. आमच्यामध्येही काही उद्योगधंद्याचे कर्तृत्व निर्माण करता येते. ते तसे निर्माण करून व त्याची वाढ करून या क्षेत्रातही पुढे जाण्याचा आम्ही प्रयत्न करावयास पाहिजे. आम्ही आमच्यामध्ये किर्लोस्करांसारख्या व्यक्ती निर्माण केल्या. आजही आमच्या येथे मोठ्या पल्लेदार बुद्धीने विचार करणारे कारखानदार निर्माण होत आहेत, ते काय आमच्यात उद्योगधंद्याची दृष्टी नसण्याचे लक्षण आहे ? मी म्हणतो, खऱ्या अर्थाने आमच्यामध्येही ही दृष्टी आहे. फक्त आम्हांला तांत्रिक शिक्षण, वेगवेगळ्या शास्त्रांचे शिक्षण घेतले पाहिजे. अशा तऱ्हेच्या शिक्षणाला आम्ही प्राधान्य दिले पाहिजे. "

राष्ट्र आणि महाराष्ट्र यांच्या प्रवृत्ती काही परस्परविरोधी नाहीत. याबद्दल आपले विचार मांडताना ते म्हणतात की, " आमची राष्ट्रनिष्ठा आणि आमची

महाराष्ट्रनिष्ठा या एकमेकींच्या हातात हात घालून चालणाऱ्या असल्या पाहिजेत. म्हणून आपण अशी भावना निर्माण करता कामा नये की, आमच्या महाराष्ट्राच्या विरोधी, आमच्याशी वैर करणारी कुणीतरी माणसे कोठेतरी बसलेली आहेत. अशा भावनेने आपल्याच मनाने आपल्या विरुद्ध एखादा शत्रू निर्माण करून आणि त्याच्याशी आपल्याच मनातील समशेर काढून लुटूपुटीची लढाई करीत बसण्यामध्ये काही अर्थ राहिलेला नाही. आपणही पराक्रम करू शकतो, विजय मिळवू शकतो, या भावनेची आज आपणास आवश्यकता आहे. आमचे कोणी विरोधी आहेत, आमचे कोणी भले होऊ देत नाही अशी भांडखोर, रडवी, निराशावादी, विफलतेची भावना निर्माण करणारी वृत्ती आपण राजकारणातून मोडून काढली पाहिजे. तिला बाजूला टाकले पाहिजे आणि विजिगीषु भावनेने पुढे जावयाचा प्रयत्न केला पाहिजे. आम्हीही कर्तृत्व करू शकतो अशी भावना, असा आशावाद, तरुणांमध्ये, कार्यकर्त्यांमध्ये आपण निर्माण केला पाहिजे. आणि अशा भावनेतून कर्तृत्वाचा एक सुंदरसा बाग निर्माण केला पाहिजे. महाराष्ट्रातील जनतेच्या मनात विफलतेची, विषादाची आणि पराभवाची भावना निर्माण करून महाराष्ट्रात असंतोषाचे वातावरण पसरविण्याचा जे प्रयत्न करतील ते महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान करतील. पराजयवादी वृत्ती लोकांच्या मनात निर्माण करून महाराष्ट्राची शक्ती वाया घालवू नका. नवी शक्ती उभी करण्याचे तुम्हाआम्हांला इतिहासाचे आव्हान आहे. ते आम्ही स्वीकारणार की नाही यावर आमचे पुढील जीवितकार्य अवलंबून आहे. याच एका भावनेने आपण वागलो तर मला वाटते की, ही जी सफर तुम्हाआम्हांला पुरी करायची आहे ती पुरी करण्यात आपण निश्चित यशस्वी होऊ. ती लांबची सफर आहे, कष्टाची सफर आहे, उद्योगाची सफर आहे, पण ती पुरी केलीच पाहिजे, कारण त्यामध्ये जनतेचे कल्याण आहे.''

## छत्रपती शिवाजी महाराज व यशवंतराव चव्हाण—

काही मंडळी यशवंतराव चव्हाण यांची शिवाजी महाराजांबरोबर तुलना करून आपला आदर व्यक्त करतात. या बाबतीत स्वतः यशवंतरावजी काय म्हणतात ते समजावून घेण्यासारखे आहे. ''आपण माझा शिवाजी महाराजांबरोबर आणि लोकमान्य टिळकांबरोबर उल्लेख केला. पण या सर्व खोट्या तुलना आहेत. या खोट्या तुलनेमध्ये तुम्ही फसू नका आणि कृपा करून मला फसवू नका, असे माझे सांगणे आहे. एकच शिवाजी महाराज होऊन गेले आणि एकच टिळक होऊन गेले. महाराष्ट्राचा इतिहास ज्यांनी घडवला ते शिवाजी महाराज आता पुन्हा निर्माण होणार नाहीत. ब्रिटिशांच्या सत्तेखाली दबलेल्या हिंदुस्तानला स्वराज्याचा मंत्र देणारे लोकमान्य टिळक एकदाच होऊन गेले. ते आता पुन्हा होणार नाहीत. पुन्हा होणार नाहीत असे म्हणण्याचे कारण हिंदुस्तान पुन्हा परतंत्र होणार नाही हे आहे. शिवाजी महाराज व लोकमान्य टिळक ह्या ज्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे अशा महान विभूती आहेत. आपण

छोटी माणसे आहोत. मी कोणत्या मुशीत जन्माला आलो त्याची मला कल्पना आहे. या दक्षिण साताऱ्याच्या माळावरच्या एका गावात एका गरीब घरामध्ये माझा जन्म झाला, हे मला विसरता येत नाही. अशी अनेक गरीब घरे अजूनही आहेत. त्यांची माझ्या मनाला मोठी खंत वाटत आहे. या असंख्य घराघरांतून पडलेली जी असंख्य माणसे आहेत त्यांना प्रकाशात आणले पाहिजे. हे नवे काम आता आम्हांला करावयाचे आहे आणि हे काम ज्या पिढीकडे आले आहे त्या पिढीचा मी प्रतिनिधी आहे एवढाच माझा दावा आहे. ”

मुंबई येथे शिवछत्रपतींच्या पुतळ्याच्या अनावरण-प्रसंगी त्यांनी शिवाजी महाराजांच्या संबंधाने आपला नितान्त आदर व्यक्त करताना म्हटले की, “ छत्रपती शिवाजी महाराजांची स्मृती ही भारताच्या सेवेची स्मृती आहे. त्यांना मराठी मनाने निव्वळ महाराष्ट्राचे नेते मानले नव्हते. ते सबंध भारताचे नेते होते. मानव्याचा एक अत्यंत उत्कृष्ट आदर्श त्यांच्या जीवनामध्ये आपल्याला पाहावयास सापडतो. नव्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती ही छत्रपती शिवाजी राजांची पुण्याई आहे असे आम्ही मानतो. महाराजांची ही मूर्ती त्यांची निव्वळ प्रतिमा आहे, असे आम्ही मानीत नाही, तर भारतामध्ये जी तेजस्विता आहे, जी अस्मिता आहे, जो स्वाभिमान आहे, त्या तेजस्वितेचे, त्या अस्मितेचे आणि त्या स्वाभिमानाचे ही मूर्ती एक प्रतीक आहे, अशी आमची तिच्या पाठीमागची भावना आहे. म्हणून आजचा दिवस निव्वळ महाराष्ट्राच्याच इतिहासातील नव्हे तर भारताच्याही इतिहासातील एक सोन्याचा दिवस आहे. ”

छत्रपती शिवाजी महाराजांनी सामान्य माणसात राष्ट्रप्रेम निर्माण केले. या संदर्भात यशवंतरावजी म्हणाले की, “ मावळच्या खेड्यातील लंगोटी घालणाऱ्या साध्या शेतकऱ्याला त्यांनी शूर शिपाई बनविला. मोडकी तोडकी भीमथडीची तट्टे त्यांनी आपली विमाने बनविली आणि त्यांच्या बळावर आपली सेना त्यांनी सबंध हिंदुस्थानभर विखुरविली. असा हा सामान्य माणसांचा राजा होता. तो नीतीचे व चारित्र्याचे प्रतीक होता. म्हणून मुंबई शहरातील शेकडो जाती, शेकडो भाषा आणि सगळे धर्म यांचे प्रतिनिधी आज छत्रपती शिवाजी महाराजांना प्रणाम करण्यासाठी येथे एकत्र आले आहेत. धन्य शिवाजी महाराजांच्या स्मृतीची आणि धन्य महाराष्ट्र भूमीची की तिने असा महापुत्र प्रसवला. ”

महाराष्ट्र राज्य निर्मितीप्रीत्यर्थ शिवनेरी येथे यशवंतरावजींनी ऐतिहासिक आलोचनात्मक जे विचार प्रदर्शित केले, त्यावरून त्यांची राष्ट्रनिष्ठा प्रत्ययास येते. ते म्हणाले की, “ भारताचे राज्य जे निर्माण झाले त्यामागे अनेकांच्या भावनांचा संगम झालेला आहे. स्वतंत्र भारताचे राज्य एक-दोन शतकांकरिता निर्माण झालेले नाही. पूर्वीच्या काळीं राजे आले आणि गेले, पातशाह्या आल्या आणि गेल्या,

परकीय सत्ता आली आणि गेली पण आता भारताचे राज्य तसेच जाण्यासाठी जन्माला आलेले नाही. आज भारतात चाळीस कोटी लोकांचे जे राज्य निर्माण झालेले आहे ते भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याचा अभिमान जोपर्यंत जागृत आहे तोपर्यंत टिकणार आहे आणि म्हणून मी म्हणतो की, हे स्वतंत्र भारताचे राज्य यावच्चंद्रदिवाकरौ टिकणारे आहे. आजपासून पुढे अनंतकाळपर्यंत महाराष्ट्र भारताशी समरस होऊन सांगणार आहे की, आमच्या मराठी जीवनात जे जे काही चांगले, मंगल आहे, ते ते भारताच्या सुखसमृद्धीसाठी, संरक्षणासाठी आणि सेवेसाठी आम्ही देणार आहोत. जी अपूर्णता, जे दोष असतील ते आम्ही आमच्यापाशी ठेवणार आहोत. आम्ही प्रथम भारतीय आणि नंतर महाराष्ट्रीय आहोत."

महाराष्ट्रातील वीर पुरुषांच्या परंपरेबद्दल ते म्हणतात की, "वीर, पराक्रमी, राजकारणी पुरुषांचे प्रतीक म्हणजेच शिवाजी महाराज होत. अन्यायाविरुद्ध दलितांचा कैवार घेऊन लढण्याची परंपरा महात्मा फुल्यांनी आपणाला दिली आहे. विद्वानांच्या बुद्धिमत्तेचा वापर देशासाठी करून त्या मार्गाने वाटेल तो त्याग हसतमुखाने सहन करण्याची राजकारणी प्रवृत्ती लोकमान्य टिळकांनी या महाराष्ट्राला दिली आहे. आपला हा जो वारसा आहे त्याची आपणाला जाणीव ठेवावयाची आहे. संकटे आली तर त्यांना निधड्या छातीने झेलल्याशिवाय ती संपणार नाहीत. त्यांना पाठ दाखविली की ती अधिकच पाठीशी लागतात. दुःखात असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सावली निर्माण करणे हे कार्य आता प्रत्येक मराठी माणसाने केले पाहिजे. भारता-बरोबर महाराष्ट्र आपणाला मोठा करावयाचा आहे, भारत जगेल तरच महाराष्ट्र जगणार आहे, वाढणार आहे. आमच्या महाराष्ट्रीय परंपरेत जे जे पवित्र आणि उच्च असेल ते ते भारताच्या उत्थापनासाठी आम्ही देणार आहोत. देवा, आम्हांला अशी दानत आणि शक्ती दे की, हे महाराष्ट्र राज्य जनतेचे राज्य होईल. ते राज्य लोककल्याणाकरिता झटेल आणि भारताच्या नकाशावरील ताऱ्यात एका नव्या तेजस्वी ताऱ्याची भर टाकील." शिवनेरीच्या गडावर बाल शिवाजी व राजमाता जिजाबाई यांच्या प्रतिमेचे उद्घाटन करून श्रीशिवछत्रपतींना त्यांनी मुजरा केला आणि नव्या महाराष्ट्र राज्याची घोषणा केली, त्यावेळी काढलेले वरील उद्गार भक्तिसामर्थ्याने किती ओथंबलेले आहेत याची आपणास कल्पना येते.

महाराष्ट्र राज्याच्या उद्घाटन समारंभप्रसंगी त्यांनी सह्याद्रीच्या संबंधाने व्यक्त केलेले आत्मविश्वासाचे विचार पाहा : "उंचउंच शिखरे असलेला बर्फाच्छादित हिमालय हे भारताचे प्रतीक आहे, तर दोनशे-तीनशे इंच पावसाचा मारा आपल्या डोक्यावर घेणारा काळ्या फत्तराचा सह्याद्री आमचे प्रतीक आहे. आणि जर कधी भारताच्या हिमालयावर संकट आलेच तर महाराष्ट्राचा हा सह्याद्री आपल्या काळ्या फत्तराची छाती हिमालयाच्या रक्षणाकरता उभी करील असे मी आपणाला आश्वासन देऊ इच्छितो."

**विचार-आचारांचा सुंदर समन्वय साधणारे यशवंतराव चव्हाण—**

दिनांक १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. त्याप्रसंगी मराठी माणसाच्या कर्तव्यासंबंधाने त्यांनी खालील उद्‌गार काढले. “ आमच्या जुन्या परंपरांना अनुलक्षूनच दुरितांचे तिमिर जावो हे वरदान मी मागत आहे. ही आमची प्रार्थना ज्ञानेश्वरांनी आम्हांला शिकविलेली आहे. अमंगलतेचा अंधकार दुनियेवरून नाहीसा होवो व मांगल्याचा सर्वत्र प्रकाश पडो हे तत्त्वज्ञान आम्हाला आमच्या संतांकडून मिळाले आहे. समानतेचे तत्त्व त्यांनी आम्हांला शिकविले आहे आणि अन्यायाचा प्रतिकार करायलाही त्यांनी आम्हांला शिकविले आहे. महाराष्ट्राची भूमी अनेक संत, पराक्रमी वीर, त्यागी समाजसुधारक व विद्वान देशभक्त यांच्या वास्तव्याने पुनीत झालेली आहे. संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व लोकमान्य टिळक ही आमची प्रातिनिधिक प्रतीके आहेत. त्यांनीच महाराष्ट्राच्या संस्कृतीची जोपासना केली व तिचा वारसा आपल्या हाती दिला. हा अमोल ठेवा आपल्या हृदयात जपून ठेवणे व त्याचा विकास करणे हे प्रत्येक मराठी माणसाचे आद्य कर्तव्य ठरते. ”

यशवंतरावजींच्या अंतःकरणात महाराष्ट्रातील संत परंपरेबद्दल केवढा नितांत आदर आहे याचे प्रत्यंतर त्यांनी काढलेल्या खालील उद्‌गारावरून दिसून येते. ते म्हणतात की, “ आमच्या मराठी साधुसंतांची परंपरा मुक्तेश्वर–ज्ञानेश्वरापासून तो आज विनोबांपर्यंत समतेचा, न्यायाचा व बंधुभावाचा संदेश देत असताना मला दिसत आहे. विनोबांचे, गाडगे महाराजांचे बोल आपण ऐकले. संत तुकडोजी महाराज नागपूर भागात तोच संदेश देण्याचे कार्य करतात. ही आमच्या मराठी संतांची उज्ज्वल परंपरा आहे. आम्ही तिचे वारस आहोत. ”

यशवंतरावांच्या सेहेचाळीसाव्या वाढदिवस समारंभप्रसंगी सांगली येथे त्यांनी काढलेले पुढील उद्‌गार त्यांच्या विनम्र स्वभावाची साक्षच देत नाहीत काय ? “ महाराष्ट्राच्या रचनेचा प्रश्न हा निव्वळ यशवंतराव चव्हाणांनी सोडविला आहे, असे आपण कृपा करून समजू नका. त्याच्या पाठीमागे महाराष्ट्रातील चार कोटी जनतेच्या वाढलेल्या भावना आहेत. त्याच्यासाठी अनेक विचारवंत, इतर पक्षातील कार्यकर्ते, या सर्वांच्या प्रतिष्ठा पणाला लागलेल्या आहेत. समाजामधील कर्तृत्ववान मनुष्य हा समाजाला सोडून कर्तृत्व करूच शकत नाही. नवनीत म्हणजे आपण ज्याला लोणी म्हणतो ते दुधातून येते. दूध नसेल तर लोणी नाही. नवनीताला स्वतंत्र अस्तित्व असते ही खोटी गोष्ट आहे. तीच गोष्ट कुठल्याही कर्तृत्ववान दिसणाऱ्या माणसाच्या जीवनासंबंधीही खरी आहे, असे माझे मत आहे. ”

लोकशाहीत कर्तृत्ववान माणसाचे सहकार्य घेण्यासंबंधीचा यशवंतरावजींचा दृष्टिकोन किती विशाल आहे याची प्रचीती खालील उताऱ्यावरून कळून येते. ‘ नवीन जे काम सुरू होणार आहे त्यासाठी अनेक विचारी माणसे माझ्या नजरे-

समोर आहेत. कॉंग्रेसच्या बाहेरही जी चांगली माणसे आहेत त्यांचेही सहकार्य मिळवावयाचे आहे. कारण लोकशाहीच्या कारभारामध्ये असे एक महत्त्वाचे सूत्र आहे की, नुसते न्यायाने वागून भागत नाही, तर न्याय होत आहे अशी भावना निर्माण करावी लागते. लोकांना वाटले पाहिजे की सर्व न्यायाने चालले आहे आणि तसे झाले तरच चालतो लोकशाहीचा कारभार. म्हणून विरोधी पक्षातही जी चांगली कर्तृत्ववान, हुशार, बुद्धिमान माणसे आहेत, त्यांनाही हे पटवून देऊन पुढे चालावयाचे आहे. आत्मविश्वासाने आपली शक्ती कोणती ते आपल्याला समजले पाहिजे. आपल्या शक्तीबरोबरच आपल्यामध्ये जे दोष आहेत त्यांचीही मोजदाद आपण आपल्या मनाशी घेतली पाहिजे आणि या दोन्हींचा हिशेब मनाशी बांधून मग आम्ही आमची पावले टाकली पाहिजेत. अमका पक्षवाला काय म्हणतो त्यापेक्षा या सगळ्या पक्षांच्या बाहेर म्हणून जी काही जनता आहे, जो बहुजनसमाज आहे, त्याचा काय अंदाज आहे, ते पाहून शहाण्या पक्षाने आणि राज्यकर्त्याने आपले धोरण ठरवावे. माझ्या कामातले तुम्हांला जर काही ट्रेड सीक्रेट पाहिजे असेल तर ते हे आहे."

आकाशवाणीवरून यशवंतरावजींनी जे भाषण केले त्यात महाराष्ट्राचे शब्द-चित्र त्यांनी किती लालित्यपूर्ण शब्दांत व्यक्त केले आहे, ते पाहा, "महाराष्ट्र हा विविधतेने नटलेला असा सुंदर प्रदेश आहे. उत्तरेस सातपुडा आणि पश्चिमेस सह्याद्री यांची उत्तुंग शिखरे आहेत. त्यांच्या उतरणीवरील घनदाट जंगलांनी या भागास भव्योदात्त सौंदर्य प्राप्त झाले आहे, तर वर्धा-वैनगंगेच्या खोऱ्यात जागोजाग असलेली जलाशये आणि पळसाच्या लाल फुलांनी डंवरलेली राने मनाला प्रसन्नता आणतात. कोकणचा किनारा अथांग पश्चिम सागराचे दर्शन घडवितो, तर गोदेच्या पाण्याने पुनीत व समृद्ध झालेली मराठवाड्याची भूमी महाराष्ट्राच्या तेजस्वी भूतकाळाची व संस्कृतीची आठवण करून देते. भारतातच केवळ नव्हे तर सर्व आशियात उत्तम म्हणून नावाजलेली संत्री नागपूरच्या परिसरास पिकतात, तर भारतात ज्याच्या तोडीचा दुसरा आंबा नाही तो हापूस आंबा रत्नागिरीकडे अमाप पिकतो. विदर्भ–मराठवाड्याच्या काळ्याभोर जमिनीत कापूस भरघोस फुलतो, तर नगर–सोलापूर–कोल्हापूर भागात पिकणारा रसदार ऊस सर्वांचे तोंड गोड करतो. निरनिराळ्या भागातील लोकांच्या बाबतींतही ही विविधता आहे. अशा या महाराष्ट्र भाषिक राज्याची स्थापना हे साधन असून जनतेचा सर्वांगीण विकास हे साध्य आहे."

अर्थशास्त्रज्ञांच्या मेळाव्याचे उद्‌घाटन करताना अविकसित देशाचा आर्थिक विकास या विषयासंबंधाने त्यांनी शास्त्रशुद्ध विचार व्यक्त करून अर्थशास्त्रावरील आपल्या सखोल अध्ययनाचा सुंदर प्रत्यय श्रोत्यांना आणून दिला. ते म्हणाले की, "एखाद्या देशाची आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय पद्धती कोणती का असेना, आर्थिक विकासातील नियोजनाचे महत्त्व त्या देशाला कळले नसेल तर त्याला आर्थिक क्षेत्रात प्रगती करणे फार अवघड जाईल. शेती, मनुष्यबळ, नागरीकरण व औद्योगीकरण

हे प्रश्न आमच्या देशाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे व जिव्हाळ्याचे आहेत. आमच्या योजनांची अंमलबजावणी करीत असताना आमच्यापुढे उभा असलेला मुख्य प्रश्न म्हणजे अन्नधान्याचे अपुरे उत्पादन व जमिनीवर पडणारा वाढता ताण हा आहे. शेतीची उत्पादनक्षमता व शेतमालाचे उत्पादन वाढविण्यासाठी उपाययोजना करीत असताना, जमीनविषयक सुधारणांच्या द्वारा, सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्याचेही प्रयत्न झाले पाहिजेत. ग्रामीण विभागातील बहुसंख्य जनतेच्या दृष्टीने हे बदल अतिशय महत्त्वाचे व दूरगामी स्वरूपाचे आहेत. मनुष्यबळ ही अविकसित देशांची सर्वात मोठी संपत्ती असून आर्थिक विकासाकरिता लागणाऱ्या भांडवलाऐवजी या सुप्त संपत्तीचा पूर्णपणे उपयोग करता येईल. अविकसित देशात मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे वा औद्योगिक प्रकल्प सुरू करण्यात किंवा त्यांची वाढ करण्यात शासनाचेच पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. "

जीवनात स्वावलंबनाचे किती महत्त्व आहे हे त्यांनी विदर्भ विकास परिषदेचे उद्‌घाटन करताना स्पष्ट केले. ते म्हणाले, " आपल्याजवळ जी साधने आणि सामर्थ्य असेल त्यांचा आपण आपल्या मनाशी आढावा घेऊन कामाच्या तयारीला लागले पाहिजे. शेती हा एक अत्यंत महत्त्वाचा उद्योगधंदा आहे हे गृहीत धरूनच आपण आपली औद्योगिक योजना आखली पाहिजे. जनतेला नवीन जीवनाने सजविले पाहिजे, तिच्यापुढे नवे आदर्श निर्माण केले पाहिजेत असे आपण आग्रहाने सांगतो. पण केवळ शब्दांच्या फुलोऱ्याने हे होत नाही. नाटकातील राजाच्या आज्ञा जेवढ्या परिणामकारक ठरतात तितकेच परिणामकारक शब्दांचे हे फुलोरेही ठरतील. तेव्हा यातून मार्ग काढण्यासाठी स्वयंप्रेरित, स्वयंचलित अशा शक्ती आपण निर्माण केल्या पाहिजेत. उद्योगपतींनी उद्योगधंदे सुरू करावेत म्हणजे आपले कल्याण होईल, अशा प्रकारची आशा ठेवून त्यावर अवलंबून राहणारा समाज प्रगत होऊ शकत नाही. त्यासाठी स्वतःच्या प्रयत्नांनी स्वतःची शक्ती उपयोगात आणून आपण धडपड केली पाहिजे. पाण्यात सतत न्हाणारी शेती आणि कुणावरही अवलंबून न राहता स्वतःचे दोन हात यांचा वापर करणारा पंजाबी माणूस आज एवढी भरभराट करू शकला आहे. "

यशवंतराव चव्हाण यांना शिक्षणप्रसाराबद्दल केवढी जबरदस्त आत्मीयता आहे हे त्यांनी काढलेल्या खालील उद्‌गारावरून स्पष्ट होते. ते म्हणतात, " शिक्षणाचा प्रचंड प्रवाह महाराष्ट्रातील प्रत्येक खेड्यात पोहोचला पाहिजे आणि त्यातून खेड्यातील नवीन पिढी सुशिक्षित झाली पाहिजे. शिक्षणद्वारा होणारी ही क्रांती झालीच पाहिजे. असे एकही घर राहता कामा नये की, जेथे उच्च शिक्षणाची संधी पोहोचलेली नाही- ही शैक्षणिक क्रांती समाजामध्ये अशी जबरदस्त शक्ती निर्माण करील की, ती शक्ती आपल्याला गप्प बसू देणार नाही. अशी जबरदस्त सामाजिक शक्ती निर्माण झाली म्हणजे ती या समाजाला, राज्याला व राष्ट्राला प्रगतीच्या दिशेने पुढे रेटल्याशिवाय राहणार नाही अशी माझी धारणा आहे. "

दिनांक १९ मे १९६१ रोजी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाच्या सभेत त्यांनी मांडलेले विचार औद्योगिक प्रगतीविषयी त्यांच्या ठायी असलेली आत्मीयता दर्शवितात. ते म्हणतात, " ग्रामीण भागात उद्योगधंद्यांची उभारणी करण्याच्या दृष्टीने ज्या औद्योगिक वसाहती स्थापन करावयाच्या आहेत त्यांना मी फार महत्त्व देतो. या औद्योगिक वसाहतीत रस्ते, वीज, पाणीपुरवठा वगैरे सोयी उपलब्ध होणार असून त्यामुळे तेथे छोटे छोटे उद्योगधंदे सुरू करण्यास चांगलाच वाव मिळणार आहे. या सोयींचा जास्तीत जास्त फायदा घेऊन विजेवर चालणाऱ्या छोट्या छोट्या उद्योगधंद्यांची सुरुवात व वाढ करण्याच्या दृष्टीने प्रत्येक भागासाठी निश्चित स्वरूपाची योजना तयार करण्यात आली पाहिजे. शहरी भागात आज जे मोठे व मध्यम स्वरूपाचे उद्योधंदे केंद्रित झाले आहेत, त्यांना ग्रामीण भागातील हे छोटे उद्योगधंदे पूरक ठरतील. मोठ्या व मध्यम स्वरूपाच्या उद्योगधंद्यांतील उत्पादन विभागाचे विकेंद्रीकरण करून ग्रामीण भागात निघणाऱ्या छोट्या उद्योगधंद्यांकडे हे काम सोपविण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला पाहिजे. यामुळे ग्रामीण भागाच्या अर्थव्यवस्थेची शहरी भागातील अर्थव्यवस्थेशी योग्य प्रकारे सांगड घातली जाईल आणि खेड्यातून शहराकडे धाव घेण्याची लोकांत आज जी प्रवृत्ती दिसून येते तिलाही आळा बसेल. ग्रामीण भागात या उद्योगधंद्यामुळे शेतकरी वर्गास रोजगारीचे एक साधन उपलब्ध होईल आणि त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या राहणीचा दर्जाही सुधारेल. "

कामगारांच्या न्याय्य हक्काबद्दल ते म्हणतात, " औद्योगिक उत्पादनातील सर्वांत महत्त्वाचा जो मानवी घटक, त्याकडे आपल्याला केव्हाही दुर्लक्ष करता येणार नाही. मानवी घटक म्हणजे अर्थातच कामगार. आपल्या या प्रयत्नात जर आपल्याला यश मिळवावयाचे असेल तर कामगारांना योग्य तो न्याय आपण दिलाच पाहिजे. उद्योग-धंद्याच्या कारभारात कामगारांना भागीदार करून घ्यावे या कल्पनेने आता मूळ धरले असून उत्पादनक्षमता वाढविण्याची नवी प्रेरणा तिने कामगारांमध्ये निर्माण केली आहे, म्हणून औद्योगिक संबंध आपण निकोप ठेवले पाहिजेत आणि उत्पादनातील नुकसान टाळण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला पाहिजे."

महाबळेश्वर येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबिरासमोर भाषण करताना त्यांनी नियोजन, मनुष्यबळ व शेती यासंबंधी व्यक्त केलेले विचार अत्यंत मार्गदर्शक आहेत. ते म्हणतात, " मी अगदी सामान्य माणसाच्या दृष्टीने नियोजनाकडे पाहण्याचा प्रयत्न करीत असतो. आपल्या देशामध्ये जी साधने आहेत त्या साधनांचा जास्तीत जास्त विकास करून आपल्या जीवनाला समृद्ध बनविण्याचा नियोजन हा एक प्रयत्न आहे. दुसरी गोष्ट म्हणजे या प्रयत्नामधून निर्माण होणारी जी संपत्ती आहे, जी शक्ती आहे, जे सामर्थ्य आहे, त्याचा फायदा सर्वसामान्य माणसास मिळेल याचीही काळजी नियोजनामध्ये घेतली पाहिजे. अतिशय चांगली साधनसंपत्ती महाराष्ट्रात जर कुठची असेल तर ती महाराष्ट्राचे मनुष्यबळ ही आहे, असे मला वाटते.

माझ्या मते शिक्षण हे आर्थिक विकासाचे एक मूलभूत साधन आहे. आमच्यामध्ये शक्ती निर्माण करण्याकरिता आमच्याजवळ मनुष्यबळाशिवाय दुसरे काही साधन नसल्यामुळे आम्हांला या साधनाचा विकास करण्यासाठी त्याला शिक्षणाची जोड द्यावयाची आहे. शेती कसणारा माणूस हा शेतमालक असला पाहिजे आणि त्याच्या प्रयत्नाला सेवा सहकारी प्रयत्नांची जोड देऊन त्या प्रयत्नांची परिणती शेवटी आपल्याला सहकारी शेतीत केली पाहिजे."

शेतीचे महत्त्व विशद करून सांगताना ते म्हणतात, "आपली भरभराट ही शेतीवरच अवलंबून आहे. याच्याही पुढे जाऊन मी असे म्हणेन की, आपले औद्योगीकरणही आपल्या शेतीच्या भरभराटीवर अवलंबून आहे. आपल्या देशाच्या आर्थिक यंत्रणेत शेतीला मध्यवर्ती स्थान आहे. शेतीच्या सुधारलेल्या पद्धतीचा अवलंब करून जोमदार लागवड करणे ही शेतमालाचे उत्पादन वाढविण्याची गुरुकिल्ली आहे. आपल्या शेतकऱ्यांची सध्याची जी आर्थिक परिस्थिती आहे ती लक्षात घेता आपल्या शेतकऱ्यांना एकत्र काम करूनच स्वतःसाठी आणि देशासाठी अधिक धान्योत्पादन करणे सोपे जाईल. खेडे आणि शहर, खेडे आणि नगर यामधील अंतर कृत्रिम आहे आणि ते दूर झाले पाहिजे. ते करण्याचा मार्ग म्हणजे उत्पादनाचे नवीन तंत्र आणि नवीन विज्ञान निर्माण करणारी साधने शेतकऱ्यांपर्यंत गेली पाहिजेत. शेतीमध्ये त्यांचा वापर करण्यास सुरवात झाली पाहिजे, शेती हा उद्योग आहे आणि म्हणून त्यात त्यांचा उपयोग झालाच पाहिजे."

परभणी येथे कृषिमहाविद्यालयाच्या नवीन इमारतीचा शिलान्यास करताना शेतीच्या मूलभूत प्रश्नांसंबंधी त्यांनी जे मूलगामी विचार प्रदर्शित केले ते अत्यंत मननीय आहेत. ते म्हणाले, "शेतकऱ्याला शिक्षणाची काही गरज आहे असे आजसुद्धा काही लोक मानीत नाहीत. शेतकऱ्याच्या घरातील मुलगा शिकून शहाणा झाला तर तो सांगतो की मी मॅट्रिक झालो, मला कोठेतरी नोकरीला गेले पाहिजे. शिकल्यानंतर शेतीत राहणे म्हणजे आपण काहीतरी चूक करीत आहोत अशी आपली समजूत आहे. शेतीत राहावयाचे असेल तर न शिकताच राहिले पाहिजे, अडाणी म्हणूनच राहिले पाहिजे अशी चुकीची समजूत आमच्या मनात पक्की झाली आहे. आणि ही अत्यंत घातक गोष्ट आहे, असे मी मानतो. शेतकरी आणि शेतीशी संबंध असणारा मनुष्य हा शहाणा असल्याशिवाय शेती शहाणी होणार नाही यावर माझा विश्वास आहे. शेतीच्या शास्त्रीय शिक्षणाचा दृष्टिकोन लोकामध्ये वाढविला पाहिजे. शेतीसंबंधी शास्त्रीय दृष्टिकोन अगदी झोपडीतल्या शेतकऱ्यांपर्यंत नेऊन पोचविणे हा या देशातील कृषीचे ज्ञान वाढविण्याचा खरा उद्देश आहे."

**भारतीय नवसमाजप्रवर्तक यशवंतराव चव्हाण—**

नाशिक येथे सामाजिक परिषदेचे उद्घाटन करताना यशवंतरावजींनी सामाजिक

समतेवर भर देऊन आपले विचार प्रभावीपणे म डले. ते म्हणाले, "राजकारण म्हणजे केवळ सत्तेच्या क्षेत्रात काही कारभार कर वा निवडणुका लढविणे नसून समाजपरिवर्तनाचे ते साधन आहे, हा सिद्धांत या गातील महान् नेत्यांनी जनतेपुढे मांडला. सामाजिक सुधारणावादाला सामाजिक स ा दृष्टीने ज्या गोष्टी अपेक्षित होत्या त्यांचा समावेश राजकारणात झाला. इतकेच नव्हे तर राजकीय कार्यक्रमामध्येही त्या बाबींना महत्त्वपूर्ण असे स्थान मिळाले. सर्वधर्मसमभाव, सामाजिक समता, हरिजनसेवा इत्यादी महत्त्वपूर्ण सामाजिक सुधारणा आमच्या राजकीय परंपरेचा अविभाज्य भाग बनल्या. महात्मा फुले यांच्या प्रयत्नांनी सामाजिक क्रांतिवादाची ही ज्योत बहुजनसमाजाच्या झोपड्यांना उजाळा देऊ लागली. सामाजिक क्रांती हेच आता आपल्या सर्व सार्वजनिक जीवनाचे एकमेव उद्दिष्ट बनले आहे."

नवसमाजनिर्मितीच्या कार्यात सामाजिक समतेचे महत्त्व विशद करून ते म्हणाले, "नवसमाजनिर्मिती हे आता भारताचे एकमेव उद्दिष्ट असून लोकशाही स्वराज्य हे त्याचे साधन आहे. राजकारण हे स्वराज्यप्राप्तीनंतर समाजकारण बनले आहे. परंतु राजकारण हे जरी आज समाजकारण बनले असले तरी सर्व समाजकारण म्हणजे राजकारण नव्हे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. राजकारण हा समाजकारणाचा एक भाग आहे. परंपरागत रूढीने चालत आलेला व माणसामाणसांना संघटितपणे एकमेकाविरुद्ध वागण्यास शिकविणारा जातीयवाद हा भारताला शाप ठरला आहे. स्वराज्यप्राप्तीनंतर भारतीय नागरिक स्वतंत्र झाला असला तरी खऱ्या अर्थाने तो अजून भारतीय बनावयाचा आहे. भारत हे राष्ट्र बनले असले तरी प्रत्येक भारतवासी जातपात विसरून खऱ्या अर्थाने जेव्हा भारतीय बनेल तेव्हाच राष्ट्र या पदवीला आमचा देश पात्र होणार आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे व म्हणून ग्रामीण भागातून सामाजिक सुधारणेचे पाट आपण कसे खेळवितो यावर सामाजिक क्षेत्रातील आपल्या श्रमांचे साफल्य अवलंबून आहे. बुद्धिनिष्ठा व समाजनिष्ठा या दोहोंचा योग्य मेळ घालून सामाजिक सुधारणेचे कार्य आपणास प्रभावीपणे करावयाचे आहे."

आकाशवाणीवरून त्यांनी केलेल्या आपल्या भाषणात ग्रामीण शिक्षणासंबंधी आपले स्पष्ट मत कसे व्यक्त केले आहे ते पहा, "शिक्षित व्यक्तीला स्वतःच्या भोवती घडणाऱ्या गोष्टी आणि जगामध्ये घडणाऱ्या इतर गोष्टी यांची ज्यामुळे काही संगती लावता येते, त्यांचा योग्य अर्थ समजावून घेता येतो आणि त्यांचा परिणाम आपल्या जीवनावर काय घडतो, आपल्या व्यक्तिमत्त्वावर काय घडतो हे समजावून घेता येते, त्याला मी शिक्षण मानत आलो आहे. ग्रामीण शिक्षणाची सरळ आणि साधी व्याख्या अशी आहे. खेडूत बाप आणि आई यांनी कष्ट सहन करून शिक्षणासाठी बाहेर पाठविलेला मुलगा जेव्हा शहाणा होतो तेव्हा ते त्याचे शहाणपण खेड्यामध्ये राहून शेती करणाऱ्या किंवा दुसरा काही उद्योग करणाऱ्या त्याच्या मातापित्यांचे आर्थिक

जीवन सुधारण्यास उपयोगी पडत नाही. तो शहरामध्ये एखादी सोईची, सुखाची नोकरी मिळावी या भावनेने खटपट करीत असतो. पुष्कळ वेळा तो यशस्वीही होतो आणि मग एका अर्थाने, आपले आईबाप आणि ज्या भूमीत, ज्या गावात तो वाढला तो गाव व भूमी, या सर्वांनाच तो मुकतो. अशा प्रकारची कित्येक उदाहरणे मला माहीत आहेत, आपणासही माहीत असतील. माझ्या मताने खरोखरी हे मोठे करुण असे चित्र आहे. ''

मराठवाडा विद्यापीठाच्या पदवीदान-समारंभाच्या प्रसंगी नवपदवीधरांकडून जनतेच्या काय अपेक्षा आहेत यासंबंधी त्यांनी केलेले खालील विवरण अत्यंत अर्थसूचक आहे. ते म्हणतात, '' विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी स्थानिक भागाच्या अडचणी व प्रश्न यांची दखल घेऊन ते सोडविण्याच्या कामी साहाय्य केले पाहिजे. याचा अर्थ संकुचित प्रादेशिक भावनांना उत्तेजन मिळावे असा मात्र नाही. कोणत्याही प्रदेशाचे हितसंबंध हे सबंध देशाच्या हितसंबंधाचा एक अविभाज्य भाग असतात आणि म्हणून नेहमी सर्व देशाच्या दृष्टीतूनच विचार केला पाहिजे. मराठवाड्याचा प्रदेश हा महाराष्ट्रराज्याचा एक घटक आहे आणि महाराष्ट्र राज्य हा भारताचा एक घटक आहे, याचे विस्मरण तुम्ही कधीही होऊ देता कामा नये. भारताच्या या एकतेतच आपले सामर्थ्य सामावलेले आहे. ''

अलिगड विद्यापीठाच्या पदवीदान-समारंभाच्या प्रसंगी त्यांनी काढलेले उद्‌गार विद्यमान समाज-परिस्थितीची साक्ष देत आहेत. ते म्हणतात, '' विद्यापीठातून किंवा महाविद्यालयातून दिसणारी विद्यार्थ्यांची ही प्रचंड गर्दी म्हणजे ज्या समाजाला ज्ञानापासून वंचित ठेवण्यात आले त्याने आपल्या अस्मितेसाठी चालविलेल्या धडपडीचे ते द्योतक आहे. समाजात उच्च स्थान प्राप्त करून घेण्याचे एक साधन म्हणूनही शिक्षणाकडे त्यातील काही लोक पाहत असतील. ज्यांच्या अनेक पिढ्यांना शिक्षणाची द्वारे बंद होती अशा तरुण मुलांमुलींना आपली परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने उच्च शिक्षण घ्यावेसे वाटले तर त्यात आक्षेपार्ह असे काहीच नाही. एवढेच नव्हे तर दूरदृष्टीने पाहिल्यास ज्ञानाच्या या प्रसारामुळे शिक्षणाच्या दर्जात सर्व बाजूंनी सुधारणा होणे अगदी शक्य होणार आहे. कारण जेवढे अधिक विद्यार्थी विद्यापीठात जातील, तेवढा लायक विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी अधिक वाव मिळणार आहे म्हणून शिक्षणाचा दर्जा सांभाळण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे त्यांनी त्याच कार्यावर आपले लक्ष केंद्रित केल्यास कालांतराने शिक्षणाचा दर्जा सुधारणे अवघड जाईल असे मला वाटत नाही.''

' भारतातील मुसलमानांचे भवितव्य हे त्यांचे आत्मिक बल, श्रद्धा, सर्जनशीलता आणि अन्य देशबांधवांबरोबरच्या त्यांच्या संबंधावर अवलंबून आहे. ' प्राध्यापक विलफ्रेड कॅन्टवेल स्मिथ यांनी व्यक्त केलेल्या वरील विचारांचा निर्देश करून यशवंतरावजी म्हणाले की, '' तुम्ही आपल्या विचाराने, आचाराने आणि

उक्तीने आपल्या विद्यापीठाच्या उच्च परंपरांना आपण पात्र आहोत असे दाखवून द्यावे. सुधारणा व समंजसपणा, बुद्धिनिष्ठा व सहिष्णुता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मानवतेवरील श्रद्धा, ह्याच या विद्यापीठाच्या परंपरा आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी आपल्या मुसलमान बंधूंनी आपल्यापासून अलग होण्याचें जरी पत्करले तरी मुसलमानांच्या विद्येचे आसन आमच्यामध्येच राहिले आहे, ही इतिहासातील खरोखर एक अविस्मरणीय घटना आहे. ”

प्रोग्रेसिव्ह ग्रुप या सामाजिक संस्थेतर्फे आयोजित केलेल्या प्रचंड सभेत ‘ राष्ट्ररचनेतील समाजसेवेचें महत्त्व ’ या विषयावर यशवंतरावजींनी आपले मूलगामी विचार व्यक्त केले. “ आपल्या देशात समाजसेवेला अमर्याद वाव आहे, अर्थात आपणास भूषणावह वाटावी अशी ही गोष्ट नाही. आपल्या समाजातील बहुसंख्य लोकांना जीवनातील सुखसोयी अद्याप उपलब्धच नाहीत किंवा जेथे त्या उपलब्ध असतील तिथे त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. ज्या समाजात आर्थिक सामाजिक दृष्ट्या सर्व लोक समान पातळीवर असतात अशा प्रकारच्या समाजव्यवस्थेस आदर्श समाजव्यवस्था म्हणता येईल. समाजवादी समाजव्यवस्था निर्माण करण्याचे आपले ध्येय आपण बुद्धिपुरःसर व पूर्ण विचारांतीच स्वीकारले आहे. समता व सामाजिक न्याय यावर आधारलेली नवीन समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या कामी समाजसेवकांना हातभार लावता येईल. सामाजिक सुधारणा घडवून आणणे हे जनमताचे नेतृत्व करणाऱ्या नेत्याचे कार्य असते तर समाजसेवा करण्यासाठी योग्य प्रकारे शिक्षण घेतलेल्या माणसांची जरूरी असते. महात्मा फुले हे महान समाजसुधारकही होते व त्याचबरोबर ते निष्ठावंत समाजसेवकही होते. ”

सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांच्या आवश्यकतेवर भर देऊन ते म्हणतात, “ निरनिराळ्या क्षेत्रात सरकारी व बिनसरकारी संस्थांकडून होत असलेले कार्य जमेस धरूनसुद्धा, कल्याणकारी राज्याचे आपले उद्दिष्ट गाठण्यासाठी आपणास अद्यापि बरीच मजल गाठावयाची आहे. सामाजिक कार्य शास्त्रोक्त पद्धतीने केले तर ते अधिक परिणामकारक होते आणि त्याकरिता आवश्यक ती सर्व माहिती व त्यासंबंधीची आकडेवारी आपल्याजवळ असावी लागते. सरकार अधिकारावर येते आणि जाते तर विकासकार्य ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे. हे विकासकार्य म्हणजे नवी समाजरचना निर्माण करण्याचे प्रयत्न होत आणि म्हणून त्यात पक्षीय किंवा जातीय विचारांना थारा असता कामा नये. ”

नागपूर येथील जाहीर सभेत यशवंतरावांनी आपले भावपूर्ण विचार व्यक्त करून राष्ट्रप्रगतीसाठी एकजुटीने कार्य करण्याचे तळमळीने आवाहन केले. ते म्हणाले, “ राज्यपुनर्रचनेचा प्रश्न मी मूलभूत असा कधीच मानला नाही. देशापुढे उपस्थित होणारे प्रश्न सोडविण्याचे आणि देशाचा विकास व समृद्धी घडवून आणण्याचे राज्य हे एक साधन आहे. जनहिताचे प्रश्न त्वरित सोडविता यावे व राज्याचा विकास

साधावा या दृष्टीने राज्य व राज्ययंत्रणा प्रयत्न करीत असते. आपल्या देशातील मालाचा उपयोग येथील उत्पादनात झाल्याशिवाय व गरजेच्या वस्तूंचे येथे व्यापक प्रमाणावर उत्पादन झाल्याशिवाय आपला देश स्वतंत्र होणार नाही. व्यापारासंबंधीच्या कल्पना उपजाऊ व उत्पादक अशा असल्या पाहिजेत. मी मुंबईला व्यापार पाहतो. तो मला व्यापार दिसत नाही. जो देश परदेशांच्या आयातीवर विसंबून राहतो, तो दुबळा देश ठरतो. व्यापारी उत्पादक म्हणून राहिला पाहिजे. त्याने उद्योगधंदे सुरू करून देश समृद्ध केला पाहिजे. ह्यावर आता आपण आपली दृष्टी केंद्रित केली पाहिजे. ''

विज्ञान युगासंबंधाने विचार व्यक्त करताना ते म्हणाले, "आजचे युग विज्ञानाचे आहे. परंतु विज्ञान हे एक साधन असून त्याचा उपयोग मानवजातीच्या हिताकरिता झाला पाहिजे. मानवजातीने विज्ञानाचा विकास केला व त्यातून मानव-जातीचे नुकसान झाले तर त्या विज्ञानाचा काही उपयोग नाही. कोणत्याही साधनातून जनतेचे कल्याण साध्य करता आले पाहिजे. ह्या सर्व क्षेत्रांत प्रगती घडवून आणण्या-साठी नवीन क्रांतिकारक दृष्टी ठेवून प्रयत्न झाले पाहिजेत. आपण म्हणतो आपल्याला देश बदलावयाचा आहे. पण देश बदलावयाचा म्हणजे त्यातील विंध्य, सातपुडा, सह्याद्री हे पर्वत बदलावयाचे आणि त्यातील नद्या बदलावयाच्या, असा त्याचा अर्थ नव्हे. देश बदलणे म्हणजे देशातील माणसे बदलणे, त्यांच्या विचारात बदल होणे. हे सर्व त्यांच्यात नव्या शक्तीचा संचार झाल्यानेच घडून येणार आहे. आपणाला हिंदुस्तान शक्तिशाली करावयाचा आहे, समृद्ध करावयाचा आहे. त्याकरिता औद्योगिक शक्ती वाढली पाहिजे.'

## भारतीय लोकशाही-सागरातील दीपस्तंभ यशवंतराव चव्हाण—

लोकशाही राज्यकारभाराची कसोटी कोणत्या गोष्टीवर आहे यासंबंधी आपले विचार व्यक्त करताना ते म्हणाले, "कर्तृत्वाची खरी परीक्षा अवघड कामामध्येच होत असते. लोकांचे समाधान हीच चांगल्या राज्यकारभाराची खरी कसोटी आहे. लोकशाही राज्यकारभारामध्ये मी चांगले काम करतो, लोकांच्या उपयोगाचे काम करतो एवढी कसोटी अपुरी आहे. काम चांगले तर केलेच पाहिजे, पण काम चांगल्या प्रकारे झाले आहे याची लोकांना प्रचीती आली पाहिजे. लोकांना ते जाणवले पाहिजे. राज्यकारभारामध्ये सुधारणा व प्रगती करण्याचे तुम्ही आणि मी जरी काम करणार असलो तरी आत्मसंबोधनाची, आत्मटीकेची आपल्याला फार जरूरी आहे. कार्यक्षम कारभार याचा अर्थ जे काम असेल ते आपण तातडीने केले पाहिजे आणि ते करून आपण लोकांचे समाधान केले पाहिजे. काम व्हावयाचे असेल तर ओळखीने किंवा एका विशिष्ट पद्धतीने केले पाहिजे, अशा तऱ्हेची लोकांची भावना होणे याला मी लाचलुचपत म्हणतो. म्हणून या दृष्टीने राज्यकारभार व्यक्तिनिरपेक्ष होण्याची आवश्यकता आहे. ''

मुंबई येथे लोकशाही विकेंद्रीकरण चर्चा सत्राचे उद्घाटन करताना लोकशाही जीवनपद्धतीचा पाया विकेंद्रीकरण आहे हे स्पष्ट करताना ते म्हणाले की, " सामूहिक विकास योजनेच्या कार्यामुळे ग्रामीण भागातील जनतेत स्वावलंबनाची वृत्ती निर्माण झाली आहे. स्वतःचे श्रम व पैसा विकासाच्या कामी लावण्यासाठी ग्रामीण भागातील जनता स्वयंस्फूर्तीने पुढे येत असल्याची दृश्ये आज आपणास दिसत आहे. जनतेच्या वृत्तीतील हा बदल म्हणजे अलीकडच्या काळात आपण मिळविलेला एक मोठा विजयच आहे असे मी समजतो. ज्यांच्यामुळे विकास-कार्याचा वेग वाढण्यास मदत होईल आणि देशातील लोकशाहीचाही पाया दृढमूल होईल अशा प्रकारच्या शासन-संस्था आणि लोकशाही संस्था आपण निर्माण केल्या पाहिजेत. या संस्था चालवविण्याची जबाबदारी ज्या माणसावर पडेल ती माणसे त्यागी असली पाहिजेत. त्यांना तांत्रिक सल्ला व जरूर ते मार्गदर्शन मिळाले पाहिजे, विकासाच्या विविध कार्यासाठी जनतेचे सहकार्य मिळविण्यासाठी त्यांच्यात ताकद असली पाहिजे."

नागपूर येथे यशवंतरावजींच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विश्वातील प्रचलित परिस्थितीसंबंधाने त्यांनी आपले परखड विचार मांडले. ते म्हणाले, " आज सबंध दुनियेमध्ये मनाचा थरकाप उडावा अशी परिस्थिती आहे. प्रामाणिकपणे कष्ट करून शांततेने विकास करू इच्छिणाऱ्या मानवतेला भीती वाटावी अशी ही परिस्थिती आहे. परंतु मानवता हे आज एक सामर्थ्य आहे, ती एक दृष्टी आहे. ही दृष्टी दुनियेमध्ये यशस्वी कशी होईल, कशी आरोग्यशाली बनेल, कशी सामर्थ्यशाली बनेल, ती कशी पुढे पुढे जात राहील याचा विचार आज आपण सर्वांनी करावयास पाहिजे. मग तुम्ही महाराष्ट्रात असा किंवा गुजराथमध्ये असा; लाओसमध्ये असा किंवा अमेरिकेमध्ये असा; किंवा तिकडे रशियामध्ये कुठे असा. आज हा मानवजातीचा खरा प्रश्न आहे. तुमचा माझा कोणताही पक्ष असू द्या, तुमची माझी कोणतीही भाषा असू द्या; आज हा मूळ विचार मनामध्ये ठेवून त्या मूळ विचाराशी आमचे बोलणे व आमचे आचरण सुसंगत आहे की नाही याचा विचार करूनच आम्हाला आमची पावले टाकली पाहिजेत. ही महत्त्वाची गोष्ट आमच्या देशामध्ये, आमच्या कामामध्ये आम्हांला पाहिली पाहिजे."

याच प्रसंगी देशातील अंतर्गत फुटीर वृत्तीमुळे स्वातंत्र्याचे किती मोठे नुकसान होणार आहे याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. " आम्हांला आमचा देश एक ठेवता आला पाहिजे. फुटीर वृत्ती हे आज या देशावर येऊ पाहणारे महान संकट आहे. बाहेरची संकटे तर आहेतच. कुठे उत्तरेला कुणाच्या मनात पाप आहे, तर कुठे शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या मनात पाप आहे. पण या पापांची मला भीती वाटत नाही. जोपर्यंत आमच्या मनगटामध्ये आणि आमच्या मनामध्ये सामर्थ्य आहे तोपर्यंत इतरांच्या पापांची मला भीती वाटत नाही. तुमचे माझे मन जर एकजिनसी झाले असेल, तुमच्या-

माझ्या मनामध्ये जर काही सद्भावना असतील, तुमचे माझे मनगट जर एका सामर्थ्याने बांधले गेले असेल तर मग आपल्याला कशाचीही भीती नाही."

नागपूर महाविद्यालयाच्या पोलिटिकल सायन्स आणि पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन असोसिएशनपुढे भाषण करताना 'लोकशाहीतील प्रशासन' याविषयी आपले विचार व्यक्त करताना ते म्हणाले की, "राज्यशास्त्र हेही एक सामाजिक शास्त्र असल्यामुळे निरनिराळ्या काळीं आणि निरनिराळ्या देशांत लोकशाहीची कल्पना निरनिराळी असावी यात आश्चर्य नाही. लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांनी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही असे लोकशाहीचे वर्णन करण्यात येते. परंतु ही अगदी औपचारिक स्वरूपाची व्याख्या आहे. कारण या व्याख्येवरून लोकशाही सरकारच्या कार्यपद्धतीचा नक्की बोध होत नाही. प्रशासनातील लोकशाही म्हणजे एकमेकांच्या सतत विचारविनिमयाने चालणारा राज्यकारभार होय. कोणत्याही प्रकारचा साचेबंद दृष्टिकोन न ठेवता प्रतिनिधी एकत्र येऊन जिथे विचारविनिमय करतात अशा शासनाच्या पद्धतीला मी लोकशाही म्हणतो. राजकीय हक्कांच्या बाबतीत सर्वांना समान संधी मिळणे हा राजकीय लोकशाहीचा अर्थ असेल, तर या राजकीय हक्कांबरोबरच, सामाजिक व आर्थिक क्षेत्रातही प्रत्येक व्यक्तीला ज्यायोगे समान संधी मिळेल अशी आर्थिक व सामाजिक परिस्थिती निर्माण झाली पाहिजे."

प्रशासनासंबंधाने आपले मूलभूत विचार त्यांनी खालील शब्दांत व्यक्त केले आहेत. "सामाजिक आणि आर्थिक विकासामुळे निर्माण होणारी शक्ती हीच लोकशाही व प्रशासन यांची प्रेरक शक्ती आहे. प्रशासन हे आजच्याही काळात केवळ धोरणाची अंमलबजावणी करणारे एक व्यक्तिनिरपेक्ष माध्यम बनणार असेल तर त्या प्रमाणात प्रशासनाचे लोकशाही स्वरूप नाहीसे होईल. लोकशाहीशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे, तर सामाजिक व आर्थिक क्षेत्रात देखील, लोकांचे समाधान हेच आपले अंतिम उद्दिष्ट मानले पाहिजे. राज्यशास्त्र आणि लोकशाहीतील प्रशासन यांना सांधणारा दुवा हाच आहे असे मला वाटते. आपल्या दैनंदिन कामात, मग ते प्रशासनातील असो राजकारणातील असो, अगर अन्य कोणत्याही क्षेत्रातील असो, आपण या मार्गदर्शक तत्त्वाचा स्वीकार केला तर समाजातील अनेक गोष्टींत द्रुतगतीने सुधारणा होईल आणि सरकार व जनता यांच्यातील संबंधही सुधारतील."

दिनांक ३० ऑगस्ट १९६१ रोजी नागपूर येथे दीक्षा मैदानावर "डॉ. आंबेडकरांच्या विचारपरंपरेचा वारसा" या विषयावर बोलताना ते म्हणाले, "आपल्या समाजाचे बाबासाहेब मोठे उद्धारकर्ते होते म्हणून आपणाला त्यांच्याबद्दल फार आदर आहे. जातीजातीने उभारलेल्या, दबलेल्या समाजाला स्वातंत्र्याकरिता प्रयत्न करून आम्ही पुन्हा अस्पृश्यच राहणार असलो, दबलेलेच राहणार असलो, तर त्या स्वातंत्र्याची आम्हांला काय गरज आहे असे जर कुणाला वाटले असेल तर ते आम्ही समजून

घेतले पाहिजे. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वातंत्र्याचा पूर्वीचा अर्थ बदलून, त्याला सामाजिक न्यायाचा अर्थ देणे आणि त्यासाठी आर्थिक न्यायाची भूमिका निर्माण करणे, हे महत्त्वाचे काम तुम्हा–आम्हांला आज आपल्या देशामध्ये करावयाचे आहे. ''

लोकशाहीत प्रामाणिक मतभेद असणे स्वाभाविक आहे असे सांगून आपण काय केले पाहिजे याविषयी सांगताना ते म्हणाले, “सामाजिक विषमतेच्या भावनेचा आमचा जो वारसा होता तो आम्ही टाकून दिला पाहिजे, गाडला पाहिजे. आणि एका नव्या वातावरणाचे, प्रेमाचे, सहकाराचे चित्र या देशात उभे राहिले पाहिजे, महाराष्ट्रात उभे राहिले पाहिजे. आपला रिपब्लिकन पक्ष असेल, माझा काँग्रेस पक्ष असेल, आपला धर्म वेगळा असेल, माझा धर्म कदाचित् वेगळा असेल. परंतु शेवटी तुम्ही आणि मी भारतीय असून तुमचे आणि माझे एकमेकांशी जवळचे नाते आहे. या प्रांतात राहणारे नागरिक म्हणून तुमचा आणि माझा एकमेकांवर एक प्रकारचा हक्क आहे. शेकडो वर्षे या भूमीत आपण राहिलो, रगडले गेलो, दबले गेलो आणि शेवटी येथेच तुमची–माझी सगळ्यांची हाडे पडणार आहेत, जळणार आहेत. परंतु कर्मभूमी म्हणून, मायभूमी म्हणून ज्या भूमीवर आपण वाढलो आहोत आणि जगतो आहोत, तिचे काम करण्याचे समान हक्काचे तुमचे माझे बंधूबंधू म्हणून जे नाते आहे त्या नात्याने, आपण एकमेकांजवळ गेले पाहिजे, एकमेकांची मने समजून घेतली पाहिजेत, एकमेकांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत आणि पुढे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपणाला या देशात नवी सामाजिक परिस्थिती निर्माण करावयाची असेल, सामाजिक एकतेची नवी भावना निर्माण करावयाची असेल तर सहनशीलतेची, आपुलकीची, समजतदारपणाची आणि दुसऱ्याचा विचार समजून घेण्याची प्रवृत्ती आपण आपल्या समाजामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ''

सावरगाव डुकरे येथे विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्रसंगी साहित्यिकांची जबाबदारी या विषयावर बोलताना ते म्हणाले, “भाषिक राज्याच्या मागणीच्या पाठीमागे एकभाषिक जनतेच्या सांस्कृतिक विकासाचा जसा हेतू आहे, तशीच त्या राज्याच्या भाषेला मानाच्या महत्पदी बसविण्याचीही कल्पना आहे. मराठी भाषेचे राज्य झाल्यानंतर ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांतील विचारांची संपदा तिने मराठी जीवनात आणली पाहिजे, ही जिम्मेदारी तिच्यावर आहे. त्याकरिता मराठी भाषा ही अधिक विचारप्रवाही झाली पाहिजे. ज्ञानाचे आणि विज्ञानाचे मूलभूत संशोधन हाती घेण्याचा प्रयत्न ज्या भाषेत होतो तीच भाषा ज्ञानाची भाषा होऊ शकते. सामाजिक मनाला जागे करण्याचा प्रयत्न साहित्याने केला पाहिजे. त्यामागील ज्या सांस्कृतिक प्रेरणा आहेत त्यांना जागे करण्याचे काम साहित्याने केले पाहिजे. साहित्याची खरी सेवा या क्षेत्रात झाली पाहिजे. साहित्याची अंतिम प्रेरणा मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी असली पाहिजे. मानवी मूल्यांचा प्रत्यय हीच वाङ्मयाची आपण शेवटची कसोटी मानली तर मानवी मूल्यांची किंवा मानवी गुणांची वाढ करणे हे आम्ही आमचे साध्य

मानले पाहिजे. शिवाजी महाराज आमच्या मराठी मनाचे प्रतीक आहेत आणि त्यांचे आजोळ विदर्भात बुलढाणा जिल्ह्यात आहे, आणि म्हणून मी म्हणतो की, विदर्भ ऐतिहासिक दृष्टयाही महाराष्ट्राचे आजोळ आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वैचारिक व सांस्कृतिक पुनरुज्जीवन घडवून आणणारा एका शक्तिशाली नवा प्रवाह भारतीय जीवनात निर्माण झाला असून आपण आता एक समृद्ध अशा कालखंडात प्रवेश करीत आहोत. देशातील विचारवंत, कलावंत, लेखक, शास्त्रज्ञ व संशोधक यांच्या प्रयत्नाने निर्माण होणारे विचारधन हेच समाजाचे फार मोठे धन आहे. समाज जिवंत राहतो तो त्याच्याजवळ असलेल्या भौतिक सामर्थ्याने नव्हे, तर त्याच्याजवळ असलेल्या सांस्कृतिक मूल्यावर आणि विचारधनावर तो जिवंत राहतो आणि वाढतो, असाच इतिहासाचा दाखला आहे. ”

मुंबई येथे प्रांतिक राष्ट्रभाषा प्रचारसभेचा २२ वा पदवीदान समारंभ साजरा करण्यात आला. याप्रसंगी यशवंतरावजींनी काढलेले उद्गार मार्गदर्शक आहेत. ते म्हणाले, “ परिस्थितीवर ज्याला विजय मिळविता येत नाही तो तिचा गुलाम बनतो आणि आपल्या दुर्भाग्याला दोष देत राहतो घोड्यावर स्वार होणाराही कधी कधी खाली पडतो, पण पडल्यानंतर ज्याला उठता येत नाही त्याला स्वतःचे संरक्षण करणे कठीण जाते. जीवनाच्या कितीतरी परीक्षांमध्ये आपल्याला अपयश येते. पण केवळ अपयश आले म्हणून आपण धीर सोडता कामा नये. हिंमत धरून आणि आपल्या अपयशाची कारणे समजावून घेऊन योग्य दिशेने आत्मविश्वासपूर्वक व जोमाने आपण प्रयत्न केले तर आपले ईप्सित साध्य होण्याच्या मार्गात कोणतेच अडथळे येणार नाहीत. ज्ञानसंपादनाची आपली आवड व यशाची ईर्षा आपण कायम राखली तर अपयशामुळेसुद्धा आपण अधिक कार्यक्षम व कार्यप्रवण बनू शकतो असाच आपल्याला अनुभव येईल. ”

हिंदी भाषेसंबंधी आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, “ प्रांतिक भाषांशी हिंदी भाषेचे अधिक प्रमाणात साहचर्य व्हावयास पाहिजे. तसे झाल्यास सगळ्या प्रांतिक भाषांबरोबरच हिंदीचीही खऱ्या अर्थाने प्रगती होऊ शकेल. प्रांतिक भाषांतील चांगल्या व मौलिक साहित्याचा हिंदी भाषेतही अनुवाद व्हावयास पाहिजे, आणि त्याप्रमाणे हिंदी भाषेतील मौलिक साहित्याचाही प्रांतिक भाषांतून अनुवाद झाला पाहिजे. साहित्याच्या या देवाणघेवाणीबरोबरच शब्दसंपत्तीचीही देवाणघेवाण झाल्यास परस्परांतील जिव्हाळा वाढविण्याच्या दृष्टीने बरीच मदत होईल. विज्ञानाच्या प्रगती-बरोबरच जीवनमूल्यातही आश्चर्यकारक असे बदल होत असून त्यांचे यथोचित मूल्यमापन नव्या हिंदी साहित्यात होणे आवश्यक आहे. सामान्य लोकांना हिंदी भाषा समजण्यास अडचण पडू नये म्हणून ही भाषा शक्य तितकी सरळ व सोपी ठेवण्याची जाणूनबुजून प्रयत्न झाले पाहिजेत. हिंदी भाषा ही राष्ट्रीय ऐक्याची वाढ करणारी एक फार मोठी शक्ती आहे आणि म्हणून हिंदीच्या प्रगतीबरोबरच देशाच्या एकतेतही वाढ होत

जाईल. राष्ट्राचे संघटन व ऐक्य साधण्यासाठी सगळ्या ठिकाणी समजली जाईल अशा भाषेची फार आवश्यकता असून हिंदी हीच अशा प्रकारची भाषा आहे असे माझे ठाम मत झाले आहे. ”

दिनांक २०–१०–६२ ला चीनने आपल्या सरहद्दीवर आक्रमण केले. “ हिमालयावर संकट कोसळले तर सह्याद्रीचे कडे त्याचे संरक्षण करतील. ” हे त्यांनी पंडित नेहरूंना वचन दिले होते. पंडित नेहरूंनी त्यांना भारताचे संरक्षणमंत्री म्हणून बोलाविले. भारतावर येऊन कोसळलेल्या महान संकटात भारतमातेने तिच्या एका मराठी सुपुत्राला हाक मारली. यात महाराष्ट्राला अतिशय अभिमान वाटला. यशवंतरावसारख्या बुद्धिमान, कार्यधुरंधर व जनतेचे अमाप प्रेम संपादन केलेल्या नेत्याच्या हातात संरक्षण खाते मिळाल्यावर महाराष्ट्रातील जनतेला अतिशय आनंद झाला. महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त आहे, हे त्यामुळे सिद्ध झाले. यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री झाले व थोड्याच अवधीत चीनने युद्धबंदी जाहीर केली.

पाकिस्तानने काश्मीरमधील युद्धबंदी रेषेपलीकडे हजारो गनीम पाठवून तारीख ५–८–६५ रोजी भारतावर हल्ला चढविला. पंतप्रधान शास्त्री यांच्या नेतृत्वाखाली भारताला स्वसंरक्षणार्थ शस्त्र हाती घ्यावे लागले. स्वसंरक्षणार्थ आपल्या फौजा पाकिस्तानात शिरल्या. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या कुशल नेतृत्वामुळे पाकिस्तानच्या घमेंडखोर लष्करी सामर्थ्याचे शिरकाण झाले. अशा रीतीने संरक्षणमंत्री श्री. चव्हाण यांची पंडित नेहरूंनी ज्या अपेक्षेने नेमणूक केली होती, ती पूर्ण झाली. १९६४ च्या मे २७ ला नेहरूंचे निधन झाले. त्यानंतर अवघ्या अठरा महिन्यांनीच देशावर दुसरा मोठा आघात झाला. रशियात ताश्कंद येथे दिनांक ११ जानेवारी १९६६ रोजी रात्री एक वाजून दोन मिनिटांनी हृदयविकाराचा एकदम झटका येऊन शास्त्रीजी निधन पावले. त्यांच्या निधनानंतर इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या व श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे भारताचे गृहमंत्रिपद चालून आले.

वेगवेगळ्या समाज-घटकांना एकत्र आणण्याचे कार्य त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना केले. श्रीकृष्ण मेनन यांच्या काळात नैतिक धैर्य गमावून बसलेल्या व अंतर्गत असंतोषाने जर्जर झालेल्या सेनानी व सैन्यामध्ये त्यांनी नवे चैतन्य व धैर्य उत्पन्न केले. सैन्यात राष्ट्रीयत्वाची भावना व जिद्द निर्माण केली. १९६२ ते १९६५ या तीन वर्षांच्या अवधीत चीनकडून मार खाल्लेली सेना पाकिस्तानावर विजय मिळविण्याइतकी बलशाली केली.

संरक्षणमंत्र्यांची यशस्वी कामगिरी बजावल्यानंतर गृहखात्याचा कारभारही ते मोठ्या दक्षतेने चालवीत आहेत. त्यांनी दिल्लीतील साधूंचे बंड मोडले. विद्यार्थ्यांना चळवळ न करण्याबाबत जाणीव दिली. “ मी कसल्याही तऱ्हेचे अराजक चालू देणार नाही. ” असा इशारा दिला. शंकराचार्यांचे गोवधबंदीबद्दलचे उपोषणही त्यांनी मोठ्या कौशल्याने हाताळले. सार्वत्रिक निवडणुकीनंतर अनेक विरोधी पक्षांची प्रांतीय सरकारे आली

आहेत. मध्यवर्ती सरकार काँग्रेसचे व काही राज्य सरकारे बिगर काँग्रसची असल्यामुळे पुष्कळ वेळा बिकट पेचप्रसंग उत्पन्न होत आहेत. अशा परिस्थितीत यशवंतराव मोठ्या कौशल्याने तथापि मूलभूत विचारांची बैठक न मोडता सर्व प्रश्न हाताळीत आहेत. मध्यवर्ती सरकार निःपक्षपाती ठेवण्याच्या दृष्टीने ते सतत प्रयत्नशील असतात. विचारांशी इमान राखायला जे निष्ठावान मन लागते ते त्यांच्याजवळ आहे. देशाच्या एकात्मतेवर त्यांचा फार जोर असतो. " देशाच्या एकात्मतेकरिता प्राणाची बाजी लावू परंतु देश दुभंगू देणार नाही, अशी प्रत्येकानें प्रतिज्ञा केली पाहिजे. " असे ते भारतीय जनतेला नेहमी आग्रहानें सांगतात.

एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन स्वकर्तृत्वाने मनुष्य केवढे मोठे उच्च पद भूषवू शकतो हे भारतीय लोकशाहीत यशवंतरावांनी इतरांना दाखवून दिले आहे. खरोखरच " जन्मा येणे दैवा हाती, करणी जग हासवी, गाणे व्यर्थची कुलथोरवी " हाच संदेश यशवंतरावांच्या चरित्र-दर्शनातून आपणास मिळत नाही काय ?

हे महाराष्ट्राच्या लाडक्या सुपुत्रा ! भारताचे गृहमंत्रिपद विभूषित करून आपण भारताचे कर्णधार झाला आहात. अखिल भारतीय जनतेचे आपण आता आशास्थान बनला आहात. शिवरायाचे स्वप्न आपण साकार करीत आहात. महादजी शिंद्यांची परंपरा आपण पुढे चालवीत आहात. स्वातंत्र्यवीर पृथ्वीराज चव्हाण, रणधीर बाप्पा रावळ, महाराणा प्रतापसिंह, रणशूर रणजितसिंह यांच्या अतृप्त आशाआकांक्षा आपल्या रूपाने आज पूर्ण होऊ पाहात आहेत. या रणवीरांना साक्षी ठेवून आपण महाराष्ट्राची मान व भारताची शान सतत उंच उंच ठेवण्यासाठी जी प्रचंड घोडदौड चालविली आहे, ती शुद्ध पक्षातील चंद्राप्रमाणे उत्तरोत्तर वृद्धिंगत होत राहण्यासाठी परमेश्वर आपणास उदंड आयुष्य देवो, याशिवाय त्या दयाघन परमेश्वराजवळ मी दुसरे काय मागू ?

# राजकीय रणक्षेत्रातील मानकऱ्यांचे मनोगत

## या विभागातील मानकरी

* नामदार श्री. **यशवंतराव चव्हाण**, गृहमंत्री, भारत सरकार
* नामदार श्री. **वसंतराव नाईक**, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
* पद्मभूषण श्री. **वसंतरावदादा पाटील**, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस
* खासदार श्री. **अण्णासाहेब शिंदे**, राज्यमंत्री, भारत सरकार
* नामदार श्री. **शंकरराव चव्हाण**, मंत्री, महाराष्ट्र राज्य
* नामदार श्री **बी. जे. खताळ**, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
* नामदार श्री. **व्यंकटराव हिरे**, उपमंत्री, महाराष्ट्र राज्य
* नामदार श्री. **शिवाजीराव पाटील**, राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
* खासदार श्री. **अनंतराव पाटील**, संपादक, विशाल सह्याद्रि
* आमदार श्री. **शरद पवार**, चिटणीस महाराष्ट्र कॉंग्रेस
* आमदार श्री. **मारोतराव तुमपल्लीवार**


★ ★ ★



तू कोण होणार ?
"मी यशवंतराव चव्हाण होणार"
आत्मविश्वासाचे उद्‌गार काढणारे
बाल यशवंतराव.



वाचनाचा व्यासंग,
कुस्तीचा छंद,
विचारातही गुंग
असा हा क्रांतिकारी
यशवंत !



गृहखात्याचे
पार्लमेंटरी सेक्रेटरी
भारतीय प्रशासनाचे
शिक्षण अशा जिद्दीने
घेत आहेत.




भारतीय
नेतृत्वाचे
सुसंस्कार
घडविणारी
महादेवता
राजमाता
जिजाबाई



तेच संस्काराचे राष्ट्रकार्य
वीरमाता विठाबाईंच्या
रूपाने अव्याहत चालू आहे.






धुरंधर राष्ट्रकार्यात काहीही उणे पडू न देणारी महासाध्वी सहधर्मचारिणी वेणूताई ! कसली बरं बातचीत चालली आहे ?




शिवरायांचा जसा इमानी वाघ्या तसाच हा यशवंतरावांचा नेकजात मोत्याबरं का.




अखिल भारतातील सर्वांत तरुण मुख्यमंत्री,
महाराष्ट्राचे आशास्थान आणि भारताचे स्फूर्तिस्थान बनणारे
हेच महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री !




भारताचा महान पोलादी पुरुष भारताच्या संरक्षणाची
हमी घेऊन कार्यरत झालेला संरक्षणमंत्री.



राज्यपाल श्रीप्रकाश यांच्यासमोर मुख्यमंत्रिपदाच्या शपथविधीचा शुभप्रसंग.




ारतीय स्वातंत्र्याची गर्जून ग्वाही देणारे हे प्रतीक, डयूकसाहेब, आम्ही तुम्हास सप्रेम भेट देत आहोत.




तुळजा भवानीच्या हस्तस्पर्शाने पवित्र झालेली ही शिवरायाची वरदायिनी समशेर आम्ही तुम्हास अर्पण करतो. यशवंतराव, विजयी होऊन या. तुळजाभवानीचा तुम्हास आशीर्वाद आहे.



राष्ट्र संकटात असताना मला आपण हाक दिली. क्षणाचाही विलंब न लावता मी धावत आलो. माझी कामगिरी मी यथार्थानं पूर्ण करीनच असं मी अभिवचन देतो.



समाजवादी रशियाचे कर्णधार निकिता क्रुश्चेव्ह आणि लोकशाही समाजवादाचे महान पुरस्कर्ते यशवंतराव चव्हाण यांची ही ऐतिहासिक संस्मरणीय भेट.



अलिगड
विश्वविद्यालयाला
या महाराष्ट्रीय
महान पंडिताची
विद्वत्ता, धैर्य
आणि शहाणपण
सर्वांआधी कळलं हं !
म्हणूनच
ही डी. लिट्. ची
पदवी दिली जात
आहे काय ?

# संस्कारांचे सामर्थ्य

नामदार श्री. यशवंतराव चव्हाण, गृहमंत्री : भारत सरकार

सिंहावलोकन करीत कर्तृत्वाची वाटचाल करणारा मी एक संस्कारक्षम माणूस आहे. सभोवतालच्या परिस्थितीशी जुळते घेत मी आलो आणि पुढे चाललो आहे. काही करावयाचे असे ठरवून एखाद्या मुशीत बांधून घेण्याचा 'जाणता' प्रयत्न मी कधी केलेला नाही. तशी माझी प्रवृत्तीही नाही. माझ्यात काही वेगळीक आहे असे मला विद्यार्थिदशेत असतानाही कधी वाटले नाही. एवढे मात्र खरे की, मी वयाने वाढत असताना, आपण एका सामान्य कुटुंबातील आहोत, याची जाणीव व्हावी असे काही माझ्या आवतीभोवती सतत घडत होते. जाणिवेने मी ते न्याहाळीत होतो, पण त्याची मला खंत वाटावी असे वातावरणच माझ्याभोवती नव्हते.

कारण असे की, मी माझ्या आईच्या आवतीभोवती वाढलो. साक्षात् प्रेम असे जिच्याकडे पाहून म्हणावे अशी माझी आई आहे. तिची अन् शाळेची ओळख नसेलही; पण तिचे कर्तृत्व दांडगे आहे. खऱ्या अर्थाने ती सुमाता आहे. आईच्या प्रेमाने वाढविलेली फार मोठी झालेली माणसे मी आजही जेव्हा पाहतो तेव्हा मला माझी आई अधिक समजते. माझ्या कुटुंबात हीच खरी श्रीमंती आहे. या श्रीमंतीने मला मनाचा राजा बनायला शिकविले. 'मन थोडे मोठे कर' असे कुंतीने धर्मराजाच्या एका प्रश्नाला म्हणे उत्तर दिले आहे. आईने आम्हा भावंडांची मने अशीच मोठी बनविली. मनाचा कोतेपणा हा अनेक दुःखांचे मूळ असू शकतो याचे धडे आईने मला प्रत्यक्ष दिले नसतीलही. परंतु तिच्या कृतीतून मी ते सतत टिपले आहेत. परिस्थितीने गांगरून जायचे नाही हा पहिला धडा आईने माझ्याकडून गिरविला तो अगदी लहानपणी !

त्यावेळी आम्ही कराडला होतो. घरची अतिशय गरिबी. वडील लहानपणीच वारलेले. घरात मिळवते कोणी नाही. हाता-तोंडाची गाठ पडावी एवढेही साधन जवळ

नाही; आणि त्यातूनच आई आम्हांला वाढवीत होती. नकळत माझ्यात एक जिद्द निर्माण करीत होती. शाळेतील शिक्षण याच अवस्थेत संपले. मुले दुबळी आहेत याची आईला नेहमी खंत वाटत असे. मुलांना कोणी पाठीराखा नाही म्हणून तिचे मन तुटत होते. पण तिने तसे कधी भासू दिले नाही. तथापि आम्ही मुले परावलंबी होणार नाही याचीही तिला काळजी होती. त्या लहान वयात मला ते थोडेफार समजत होते. पण त्यावरचा उपाय मात्र उमजत नव्हता; आणि तेही खरेच आहे. थोरांचे उलगडे लहानांना होऊ लागले तर जगातले बाल्यच नाहीसे होईल. नियतीची तशी योजना नाही. नियतीला हे जग केवळ सुखीही ठेवायचे नाही आणि दुःखीही बनवायचे नाही. श्रीखंडाच्या जेवणातही हिरव्या मिरचीची चटणी लागतेच, तरच त्या जेवणाला रुची येते आणि सुखाचे श्रीखंड पोटभर खाता येते! पण त्यावेळी माझ्या पानात काहीच नव्हते. मोकळ्या ताटावर बसून भूक भागविण्याची आईची कला मला अवगत नव्हती.

मनाच्या कोंडवाड्यातून बाहेर पडावे, धडपड करावी, शिकावे, आईचे ओझे हलके करावे असे नेहमी वाटे. परंतु जागच्या जागी पंख फडफडविण्याव्यतिरिक्त मी काही करू शकत नव्हतो. परिस्थितीचे कुंपण चारी बाजूंनी उभे होते. एरवी कुंपणात शिरणाऱ्यांना काटे बोचतात, ते बोचावेत अशीच ती व्यवस्था असते. कुंपणाच्या आत जे असेल ते स्थिर राहावे अशासाठी ती योजना असते. परंतु मला कुंपणात स्थिर व्हावयाचे नव्हते. तशी स्थितीच नव्हती – हीच खरी अडचण होती. परिस्थितीच्या कुंपणातून बाहेर पडताना अंगाला काटे बोचतात. अंग फाटून निघते याचाही अनुभव माझ्या गाठी नव्हता. आहे त्या कोंडीतून बाहेर निसटायचे एवढेच माझ्यासमोर होते.

मी जेव्हा प्रत्यक्षात बाहेरच्या जगात पाय ठेवला त्यावेळी मी अधिक दुबळा बनतो की काय असे मला वाटू लागले. बाहेरच्या समाजातल्या ज्या वातावरणाकडे मी पाहात होतो ते मला शुद्ध, स्वच्छ वाटत नव्हते. हिमालयाच्या अंगावरून स्फटिकशुभ्र पाण्याचे झरे स्वच्छंद धावत असतात. श्रमिक पथिकांचे लक्ष ते झरे तेव्हाच वेधून घेतात. तहानलेला पथिक त्याचा मनमुराद आस्वादही घेतो. परंतु नंतर मात्र त्याच्या अंगाचा दाह होऊ लागतो. असे सांगतात की, तेथील अनेक झरे जे वाहात येतात त्यांच्या मार्गात विषारी वृक्ष असतात. त्या वृक्षाच्या मुळातील विष त्या पाण्याबरोबर नेहमीच वाहत असते आणि ते शुभ्र जीवन अनेक पथिकांचा जीवनप्रवाह गोठविण्यास कारणीभूत ठरते. त्या स्वच्छंदी झऱ्यासही त्याची कल्पना नसते–तो आपला वाहातच असतो.

आमच्याकडील समाजपुरुषाच्या मनातही त्यावेळी विचारांचे जे झरे पाझरत होते ते मला काहीसे असेच वाटत होते. परिस्थितीची कोंडी फोडण्यासाठी मी बाहेर पडत होतो खरा, परंतु दुसरी एक वैचारिक कोंडी माझ्याभोवती तयार होऊ

पाहात होती. आमच्या भागात त्यावेळीं ब्राह्मणेतर चळवळींची एक वावटळ उठली होती. घरात आणि घराबाहेरचे वातावरण या चळवळींने वेढलेले होते. आजूबाजूला मी जे पाहात होतो, ऐकत होतो, अनुभवीत होतो, ते काही प्रसन्न नव्हते. सत्य-शोधकांचे मी जे वाचीत होतो तेही एकांगी वाटत होते. किंबहुना जे वाचत होतो त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे असे दुसरे मोठे पवित्र काही आहे आणि ते समाजासमोर हिरीरीनें का ठेवले जात नाही असेही वाटत होते. त्यावेळचा काळ मोठा वैचारिक गोंधळाचा होता; आणि त्या सर्वांमधून मी मोकळा कसा राहिलो याचे मला कधी कधी आश्चर्य वाटते. ब्राह्मणेतर चळवळींचे विशेष असे आकर्षण माझ्यावर फार काळ टिकले नाही. ते का टिकले नाही याचे उत्तर देणे हे मला आजही बुचकळ्यात टाकते. परंतु माझ्या मनाने त्याचे जे एक कारण असू शकेल ते म्हणजे आवती-भोवती विचारांची वेटोळी पडलेली असतानाही मी त्याशिवाय वेगळे असे काही वाचीत होतो.

मी शाळेत असताना उपरिनिर्दिष्ट चळवळ जोराला लागली होती. लोकमान्य टिळकांच्या विरोधी बोलणे, लिहणे ही एक चळवळ त्यावेळी सुरू होती. जाणती माणसे हिरीरीने ती चळवळ करीत होती. तेही सारे मी वाचीत असे. पण हे सारे काय चालले आहे, कशासाठी चालले आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न करूनही मला समजत नव्हते. जे चालले त्यापेक्षा अनेक महत्त्वाचे प्रश्न देशात आहेत. त्यांच्याकडे ही जाणती माणसे लक्ष का देत नाहीत. अशी एक हुरहूर मनाला चिकटलेली असे आणि या हुरहुरीतूनच आपण काही केले पाहिजे या विचाराचा जन्म झाला. पण करायचे म्हणजे तरी काय ? आणि ते कसे हा प्रश्न होताच. तथापि या प्रश्नाचे उत्तर शोधण्यात मला फार काळ लागला नाही. कारण या गंभीर विचारातूनच माझे गंभीर वाचन सुरू झाले होते. त्यावेळीं मी जे वाचले, त्यात राष्ट्रपुरुषांची चरित्रे होती, टिळकांचे राजकारण होते; स्वातंत्र्य-युद्धातील क्रांतिकारकांचे ज्वलंत विचार होते. कॅाँग्रेसच्या नेत्यांची शिकवण होती. समाजनेत्यांचा आदर्श होता.......आणखी पुष्कळ होते. मी विचार करून वाचीत होतो आणि वाचून विचार करीत होतो. आणि ह्या दोन्हींची सांगड अनुभवाशी लावीत होतो. पुढे पुढे तो एक माझा स्वभावच झाला. विचार करून अनुभवातून प्रतिक्रिया व्यक्त करावयची हा माझ्या स्वभावाचा स्थायीभाव त्यावेळेपासूनचा आहे. गेल्या बेचाळीस वर्षांच्या माझ्या राजकीय जीवनात त्यावेळच्या त्या संयमी विचारांची सोबत मला अनेकदा उपयोगी पडत आली आहे.

वाचनाला आणि विचाराला अनुभवाचे कोंदण लाभावे अशी त्यावेळी कराडची स्थिती होती. आमचा कराडभाग नेहमीच जागृत ! सत्यशोधकांच्या चळवळीमुळे समाजाचे मन बदलत चालले होते. बदललेही होते. मी ते अनुभवीत होतो. माझे अंत:करण मात्र दुसरेच काहीतरी धुंडाळीत होते. मोठी मोठी माणसे तुरुंगात जातात, हालअपेष्टा भोगतात. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलाढ्य इंग्रजांना तरुण मने आव्हाने

देतात. जिवाची कुर्बानी करतात, हसत हसत फासाची दोरी स्वतःच स्वतःच्या गळ्याभोवती आवळून घेतात. आणि 'जय भारत' म्हणून पंचत्वात विलीन होतात, हेही माझ्या वाचनात होते. सत्यशोधक मंडळी यासंबंधी का बोलत नाहीत, असे मला नेहमी वाटे. स्वातंत्र्याचा शोध हाच खरा सत्याचा शोध असू शकतो, याविषयी माझ्या मनात तिळमात्र शंका नव्हती. समाजात वावरताना मात्र मला जो अनुभव मिळत होता, तो खटकणारा होता. तथापि अनुभव कोणता का असेना तो कधी व्यर्थ जात नाही, अशी माझी धारणा असल्याने तसलाही अनुभव गाठी बांधून मी पुढे जात होतो.

तेव्हा माझे वय १६-१७ वर्षांचे असेल. कराडला त्यावेळी प्लेग सुरू होता. अर्धेअधिक गाव फुटले होते. लांब कुठेतरी दोन तीन मैलांवर मोकळ्या रानात वस्त्या उभ्या होत्या. प्लेगच्या भीतीने माणसे रानावनात पसरली होती. अगोदरच विस्कळीत झालेल्या समाजातीलही फुटाफूट अधिकच भयाण वाटावी अशी स्थिती होती. शाळा बंद होत्या म्हणून अभ्यासही बंद होता. पण तेही एका दृष्टीने ठीकच होते. अभ्यासाकडे लक्ष देण्याला माझे मन तरी कुठे स्थिर होते!

त्यावेळच्या त्या घटना माझ्या मनात आजही ताज्या आहेत. क्रांतिकारकांच्या उठावणीचा तो काळ होता. लाहोर कटाच्या खटल्याने साऱ्या भारताचे चित्त खेचून घेतले होते. अनेक क्रांतिकारकांना त्यावेळच्या नोकरशाहीने तुरुंगात डांबून त्यांचे अनन्वित हाल मांडले होते. नोकरशाहीने ज्यांच्यावर दात धरला होता, अशा अनेकांना लाहोर कटाच्या जाळ्यात गोवले होते, आणि त्यातच बंगालचे प्रसिद्ध क्रांतिकारक श्री. जतींद्रनाथ दास हे एक होते. जतींद्रनाथांना वस्तुतः लाहोरच्या कटाशी त्यांचा दूरान्वयानेही संबंध सिद्ध न करताना सरकारने पकडले होते. १९२० सालच्या असहकाराच्या चळवळीत सामील झाल्यापासूनच नोकरशाहीचा त्यांच्यावर दात होता. पाच वर्षांत त्यांना चार वेळा तुरुंगात अडकविण्यात आले. चौथ्यांदा ज्यावेळी ते मैमनसिंगच्या तुरुंगात गेले तेव्हा त्यांचा इतका छळ झाला की, वैतागून त्यांनी जेल सुपरिंटेंडेंटशी मारामारी केली. परंतु ह्या गुन्ह्यामुळे त्यांना अंधारकोठडीची शिक्षा भोगावी लागली. तेथे जतींद्रनाथांनी उपवास आरंभिला. तेवीस दिवस त्यांनी उपाशी पोटी काढले तेव्हा त्यांच्या तक्रारीची थोडीशी कुठे दाद लागली!

लाहोर कटात अडकवून त्यांना बंदिखान्यात टाकल्यानंतरही पुन्हा तसलाच प्रसंग उद्‌भवला होता. राजकीय कैद्यांना निर्ढावलेल्या बदमाश गुन्हेगारांप्रमाणे वागविले जात आहे असे पाहून सात्त्विक संतापाने जतींद्रांनी तुरुंगात उपोषण आरंभिले होते. वृत्तपत्रातून त्यांच्या उपोषणाच्या बातम्या नित्य येत असत. जतींद्रनाथांच्या अगोदरपासूनच सरदार भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी राजकीय कैद्यांना विशिष्ट सवलती मिळाव्यात म्हणून उपोषण आरंभिले होते. क्रांतिकारकांच्या या अन्नत्यागाच्या सत्याग्रहाने साऱ्या देशात चिंता पसरली होती. उपोषणाचा एक एक दिवस वाढत होता आणि

नोकरशाही अधिकाधिक निगरगट्ट बनत चालली होती. या दोघा क्रांतिवीरांनी उपोषण सुरू करून एक महिना उलटला तरी इंग्रज राज्यकर्त्यांना घाम फुटेना तेव्हा तुरुंगातील इतर कैद्यांनीही अन्नसत्याग्रह पुकारला. त्यात जतींद्रनाथही सामील झाले. त्यामुळे भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांच्या उपोषणास गंभीर व उग्र स्वरूप प्राप्त झाले आणि त्यापुढच्या प्रत्येक दिवशी भयाणपणा वाढतच गेला.

कराडला त्यावेळीं केसरी, ज्ञानप्रकाश व नवाकाळ एवढीच वर्तमानपत्रे वाचावयास मिळत असत. अन्नसत्याग्रहाचे काय झाले हे समजण्यासाठी मी रानातल्या वस्तीवरून रोज दोन तीन मैल गावात येत असे. कंबरेइतक्या पाण्यातून नदी ओलांडून मी येत असे. त्यावेळीं वर्तमानपत्र वाचावयास मिळणे हे सहजसुलभ नव्हते. ज्या कोणाकडे वृत्तपत्र येत असेल, त्याच्याकडे जाऊन ते वाचावे लागे. मी रोज तसे करीत असे. क्रांतिकारकांच्या उपोषणाने मी अस्वस्थ झालो होतो. भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांची उपासमारीने सर्व शक्ती संपत आली होती. परंतु त्याहीपेक्षा एक महिन्याने उपवास सुरू केलेले जतींद्रनाथ यांस उपवासाने प्रेतकळा आल्याची वर्णने येत होती. एक तर सरकारने शुद्धीवर आले पाहिजे किंवा प्राणाने देह सोडून गेले पाहिजे अशा अटीतटीने क्रांतिकारकांचा उपवास सुरू झाला होता. वर्तमानपत्रात त्यावेळीं येणारी वर्णने चित्तथरारक होती. का कोणाला ठाऊक, परंतु जतींद्रनाथांच्या उपोषणाने मला घायाळ केले होते. शेवटचे वीस दिवस तर जतींद्रनाथांची प्रकृती क्षणाक्षणाला घसरत असल्याचे वृत्त येऊ लागले. धडधडत्या अंतःकरणाने मी ते वाचीत होतो. जतींद्रनाथांच्या सुटकेच्या बाबतीत सरकारने धरलेला निष्ठुरपणा यमालाही लाजविणारा होता असे मला वाटे. जतींद्रनाथ हे काही थोड्या घटकांचे सोबती असताना व पंजाब सरकार त्यांना सोडून भावाच्या ताब्यात देण्यास तयार असतानाही त्यांजपासून जामीन घेतल्यावाचून त्यांस सोडू नये अशी सरकारने अपमानास्पद अट घातली. परंतु या अटीपुढे मान तुकविण्यास जतींद्रनाथांचा भाऊ कबूल नव्हता. दुसरे काहीजण जामीन भरण्याच्या तयारीने पुढे आलेही. परंतु स्वतः जतींद्रनाथांची जामिनावर सुटका करून घेण्याची तयारी नव्हती. जणू काही इहलोकाच्या बंदिवासातून कायमची सुटका करून घेण्याच्या क्षणाचीच ते वाट पाहात होते !

माझ्या बालमनावर या घटनांचा चिरकालचा परिणाम झाला. देशासाठी देह सोडणारे जतींद्र माझे कोणी जवळचे आप्त आहेत असे माझ्या मनाने ठामपणे घेतले. बासष्ट दिवस जतींद्रनाथांनी देशासाठी तिळ-तिळ आहुती दिली आणि बासष्टाव्या दिवशी लाहोरच्या तुरुंगात भर दुपारी एक वाजता सूर्याला साक्ष ठेवून त्यांनी स्वदेहाची पूर्णाहुती दिली. मातृदेवतेसाठी झिजून झिजून त्यांनी प्राणार्पण केले.

जतींद्रांचा आत्मयज्ञ ही एकच एक घटना त्या दिवशी सर्वांमुखी होती. वृत्तपत्रात मी त्या आत्मयज्ञाचें वृत्त वाचले आणि या प्रसंगाने मी भांबावून गेलो. जतींद्रांनी देशासाठी प्राण दिला या घटनेने मला बेचैन केले. काय होत आहे हे समजेनासे झाले.

देहाचे व्यापार सुरू होते परंतु मनाचे व्यवहार उधळले होते. परमदुःखाच्या खोल गर्तेत मी कुठे तरी पडलो आहे; असे स्पंदन मनात कोठे तरी चालू होते. परंतु कोठे जावे, काय करावे, कोणाला सांगावे हे काही सुचत नव्हते. बधीर झालेल्या मनाने मी तसाच चालायला लागलो आणि चालता चालता रडायलाही लागलो. मी केव्हा रडायला लागलो हेही मला समजले नाही. गावातील घरे ओलांडून मी पुढे चाललो होतो. ती निर्मनुष्य घरे मला भयाण वाटली. सायंकाळी नदी ओलांडून जाताना नेहमी घरट्याकडे जाणारे पक्ष्यांचे थवे मला त्या दिवशी आढळले नाहीत. रानात भिरभिरणारा वारा सुस्तावला होता. झाडझुडूप स्तब्ध झाले होते. सारे वातावरण कुंद बनले होते. माझ्या मनाचे प्रतिबिंब मला जणू चराचरात दिसत होते. त्यामुळे तर मी अधिकच व्याकुळ झालो. दिवस संपून गेला होता. मी वस्तीवर पोहोचलो तेव्हा कडूस पडलं होतं. वाढत्या अंधःकारात झोपड्यातील मिणमिणते दिवे वातावरणाला उजाळा देण्यास असमर्थ होते. काळ्या रानातील त्या काळ्या अंधारात नेहमी तासन् तास तारकांशी खेळ खेळणारा मी त्या रात्री तारकापुंजात जतींद्रनाथ मला कुठे दिसतात का, हे शून्य दृष्टीने पाहात होतो. पोटात भूक असूनही अन्नावरची वासना उडाली होती. तहान भूकहरपलेल्या स्थितीत मी एकच एक करीत होतो......एकसारखा रडत होतो. आई समजावीत होती आणि मी रडत होतो. अशा स्थितीत रात्र सरली पण माझे रडणे संपले नाही. मातेचे मऊ मन माझ्यामुळे मरगळून गेले होते. कलकत्त्याचे कोणीतरी निधन पावले म्हणून मी दुःख मानावे, हे आईला समजत नव्हते. माझ्या केविलवाण्या मनःस्थितीचा तिच्यावर वेगळाच परिणाम झाला. " मुलाला काय झाले आहे पाहा हो, याला कोणाला तरी दाखवा हो " असे ती शेजाऱ्यांना म्हणत होती. मी हे सारे समजत होतो. पण माझे मन आईला खुले करून कसे दाखवावे हे मला उलगडत नव्हते.

जतींद्रांच्या देहातील राष्ट्रीय स्वातंत्र्याचे प्रखर तेजोवलय माझे अंतःकरण छेदून गेले. हे मी या माउलीला कसे समजावून सांगणार होतो ! एवढे मात्र खरे की, त्या घटनेने माझ्या चित्तवृत्तीत बदल झाला. देशात घडणाऱ्या घटनांचे अर्थ मला अधिक जवळचे वाटू लागले. मी त्यांचे अर्थ समजावून घेण्याच्या मनःस्थितीपर्यंत पोहोचलो. कराडचे आमचे त्यावेळचे नेते श्री. बाबुराव गोखले, सदाशिवराव आळतेकर, त्यांचे चिरंजीव गणपतराव आळतेकर माझ्या शाळेतील राष्ट्रीयवृत्तीचे शिक्षक या सर्वांचे व्यक्तिमत्त्व माझ्या मनावर काही संस्कार घडवीत होते. ते जे बोलत असत ते मी मनाने टिपत होतो. त्या दृष्टीने १९२७ ते १९४० हा बारा तेरा वर्षांचा काळ शिक्षणाबरोबरच माझी राजकीय मनोभूमी तयार होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. या काळात राजकीय चळवळ, तुरुंगवास, वैचारिक खळबळ, अशा कितीतरी घटना घडल्या. अशा वेळी मला मित्रांची बहुमोल मदत झाली आहे.

किंबहुना माझे व्यक्तिमत्व हे माझ्या सर्व मित्रांच्या आशीर्वादाचे आणि प्रयत्नांचे दृश्य रूप आहे असेच मी मानतो. १९३० साली मी राष्ट्रीय चळवळीत उतरलो त्यावेळीं माझ्या मनात एक वैचारिक द्वंद्व निर्माण झाले. स्वातंत्र्यचळवळीला सामाजिक व आर्थिक स्वरूपाची एक बाजू असावी असे मला नेहमी वाटे. त्या दृष्टीने रॉय यांच्या विचारांचा पगडा माझ्यावर अधिक पकड करू शकला.

सांप्रदायिकतेने एखाद्या विचारांशी बांधून घेणे हा माझा स्वभाव नाही. ते मला पटत नाही. त्या विचारातून आणि कृतीतून दैनंदिन जीवनाला योग्य ते मार्गदर्शन लाभणार नसेल तर मी अशा विचारापासून अलग होत गेलो आहे. वैचारिक सिद्धांताचा अचूकपणा मी तोच जाणतो की, ज्यातून कार्याचा प्रभाव निर्माण होऊ शकतो. तसे न होईल तर त्या विचारातच काहीतरी चूक असली पाहिजे असे समजण्यास हरकत नसावी. तशी चूक असेल तर तो विचार तपासण्याची माझी वृत्ती असते. १९४० पासूनची ती वैचारिक बैठक राजकीय प्रवासातील माझी कायमची सोबत झाली आहे.

मला असे नेहमी वाटते की, माणसाचे जीवन फुलायचे असेल तर त्याला अशी काहीतरी सोबतीची सांगड पाहिजे. माझा तरी तो अनुभव आहे. माझ्या आयुष्यात जर काही घडल्याचे दिसत असेल तर ते माझ्या सोबत्यांनी घडविले असे माझे प्रांजल मत आहे. प्रत्येक मनुष्य स्वतःचे जीवन स्वतःच घडवितो असे मी तरी मानीत नाही. जीवनाची मी जी वाटचाल केली त्यात योगायोगाचा काही भाग जरूर आहे. योगायोग याचा अर्थ तेथे कर्तृत्व निष्प्रभ होते असा नव्हे. मनुष्य हा स्वयं-प्रकाशित आहे, ही अध्यात्माची भाषा खरी असली तरी व्यवहारात मनुष्याची शक्ती मर्यादित आहे असा अनुभव येतो. अदृश्यांतील अनेकानेक शक्ती मानवी जीवन मागेपुढे खेचू शकतात. ही वस्तुस्थिती निर्विवाद मानावी लागते. माणसाची इच्छा-शक्ती असीम खरी, पण तिची पूर्तता सर्वस्वी मानवाधीन आहेच असे नव्हे. तसे जर असते तर ' योगायोग ' या शब्दाचा जन्मच होऊ शकला नसता. मानवमात्राच्या ठिकाणी विचारांची शक्ती मोठी असली तरी त्याच्याही पलीकडे नियती शिल्लक उरतेच. एखाद्या गोष्टीचे ज्ञान पूर्णांशाने होऊच शकत नाही, ही नियतीची अबाधित व्यवस्था आहे. नियतीचा हा क्रम बदलण्याची शक्ती अजून उपलब्ध व्हावयाची आहे. जगाच्या अर्ध्यावर अंधार आणि अर्ध्यावर उजेड हा नियतीचा नियम मानवी जीवनातही आढळतो. गावात शिरून मोठमोठ्या हवेल्या पाहिल्या तरी त्या गावची वेस विसरावयाची नाही. ही कृतज्ञता मला परिस्थितीने शिकवली आहे.

भारतीय लोकशाहीची मृत्युघंटा वाजते आहे अशा घोषणांनी मी सचिंत होत नाही. मला स्वतःला भारतीय लोकशाहीचे रोपटे रसरसलेले आहे असे वाटते आणि लहानशा वादळाने ते उन्मळून पडेल अशी भीती मला वाटत नाही. शासनाचा दर्जा आणि उंची दिवसेंदिवस वाढावयाला हवी. राज्यकारभार हाकण्यासाठी

दिवसेंदिवस नवी तडफदार तरुण मंडळी पुढे येत असून त्यांच्या आशा–आकांक्षा–महत्त्वाकांक्षा ध्यानी घेतल्या जाणे जरूर आहे. हे तरुण नव्या पिढीचे प्रतिनिधी आहेत. ते राजकीय, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत जागरूक आहेत. सरकारातील किंवा कायदेमंडळातील लोकप्रतिनिधी त्यांचेशी कसे वागतात व त्यांना वागवून कसे घेतात याला फार महत्त्व आहे. सरकारी यंत्रणेची पोलादी चौकट अद्याप फारशी बदललेली नसली, जुने सनदी नोकर आणि त्यांच्या काम करण्याच्या विशिष्ट पद्धतीत फारसा बदल झालेला नसला तरी जुन्या-नव्यांना बरोबर घेऊन आपल्याला चांगली कामे करून घ्यावयाची आहेत, त्यांना पटवून देऊन जनतेच्या गरजा पुऱ्या करावयाच्या आहेत, हे सरकारात किंवा उच्च पदावर बसलेल्यांनी विसरता कामा नये. सुदैवाने सर्वच राजकीय पक्षातील जुनी अनुभवी व नवी तरुण शिकलेली मंडळी आजकाल कायदेमंडळात व सरकारात दिसू लागली आहेत. या मंडळीवर नव्या बदललेल्या परिस्थितीत फार मोठी जबाबदारी आहे. सार्वजनिक जीवनातील कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी आपल्यावर काही बंधने घालून घेऊन आपल्या जबाबदाऱ्या पार पाडायला हव्यात. नैतिक चारित्र्य, कर्तृत्व, अभ्यासूपणा, गुणग्राहकता, लोकसंग्रह यांना विशेष महत्त्व असून ज्याचेजवळ किमान ही पुंजी नसेल तर तो फारशी प्रगती करू शकणार नाही. ' स्वार्थापेक्षा सेवा मोठी, भोगापेक्षा त्याग मोठा ' याची किंमत कमी झालेली नाही. लोक या गोष्टीकडे अजूनही मोठ्या कटाक्षाने बघत असतात. त्याचबरोबर जुन्या अनुभवी मंडळींकडून आपण काही शिकले पाहिजे, उमेदवारी केली पाहिजे असा दृष्टिकोन ठेवून आपापली वाढ केली पाहिजे.

कोणाला जर वाटत असेल की, आपण स्वयंसिद्ध आहोत किंवा परिपूर्ण आहोत तर ते चुकीचे आहे. सरकारबाहेर फार मोठी मंडळी काम करीत असतात व सरकारचे व सरकारातील घटकांचे काम ते बारकाईने पाहात असतात. या मंडळीकडून केवळ वाहावाच नव्हे तर वेळोवेळी सल्लामसलत, विचारविनिमयाचा लाभही मिळविता आला पाहिजे. महाराष्ट्र किंवा मुंबई राज्याचा कारभार हाकताना मी या गोष्टीकडे विशेष लक्ष देत होतो. राज्यात काम करताना त्याची विशेष आवश्यकता असते. राज्यकर्त्यांनी दुहेरी दळणवळण व दुसऱ्याचा दृष्टिकोन समजावून घेण्याची गरज विसरता कामा नये. वृत्तपत्रातील टीकेने किंवा व्यासपीठावरील हल्ल्याने गांगरून न जाता किंवा मनात राग, सूडबुद्धी न बाळगता दृष्टिकोन समतोल व वृत्ती शांत ठेवायला हवी. या भूमिकेचा मला वादळी स्थितीतही फार उपयोग झाला. राज्य कोणत्या पक्षाचे आहे, ते कोण चालवितो यापेक्षा ते कसे चालविले जाते याला फार महत्त्व आहे. चालू काळ संक्रमणाचा आहे, त्याचबरोबर सर्वांच्या कसोटीचा पण आहे. लोकशाहीला वेगवेगळी आव्हाने दिली जात आहेत. या आव्हानांना सार्थपणे तोंड देऊन भारतीय लोकशाही टिकेल व वाढेल अशी माझी श्रद्धा आहे.

卐 卐 卐

म १५४४४

# आदर्श व्यक्तिमत्व

## नामदार श्री. वसंतराव नाईक, मुख्यमंत्री : महाराष्ट्र राज्य

ज्या व्यक्तीला आपण नित्य जवळून पाहतो, ज्याच्याबरोबर काम करतो, ज्याला मानतो अशा व्यक्तीबद्दल स्वतःचे विचार स्पष्टपणे मांडणे कठीण असते. परंतु यशवंतराव ही व्यक्तीच अशी आहे की, त्यांच्यासोबत काही काळ जरी मिळाला तरी एक प्रकारचा जिव्हाळा वाटतो. आपण मोकळेपणा दाखविला तरी त्यामुळे त्यांचा गैरसमज होणार नाही, याची खात्री वाटते. यशवंतरावजींना जवळून पाहण्याचा व त्यांच्यासोबत काम करण्याचा योग मला सुमारे तेरा वर्षांपूर्वी आला.

यशवंतरावजींची स्वातंत्र्यपूर्व काळातील महनीय कामगिरी मी ऐकून होतो. एक झुंजार व नेकजात स्वातंत्र्य-सैनिक म्हणून त्यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात हिरीरीने भाग घेतला होता. ते सामान्य जनतेतून वर आले होते. गरीब माणसांच्या साऱ्या वेदना त्यांना माहीत होत्या. जनसामान्यात वावरल्यामुळे जनतेच्या आशा-आकांक्षांची त्यांना पूर्ण जाणीव होती. त्यामुळेच बेचाळीसच्या क्रांतीमध्ये कार्य केलेल्या व वयाच्या बेचाळीसाव्या वर्षीच एका मोठ्या राज्याच्या मुख्यमंत्रि-पदाची सूत्रे स्वीकारलेल्या यशवंतरावजींचा राजकीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोन कसा असेल याची काहीशी कल्पना मी मनाशी बाळगली होती. हा तरुण नेता पुरोगामी विचारसरणीचा, बुद्धिनिष्ठ असूनही भावनांना पारखा न झालेला, व्यवहारी दृष्टीचा व फार कर्तबगार असावा अशी माझी अटकळ होती. यशवंतरावजींबरोबर काम करू लागल्यावर ती तंतोतंत खरी असल्याचा मला पडताळा आला. स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरू व यशवंतरावजी यांच्यामध्ये जे एक साधर्म्य आढळून येते, त्याची या ठिकाणी आठवण होते. पंडितजींचे व्यक्तित्व एखाद्या वटवृक्षासारखे होते. वाटचाल करणाऱ्या पांथस्थाला ज्याप्रमाणे वाटेवरील वडाचा आधार वाटावा तसा राजकारणात काटेरी वाटचाल करणाऱ्या कार्यकर्त्यांना पंडितजींचा मोठाच आधार वाटत असे. हीच

गोष्ट यशवंतरावजींनाही लागू पडते. राष्ट्राच्या एकंदर जीवनावर पंडितजींच्या विचारांचा आणि विशाल व्यक्तिमत्त्वाचा ठसा ज्याप्रमाणे उमटलेला होता त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या राजकीय व वैचारिक जीवनावर यशवंतरावजींच्या विचारांचा आणि व्यक्तिमत्वाचा प्रभाव प्रकर्षाने पडला असल्याचे दिसून येते. यशवंतरावजींच्या नेतृत्वाचे जे आणखी एक वैशिष्ट्य आढळून येते ते हे की, ते कार्यकर्त्यांना मार्ग-दर्शन तर करतेच पण लायक कार्यकर्त्याला पुढे येण्याची संधीही देते. म्हणूनच नव्या कार्यकर्त्याला यशवंतरावजी हे आपले मित्र व मार्गदर्शकच वाटतात. सर्वांना बरोबर घेऊन पुढे जाण्याच्या यशवंतरावजींच्या गुणामुळेच त्यांच्या सहकाऱ्यांना त्यांच्याबद्दल आदर, प्रेम आणि आपलेपणा वाटावा हे स्वाभाविक आहे.

१ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. कित्येक वर्षे एकत्र राहिलेली महाराष्ट्र व गुजरात ही राज्ये अलग झाली. मराठी भाषिकांचे एक राज्य व्हावे, ही जनतेची इच्छा फलद्रूप झाली. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्रिपद यशवंत-रावजींकडे सोपविण्यात आले. महाराष्ट्र निर्मितीच्या कार्यात खुद्द यशवंतरावजींनी किती महत्त्वाची कामगिरी बजावली होती, हे सर्वश्रुत आहे. त्या कामगिरीचे मूल्यमापन इतिहास करीलच. महाराष्ट्र व गुजरात ही दोन वेगळी राज्ये अस्तित्वात येण्यापूर्वी जी परिस्थिती निर्माण झाली होती ती यशवंतरावजींनी मोठ्या चातुर्याने व संयमाने हाताळली. कोणताही वाद असो, तो कटुता निर्माण होऊ न देता सामोपचाराने सोडविला जावा, अशी त्यांची भूमिका असे. विरोधकांशीही सौजन्याने वागण्याची व त्यांच्या मतांचा योग्य आदर करण्याची त्यांची वृत्ती वाखाणण्यासारखी आहे. या वृत्तीमुळेच त्यांनी महाराष्ट्र राज्य-निर्मितीच्या वेळची सारी परिस्थिती कुशलतेने हाताळली. त्यांच्यातील श्रेष्ठ शासकीय कौशल्य त्यावेळी पणाला लागले होते. महत्त्वाच्या प्रत्येक बाबतीत ते आपल्या सहकाऱ्यांना विश्वासात घेत असत. सहकाऱ्यांवर विश्वास टाकून आणि त्यांना वाढत्या जबाबदारीची कामे करण्याची संधी देऊन त्यांच्यातील शासकीय आत्मविश्वास वाढीला लावण्याचे त्यांचे धोरण मला तरी फार महत्त्वाचे वाटते.

आज महाराष्ट्र राज्याची भव्य प्रतिमा सर्वांच्या नजरेसमोर दिसत आहे. तिला उजाळा देण्यात यशवंतरावजींनी अशा प्रकारे फार मोलाचा हातभार लावला आहे. महाराष्ट्राच्या मातीवर, महाराष्ट्राच्या संस्कृतीवर, मराठी भाषेवर आणि मराठी जनतेवर त्यांचे अपरंपार प्रेम आहे, परंतु हे प्रेम केवळ प्रांतीय स्वरूपाचे नाही. भारताला बलवान करावयाचे झाल्यास महाराष्ट्राचा विकास झाला पाहिजे, अशी त्यांची निष्ठा होती व ती तशी आजही आहे. ही निष्ठा महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नाही तर भारतातील प्रत्येक घटक राज्याची एकत्रित शक्ती हीच भारताची संघशक्ती, अशी त्यांची व्यापक धारणा आहे. त्याच राष्ट्रीय दृष्टिकोनातून ते महाराष्ट्राकडेही पाहात असतात.

यशवंतरावजींच्या व्यक्तित्वाची जडणघडण ही अशी एका राष्ट्रीय व तात्त्विक विचारसरणीतून झालेली आहे. प्रत्येक विषयाचा मूलभूत दृष्टिकोनातून ते विचार करतात. राजकारणात मुद्देसूद व तत्त्वनिष्ठ विचार कसा करावा, हे आपण मानवेन्द्रनाथ रॉय यांचेपासून शिकलो, हे त्यांनी जाहीरपणे मान्य केलेले आहे. कोणत्याही प्रश्नाची उकल करताना ते व्यवहाराचे सूत्र जसे सोडीत नाहीत तशीच तत्त्वापासून फारकतही स्वीकारीत नाहीत. औद्योगिक विकास, शेतीमालाचे उत्पादन, नियोजन, सहकारी चळवळ, राष्ट्रीय एकात्मता व समाजवाद यासारखा कोणताही गुंतागुंतीचा विषय असो; यशवंतरावजींचे त्यावर खास चिंतन चालू असते. त्या प्रत्येक विषयाचा ते मूलभूत दृष्टीने सर्वांगीण विचार करीत असतात. आपला देश कसा होईल, त्याचे ऐक्य कसे वाढीला लागेल व देशातील सर्वसामान्य जनता कशी सुखी होईल, याचाच ते निरंतर वेध घेताना आढळतात. लहान पातळीवरील संकुचित विचार त्यांच्या मनाला स्पर्श करीत नाहीत; त्यामुळेच यशवंतरावजींच्या प्रत्येक विचाराची, विधानाची व विश्लेषणाची दखल सर्वांना घ्यावीच लागते. शब्दांच्या वारेमाप उधळपट्टीपेक्षा यशवंतरावजी कृतीला महत्त्व देतात. त्यांच्या कृतीला भक्कम वैचारिक अधिष्ठान असते.

यशवंतराव अद्यापि तरुण मनाचे आणि प्रगत विचाराचे आहेत. काहींनी त्यांना " मॅन ऑफ क्रायसीस " म्हणून संबोधिले आहे. कॅाँग्रेस संघटनेत काही काळापासून विघ्ने निर्माण झाली आहेत. कठोण परिस्थितीतून यशस्वीपणे मार्ग काढण्याचे कौशल्य यशवंतरावजींचे ठायी आहे, हे पूर्वी सिद्ध झालेलेच आहे. त्यांच्या बहुमोल अनुभवाचा फायदा सध्याच्या परिस्थितीत व येथून पुढेही आपल्या राष्ट्रास मिळेल यात शंका नाही. या थोर नेत्याला व मार्गदर्शकाला आपल्या भारतमातेची सेवा करण्यासाठी परमेश्वराने उदंड आयुष्य द्यावे, हीच माझी प्रार्थना आहे.

卐 卐 卐

# महाराष्ट्राचा सह्याद्री

पद्मभूषण श्री. वसंतरावदादा पाटील, अध्यक्ष : महाराष्ट्र काँग्रेस

आज श्री. यशवंतरावांना भारताचे एक यशस्वी गृहमंत्री म्हणून आपण संबोधित आहोत. परंतु त्यांना लाभलेल्या या राजकीय पदापेक्षाही त्यांच्यामध्ये माणसाला आकर्षून घेणारे इतरही काही गुण आहेत. त्यांच्यामध्ये असलेल्या या गुणांचा आपण बारकाईने अभ्यास केला तरच खऱ्या अर्थाने यशवंतराव कोण आहेत, त्यांचे स्थान खरे काय आहे, याची कल्पना येईल. यशवंतराव हे यशवंत कसे झाले हे आपण पाहिले पाहिजे.

एका सामान्य कुटुंबात जन्माला आलेला मुलगा एल्‌एल्‌. बी. झाला. सुशिक्षित मुलाला त्या काळीं स्वतःचा सुंदर संसार सहज करता आला असता, परंतु काही माणसे ही समाजाचा संसार करण्यासाठी जन्माला आलेली असतात. राजकारण हे त्यांनी आपले जीवित मानले. देशाचा संसार हा त्यांनी आपला स्वतःचा संसार मानला.

संयुक्तमहाराष्ट्राचे तुफान वादळ महाराष्ट्रात सुरू झाले. त्या वादळात सामान्य जनतेला शत्रू कोण, मित्र कोण हे ओळखणे कठीण झाले. या प्रचंड वादळात यशवंतराव ताठ उभे होते. त्यांच्या बोलण्याचालण्यात व वागण्यात कमालीचा निश्चयीपणा होता. प्रतिपक्षाच्या टीकांचे हलाहल त्यांनी शंकराप्रमाणे पचविले. त्यांनी सांगलीच्या प्रचंड सभेत ठासून सांगितले की, " मला मुद्दाम बदनाम करावयाचे असेल तर तो उद्देश साध्य होईलही, परंतु सत्य बदनाम होणार नाही. एक वेळ अशी येईल की, तुम्ही जाहीरपणे नाही, निदान माझ्या कानात तरी कबूल कराल की, १९५५-५६ मध्ये तुम्ही जे बोललात ते खरे होते. झगड्याने, वैराने असे रस्त्यावर भांडून मुंबई मिळणार नाही. मी हा जो राजकारणात आलो आहे, तो सेवेचा अधिकार घेऊन आलो आहे. मी तुम्हांला आवडत नसेन तर मला असेंब्लीत पाठवू नका. परंतु माझा सेवेचा अधिकार तुम्हांला हिरावून घेता येणार नाही. मीही काही पालापाचोळा

नाही की, विरोधाच्या फुंकाऱ्याने उडून जाईन. पंचवीस वर्षांचे माझे राजकीय-जीवन लोकांच्या समोर आहे. त्याची जाहीर चौकशी करून घेण्यास मी तयार आहे. " यशवंतरावांच्या या भाषणावरून ते किती आत्मविश्वासी होते, याची कल्पना आल्याशिवाय राहात नाही.

यशवंतराव हे पुरोगामी विचारसरणीचे आहेत. त्यांचा समाजवादावर दृढ विश्वास आहे. म्हणूनच सामान्य जनतेच्या हृदयपटलावर यशवंतरावांची प्रतिमा स्पष्ट उमटली आहे. ते अतिशय काळजीपूर्वक बोलणारे नेते आहेत. त्यांचा जिभेवर कमालीचा संयम आहे. संयम ठेवून ते विरोधकावर क्षमेचे व प्रेमाचे अस्त्र सोडतात. म्हणूनच आज काँग्रेसमध्ये पुरोगामी विचारसरणीची व समाजवादावर दृढ विश्वास असलेली माणसे दिसत आहेत. तसेच विरोधी पक्षात सुद्धा त्यांच्या विचाराबाबत आदर असलेली अनेक माणसे आढळून येतात. आपल्या स्वतःच्या कर्तृत्वाने व प्रेमळ वागणुकीने त्यांनी विरोधकांना सुद्धा वश केले आहे. विरोधी पक्षातील व समाजात विखुरलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींना त्यांनी आमंत्रणे देऊन स्वतःच्या संघटनेत ओढून घेतले आहे. मोठ्या विश्वासाने त्यांनी त्यांच्यावर जबाबदारीची कामे सोपविली आहेत.

यशवंतराव म्हणजे विवेकी आचार व धोरणाचे मूर्तिमंत प्रतीक होय. ते उत्तम संघटना-कुशल आहेत. संघटनेत एकजिनसीपणा व एकोपा ठेवण्यात आज तरी तेच यशस्वी झालेले दिसतात. संघटनेत त्यांनी पुष्कळ नवीन रक्त आणले आहे. जुन्या कार्यकर्त्यांना शक्य तो न दुखवता त्यांनी संघटना नावारूपाला आणली आहे. ते एक उत्कृष्ट प्रशासक आहेत. आदर्श मुख्य मंत्री म्हणून अनेक विद्वानांनी त्यांचा गौरव केला आहे. गुंतागुंतीचे प्रश्न सोडविणारे ते एक थोर मुत्सद्दी आहेत. त्यांच्या राज्यकारभारात सामान्य माणसाच्या कर्तृत्वालासुद्धा वाव आहे. खिलाडूवृत्तीचे ते एक यशस्वी शासनकर्ते आहेत. ते केवळ राजकारणी मुत्सद्दीच आहेत असे नाही तर ते एक रसिकही आहेत. म्हणूनच उत्कृष्ट नाटकांना ते अवश्य उपस्थित राहतात.

एखाद्या नाट्य-कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून ते सखोलपणे बोलू शकतात. त्यांचा पिंड साहित्यकाचा आहे म्हणूनच सबंध जनतेचे दुःख काय आहे, हे ते जाणू शकतात. मानवी स्वभावातले बारकावे हेरण्यात माझ्या बघण्यात व वाचनात यशवंत-रावासारखा नेता मी अद्याप तरी दुसरा पाहिला नाही. ते विनोदी आहेत. केवळ विनोदी नाहीत तर विनोदवृत्तीने वागून कार्य करणारे आहेत. ते विद्वानांचे चाहते आहेत. ते लेखक आहेत. कवी आहेत. त्यांना लेख लिहिण्यास व कविता करण्यास वेळ मिळत नाही हीच काय ती अडचण आहे. आजवर पुष्कळशा साहित्य संमेलनांना हजर राहून साहित्यकांची व कलाकारांची त्यांनी योग्य स्तुती केली आहे. म्हणूनच आज सर्व थरांतील व व्यवसायांतील लोक त्यांच्याभोवती गोळा झालेले दिसतात.

यशवंतराव हे एक उत्कृष्ट वक्ते आहेत. प्रसंगोचित भाषण करण्यात यशवंत-रावांची बरोबरी करणारा दुसरा नेता आम्हा तरुणांना तरी आज कोणी दिसत नाही

लोकांना सुरवातीलाच सांगून टाकतात, " आपल्यापुढे किती धोके आहेत, किती संकटे आहेत." लोक चिंताग्रस्त होतात. लगेच ते लोकांना सांगतात, " जर तुम्ही साथ दिली तर ह्या संकटांवर सहज मात करता येईल. " लोक तयार होतात. युक्तिवादाने ते विरोधकांच्या शिडातील हवाच काढून घेतात. कधी कधी असे बोलतात की, विरोधक गांगरतात, त्यांच्या या गोष्टीचा फायदा घेऊन यशवंतराव पुढे जातात. जाता-जाता ते आपल्या भाषणात कोपरखळ्या मारतात. ते प्रतिपक्षावर कधीही तुटून पडणार नाहीत. पण अशी काही अस्त्रे सोडतील की, प्रतिपक्षाचा आवाज बंद होईल. शब्दांची अचूक फेक करणारे ते एक उत्तम संसदपटू आहेत. आपली बाजू रास्त असली तरीही दुसऱ्याच्या भावना न दुखविण्याकडे ते लक्ष देतात. त्यांच्या भाषणातील प्रत्येक शब्द अंतःकरणाच्या गाभाऱ्यातून बाहेर पडलेला असतो. उत्कृष्ट, भव्य व शाश्वत गोष्टींकडे त्यांचा बघण्याचा दृष्टिकोन अतिशय चांगला आहे. त्यांच्या स्मित-हास्याने व प्रेमळ नमस्काराने विरोधक सुद्धा विरघळून जातात. नव्या जीवनाची शाश्वत मूल्ये सांगणारा हा नेता आज हवा आहे. नवा इतिहास घडविणारा महाराष्ट्राचा हा विशाल सह्याद्री आहे. त्यांना या कार्यासाठी परमेश्वर भरपूर आयुरारोग्य देवो, हीच अनन्यभावे प्रार्थना.

卐 卐 卐

## सच्चा देशभक्त

नामदार श्री. अण्णासाहेब शिंदे, राज्य अन्न व कृषी मंत्री : भारत सरकार.

नामदार यशवंतरावजी चव्हाण यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू आहे. ते १९४२ च्या क्रांतीतील प्रमुख पुढारी होते. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडला होता. कॉंग्रेस संघटनेत व कॉंग्रेस सरकारात त्यांनी केलेले बहुमोल कार्य सर्व भारतात आता परिचित आहे. संसदीय सचिवापासून मुंबई राज्याच्या मुख्यमंत्री पदापर्यंतची आणि तेथून भारत सरकारच्या संरक्षणमंत्री पदापासून गृहमंत्री पदापर्यंत झालेली त्यांची प्रगती आणि कामगिरी नेत्रदीपक आहे. त्यांनी जी जी पदे भूषविली त्यावर त्यांनी आपली छाप पाडली. द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी विरोधी पक्षास चुचकारून व केंद्रीय नेतृत्वास समजावून संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश महाराष्ट्र जनतेला अर्पण केला व तेव्हापासून ते महाराष्ट्राचे एकमात्र धुरीण असे पुढारी म्हणून मान्यता पावले आहेत. सात-आठ वर्षे केंद्र सरकारात राहिल्यानंतर आता ते एक प्रमुख राष्ट्रीय व आदरणीय असे पुढारी झाले आहेत.

नामदार यशवंतरावजी चव्हाण म्हणजे महाराष्ट्राने राष्ट्राला दिलेली एक बहुमूल्य भेटच आहे. नामदार यशवंतरावजी चव्हाणांचे भावी आयुष्य आता राष्ट्राच्या भवितव्याशी निगडित झाले आहे. गेल्या सात-आठ वर्षांपासून त्यांना मला बरेच जवळून पाहता आले. सुज्ञ नेता, विश्वासू सहकारी, प्रेमळ मित्र, विवेकाने प्रेरित झालेला सच्चा देशभक्त व हिमालयासारखे व्यक्तिमत्व असलेला पुढारी म्हणजे नामदार यशवंतराव चव्हाण असे मी मानतो.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा आज प्रचंड वृक्ष झाला आहे. महाराष्ट्रातील लक्षावधी जनतेच्या जीवनात सहकारी चळवळीला विशेष स्थान प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्रातील या सहकारी चळवळीस दिशा देण्याचे कार्य ना. यशवंतराव चव्हाण यांनीच केले. सामान्य माणसाला सामाजिक न्याय देण्यासाठी सहकारी

चळवळींचा उपयोग झाला पाहिजे. समतेच्या प्रेरणा घेऊन समाजसत्तावादाच्या दिशेने सहकारी चळवळींची वाटचाल झाली पाहिजे. सहकारी चळवळीपुढे हे आदर्श ठेवण्याचे काम ना. यशवंतराव चव्हाणांनीच केले.

खेड्यापाड्यातील आणि दऱ्याखोऱ्यातील तसेच शहरांतील गोरगरिबांना ज्ञान-मंदिरे खुली झाली पाहिजेत. उच्च शिक्षणाचा फायदा गरिबापर्यंत पोचविला पाहिजे यासाठी ना. यशवंतराव चव्हाणांनी खूप प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळे महाराष्ट्रात शिक्षणाचा व शिक्षणसंस्थांचा खूपच प्रसार झाला आणि कै. कर्मवीर भाऊराव पाटील, कै. डॉ. पंजाबराव देशमुख वगैरेंना शिक्षणविस्ताराच्या कार्यात ना. चव्हाणांची बहुमोल मदत झाली.

ना. यशवंतरावांची सर्वात मोठी कामगिरी ही पक्ष-बांधणीच्या व उभारणीच्या क्षेत्रातील होय. समाजामध्ये अनेक हुशार, त्यागी कार्यकर्ते असतात, परंतु सर्वांनाच पुढारीपणाची भूमिका योग्य तऱ्हेने पार पाडता येते असे म्हणता येणार नाही. ना. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राच्या पुढारीपणाची सूत्रे हातांत घेतली त्यावेळेस महाराष्ट्रातील कॅाँग्रेस पक्षाची अवस्था काही फारशी चांगली नव्हती. परंतु ना. यशवंत-रावांनी अतिशय प्रयत्नपूर्वक महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यांतील कार्यकर्त्यांशी संबंध निर्माण केले आणि महाराष्ट्रातील हजारो कार्यकर्ते आपल्या विचाराच्या प्रभावाने आणि आईच्या मायेने जवळ केले. आज अक्षरशः उभ्या महाराष्ट्रात निरनिराळ्या क्षेत्रांत काम करणारे हजारो कार्यकर्ते ना. चव्हाणांचे पुढारीपण मानतात. त्यात बुद्धिवंत आहेत, शास्त्रज्ञ आहेत, लेखक आहेत, कवी आहेत, आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे कामगार, शेतकरी, मध्यमवर्गीय थरातील निवडक कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने आहेत. अखिल भारतात महाराष्ट्र कॅाँग्रेससारखी प्रभावी संघटना आज नाहीच म्हटले तरी चालेल. मी गेली आठ वर्षे दिल्लीच्या राजकारणात आहे, परंतु एवढा लोकसंग्रह करणारा नेता मी अलीकडच्या काळात तरी पाहिला नाही. भारतीय लोकशाहीचे भवितव्य हे सर्वस्वी प्रभावी व बळकट लोकाभिमुख लोकशाही पक्ष-संघटनेवरच अवलंबून आहे. आज भारतीय पातळीवर नेतृत्वाची जबरदस्त पोकळी निर्माण झालेली आहे. केवळ ना. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखा धोरणी समाज-वादी आणि लोकशाहीवर संपूर्ण निष्ठा असलेला नेताच भारतीय लोकशाहीस जीवदान देऊ शकेल. हे सामर्थ्य ना. यशवंतराव यांच्यातच आहे असे मी म्हणेन.

त्यांच्या जीवनाचा, विचारांचा व कार्याचा अधिक सखोल अभ्यास होणे अत्यंत जरुरीचे आहे. नामदार यशवंतरावजी चव्हाण यांना राष्ट्राची अधिकाधिक सेवा करण्यास परमेश्वर दीर्घायुरारोग्य देवो हीच प्रार्थना.

卐 卐 卐

# पुरुषार्थाची प्रेरणा

नामदार श्री. शंकरराव चव्हाण, वीज व विधानकार्य मंत्री : महाराष्ट्र राज्य

सामान्य कुटुंबात जन्मलेला माणूस स्वतःच्या गुणांच्या व कर्तृत्वाच्या सामर्थ्यावर जीवनात कोणते चमत्कार घडवू शकतो, याचा आपणांस यशवंतरावजींच्या जीवनापासून चांगला बोध होऊ शकेल. गेल्या पंधरा वर्षांतील त्यांचे कार्य अत्यंत विस्मयकारक असेच आहे. " पददलित, भूमिहीन, श्रमिक, हरिजन अल्पसंख्यांक आणि तत्सम गरीबांबरोबर राहून काँग्रेस कार्यकर्त्यांनी जनकल्याण करीत राहिल्यास आपल्या पक्षात नवचैतन्य निर्माण होईल. काँग्रेसजनांनी ठाम निर्धाराने व आत्मविश्वासाने जनतेपुढे जाऊन त्यांची सुखदुःखे जाणून घेऊन त्यांच्या अडीअडचणींचे निराकरण करण्यासाठी झटले पाहिजे. आपण लोकांशी आत्मियतेने वागू व आपला जनकल्याणाचा कार्यक्रम नीट समजावून सांगू तितका आपणास उत्स्फूर्त प्रतिसाद जनतेकडून मिळेल " अशा आत्मविश्वासाचे मननीय विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा प्रयत्न करणारे यशवंतरावजी म्हणजे एक भारतीय सामाजिक क्रांतीकारकच होय.

महाराष्ट्राला विचारांचे देणे देणारे महात्मा ज्योतिराव फुले हे भारतातील महापुरुषांपैकी एक असून शतकापूर्वी त्यांनी सांगितलेल्या विचारांचे क्रांतिकारकत्व आजच्या काळात पेलणे कित्येकांना कठीण जात आहे. महात्मा ज्योतिराव फुल्यांनंतर विचारांच्या दृष्टीने मोठे आणि पल्लेदार असे व्यक्तिमत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेच होते. माता-पिता जन्म देतात, अध्यापनात गुरू मदत देतात परंतु विचारांचे देणे असे आहे की, ते पिढ्यान् पिढ्या पुरते. सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात महात्मा फुले यांनी सांगितलेला विचार पिढ्यान् पिढ्या पुरणारा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अपूर्ण कार्य पूर्ण करण्याचे पवित्र कार्य आज श्री. यशवंतरावजी चव्हाण प्राणपणाने करीत आहेत. नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांनी केवळ सामाजिक क्रांतीचेच रणशिंग फुंकले नाही

तर भारतातील शैक्षणिक, राजकीय, औद्योगिक, सहकारी, सांस्कृतिक आणि साहित्यिक उत्क्रांतीची सिंहगर्जना केली आहे. संस्थानिकांचे तनखे, बँकांचे राष्ट्रीयीकरण या बाबतीत त्यांचा दृष्टिकोन पुरोगामी नाही असे कोण म्हणेल? शेती, उद्योग, व्यापार, आर्थिक क्षेत्रे याबाबत त्यांच्या नेतृत्वाखाली जी पाउले टाकली गेली ती निश्चित उल्लेखनीय आहेत. कूळकायदा, जमिनीच्या मालकीवर मर्यादा, सहकारी व सरकारी क्षेत्रात कारखानदारी, धान्यव्यापाराचे राष्ट्रीयीकरण यांतून सरकारने शेती व शेतकरी या दोघांचेही हित साधलेले आहे. कृषी औद्योगिक समाजरचनेखेरीज देशातील विषमता कमी होणार नाही व देश पुढे जाऊ शकणार नाही, या पूर्ण जाणीवेने यशवंतरावजी आपली धोरणे ठरविताना आपणांस आढळून येतात.

साठ कोटींच्या या खंडप्राय देशात मनुष्यबळ व नैसर्गिक सामग्री भरपूर असताना आपल्याला कित्येक गोष्टींबाबत परदेशावर अवलंबून राहावे लागते. ' कमी काम व अधिक दाम ' अशीच प्रवृत्ती भारतात दिसून येते. ही प्रवृत्ती केवळ सरकारी बडग्याने अगर सत्तीच्या जोरावर बदलता येणार नाही. त्यासाठी माझा देश व माझी शक्ती या भावनांना आवाहन करणाऱ्या देशभक्तीचे संस्कार जनतेवर होणे आवश्यक आहे, असे श्री. यशवंतरावजी आवर्जून सांगतात, यात त्यांची लोकशाही निष्ठाच प्रत्ययास येते.

त्यांच्या सान्निध्यात जेव्हा जेव्हा मी आलो तेव्हा तेव्हा त्यांच्या ठिकाणी असलेल्या विशाल मनाचे दर्शन मला झाले. देशभक्तीने भारावलेल्या अशा व्यक्तीस पाहिले की, वाटते इतरांना त्यांच्यापासून बरेच शिकण्यासारखे आहे. माणसातील मानव जागा करण्याचे अप्रतीम सामर्थ्य त्यांच्याजवळ आहे, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले आहे. भारतीय नवजवानांना पुरुषार्थाची प्रेरणा देणारे श्री. यशवंतराव चव्हाण म्हणजे महाराष्ट्राने भारताला अर्पण केलेला स्वयंप्रकाशित हिरा होय.

मराठवाड्यासंबंधी सांस्कृतिक जिव्हाळा असलेले श्री. यशवंतराव म्हणजे आजपर्यंत दबलेल्या मराठवाड्यातील लहानमोठ्यांना एक आशेचा किरण वाटतो. परमेश्वराजवळ मी अशी प्रार्थना करतो की, त्याने यशवंतरावजींना उदंड आयुष्य देऊन भारताची अधिकाधिक सेवा करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

卐 卐 卐

# लोकनेत्याची वैशिष्ट्ये

**नामदार श्री. भिकाजी जि. खताळ** कृषी, नियोजन राज्यमंत्री : महाराष्ट्र राज्य.

मानवी जीवनात इतिहासाला विशिष्ट स्थान असते हे इतिहास घडविणाऱ्यांना ज्ञात असते. सभोवताली घडणाऱ्या घटना या आपोआपच घडत नाहीत. त्या विशिष्ट पद्धतीने घडविण्याचे कार्य मानवालाच करावे लागते. त्यासाठी त्याला सद्यः-परिस्थितीचे सखोल ज्ञान, त्यात वावरणाऱ्या इतर माणसांच्या स्वभावांची जाणीव व तशाच विशिष्ट परिस्थितीत पूर्वी घडलेल्या इतिहासाची माहिती असणे अत्यंत आवश्यक असते. ही माहिती जितकी परिपूर्ण असेल तितकाच प्रभावी इतिहास आजच्या कर्त्या पुरुषाकडून घडू शकेल. अशी व्यक्ती जर राजकीय क्षेत्रात कार्य करणारी असेल तर तिच्यासाठी ऐतिहासिक घटनांचे महत्त्व अनन्यसाधारण असते. कारण अशा व्यक्तीचे अस्तित्व व महत्त्व तिच्या आजच्या प्रत्येक आचाराविचारावर अवलंबून असते. नामदार यशवंतराव चव्हाण यांच्याजवळ हे गुण असल्यामुळे ते भारताच्या राजकीय इतिहासात महत्त्वपूर्ण भूमिका यशस्वी रीतीने पार पाडीत असल्याचे दिसत आहे.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यावेळच्या परकीय राजवटीत त्यांनी आपले वकिलीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. आपल्या देशातील क्रांतीने त्यांचे तरुण मन भारावून गेले आणि वकिली सोडून ते स्वातंत्र्य–संग्रामात एक सर्वसाधारण सैनिक म्हणून दाखल झाले. आपणावर सोपविलेले कार्य निष्ठापूर्वक करावयाचे हा त्यांचा बाणा सुरवातीपासूनच होता. आपल्या सभोवतालच्या व्यक्तींचे बारकाईने निरीक्षण करावयाचे व कार्य करणारी विश्वासाची माणसे निवडून घ्यायची हे पथ्य मात्र ते कसोशीने पाळीत होते. प्रचंड सामर्थ्य असलेल्या मोगल बादशाही-विरुद्ध शिवछत्रपतींनी स्वराज्याची स्थापना करण्याचे ठरविले ते केवळ मोजक्या पण अत्यंत विश्वासू अशा मावळे सहकाऱ्यांच्या भरंवशावरच. हा इतिहास यशवंतरावांना

परिचित होता, म्हणून स्वराज्य आंदोलनात आणि स्वराज्योत्तर सुराज्य करण्याच्या कार्यात त्यांनी मोजके पण विश्वासपात्र सहकारी जमविण्याचे कार्य यशस्वी रीतीने केले.

सामान्य जनतेची सेवा करण्याची प्रबल इच्छा आणि आपल्या कामावरील अढळ निष्ठा यामुळेच यशवंतराव अल्पावधीत कॅाँग्रेस संघटनेत व सरकारात उच्च पदावर पोहोचले. आपले कर्तव्य करीत असताना त्यांना शासनाची बाजू आणि जनतेच्या आशाआकांक्षा या दोहोंना एकाच वेळी तोंड द्यावे लागत होते. याचे एकच मोठे उदाहरण द्यावयाचे झाले तर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या प्रसंगाचे द्यावे लागेल. उद्दिष्टप्राप्तीसाठी शिगेला पोहोचलेल्या जनतेच्या भावनांची जाणीव असूनही त्यांना ती तत्क्षणी मान्य करता आली नव्हती. शासन आणि जनता यात कसलाही संघर्ष राहू नये म्हणून त्यांनी हा प्रश्न सलोख्याने आणि दोघांचेही समाधान करून सोडविला. यशवंतरावांच्या शासनातील कर्तव्यनिष्ठेचे आणखी एक ताजे उदाहरण म्हणजे परकीय आक्रमणाच्या वेळी त्यांच्यावर केंद्राने टाकलेल्या जबाबदारीचे देता येईल. शत्रू तोफा डागून भेडसावीत असताना संरक्षणासारख्या महत्त्वपूर्ण खात्याची जबाबदारी स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरूंनी त्यांच्यावर टाकली. त्यांच्या विश्वासाला पात्र असल्याचे यशवंतरावांनी थोड्याच अवधीत यशस्वी रीतीने सिद्ध करून दाखविले.

समाजाच्या विविध थरांतील व्यक्तींचा स्नेहभाव आणि मैत्री साध्य करण्याकरिता यशवंतरावांनी आत्मसात केलेली कला हे त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे जिवंत उदाहरण म्हणता येईल. समाजातील असा कुठलाही वर्ग नाही की, त्या क्षेत्रातील व्यक्ती यशवंतरावांच्या जवळ आल्या नाहीत. मग ते नाट्यक्षेत्र असो की संगीतक्षेत्र असो अथवा तमाशा किंवा तांबड्या मातीतील कुस्तीगीर असो, प्रत्येकाला यशवंतराव हे आपले स्नेही आणि मार्गदर्शक वाटतात. ही भावना महाराष्ट्रात तरी रुजलेली दिसते. याचे कारण म्हणजे यशवंतरावांनी प्रत्येक वर्गाचा आणि त्यात वावरणाऱ्या व्यक्तींचा जवळून अभ्यास केला आहे. अभ्यास हा त्यांचा स्थायीभाव आहे. कुठलेही क्षेत्र असले तरी त्यातील उपलब्ध असलेले सर्व साहित्य वाचल्यानंतर ते आपले मत बनवितात. त्या क्षेत्रातील व्यक्तीशी मैत्री संपादन करतात. महाराष्ट्रातील अनेक क्षेत्रांतील लहानथोर व्यक्तींना यशवंतराव हे आपले आश्रयस्थान आणि श्रद्धास्थान आहे असे वाटते. त्यामागची भूमिका म्हणजे त्यांनी आजपर्यंत अव्याहत घेतलेला त्या कार्यातला रस हे होय.

यशवंतरावांचे सगळ्यात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची चिंतनशील प्रवृत्ती होय. कुठलाही प्रश्न असो, समस्या असो वा प्रसंग असो, त्यावर पटकन आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना ते कधीच दिसणार नाहीत. त्यांच्यातील धडाडी, निर्भयपणा आणि सच्च्या कार्यकर्त्याला बरोबर घेऊन जाण्याची कला यामुळे उद्याच्या भविष्यकाळातही देशातील गौरवस्थान ते यशस्वी रीतीने भूषवीत राहतील, अशी आशा निर्माण झाली आहे.

卐 卐 卐

# संघर्षातील नेतृत्व

नामदार श्री. व्यंकटराव हिरे, कृषी व नागरी विकास, उपमंत्री : महाराष्ट्र राज्य.

भारताच्या राजकीय रंगमंचावर एक नाटक चांगलेच रंगले जात आहे. अद्याप त्यावर अखेरचा पडदा पडलेला नाही. हे नाटक चालू असता त्यातील ज्या काही प्रमुख भूमिकांनी सर्व जनतेचे लक्ष आपणांवर खिळवून ठेवले होते आणि ज्यांच्या हालचालींना विशिष्ट महत्त्व प्राप्त झाले होते त्यात श्री. यशवंतराव चव्हाण हे प्रमुख होते, हे सर्वांनाच माहीत आहे. ह्या नाटकात यशवंतराव चव्हाणांनी जी मौलिक भूमिका वठविली ती त्यांच्या आजवरच्या सौहार्दपूर्ण आणि सलोख्याच्या वर्तनाशी सुसंवादीच होती व आहे.

जेव्हा जेव्हा देशात कुठल्याही बाबतीत आणि कुठल्याही ठिकाणी संघर्षाची परिस्थिती उद्भवून फाटाफुटीचे वातावरण निर्माण झाले त्या त्या वेळी उत्कृष्टपणे कुशलतापूर्वक मध्यस्थी करून संघर्ष मिटविण्याचे महत्त्वाचे कार्य श्री. चव्हाण ह्यांनीच बजावलेले आहे. त्यामुळेच त्यांना संघर्षाच्या वेळी प्रसंग निभावून नेणारी व्यक्ती, " दि मॅन ऑफ क्रायसीस " अशी सार्थ उपाधी प्राप्त झाली आहे. केवळ अंतर्गत संघर्षाच्या वेळीच हे घडलेले नाही तर जेव्हा कधी बाह्य संघर्ष निर्माण झाला, देशाच्या सीमेवर गंभीर परिस्थिती उद्भवली त्यावेळीही ज्येष्ठ नेत्यांच्या दृष्टीसमोर चव्हाणांचेच नाव उभे ठाकले. त्यांनी श्री. चव्हाण यांना पाचारण करून त्या त्या संघर्षातून मार्ग काढण्याची अतिशय जबाबदारीची कामगिरी त्यांच्यावर सोपविली, हा इतिहासही फारसा जुना नाही. देशावर झालेल्य परकीय आक्रमणांच्या वेळीं संरक्षणाची धुरा सांभाळण्याची जबाबदारी त्यामुळेच श्री. चव्हाण ह्यांच्यावर सोपविण्यात आली होती. त्यावेळी आपल्या छोट्या नॅट विमानांच्या साह्याने शत्रूंच्या सुपरसोनिक जेटस्‌चा अन् देशी विजयंता रणगाड्यांच्या साह्याने शत्रूच्या अवाढव्य पॅटन व शेरमन रणगाड्यांचा धुव्वा उडवून शत्रूला दे माय धरणी ठाय करून टाकणारी जिद्द व शक्ती आपल्या

जवानांच्या ठायी निर्माण करण्याची प्रेरक कामगिरी श्री. चव्हाण ह्यांनी अत्यंत जबाबदारीने व कुशलतापूर्वक पार पाडली, हे त्यांच्या लौकिकाला साजेसेच होते.

दिनांक १ मे १९६० रोजी महाराष्ट्राचा अमृतकुंभ मराठी जनतेच्या हाती यशवंतरावांनी सुपूर्त केला. अर्थातच नव्या महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री होण्याचा मान त्यांनाच मिळणे स्वाभाविकच होते. त्यांच्या कारकीर्दीतच महाराष्ट्र राज्यात पंचायती राज्ययंत्रणेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. लोकशाही खऱ्याखुऱ्या अर्थाने रुजवायची असेल, विकसित करावयाची असेल आणि जनसामान्यांच्या मनोमनी बाणवायची असेल तर सत्तेचे विकेंद्रीकरण होणे अत्यावश्यक आहे ही रास्त भूमिका स्वीकारून श्री. चव्हाण ह्यांनीच महाराष्ट्रात पंचायती राज्याची स्थापना करविली. त्यानुसार निर्माण करण्यात आलेल्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती ह्यांनी ग्रामीण महाराष्ट्रात जी भरीव कामगिरी आजवर बजावली आहे, तिच्या मागची प्रेरणा श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांचीच होय यात शंका नाही. परकीय आक्रमणांच्या काळात तसेच त्या दरम्यान राज्यात निर्माण झालेल्या अवर्षणाच्या परिस्थितीत आणि त्यामुळे ओढवलेल्या दुष्काळाच्या आपत्तीत राज्यातील समस्त पंचायती संस्थांनी उपलब्ध जमिनीचा इंच न इंच आणि पाण्याचा थेंब न थेंब शेतीसाठी उपयोगात आणून अधिक धान्यउत्पादनाचे जे कार्य केले त्याला राज्याच्या इतिहासात तोड सापडणे कठीण आहे. ह्या सर्व कार्यामागची प्रेरणा श्री. चव्हाणांचीच होय हे त्यांचे कट्टर विरोधकही मान्य करतील. श्री. चव्हाणांचे व्यक्तिमत्त्वच असे आहे की, त्यांना विरोधक संभवतच नाहीत आणि असले तरी ते जास्त काळ टिकत नाहीत. आपल्या पराकोटीच्या विरोधकाशी देखील श्री. चव्हाण हसतमुखाने आणि अतिशय सौहार्दपूर्ण भावनेने वागतात. त्यांची भूमिका नेहमीच दिलजमाईची, सलोख्याची असते. त्यामुळे त्यांचे विरोधक एक तर मित्र तरी बनतात किंवा त्यांच्या विरोधाची धार अगदीच बोथट होऊन जाते.

श्री. चव्हाण ह्यांच्या सौहार्द भावनेचा असाच प्रत्यय कोयना भूकंपाच्या आपत्तीच्या वेळी आला. त्यावेळी आपद्ग्रस्तांना दिलासा देऊन त्यांच्या ठायी नवी उमेद, नवी जिद्द निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य श्री. चव्हाण ह्यांनीच बजावले. त्या काळात पाटण येथे भरलेल्या एका विराट सभेत श्री. चव्हाण ह्यांनी त्या भागातील जनतेला स्थलांतर न करता तेथेच राहून पुन्हा नव्याने सारे जीवन उभे करण्याचे आवाहन करणारे जे अतिशय प्रभावी भाषण केले ते त्यांच्या उत्कृष्ट वाक्पटुत्वाचा एक असाधारण नमुना म्हणून गणले जाईल. श्रोत्यांच्या मनावर आपली भूमिका अतिशय समर्पक शब्दांत बिंबविण्याचे त्यांचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. सतत संघर्षातून तावून सुलाखून निघालेले त्यांचे प्रभावी नेतृत्व आपल्या देशाला दीर्घकाळ लाभून भारत सुसंपन्न राष्ट्र बनो हीच माझी सदिच्छा.

卐 卐 卐

# एकमेव आशास्थान

नामदार श्री. शिवाजीराव पाटील, पाटबंधारे, वीज-प्रकल्प राज्य मंत्री : महाराष्ट्र राज्य.

यशवंतराव ही व्यक्ती नसून, एक विचार आहे असे अनेक लोक म्हणतात, तेव्हा ते तोंडपुजेपणा करतात असे काही लोकांना वाटते. काही लोक समजतात की, ही मंडळी यशवंतरावांच्या मोठेपणाविषयी प्रचारकी थाटाचे ढोल वाजवीत आहेत. यशवंतराव हा विचार आहे असे म्हणणारे जे लोक आहेत ते असें का म्हणतात ? त्यात काही तथ्य आहे, हें पडताळून पाहणे आवश्यक आहे.

संयुक्त महाराष्ट्र-निर्मितीच्या पर्वात यशवंतरावजींनी जी निर्णायक कामगिरी बजावली त्या धोरणात एकसूत्रता होती हे जनतेला अखेरीस पटले. त्या धकाधकीच्या काळात यशवंतरावजींच्या अनेकविध गुणांचे जे दर्शन घडले त्यात सगळ्यात विलोभनीय होते ते त्यांच्या राजकीय जीवनाचे वैचारिक अधिष्ठान. त्या अतिशय बिकट काळात जे असंख्य गुंतागुंतीचे प्रश्न उभे टाकले, त्यांची सोडवणूक करताना ज्या धोरणांचा अवलंब यशवंतरावजींनी केला, त्या प्रत्येकात त्यांनी त्यासंबंधी केलेल्या मूलगामी विचाराचे स्पष्ट प्रतिबिंब दिसते.

लोकप्रियतेच्या बलशाली लाटेवर आरूढ असा विरोधी पक्ष निवडणुकीनंतर समितीच्या रूपाने उभा राहिला. लोकांना मोठा प्रश्न पडला. यशवंतराव मुळीच डगमगले नाहीत. भारताच्या नवजात लोकशाहीत लोकशाही परंपरा आणि संकेत पाळावयास यशवंतरावांनी सुरवात केली. लोकशाहीत राज्य करताना विरोधी पक्षाला विश्वासात घेण्याचे तत्त्व त्यांनी अंगीकारले. विरोधी पक्षांशी संबंध ठेवण्याची आदर्श परंपरा त्यांनी निर्माण केली.

कामगार, लोकशाही विकेंद्रीकरण, कमाल जमीनधारणा मर्यादा कायदा व त्यातील कंपन्यांच्या ऊस-मळ्याचा प्रश्न, सहकार, शिक्षण, शासन आणि जनआंदोलन, गोळीबारासारख्या कठोर दंडनीतीच्या मर्यादा, नवबौद्धाच्या संबंधीचे धोरण, बहुजन

समाजाचे शासनात स्थान, कार्यक्षमता आणि यासारख्या असंख्य प्रश्नांच्याबाबत ज्या भूमिका यशवंतरावजींनी घेतल्या त्यात त्यांनी केलेल्या मूलभूत विचारांचे स्पष्ट दर्शन घडते. यशवंतरावजी कोठल्याही विषयावर बोलले तरी ते काही तरी बोलायचे म्हणून बोलल्याचे मला आठवत नाही. साहित्य असो, नाटक असो, काव्य असो, राजकारण असो की, सामाजिक प्रश्न असो—कोणत्याही विषयावर जे बोलले ते विचारपूर्वक आणि त्यानंतर कृती केली ती खंबीर. लोकमताला मान दिला पाहिजे ही भूमिका. पण लोकमत भलत्याच ठिकाणी जायला लागले तर शासनकर्ता म्हणून कठोर भूमिका घ्यायला ते कधी कचरले नाहीत. कामगारांच्या संपाविरुद्ध शासनबळाचा वापर करायला त्यांनी मान्यता दिली नाही. पण मुंबई बंदचा पहिला प्रयोग केवळ राजकीय भूमिकेने जेव्हा झाला त्यावेळी त्यांनी घेतलेल्या खंबीर भूमिकेची प्रचीती त्या पार्श्वभूमीवर वेगळीच आली.

गेल्या सातआठशे वर्षांच्या महाराष्ट्राच्या इतिहासात शिवाजी महाराज सोडल्यास यशवंतरावांच्या एवढा व्यापक सामाजिक दृष्टीचा, सर्व महाराष्ट्राची शक्ती एकवटणारा आणि ती एका विशिष्ट दिशेने कामाला लावणारा दुसरा नेता झाला नाही. हिंदुपदपादशाही स्थापन करण्याची प्रतिज्ञा केलेले शिवाजी महाराज गारद्यांपासून गोलंदाजापर्यंत कामात स्वामिनिष्ठ मुसलमानांचासुद्धा उपयोग करून घेत असत. कारण सर्वसमावेशक अशा नव्या सामाजिक धोरणाचा अवलंब महाराष्ट्रातल्या सर्व शक्ती संघटित करण्यासाठी शिवाजी महाराजांनी केला. हे धोरण म्हणजे तर्कनिष्ठ विचारांचा परिपाक होता. त्यामुळेच भटा-ब्राह्मणांपासून तो मुसलमानांपर्यंत, पंचकुळी सरदारांपासून ते लंगोटीवाल्या मावळ्यांपर्यंत आणि बारा बलुत्यांपासून तो तुकाराम रामदासापर्यंत सर्वांचा राष्ट्र बांधणीच्या कामात शिवाजी महाराजांनी उपयोग करून घेतला. यशवंतरावांनी मराठी समाजाला एकत्र व एकजिनसी करण्याचे स्वप्न फार मोठ्या प्रमाणात साकार केले.

महाराष्ट्राचे मुख्य मंत्री म्हणून अनेक साहित्यिक, नाटककार, वृत्तपत्रकार, शास्त्रज्ञ, लेखक, कलावंत, सिनेसृष्टीतील कलावंत, इंजिनिअर, खेळाडू, पहिलवान, समाजसेवक, राजकीय सहकारी आणि इतर क्षेत्रांतील कार्यकर्ते, शिक्षक, व्यापारी, उद्योगपती, राजकीय विरोधक, शेतकरी, डॉक्टर्स इत्यादी अनेकविध लोकांच्या समस्या त्यांनी समजून घेतल्या. शक्य तेथे त्यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले आणि विशेषत: यांतल्या बहुसंख्य लोकांशी त्यांनी वैयक्तिक संबंध प्रस्थापित केले. हे करताना सर्वच समाजांचा विश्वास ते संपादन करू शकले. इतक्या जाणीवपूर्वक वेगवेगळ्या समाजघटकांना एकत्र आणण्याचे कार्य सामाजिक परिवर्तनाचा त्यांचा विचार दृढ आणि संकल्प पक्का होता म्हणूनच ते करू शकले. माझा असा दावा आहे की, शिवाजी महाराजांच्या नंतर खऱ्या अर्थाने हे काम यशवंतरावजींनीच केले.

निवडणुकीनंतर अनेक विरोधी पक्षांची सरकारे आली. मध्यवर्ती सत्ता काँग्रेसची,

राज्ये आणि केंद्र सरकार यांचे संबंध मोठे नाजूक आणि गुंतागुंतीचे झाले आहेत. त्यांचे सर्व ओझे गृहखात्यावर आहे. पण यशवंतरावजी मोठ्या कौशल्याने आणि मूलभूत विचारांची बैठक न सोडता प्रश्न हाताळीत आहेत. प्राथमिक अवस्थेत मध्यवर्ती सरकारची निःपक्षपाती ग्वाही देण्यासाठी त्यांनी सर्व काही केले पण कालांतराने आपली जबाबदारी टाळून भारत सरकारवर दोषाचे खापर फोडण्यासाठी राज्यांची सवय दिसली तेव्हा आपल्या कणखर नीतीचा पुरावाही त्यांनी राज्यांना दिला आहे. पण विचाराचा आणि तत्त्वांचा त्याग करून कणखरपणा त्यांनी कधीच दाखविला नाही.

भारतात रांची, काश्मीर, आसाम, करीमगंज अशा अनेक ठिकाणी जातीय दंगे झाले. बहुसंख्य समाज नाराज होईल हे दिसत असता अप्रियतेची पर्वा न करता ज्या समाजाचा दोष होता त्यांच्या पदरी तो यशवंतरावजींनी बांधला. अशा तऱ्हेने विचारांशी इमान राखायला मोठे निष्ठावान मन लागते, ते यशवंतरावांजवळ आहे. हरियाना, पंजाब, बंगाल, बिहारमध्ये विरोधी पक्षांची सरकारे गडगडली. पण केवळ आपल्या पक्षाला हितकारक होईल अशी भूमिका यशवंतरावांनी घेतली नाही. राष्ट्रपतींची राजवट आणण्याची गरज होती, तेथे ती आणली आणि जेथे सरकार होण्याची शक्यता होती तेथे विरोधकांच्या गुंडगिरीला बळी न पडता बहुमताला मान्य असे सरकार होऊ दिले. नक्षलबारीचे प्रकरण उभे राहिले. मोठा पेचप्रसंग तो ! पण कायदा आपल्या बाजूने असूनही केवळ कायद्याच्या तांत्रिक वापराने ही परिस्थिती बदलणार नाही, याविषयी त्यांची खात्री होती. त्यासाठी त्या भागात सुधारणा पोहोचवल्या पाहिजेत. जमीनसुधारणा केली पाहिजे, हीच त्यांची इच्छा. सत्तेचे दांडके घेऊन समाजाला शांत करण्याची त्यांची रीत नाही.

आज देशात जे घडते त्याने देशाच्या ऐक्याविषयी मोठी चिंता निर्माण झाली आहे. ही चिंता सर्व समाजापुढे मांडताना ते सांगतात की, " गेल्या हजार वर्षांचा भारताचा इतिहास हा आक्रमणाचा आणि भारताच्या सदैव पराभवाचा इतिहास आहे. काय आमच्यात पराक्रम नाही ? शौर्य नाही ? सर्व आहे, पण तरीही आम्ही हरलो. कारण ही युद्धे आम्ही भारतीय म्हणून लढलो नाहीत. कारण आपण मराठे होतो, शीख होतो, रजपूत होतो पण भारतीय नव्हतो. स्वातंत्र्यानंतर आम्ही भारतीय झालो, पुन्हा आमची एकी नष्ट करण्याचे प्रयत्न होत आहेत. ते यशस्वी झाले तर मोठा धोका आहे. म्हणून देशाची एकात्मता हा आपल्या पुढचा सगळ्यात मोठा प्रश्न आहे. त्यासाठी प्राणाची बाजी लावू पण देश दुभंगू देणार नाही. अशी प्रतिज्ञा आपण केली पाहिजे. "

देशाच्या दृष्टीने आशेचा एकमेव किरण असलेले आमचे यशवंतरावजी आहेत. भवानी आई, त्यांना उदंड आयुष्य दे. भारतीय लोकजीवन समृद्ध करणारे खरेखुरे लोकराज्य अवतरू दे. तुझ्या या लाडक्या पुत्राचे कर्तृत्व व नेतृत्व यशवंत होऊ दे, हीच माझी प्रार्थना.

卐 卐 卐

# माणूस मंत्र्याचे मनोगत

खासदार श्री. अनंतराव पाटील, संपादक " विशाल सह्याद्री "

रविवार सायंकाळी पाचची वेळ. हवा स्वच्छ, कोरडी आणि उबदार होती. बाहेर पडलो आणि तडक १ रेसकोर्स रोड या नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या निवासस्थानी गेलो. मनात विचार होता की, नामदार यशवंतरावांना भेटावे आणि त्यांच्याशी मनमोकळेपणाने गप्पागोष्टी कराव्यात. राजकारण सोडून त्यांच्याशी इतरच गोष्टी बोलाव्या आणि त्यांच्याकडून पण ऐकाव्या. योगायोग म्हणूनच की काय भेटणाऱ्यांची गर्दी कमी दिसली आणि मला पाच दहा मिनिटांत त्यांच्या बसण्याच्या खोलीत प्रवेश मिळाला. खोलीत शिरता शिरताच नमस्कार करीत म्हटले,

" आपल्याशी निवांतपणे काही बोलायला आलो आहे."

' ठीक आहे, करा सुरुवात ' म्हणताच, मी म्हटले, "यशवंतरावजी, समजा आपण राजकारणात पडला नसता तर काय केले असते ? काय झाला असता आपण ? "

" राजकारणात पडलो नसतो तर वकिलीपेशा तर घेतलाच होता पण कदाचित शिक्षक किंवा पत्रकारही झालो असतो " असे सांगून यशवंतराव म्हणाले, ' अगदी लहानपणी वयाच्या १५–१६ व्या वर्षीच शाळेत असताना मी राजकारणात पडलो आणि अजूनही त्यातच राहिलो. मला वाचायची-लिहायची आणि बोलायची फार आवड. पत्रकार म्हणून मी चांगले काम करू शकलो असतो. शिक्षकी पेशा पण मला आकर्षित करायचा. कारण हे दोन्ही व्यवसाय समाजाचे शिक्षण करणारे आहेत आणि त्यांची अजूनही फार मोठी गरज आहे. राजकारणामुळे मला शाळेतून किंवा वृत्त-पत्रातून शिक्षण करता आलेले नसले तरी ते करण्याची माझी इच्छा अजून अपुरी राहिलेली आहे. वाचनाने माणसाची बौद्धिक बैठक भक्कम होते. विचारात प्रगल्भता येते आणि निर्णय घेण्यासाठी लागणारा मनाचा समतोलपणा येतो. राजकारण करता करता मी वाचनाची आणि चिंतनाची सवय सोडली नाही. लिहायला मात्र फुरसद

# अनुक्रमणिका

( आकाशवाणीच्या पुणें केंद्रावरून 'लेखनकलेंतील माझे प्रयोग' या सदराखालीं ध्वनिक्षेपित झालेलीं साहित्यविषयक भाषणमाला.)


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | सौ. कुसुमावती देशपांडे |
| १. | नाटक | मामा वरेरकर |
| २. | कादंबरी | वि. स. खांडेकर |
| ३. | लघुकथा | गंगाधर गाडगीळ |
| ४. | लघुनिबंध. व इतर वाङ्मय | अनंत काणेकर |
| ५. | शब्दचित्रें | व्यंकटेश माडगूळकर |
| ६. | विनोद | पु.ल. देशपांडे |
| ७. | कविता | मंगेश पाडगांवकर |

मिळू शकली नाही. कथा, कादंबऱ्या, कविता व मौलिक लेख अधूनमधून वाचीत असतो. माझ्या आवडीच्या विषयांवरील अनेक मौलिक ग्रंथ मी जमवून ठेवले आहेत व सवडीने ते अभ्यासावेत व लेखन करावे असा पण मानस आहे. केव्हा ते मला आज सांगता येणार नाही. कारण आजचा दैनंदिन जीवनक्रम माझ्या हातात राहिलेलाच नाही. वेळेच्या बाबतीत मी किती परावलंबी असतो हे तुम्ही पाहातच आहात.

पत्करलेली जबाबदारी कर्तव्यबुद्धीने पार पाडण्याच्या प्रयत्नात जे सुख-समाधान लाभते तेवढे वाट्याला येते. चाकोरीबाहेर पडायचे म्हटले तर शक्य होत नाही. खेळाची मला लहानपणापासून आवड. आजही वाटते की मैदानावर जाऊन क्रिकेट, हॉकी, फूटबॉलचा सामना पाहावा किंवा कुस्तीच्या दंगलीला हजर राहावे. पण सायंकाळी कोठे वेळ मिळतो ? शाळाकॉलेजात असताना कितीतरी नाटके पाहिली. गडकऱ्यांच्या प्रेमसंन्यासातील केशवराव दात्यांचे काम पाहायला एकदा एका मित्राबरोबर कराडहून कोल्हापूरला गेलो होतो आणि आता इच्छा असूनही वेळेअभावी शहरातल्या शहरात फारसे नाटक पाहता येत नाही. पुष्कळ वेळा वाटते की, सुट्टीच्या दिवशी मित्राबरोबर गप्पागोष्टी करीत बसावे. पण तेवढ्यात कोणीतरी काम घेऊन भेटायला येते आणि सारा नूरच मग बदलतो. नव्या पुस्तकाबद्दल, नाटकाबद्दल, गाण्याबद्दल चर्चेची आवड असते, पण तीही पुरी होऊ शकत नाही. मग एखादेवेळी दुसरा खेळ खेळणे किंवा पत्नीस घेऊन बाजारात, हॉटेलात किंवा सिनेमाला जाणे फारच दूर ! गेल्या ८ वर्षांत दिल्लीत फक्त एकदाच एका दुकानात गेल्याचे आठवते. तोही एकटाच. दिल्लीतल्या थंडीला तोंड देण्यासाठी खादीवुलन घ्यावे म्हणून खादी-भांडारात गेलो. पण तेथेही लोकांची भोवती गर्दी. " ते पहा रक्षामंत्री चौहानसाब " अशी कुजबूज ऐकायला मिळाली. सिनेमा थिएटरमध्ये कधी गेलो की, नेमके असेच घडते. अशा स्थितीत मनाला विरंगुळा म्हणून मी पुस्तक वाचीत बसतो. मला वाटते पुस्तक हा माणसाचा एक चांगला मित्र आहे. पुस्तकात मन गुंतले की, ते रंगून पण जाते. मी पुस्तके वाचतो ती काही करमणूक म्हणून व काही विचारप्रवर्तक गंभीर वाचन म्हणून. या वाचनाने मन ताजेतवाने व्हायला मदत होते. सध्याच्या धावपळीच्या राजकीय जीवनात या आनंदाला पण आपण मुकणार की काय असे कधी कधी वाटू लागते. "

मित्र हे माणसाचे एक मोठे धन आहे असा मित्रमंडळींचा उल्लेख नामदार चव्हाण यांनी करताच मी म्हटले, " मित्रत्वाला जात-धर्म, प्रांत-भाषा यांच्या मर्यादा नसतात, मित्रासारखे निर्व्याज प्रेम नातेवाईक आणि जातभाई पण देऊ शकत नाहीत. आपला याबाबतचा काय अनुभव आहे ? "

यशवंतरावजी म्हणाले, " माझ्या स्नेह्यांत सर्व जातीधर्मांचे लोक आहेत. मी आज जो आहे त्यात या मित्रमंडळींच्या प्रेमाचा आणि साहाय्याचा फार मोठा वाटा आहे. ज्यांनी माझ्याकरिता जे काही केले त्याचा कसलाही मोबदला त्यांनी चुकूनही मी मंत्री झाल्यावर मागितला नाही. याला म्हणतात मनाचा मोठेपणा आणि मित्रप्रेम.

कौटुंबिकदृष्ट्या आता माझ्यावर फारशी जबाबदारी राहिली नाही. पण १९४२ ते ५२ पर्यंतच्या दहा वर्षांत मी ज्या कौटुंबिक अडचणी सोसल्या त्यातून पार पडायला मला मित्रांची फार मदत झाली. ते ऋण मी विसरलेलो नाही. सहानुभूती, दया, प्रेम यांची मी जपणूक करू शकलो किंवा कधी तरी उपयोग करू शकलो त्याचे कारण माझ्या या अडचणींचे दिवस आणि त्यावेळी मला झालेली मदत हे महत्त्वाचे कारण आहे. राजकारणास आपण आज स्पर्श करीत नसलो तरी एक गोष्ट सांगावीशी वाटते की, तेथे सुद्धा मित्रांचा-स्नेह्यांचा खरा सल्ला फार उपयोगी पडतो. लोकांच्या आशीर्वादाने मला सारे काही मिळाले आहे. म्हणूनच मी माझ्या बरोबरीच्या सहकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना विसरू शकत नाही. सर्वांच्यासाठी जे करता येईल ते करण्याचा प्रयत्न करतो. महाराष्ट्रातील शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक संस्था वाढाव्यात, त्यात काम करणाऱ्या लोकांचे जीवन सुसह्य व्हावे व त्यांचा साऱ्या समाजाला फायदा मिळावा म्हणून माझा प्रयत्न चालू असतो. वाटते की, महाराष्ट्रातील संस्थांचा कारभार आणि काम चांगले चालावे, त्यात कोणी जात-पात, मित्र-शत्रू म्हणून अडथळा आणू नये. अशा संस्थांतून पाच-पंचवीस तरुण, तडफदार कार्यकर्ते काम करीत आहेत, संस्था वाढवीत आहेत हे पाहिल्यावर समाधान वाटते. ”

यशवंतरावजी म्हणाले, “ माझ्या सार्वजनिक जीवनात मी जे काही शिकलो, मिळविले, साधले ते इतरांना देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे व अजूनही करीत आहे. पण ते दिल्याने जसे कमी होत नाही तसेच ते जाणीवपूर्वक स्वीकारल्याशिवाय अंगी बाणविता येत नाही. ही गोष्ट मास्तरासारखी सक्तीने शिकविता किंवा बाणविता येणार नाही. माझा विचारकाचा व शिक्षकाचा पिंड आहे, असे तुम्ही काही मंडळी मानता, पण ते विचार घेऊन पुढे चालविणारी माणसे अधिक हवी आहेत. ती वाढविण्याचा प्रयत्न व्हायला हवा. मनाला समाधान वाटते की, अशा कार्यकर्त्यांचा एक संच मी उभा करू शकलो. तथापि तळमळीने कार्य करणाऱ्या अशा आणखी किती तरी कार्यकर्त्यांची आज गरज आहे आणि म्हणूनच अशा कार्यकर्त्यांच्या एका संचाचा विचारही मनात उभा राहतो. हे कार्यकर्ते राजकारणाप्रमाणेच सार्वजनिक क्षेत्रातही दिसले पाहिजेत. त्यांची महाराष्ट्राला व देशाला आज अतिशय गरज आहे. एक माणूस मोठा होऊन चालणार नाही. त्यांच्याबरोबर अनेकांचा संच हवा आहे. ४० वर्षे सातत्याने राजकारणाच्या धकाधकीत व बरीच वर्षे सत्तास्थानी वावरल्यानंतर एका वेगळ्या साध्या सामान्य माणसाच्या जीवनाबद्दल मला आसक्ती वाटली तर त्यात आश्चर्य नाही. देशापुढील विविध समस्यांचा विचार करताना नेहमी हे सातत्याने जाणवते की अजून खूप काम करावयाचे राहिले आहे ”

राजकारणात रममाण होणारा आणि अनेक अडचणींना शांतपणे-संथपणे-निर्भीडपणे तोंड देत त्यावर लीलया मात करणारा हा माणूस देशाला या काळात लाभला हे विशेष वाटले आणि या माणूस मंत्र्याचे मनोगत मला समजले. 卐 卐 卐

# लोकशाहीचा जागरूक रखवालदार

आमदार श्री. शरद पवार, चिटणीस : महाराष्ट्र काँग्रेस

" तत्त्वावर विचारविनिमयाची भाषा बोलू लागलो, तर तो जनमानसाशी द्रोह ठरेल. आपण आपली तत्त्वे आणि कार्यक्रम घेऊन जनतेपुढे जाऊ या. प्रसंग पडलाच तर अल्पमतात राहूनही या देशाचा विकास आणि लोकशाहीचे संगोपन करण्याचे व्रत आपण पाळले पाहिजे. " यशवंतरावांच्या या वक्तव्याने समान विचारांच्या पक्षांशी विचारविनिमयाचा प्रश्न तिथेच जिरला नि यशवंतरावांचा राजकीय प्रस्ताव महा-समितीने स्वीकारला. इतर सर्व बाबतींत बंगलोर अधिवेशनात खल करावयाचे ठरून फरिदाबाद काँग्रेस समाप्त झाली.

बंगलोर काँग्रेस व त्यानंतरच्या घटनाच इतक्या विलक्षण वेगाने घडल्या की, आपल्या देशाच्या दैनंदिन जीवनालाही एक प्रकारची चैतन्यमय कलाटणी मिळाली. भारतीय जीवनात आणि राजकीय विचारवंतांमध्ये भारतातल्या राजकीय ध्रुवीकरणाची प्रक्रिया सुरू झाली आहे, असा विचाराचा सूर वाढू लागला. या सामाजिक पुनर्निर्माणाच्या प्रक्रियेतून जे नवे राजकारण उभे राहात आहे, त्याला ध्रुवीकरणाच्या गदारोळात बांधायला यशवंतरावजी तयार नाहीत. ध्रुवीकरणाच्या राजकारणाकडे जर आता निर्माण झालेला जोष वेळ दवडून वळविला, तर सामाजिक नवनिर्मिती आणि समाजातल्या सर्वात दुर्बल घटकांचे हित व तदनुषंगाने पडणारी पावले यांची गती कुंठित होईल असे त्यांना वाटते. यशवंतरावांनी आपल्या संपूर्ण राजकीय आयुष्यात जी राजकीय भूमिका पत्करली तिच्या दृष्टिकोनातून पाहता यशवंतरावांना आज खरी आच लागून राहिली आहे, ती व्यापक सामाजिक हिताची, समाजातल्या दुर्बल घटकांचे जीवन सुसह्य होण्यासाठी भरीव प्रयत्न करण्याबाबतची.

मुंबई काँग्रेस ( डिसेंबर १९६९ ) अधिवेशनात सूर्याच्या साक्षीने समाज-वादाची शपथ घेऊन पुढचे पाऊल पुढेच पडेल असे, दहा लाख लोकांच्या विशाल

जनसागरासमोर बोलताना यशवंतरावांनी व्यक्त केले.

मुंबई काँग्रेस अधिवेशनात आर्थिक प्रस्ताव संमत झाल्यानंतर त्यावर बरीवाईट अशी प्रतिक्रिया सर्व थरांतून व्यक्त झाली. जनतेत नवा जोष आहे, पक्षाला नवे अवसान आहे. भोवती अलोट गर्दी जयनाद करीत आहे अशा एका संक्रमण-कालखंडाचा विजिगीषु नेता म्हणून मिरविण्याची संधी समोर असताना गर्दीच्या कोलाहलात भल्याभल्यांचा विवेक सुटला. पण यशवंतरावांचा विवेक नेमक्या अशाच क्षणी अविचल, अढळ राहतो. आवेश आणि जयनाद यांच्या धामधुमीत आर्थिक प्रस्तावावर बोलताना लोकप्रियतेचा सोपा मार्ग त्यांनी चोखाळला नाही किंवा भरमसाट आश्वासने दिली नाहीत. मोजके आणि नेमके आर्थिक उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून त्यासाठी दोन वर्षांची कालमर्यादा घालून दिली, परंतु त्यातून आजवर जो पीडला, नाडला गेला होता, त्याच्या मनात आपल्या हिताहिताची चिंता वाहणारे राजकारण आता नव्याने सुरू झाले आहे एवढा विश्वास जरूर त्यांनी निर्माण करून दिला.

आजसुद्धा कधीमधी बंगलोर काँग्रेसनंतर यशवंतरावजींनी संघटनात्मक राजकारणात ज्या भूमिका स्वीकारल्या त्याबद्दल गैरसमज काही ठिकाणी दुर्दैवाने दिसून येतो. हा गैरसमज राजकीय बुद्धिभेदाचाच अटळ असा परिणाम आहे. पण ज्यांची मनेच साचेबंद झालीत, ज्यांची वैचारिक प्रक्रियाच चाकोरीबद्ध राजकारणाची आहे, त्यांना यशवंतरावांच्या गतिमान व समाजजीवनाच्या विविध आकांक्षांशी एकरूप होणाऱ्या राजकारणाचा अर्थ समजणार नाही.

काँग्रेसचे एकसंध घर फुटू नये म्हणून जीवापाड शिकस्त करून शेवटी घर शाबूत ठेवणाऱ्याच्या कपाळीच शिव्याशाप यावेत हा दैवदुर्विलास म्हणावा लागतो. त्यांनी राष्ट्राध्यक्ष निवडणुकीबाबत संघटनेचा निर्णय शिरोधार्य मानावयाची शिस्त स्वतः व अनुयायांकरवी पाळली व त्याच वेळी भारतीय अर्थव्यवस्थेला नवे आशाकिरण देणाऱ्या बँक राष्ट्रीयीकरणाचे खुल्या मनाने स्वागतही केले. संघटना उद्ध्वस्त होऊ नये म्हणून प्रयत्न करतानाच त्याच वेळी गतिमान राजकारणाचा प्रवाह समाजजीवनात नवे चैतन्य निर्माण करीत असताना त्यात आपण सहभागी आहोत, हेही त्यांनी सक्रिय सिद्ध केले. पुढे मनाचे कप्पे बंद करून ज्येष्ठ नेत्यांनी जो अडेलपणा दाखविला त्याचा परिणाम अटळ होता. शिवाजी पार्कच्या जाहीर सभेत आपली भूमिका विशद करताना त्यांनी सांगितले की, "घर फुटू नये म्हणून उरफोडी करूनही यश न आल्याचा विषाद मनी न बाळगता राष्ट्रीयीकरणानंतर सुरू झालेल्या नवप्रवाहात सामील होणे अगत्याचे होते; म्हणून पंढरीचा भाविक ज्या श्रद्धेने दिंडीत सामील होतो, त्या श्रद्धेने मी या नव्या जीवनप्रवाहाशी एकरूप झालो."

मी जो जो विचार करतो तो तो यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व मला अधिक विचार–संपन्न व भावना-प्रगल्भ वाटते.

卐 卐 卐

# समाजवादी व्यक्तिमत्त्व

## आमदार श्री. मारोतराव तुमपल्लीवार, सदस्य : महाराष्ट्र विधानसभा

महाराष्ट्राने अनेक थोर पुरुषांना जन्म दिला, हा इतिहास तर आहेच पण ती परंपरा आजतागायत अखंडितही आहे. यशवंतराव चव्हाणांच्या रूपाने मराठी बाणा वर्तमानात वावरत आहे. ' मोडेन पण वाकणार नाही ' अशी मराठी बाण्या-बाबतची लोकवाणी आहे. पण ती वस्तुस्थितीशी विसंगत आहे. ' प्रसंगी वाकेन पण ध्येयाचा पाठलाग सोडणार नाही ' असेच वर्णन मराठी बाण्याचे औचित्याला धरून होईल. यात अंतीम यशातही आवश्यक असलेला पराक्रम, डावपेच आणि मुत्सद्दीपणा यांचा यथोचित समन्वय आहे. यामुळे यशवंतरावांना अपयश माहीतच नाही. परिस्थितीची त्यांची निदाने अचूक ठरली. त्यांनी काढलेले मार्ग फलदायी ठरले. त्यांचे निर्णय बरोबर असल्याची ग्वाही अनेकदा काळाने दिली आणि त्यांचे डावपेच अमोघ अस्त्राप्रमाणे उद्दिष्ट गाठण्यात सफल झाले.


१९५५ चा आणीबाणीचा प्रसंग होता तो. राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशीने महाराष्ट्र केवढा पेटून निघाला होता ! केंद्रीय नेतृत्वाविरुद्धच नव्हे तर केंद्रीय सत्तेविरुद्ध सुद्धा त्याने दंड थोपटले होते. ' महाराष्ट्राची लढाई संसदेत हरली तर ती रस्त्यावर लढली जाईल ' अशी काकासाहेब गाडगीळांची घोषणा होती. सारा महाराष्ट्र " संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे " या घोषणेने निनादून उठला होता. उभा देश चिंताक्रांत झाला होता.

अशा युयुत्सू वातावरणाच्या पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाणांनी फलटणहून आपले मनोगत जाहीर केले की, " मला महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे वाटतात, ते जो निर्णय देतील तो मी मान्य करीन. " त्यावेळी केवढे तुफान वादळ उठले त्यांच्या विरुद्ध ! पण यशवंतराव डगमगले नाहीत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत द्विभाषिक विभागण्यात आणि मराठी भाषिकांचे वेगळे राज्य स्थापन करण्यात त्यांनी यश


मिळविले. ज्यांनी यशवंतराव मुर्दाबाद अशा घोषणा दिल्या होत्या त्यांनीच संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश यशवंतरावांनी आणून दिल्यावर यशवंतराव झिंदाबादच्या घोषणा केल्या !

१९६३ च्या मुंबईतील संपाच्या निरवा-निरवीत यशवंतरावांचे जे दर्शन घडले ते अनेकार्थांनी आगळे असेच आहे. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कै. कन्नमवार होते. यशवंतराव भारताचे संरक्षणमंत्री होते तरी महाराष्ट्राचे एकमेव नेते तेच होते. मुख्यमंत्री कन्नमवारांनी कणखर उपायांनी पालिका कामगारांचा संप अक्षरशः झोडपून काढला. त्यांच्यावर स्तुती-सुमनांचा वर्षाव झाला. तथापि यशवंतरावांच्या मनात वेदनांच्या नांग्या डसत होत्या. प्रचलित लोकमताच्या प्रवाहाची पर्वा न करता कन्नमवारांच्या संप हाताळण्याच्या पद्धतीबद्दल त्यांनी नापसंती व्यक्त केली.

एकाच विचाराचे प्राबल्य यशवंतरावांच्या मनात होते. " समाजवादाचा पहिला पाळणा महाराष्ट्रातच हालला पाहिजे. महाराष्ट्र हे शेतकऱ्यांचे आणि कामगारांचे राज्य बनले पाहिजे. म्हणून शासनाच्या किंवा पक्षाचा प्रतिष्ठेच्या नावाखाली सुद्धा शेतकरी कामकरी यांच्या शक्तीचा कणा मोडेल असे काही करता कामा नये. " वैभव मिळूनही त्यात न रमणारे सापडतील, ध्येयासाठी आत्माहुती करणारेही सापडतील पण ध्येयसिद्धीसाठी स्वतःच्या प्रतिष्ठेलाही तुच्छ लेखणारा निरहंकारी मात्र सापडणे कठीण ! लोकनिष्ठा आणि ध्येयनिष्ठा यांच्या बळावर भारताला समाजवादाकडे नेणाऱ्या अग्रणीत यशवंतराव अग्रगण्य ठरतील यात काय शंका ?



'पधारिए पंडितजी, यही साधुसंतों की भूमि है। यही शिवछत्रपति की उर्मि है।'




पंचशील तत्त्वांचा ख्यातनाम प्रणेता, भारतीय संस्कृतीचा विश्वविख्यात विद्वान आणि लोकशाही स्वातंत्र्याचा खंदा वीर हेच ते भारताचे त्रिमूर्तिदर्शन.




राज्यकार्यधुरंधरास साहित्याचे वावडे नसते.



हेच ते महाराष्ट्रातील
दोन झुंजार नेते !
एक लेखणीचा
बरकंदाज,
दुसरा वाणीचा बाका
तिरंदाज.
इतकेच नव्हे,
लेखणी, वाणी व करणी
यांचा सुरेख प्रीतिसंगम
म्हणजेच यशवंतरावांचे
यशस्वी जीवन !




मल्लविद्येचा पुरस्कर्ता, शरीरसंपदा हीच राष्ट्राच्या उत्कर्षास पुढे नेत असते, हे आवर्जून सांगणारा, शक्तीबरोबरच बुद्धीचीही जोपासना झाली पाहिजे हे भविष्य वर्तविणारा महान द्रष्टा.




हाडाचा शेतकरी कृषिवंतांची विचारपूस करीत आहे. बलीराज्याची अस्मिता जागृत करीत आहे




वाढदिवसाप्रीत्यर्थ जमलेला गोतावळा, शिवरायाचे सवंगडीच जणू ! यशवंतरावजी, जीवेत शरदः शतम !



" काशीजी की कला जाते, मथुरा मस्जीद होते ।
शिवाजी न होते, तो सुन्नत होती सबकी ॥ "




शिवरायाला साक्षी ठेवून हे दोन महान मुत्सद्दी
कोणती भीष्मप्रतिज्ञा करीत आहेत ?




पाणी जोखले आहे. कावा ओळखला आहे. 'आप चीनी हैं लेकिन हम प्राचीन हैं।'



'सादिकजी, आप घबराइए नहीं। राष्ट्रपतीजी की आज्ञा हो तो हम देख लेंगे।'




“ पंडितजी, विचार कसचा करता ? हा सह्याद्रीचा पहाड समोर उभा असताना ! ”



महाराष्ट्राची धुरा वसंतरावांच्या खांद्यावर ठेऊन भारताच्या संरक्षणासाठी धाऊन जाणारे
हेच ते यशवंतराव. आता कसची चिंता करता पंडितजी ?

# शुभेच्छा – संदेशात्मक राष्ट्रनेत्यांचे सद्विचार

या विभागातील शुभचिंतक—

* डॉ. **वराहगिरी व्यंकटगिरी**, राष्ट्रपती, भारत सरकार
* डॉ. **गोपालस्वरूप पाठक**, उपराष्ट्रपती, चिटणिसांतर्फे संदेश
* श्री. **जगजीवनराम**, अध्यक्ष, भारतीय काँग्रेस
* श्री. **दयानंद बांदोडकर**, मुख्यमंत्री, गोवा राज्य
* श्री. **जयप्रकाश नारायण**, अध्यक्ष, अखिल भारतीय सर्वोदय समाज.

★ ★ ★

राष्ट्रपतिभवन, नई दिल्ली–४
RASHTRAPATI BHAWAN
NEW DELHI–4
१७ जनवरी १९७०

मुझे यह जानकर प्रसन्नता हुई कि श्री. यशवंतराव बलवंतराव चव्हाण के जीवन से संबंधित " गौरव ग्रंथ " के प्रकाशन का आयोजन किया जा रहा है ।

श्री. चव्हाण के दीर्घ जीवन एवं " गौरव ग्रंथ " की सफलता के लिये मैं अपनी शुभकामनायें भेजता हूँ ।

**व. वें. गिरी**

सत्यमेव जयते

No-VP ( S )–8671/69
**SECRETARY**
**TO THE VICE-PRESIDENT OF INDIA**
**NEW DELHI**
**November 11, 1969**

Dear sir,

The Vice–President of India is very happy to learn that a Special Souvenir Volume depicting the achievements and episodes in the Public life of Shri Yeshwantrao Chavan, Union Home Minister, is proposed to be published under the aegis of ' Karmaveer Prakashan ' Poona, and sends his best wishes for the success of this noteworthy project.

Yours faithfully
Sd/—
( V. Phadke )

Dr. Punjbarao R. Jadhav,
Advocate & Publisher,
' Karmaveer Prakashan ',
22, Ambika Housing Society,
Chatuhshringi Paytha, Senapati Bapat Path,
Poona– 16

कै. म. म. द. वा. पोतदा
ग्रंथ संग्रह

सत्यमेव जयते

खाद्य, कृषि, सामुदायिक विकास
तथा सहकारिता मंत्री,
भारत सरकार नई दिल्ली ।
MINISTFR FOR
FOOD, AGRICULTURE, COMMUNITY
DEVELOPMENT & CO-OPERATION
GOVERNMENT OF INDIA,
NEW DELHI
दिनांक ४ मार्च, १९७०

कर्मवीर प्रकाशन, पूना द्वारा श्री. यशवंतराव चव्हाण के जन्मदिन के अवसर पर एक अभिनंदन ग्रंथ प्रकाशित किया जा रहा है, यह ज्ञात हुआ !

श्री. चव्हाण की देश और समाज के प्रति प्रशंसनीय सेवाएं हैं । महाराष्ट्र के मुख्य-मंत्री और केन्द्र के गृहमंत्री के रूप में देश प्रशासन में भाग लेकर अपने देश-निर्माण के कार्य में महत्त्वपूर्ण योगदान दिया है । इनका अभिनंदन करके महाराष्ट्र विशेषकर पूना निवासी अपने मात्र कर्तव्य का पालन कर रहे हैं । आशा है, ग्रंथ में इनकी जीवनी एवं सेवाओं का समुचित दिग्दर्शन होगा ।

मेरी शुभकामना है कि श्री. चव्हाण दीर्घायु हो एवं देश और समाज की सेवा में आजीवन लगे रहें ।

ग्रंथ उपयोगी सिद्ध हो ।

**जगजीवन राम**

# इतिहासातील अढळस्थान

श्री. दयानंद बाळकृष्ण बांदोडकर, मुख्यमंत्री : गोवा, दमण व दीव सरकार, गोवा.

श्री. यशवंतरावांचा व माझा प्रथम संबंध आला तो प्रसंग अजून माझ्या डोळ्यांसमोर आहे. त्यावेळी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते व मी होतो एक सामान्य नागरिक. यशवंतरावांची भेट घेण्याकरिता मी सचिवालयात गेलो होतो. पंढरीच्या विठोबाप्रमाणे त्यांच्या दाराशी जनसामान्यांची जत्रा लोटली होती. त्यामुळे देवदर्शनाऐवजी कळसाचे दर्शन घ्यावे त्याप्रमाणे यशवंतरावांची भेट न होताच मी परत आलो. पण त्यांच्या लोकप्रियतेचे मात्र दर्शन घडलेच. त्यानंतर आमची प्रथम भेट झाली ती पुण्याला–महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे तत्कालीन चिटणीस श्री. मोहन धारिया यांच्यामार्फत. चर्चेतून एक गोष्ट स्पष्ट झाली. गोमंतकविषयी त्यांना गाढ आस्था तर होतीच पण माहितीही सखोल होती. एका अनुभवसंपन्न प्रशासकाशी व सहृदय विचारवंताशी आपण बोलत आहोत याची पदोपदी जाणीव होत होती.

श्री. यशवंतराव हे मितभाषी म्हणून प्रसिद्ध आहेत. काही हितशत्रू या गोष्टीचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांनी मितभाषित्व सोडले नाही. कारण आपण ज्याचा उच्चार करतो ते प्रत्यक्षात आणता आले पाहिजे अशी ज्यांना तळमळ असते ती माणसे जास्त बोलतच नाहीत. त्यांची एक निश्चित अशी विचारसरणी आहे आणि गाजावाजा न करता ते आपली विचारप्रणाली पुढे नेत असतात. वरवर पाहणाऱ्यांना त्याची जाणीव होणे कठीण. परंतु त्यांच्या या पद्धतीमुळे त्यांनी महाराष्ट्राला दिल्लीत मानाचे स्थान प्राप्त करून दिले आहे. बृहन्महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत त्यांचा वाटा फार मोठा आहे. योग्य माणसाची योग्य कामासाठी निवड करण्याचे जे कौशल्य त्यांच्यामध्ये आहे त्यामुळे प्रशासन व संघटना या दोन्ही क्षेत्रांत ते यशस्वी झालेले आहेत. या समर्थ, सहृदय व सर्वसंग्राहक नेत्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष व्हावा हीच मनोमन इच्छा.

卐 卐 卐

# नवे नेतृत्व

श्री. जयप्रकाश नारायण, अध्यक्ष, अखिल भारतीय सर्वोदय समाज, दिल्ली

श्री. यशवंतराव चव्हाण जीवन-दर्शन घडविण्याचा डॉ. पंजाबराव जाधव यांचा प्रातिनिधिक प्रयत्न नाविन्यपूर्ण वाटतो. त्यांच्या प्रस्तुत उपक्रमाबद्दल धन्यवाद.

भारतातील सर्व जाती, धर्म, पंथ यांना एकजीव करणारे ऐक्य नांदविण्यासाठी आपल्या देशाला श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे पुरोगामी नेते लाभले आहेत, हे देशाचे भाग्यच समजले पाहिजे. त्यांना जवळून पाहण्याचा मला अनेक वेळा योग आला आहे. भारतीय लोकशाहीत व्यक्तिविकासाला समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी घेतलेला ध्यास मी प्रत्यक्ष पाहिलेला आहे.

प्रचलित परिस्थितीत देशातील सार्वजनिक शील थोडे शिथिल होऊ पाहात आहे. राजकारण हे व्रत न राहाता वृत्ती झाल्याचे दृश्य दिसू लागले आहे. सार्वजनिक जीवन सेवा न राहाता एक व्यवसाय बनू पाहात आहे. ही घसरण जर थांबविली गेली नाही तर लोकशाहीला निश्चित धोका आहे. तथापि संतोषाची गोष्ट आहे की, श्री. यशवंतरावांसारखे ध्येयनिष्ठ, राष्ट्रकार्य धुरंधर आणि सर्वसमावेषक विशालहृदयी महामानव आज विशाल भारताच्या उज्ज्वल भविष्यकाळासाठी अहर्निश कार्यरत आहेत. अनेक लोक आज जरी भारतातील लोकशाहीच्या भवितव्याबद्दल सचिंत असले तरी तितके चिंता करण्याचे कारण नाही नव्या भारतास नेहरूंनंतर कोण हा प्रश्न पडण्याचे कारण नाही. श्री. यशवंतरावांसारखे कर्तबगार नेते निर्माण होत आहेत.

भारतीय लोकशाही शासनाचे सारथ्य करण्यासाठी परमेश्वराने त्यांना अखंड आरोग्य आणि दीर्घायुष्य द्यावे व त्यांचे भावी जीवनातील कर्तृत्व शुद्ध पक्षातील चंद्राप्रमाणे उत्तरोत्तर वृद्धिंगत होत राहावे, हीच माझी शुभकामना आहे.

卐 卐 卐

# संशोधकांच्या सूक्ष्म-दर्शकातून दिसणारे श्री. यशवंतराव चव्हाण

या विभागातील विद्वान विचारवंत —

★ डॉ. **वि. भि. कोलते**, कुलगुरू, नागपूर विद्यापीठ

★ डॉ. **डी. सी. पावटे**, राज्यपाल, पंजाबराज्य

★ डॉ. **हरिभाऊ पाटसकर**, कुलगुरू, पुणे विद्यापीठ

★ डॉ. **पी. व्ही. चेरियन**, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

★ डॉ. **दादासाहेब घोगरे**, संस्थापक, श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्था, धुळे

★ डॉ. **गजानन श्रीपत खैर**, संचालक, अनाथ विद्यार्थी गृह, पुणे

★ डॉ. **प्रभाकर माचवे**, अध्यक्ष, हिंदी साहित्य अकॅडमी, भारत सरकार

★ डॉ. **प्र. चिं. शेजवलकर**, प्रा. बृहन् महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे

★ डॉ. **सरोजिनी बाबर**, संचालिका, लोकसाहित्य समिती, महाराष्ट्र सरकार

★ डॉ. **कमलाताई मोरे** ( मराठे ) संचालिका, महिलामंडळ, नंदुरबार.

★ डॉ. **बी. एन्. सावंत**, अध्यक्ष, आरोग्य केंद्र, मुंबई.

★ डॉ. **दत्तो वामन पोतदार**, अध्यक्ष, इतिहास संशोधक मंडळ.

★ ★ ★

# सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्व

डॉ. वि. भि. कोलते, कुलगुरू : नागपूर विद्यापीठ, नागपूर.

आकाशात एकदम एखादा तारा आविर्भूत व्हावा आणि त्याने आपल्या तेजाने सर्वांचे लक्ष वेधून घ्यावे, असेच काहीसे श्री. यशवंतरावजींच्या बाबतीत राज्य-पुनर्घटनेच्या वेळी निदान वैदर्भीय जनतेच्या दृष्टीने झाले. राज्यपुनर्घटनेनंतर स्थापन झालेल्या नव्या मुंबईत राज्याचे मुख्यमंत्रिपद त्यांच्याकडे आले तेव्हाच विदर्भातील जनतेचे लक्ष त्यांच्याकडे विशेष वेधले गेले. 'हा कोण संप्रति नवा पुरुषावतार' म्हणून जो तो एकमेकाला विचारू लागला आणि त्यांच्या कर्तृत्वाचा शोध घेऊ लागला. याचा अर्थ असा नव्हे की, यशवंतराव मुख्यमंत्री म्हणून एखाद्या धूमकेतूप्रमाणे प्रकट झाले. तसे असते तर आतापर्यंत हा धूमकेतू लुप्तही झाला असता. खरे असे आहे की, हा तारा आपल्या कर्तृत्वाचे तेज पसरीत राजकीय नभोमंडळात हळूहळू वर येत होता. हिऱ्यांच्या कोंदणातील बहुमोल रत्नाप्रमाणे काही काळ तो शोभून दिसत होता पण या रत्नाचे तेज आगळेच असल्यामुळे त्याने आपल्या देदीप्यमान कांतीने पैलू न पाडलेल्या हिऱ्यांना लौकरच मंदप्रद करून सोडले आणि आपल्या अंगभूत स्वतंत्र कर्तृत्वाच्या तेजाने तो तळपू लागला. खऱ्या रत्नाचे पाणी मुळात असले तरीही ते जोखायला खुद्द जवाहिऱ्यांनाही वेळ लागतो. पण एकदा ते जोखले गेले म्हणजे त्यांचेच नव्हे तर इतरांचेही लक्ष त्या रत्नाकडे आकर्षिले जाऊन त्याचे मूल्य वाढत जाते. यशवंतरावांच्या अभ्युदयाचे असे वर्णन केले तर चुकीचे होईल काय ?

द्वैभाषिक मुंबई राज्यातून त्यांनी ज्या रीतीने महाराष्ट्र आकाराला आणला त्यामुळे सर्वजण अक्षरशः स्तिमित झाले. आपले स्वप्न साकार करणाऱ्या या नेत्या-समोर जनता आदराने विनम्र झाली. उचंबळलेल्या अंतःकरणाने तिने त्याला अभिवादन केले. " अभिवादन तुज आमुचे युगपुरुषा यशवंता । तूच महाराष्ट्र राज्य कौशल्ये निर्माता । " म्हणून त्यांच्यावर स्तुतिसुमनांजली उधळली. महाराष्ट्राच्याच नव्हे तर

भारताच्या अभ्युदयाचे एक आशास्थान म्हणून त्यांच्याकडे जनता पाहू लागली आज त्याचे प्रत्यंतर येत आहे. यशवंतरावांच्या प्रशासन-कौशल्यामुळे राजकीय क्षेत्रात त्यांच्या रूपाने राष्ट्रातील नवीन नेतृत्व प्रगट झाले. हे नेतृत्व जसे तरुण, विकासशील आणि प्रगतशील आहे तसे सर्वस्पर्शीही आहे.

श्री. यशवंतरावांच्या यशाचे माझ्या दृष्टीने एक महत्त्वाचे कारण आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वस्पर्शी आहे. जीवनाच्या विविध अंगांचा वेध घेणारे आहे. त्यामुळेच ते विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांच्या आणि जनतेच्या आदराला पात्र झाले आहेत. खरे नेतृत्व हे नेहमीच सर्वस्पर्शी असते. अनेकदा आपणांला असे आढळते की, एका विशिष्ट क्षेत्रात प्राविण्य प्राप्त केलेल्या व्यक्तीच्या ठिकाणी जीवनातील इतर अंगांच्या बाबतीत फारशी सहानुभूती आढळत नाही; तिचे व्यक्तिमत्त्व एकांगी असते. त्यामुळेच तिचे स्वतःचे जीवनसुद्धा एकारलेले आढळते. व्यक्तीच्या काय किंवा समाजाच्या काय जीवनाला अनेक अंगे असतात. त्यांच्या समतोल समन्वयातूनच खरा सुसंस्कृतपणा व्यक्त होत असतो. याची जाणीव जिला नाही ती व्यक्ती आपल्या स्वतःच्या क्षेत्रात कितीही श्रेष्ठ असली तरी तिला आपण खऱ्या अर्थाने थोर म्हणणार नाही. तिच्याकडे समाजाचे नेतृत्व कधी येणार नाही. आपल्या ठिकाणी असलेल्या मौलिक गुणसंपन्नतेमुळे त्या थोर पुरुषाचे कर्तृत्व एखाद्या विशिष्ट क्षेत्रात विशेष चमकलेले असले तरी त्याने मनात आणले असते किंवा तशी संधी प्राप्त झाली असती तर इतर कोणत्याही क्षेत्रात ते तितकेच उठावलेले, चमकलेले आढळले असते. कारण या सर्व क्षेत्रांविषयी त्याच्या ठिकाणी स्वभावतःच सहानुभूती असते किंवा भिन्न भिन्न क्षेत्रांविषयी सहानुभूती बाळगण्याइतपत त्याचे व्यक्तिमत्त्व विशाल व व्यापक असते. तो एका क्षेत्रात काम करतो हा केवळ योगायोग होय.

लोकमान्य टिळक, महात्मा फुले, महात्मा गांधीजी, पंडित जवाहरलाल नेहरू इत्यादिकांच्या नेतृत्वातसुद्धा हीच सर्वंकष सहानुभूती असल्याचे दिसून येईल. वैयक्तिक चारित्र्यसंपन्नतेइतकीच ही जीवनस्पर्शी सहानुभूती नेत्यांच्या ठिकाणी आवश्यक असते आणि ह्या दोन्ही गोष्टी यशवंतरावांच्या ठिकाणी आहेत असे मी म्हटले तर त्यांचा कट्टर विरोधकदेखील त्यावर आक्षेप घेऊ शकणार नाही. या गुणामुळेच त्यांनी आज सर्वांची अंतःकरणे जिंकली आहेत. खरे नेतृत्व हे राष्ट्राच्या भूतकाळाच्या पायावर वर्तमान काळातील कर्तृत्वाची आखणी करून सर्वांगीण उज्ज्वल भविष्याचा वेध घेणारे असते. श्री. यशवंतरावांनी १५ ऑगस्ट १९५७ रोजी घेतलेल्या आढाव्यात हे उत्तम रीतीने प्रगट झालेले आहे. त्यांच्या भाषणातील हा एक उतारा पाहा :

> "आपल्याला मिळालेल्या राजकीय स्वातंत्र्याचा उपयोग करून आपणाला दारिद्र्य, रोग आणि अज्ञान यांपासून मुक्त व्हावयाचे आहे आणि इतर मूलभूत स्वातंत्र्ये प्राप्त करावयाची आहेत. या सर्वांच्या प्राप्तीनंतर आजच्या आपल्या राजकीय स्वातंत्र्याला खराखुरा अर्थ

येईल. परंतु हे महान कार्य कोणाही एका अद्वितीय व्यक्तीकडून किंवा एखाद्या कर्तृत्ववान गटाकडून होण्यासारखे नाही तर ते सबंध राष्ट्राला —प्रत्येक व्यक्तीला मग ती स्त्री, पुरुष किंवा मूल कोणीही असो, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात करावयाचे आहे. कारण आपली ही भारतभूमी भविष्यकाळी कशी असावी हे त्या सर्वांच्या कार्यावर व वागणुकीवर विसंबून आहे. भूतकाळात केलेल्या त्यागाच्या व प्रयत्नांच्या पायावर जर आपण राष्ट्रमंदिराची उभारणी केली नाही तर तो त्याग व ते प्रयत्न विफल ठरतील. स्वातंत्र्याचे खरे फळ म्हणजे एखाद्या व्यक्तीचा किंवा गटाचा अल्पस्वल्प लाभ नव्हे तर सबंध समाजाचे जास्तीत जास्त कल्याण होय. ”

श्री. यशवंतरावजींच्या या उद्‌गारात मी म्हणतो त्या सर्वांगीण सहानुभूतीचा पुरेपूर प्रत्यय येतो. राष्ट्राच्या उन्नतीचे त्यांचे स्वप्न एखादी व्यक्ती किंवा पक्ष याच्याशी निगडित नाही तर त्यातील आबालवृद्ध स्त्रीपुरुष या सर्व घटकांशी निगडित आहे. ते विचार करतात तेव्हा राष्ट्राच्या सर्व जीवनाचा विचार करतात, नुसत्या लौकिक राजकारणाचा नाही, तर राष्ट्रजीवनातील सर्व अंगांचा—शिक्षण, शेती, उद्योग, स्वास्थ्य, कला, साहित्य, इत्यादिकांचा विचार करतात. भारताची प्राचीन संस्कृती, त्याचा भूतकाळ दृष्टिआड न करता, उलट त्यावर श्रद्धा ठेवून पण त्यापासून योग्य तो धडा घेऊन ते वर्तमानात वावरतात आणि त्याच्या उज्ज्वल भवितव्याची चिंता वाहतात. या सहानुभूतीनेच ते सर्वांशी वागतात. सर्वांत मिसळतात. त्यांची सुखदुःखे समजावून घेतात आणि त्यामुळे सर्वांची अंतःकरणे आपलीशी करून त्यांचा आदर व विश्वास संपादन करतात. १९६१ च्या नोव्हेंबर—डिसेंबर मध्ये नागपूर येथे झालेल्या त्यांच्या प्रदीर्घ वास्तव्यात याचा चांगला प्रत्यय आलेला आहे. येथील समाजाच्या सर्व थरांतून त्यांचे जे स्वागत-समारंभ झाले त्यांतून हे स्पष्ट होत होते. आतापर्यंत अनेक मुख्य मंत्री झाले पण यशवंतरावांप्रमाणे प्रेमाचा वर्षाव इतरांवर क्वचितच झाला असेल. सर्वांच्या तोंडून या पुरुषाच्या हातात आपले भवितव्य सोपवायला काहीही हरकत नाही, असे उद्‌गार निघालेले मी ऐकलेले आहेत.

श्री. यशवंतरावांच्या कारभारातही त्यांच्या या सर्वस्पर्शी सहानुभूतीचा प्रत्यय येतो. छत्रपती श्री शिवाजीमहाराजांच्या यशस्वी राज्यकारभाराचे एक मर्म असे दिसते की, योग्य माणसांची पारख करून जीवनाची विविध अंगे समृद्ध करण्यासाठी त्यांच्या कर्तृत्वशक्तीचा ते उपयोग करून घेत असत. यशवंतरावांनी या बाबतीत अंगिकारलेले धोरण प्रसिद्ध आहे. मराठी भाषा आणि साहित्य यांच्या संवर्धनासाठी त्यांनी चालविलेले प्रयत्न लक्षात घेतले तरीही मी काय म्हणतो याचा प्रत्यय येईल. सुदैवाने यशवंतरावांचा पिंड साहित्यिकाचा आहे. ते हाडाचे रसिक आहेत. कला आणि साहित्य हे केवळ त्यांच्या विसाव्याचे स्थान आहे असे नाही तर तो त्यांच्या

चिंतनाचाही विषय आहे. मानवता हे त्यांच्या कला व साहित्यविषयक विचारांचे अधिष्ठान होय. यवतमाळ आणि सावरगाव डुकरे येथील विदर्भ साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणातून या मानवतेचा साक्षात्कार उत्तम रीतीने झालेला आढळतो. ज्ञानेश्वर-तुकाराम इ० मराठी संत आणि लो. टिळक, न्यायमूर्ती रानडे आदी आधुनिक विचारवंत यांच्या साहित्यातील विचारांची प्रेरणा मानवतावादी कशी होती हे समर्पक रीतीने सांगून आपल्या विवेचनाच्या पुष्ट्यर्थ रशियन साहित्यिक मॅक्झिम गॉर्की यांची 'आई' आणि 'थ्री मेन ऑन ए बोट' या कादंबऱ्यांची अत्यंत समर्पक उदाहरणे यशवंतरावांनी दिली. आपल्या विवेचनातील तर्कशुद्धतेने व बहुश्रुततेने तेथील श्रोत्यांची मने त्यांनी सहज जिंकून घेतली. साहित्याचा बाह्य शृंगार यशवंतरावांना प्रिय नाही असे नाही, पण त्याचबरोबर साहित्याचा आत्मा कोणता आहे याकडे त्यांचे विशेष लक्ष असते आणि तो मानवतेने भरलेला असला पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष आहे. साहित्यातील शब्दांवर त्यांची श्रद्धा आहे. "रसांनी थबथबलेले शब्द म्हणजे साहित्य" अशी साहित्याची सुटसुटीत व्याख्या करून हे रसाळ शब्द संकटात सापडलेल्या मानवतेच्या मुक्ततेसाठी साहित्यिकांनी वापरले पाहिजेत. कारण शब्दांचे सामर्थ्य अपूर्व आणि अमर आहे. ते ॲटम बॉम्बपेक्षाही महान आहे, अधिक परिणामकारक आहे. असे विचार यवतमाळ येथील विदर्भ साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी व्यक्त केले. आशय आणि वक्तृत्व या दोन्ही दृष्टींनी त्यांचे भाषण परिणामकारक झाले. या भाषणाने विदर्भातील सर्व साहित्यिकांची मने त्यांनी जिंकून घेतली, असे मी म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

जनमनावर प्रभुत्व प्राप्त करून देणाऱ्या लेखणी आणि वाणी या दोन महान शक्ती होत. यशवंतरावांनी अद्याप लेखणी फारशी हातात धरली नाही; पण आपल्या वाणीचा मात्र या कामी ते चांगला उपयोग करून घेतात. त्यांच्या वक्तृत्वगुणामुळे ते श्रोत्यांवर सहज छाप पाडून जातात. त्यामुळे त्यांचे प्रासंगिक भाषण देखील ऐकावेसे वाटते. १९६१ मध्ये नागपूर येथील त्यांच्या वास्तव्यात मला आणि माझ्या मित्रांना याचा अनुभव आला. श्रोत्यांवर छाप पाडण्यासाठी वक्त्याच्या ठिकाणी एका दृष्टीने आवश्यक असलेली शरीरसंपत्ती यशवंतरावांच्या जवळ आहे. समारंभातून व्यासपीठाकडे जाताना चालण्याची त्यांची पद्धती कित्येकांना वाटते त्याप्रमाणे कृत्रिम नाही, लहानपणी केलेल्या व्यायामातून आणि मारलेल्या कुस्त्यांतून ती निर्माण झालेली आहे. त्यामुळे त्यांच्या गतीत "नमवी पहा भूमि हा चालताना" असा भास होतो, भाषणासाठी उभे राहिल्यानंतर त्यांच्या या भरदार व्यक्तित्वाचा आणि मुक्त हास्याचा परिणाम होऊन श्रोत्यांची मने प्रसन्न होतात आणि भाषण संपविताना "जयहिंद" म्हणून ज्या पद्धतीने ते आपल्या खुर्चीकडे वळतात त्यातील नाट्याने ती जिंकली जातात. तसे पाहिले तर त्यांच्या आवाजात माधुर्य फारसे नाही. पण त्यांच्या भरदार व्यक्तिमत्त्वाला शोभणारे ओज त्यात भरपूर असते. त्यांच्या ओजस्वी आवाजातही

एक प्रकारची लयबद्धता असते आणि त्यामुळे त्यांचे भाषण कधी कंटाळवाणे होत नाही, ते ऐकत राहावेसे वाटते.

त्यांच्या वक्तृत्वाचा महत्त्वाचा गुण असा की, ते नेहमी फार थोडे आणि आवश्यक तेवढेच बोलतात. अनेक ठिकाणी भाषणे करावी लागत असल्यामुळे कदाचित् असे असेल, पण आटोपशीरपणाच्या बाबतीत त्यांची भाषणे आदर्श ठरतील. कित्येक सुप्रसिद्ध वक्त्यांची भाषणे ऐसपैस असतात. आरंभी व्यवस्थित विचार केलेला नसल्यामुळे ती तुटक तुटक वाटतात. वेळेवर सुचलेले चार विचार कसे तरी एकत्रित गुंडाळण्यात त्या वक्त्यांना श्रम करावे लागतात की काय असा श्रोत्यांना भास होतो. यशवंतरावांची भाषणे ऐकताना असे वाटत नाही. एखादा-दुसराच विचार व्यवस्थितपणे आणि तरीही आटोपशीरपणे ते मांडतात. विचार संपल्यानंतर उगीच पुनरुक्ती करीत ते लांबण लावीत नाहीत. तर लागलीच भाषण संपवितात आणि आपल्या आसनाकडे वळतात. त्यांनी मांडलेला विचारसुद्धा बहुधा नवीन असतो, स्वतंत्र असतो. आशयाच्या दृष्टीने त्यांच्या वक्तृत्वाचा हाच गुण मला अधिक महत्त्वाचा वाटतो.

१९५२ साली पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत " हिंदी लोकशाहीचे भवितव्य " या विषयावर भाषण करताना त्यांनी मांडलेला विचार पाहण्यासारखा आहे. ते म्हणाले, " गरीब मनात नव्या आकांक्षा उत्पन्न करून त्यांना कार्यप्रवण करण्यास प्रवृत्त करण्याऐवजी त्यांच्यात असंतोषच पसरविण्याचा प्रयत्न झाला तर रात्री त्यांचे लक्ष त्या श्रीमंतांच्या तिजोरीकडे जाईल इतकेच. पण खरा प्रश्न कायमच राहील. पैसा हा पुंजीपतीच्या किंवा सरकारच्या तिजोरीत नसून तो आकाशातील ढगांत आहे. त्या ढगांतून खाली पडणाऱ्या जलधारांत आहे. त्या पाण्याच्या प्रवाहरूपी नदीत आहे. नदीच्या दुकाठास मिळणाऱ्या काळ्या जमिनीत आहे. त्याच जमिनीतील खनिज संपत्तीत आहे, त्याच खनिज संपत्तिद्वारा निर्माण होणाऱ्या वैज्ञानिक यंत्रसामुग्रीत आहे, इतकेच नव्हे तर त्या सर्वांना एका सूत्रात बांधणाऱ्या मानवाच्या मनगटात आहे. असे जर ह्या गरीब जनतेला पटवून देऊन त्यांच्यात सृजन-शक्ती निर्माण करून त्यांना कार्यप्रवण केले तर आपले सारे प्रश्न सुटतील व त्या सुटण्यातच भारतीय लोकशाहीचे भवितव्य सामावलेले आहे."

हा विचार किती नवीन आणि भव्य आहे. यशवंतरावांच्या चिंतनातून तो निर्माण झालेला आहे. त्यावरून त्यांच्या सृजनशील प्रतिभेचा जसा प्रत्यय येतो तसाच विधायक कार्यकर्तृत्वाचाही येतो. मानवाच्या मनगटातील सामर्थ्यावर श्रद्धा निर्माण करणारा हा नवीन विचार ऐकून श्रोत्यांचे अंतःकरण फुलून न गेले तरच आश्चर्य.

अनेकदा यशवंतराव आपले विचार समर्पक कथांच्या किंवा उपमादृष्टांताच्या द्वारा जेव्हा व्यक्त करतात तेव्हा त्यातील साहित्यगुणांनी व बहुश्रुततेने श्रोता प्रभावित झाल्यावाचून राहात नाही. नागपूर महाविद्यालयात १८५७ च्या स्वातंत्र्य-समर-शताब्दीच्या निमित्ताने ते आले असताना गुरुदेव टागोरांच्या एका कथेच्या द्वारा त्यांनी विद्यार्थ्यांना उपदेश केला. ते म्हणाले, " कल्पना करा की, नकाशातील

भारताचे चित्र हा एक राष्ट्रपुरुष असून तो काखेपर्यंत समुद्राच्या पाण्यात उतरलेला आहे. समुद्रात उतरलेला हा राष्ट्रपुरुष काय करीत आहे, ह्याची गुरुदेव टागोरांनी आपल्या विद्यार्थ्यांना कल्पना करण्यास सांगितली; तेव्हा एका विद्यार्थ्याने सांगितले की, हा राष्ट्रपुरुष समुद्रात उतरलेला असून सूर्याला आणि चंद्राला दिवसा आणि रात्री अर्घ्य देत आहे. दुसऱ्या विद्यार्थ्याने उत्तर दिले की, दुःख, दैन्य व दारिद्र्य यांना कंटाळून तो आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाला आहे. तिसऱ्याने कल्पना केली व सांगितले की, गुरुदेव मला वाटते की, हा राष्ट्रपुरुष रत्नाकराच्या तळाशी असलेले माणिकमोती शोधून ते साऱ्या जगाला देण्यासाठी उत्सुक झालेला आहे. या तीन प्रतीकांतून जीवनाकडे बघण्याचे तीन दृष्टिकोन स्पष्ट होतात. त्यांपैकी कोणत्या दृष्टिकोनाने जीवनाकडे बघावयाचे याचा आपण विचार करा. मला विचाराल तर मी सांगेन की, रत्नाकराच्या तळाशी असलेले माणिकमोती वेचून ते साऱ्या जगाला देण्याची जी कल्पना आहे, तोच दृष्टिकोन सर्वांनी ठेवावा."

गुरुदेव टागोरांच्या प्रतीकात्मक कथेच्या साह्याने यशवंतरावांनी केलेला हा उपदेश ऐकताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात त्यांचे जे स्वागत केले ते अजून माझ्या डोळ्यांसमोर आहे. त्याच वर्षी नागपूर महाविद्यालयाच्या अमृत महोत्सव प्रसंगी ग्रंथालयाचा शिलान्यास करताना त्यांचे भाषण असेच आटोपशीर पण अत्यंत मार्मिक होते. महाविद्यालयातील ग्रंथालयाचे महत्त्व वर्णन करताना ते म्हणाले की, "एखाद्याचा संसार सुखाचा चालला आहे की नाही हे ज्याप्रमाणे सुगरण स्वयंपाकघरात डोकावून पाहून ठरविते त्याप्रमाणे विद्यालयाच्या प्रगतीची कल्पना त्यातील ग्रंथालय पाहून करता येते." असे घरगुती दृष्टांत वापरून आपले विवेचन सुबोध व रोचक करून सोडण्याचे कौशल्य त्यांच्या अनेक भाषणांत आढळते. "लहानपणी मुलांच्या वाढदिवशी शिवलेले कपडे तो मोठा होऊ लागल्यावर त्याला तोकडे पडू लागले तर आईला वाईट वाटेल काय? तसेच आज राष्ट्राच्या गरजा वाढल्या असून त्या पुऱ्या पडत नाहीत ही आपली चूक नाही." भुसावळ येथे ता. ३०-१२-१९५७ रोजी महात्मा फुले यांच्या तैलचित्राच्या उद्घाटन प्रसंगी जनतेपर्यंत शिक्षण पोचविण्याची कल्पना व्यक्त करताना त्यांनी म्हटले, "हिमालयावरील गंगा जेव्हा भागीरथी होऊन भूतलावर येते तेव्हाच ती लोकोपयोगी बनते. त्याप्रमाणे ज्ञानाची गंगा समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोचली पाहिजे. म्हणजेच ती सर्वांना कल्याणकारक होईल." यशवंतरावांनी वापरलेले असे दृष्टांत त्यांच्या भाषणातून ऐकले म्हणजे त्यांच्या ठिकाणी असलेल्या साहित्यगुणांची चांगली कल्पना येते.

गंभीर विचाराप्रमाणे अनेकदा त्यांच्या भाषणात मार्मिक विनोदही आढळून येतो. नागपूर येथील विदर्भ साहित्य संघाच्या एका नाट्योत्सवाच्या वेळी समारोपाचे भाषण ते करीत होते. आधीच्या वक्त्यांनी पूर्वीच्या मध्यप्रदेश शासनाने विदर्भ

साहित्य संघाला दिलेले अनुदान नवीन राज्यातही मिळाले पाहिजे, असे वारंवार आवाहन केले होते. त्याला उत्तर देताना यशवंतराव एक वाक्य अत्यंत मार्मिकपणे उद्गारले, " पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारने विदर्भ साहित्य संघाला दिलेल्या अनुदानाची कागदपत्रे मी पाहिली आहेत. त्यावरून अनुदान देणाराचे कौतुक करावे की घेणाराचे हा प्रश्न मला पडला आहे. कारण राज्यपुनर्घटना होण्याच्या अगदी आदल्या दिवशी हे अनुदान देण्यात व घेण्यात आले " त्यांनी हा गौप्यस्फोट करताच सभागृहात हशाचा नुसता कल्लोळ उडाला. गेल्या दहा वर्षांत यशवंतरावांचे कर्तृत्व आणि व्यक्तित्व अनेक पटींनी विकसित झालेले आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदा-वरून उचलून स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आणीबाणीच्या प्रसंगी त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळात नेले आणि भारताच्या संरक्षणखात्याची सूत्रे त्यांच्या हाती सोपविली. तेथे त्यांनी केलेले कार्य प्रसिद्ध आहे. विशेषतः कै. लालबहादूर शास्त्रींच्या कारकीर्दीत पाकिस्तानने ज्या वेळी भारतावर आक्रमण केले त्या वेळी आपल्या कणखर धोरणाने त्यांनी त्या युद्धात जो जय मिळविला त्यामुळे त्यांची कीर्ती दिगंत पसरली. भारतातील आबालवृद्ध जनतेच्या अंतःकरणात त्यांनी कायमचे स्थान मिळविले आणि आज ते गृहमंत्रिपदाची सूत्रे हालवीत आहेत. त्यांचा भविष्यकाल उज्ज्वल आहे असा माझा आत्मविश्वास आहे.

卐 卐 卐

# सामान्यांचा उद्धारक

डॉ. डी. सी. पावटे, पंजाबचे राज्यपाल, चंदीगड.

कोणत्याही देशातील लोकशाहीची निकोप वाढ व्हावयाची असेल तर त्या देशाच्या राज्यकारभारात उच्च स्थानावर असलेले नेते हे त्या देशातील समाजाच्या सर्व थरांतून आलेले असणे आवश्यक असते. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, यांसारख्या लोकशाहीप्रधान देशात अशी कितीतरी उदाहरणे सापडतील की, ग्रामीण भागांत जन्माला आलेली कित्येक लहान मुले पुढे देशाचे नेते म्हणून मोठ्या नावलौकिकास पोहोचले राजकीय नेतृत्व हे समाजाच्या सर्व थरांतून नैसर्गिकपणेच मिळाले पाहिजे. १९१३ मध्ये महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात जेव्हा यशवंतरावांचा जन्म झाला तेव्हा त्यांच्या देवतातुल्य मातेने राजकीय नेतृत्वासाठी बुद्धी आणि भावना अशा आवश्यक गुणांचा त्यांना आशीर्वाद दिला. त्यामुळेच यशवंतरावांना आपल्या देशाचे स्वतंत्र्य बलवान आणि महान करण्याच्या कामात महत्त्वाची कामगिरी बजावता आली. ते ब्रिटिशांविरुद्ध सिंहासारखे झुंजले व त्यात कल्पनाही करता येणार नाही अशा हालअपेष्टा सोसल्या. विधायक कार्यशक्ती, राजकीय डावपेचांचे सहज आकलन आणि माणसांची अचूक पारख या गुणांच्या जोरावर त्यांनी देशाची सेवा केली.

यशवंतरावांनी आपल्या विद्यार्थी–दशेपासूनच कष्ट करण्याची, भरपूर वाचन करून त्यावर स्वतः विचार करण्याची सवय लावून घेतली होती. त्यांचे उत्तुंग नेतृत्व महाराष्ट्र सरकारला सर्वांत प्रथम लाभले. महाराष्ट्रातील घडामोडींविषयी मी असे म्हणू शकेन की, गेल्या शे-सव्वाशे वर्षांत महाराष्ट्रावर ब्रिटिशांचा अंमल असताना शेतकी, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक बाबतीत सुधारणा करण्याचा विचार एकही नेता फारसा करू शकला नाही. इतकेच काय पण मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणेच्या वेळी सामान्य माणसांसाठी बोलणारा धीरोदात्त नेता अगदी क्वचितच सापडत असे.

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात अबकारी खात्याच्या अधिकारावर असलेले एक मंत्री मला माहीत आहेत. महात्मा गांधींच्या मद्यपानविरोधी चळवळीमुळे सरकारी वसुलीच्या कामात खंड पडल्याने ब्रिटिश अधिकारी चिंतातुर झाले. अशा वेळी हे मंत्रिमहाशय त्यांना म्हणाले, " जर लोकांनी मद्यपानबंदी केली तर ते सर्व मद्य मी एकटा पिऊन टाकीन ! "

स्वातंत्र्यानंतर लोकांच्या गरजेप्रमाणे अनेक खाती काढून सर्वांचे भले होईल असे महाराष्ट्र सरकारला पाहावे लागले. १९३९ नंतर मुंबई राज्याची स्थापना होऊन तरुण आणि उत्साही यशवंतरावांची त्या सरकारात एका महत्त्वाच्या जागेवर निवड झाली. त्यांनी लोकनियुक्त सरकारातील सर्व गोष्टी समजावून व शिकून घेतल्या. केवळ तीनच वर्षांत ते पार्लमेंटरी जीवनातील उगवता तारा म्हणून चमकले. त्यांची कष्ट करण्याची सवय, इतरांविषयी सहानुभूतीने विचार करण्याचा स्वभाव, सगळ्यांना समान वागणूक आणि दुर्लक्ष झालेल्यांना सहानुभूती इत्यादी गुणांमुळे खरोखरच ते समाजाच्या सर्व थरांत लोकप्रिय झाले.

संयुक्त महाराष्ट्राला यशवंतराव चव्हाण हे मुख्यमंत्री म्हणून लाभले हे त्यांचे भाग्यच म्हटले पाहिजे. महाराष्ट्राच्या गेल्या काही वर्षांच्या इतिहासात प्रांताबरोबरच देशाच्या आर्थिक उत्कर्षासाठी विचार करणारी यशवंतरावांसारखी एकही व्यक्ती झाली नाही. शिवाजीमहाराजांना आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आयुष्यभर शत्रूशी लढावे लागले. आपल्या हातांनी अपार कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद मिळवून देण्याचा विचार करण्यासाठी पेशवाईत देखील कोणाला वेळच मिळाला नाही. आपले कुशल नेतृत्व, साधी पण परिणामकारक भाषणपद्धत, दुसऱ्याचे ऐकून घेण्याची समंजस वृत्ती आणि निःपक्षपाती शासन यायोगे यशवंतरावांनी समाजाच्या सर्व थरांचे जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न केला व त्यात ते बव्हंशी यशस्वी झाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द खचितच अभिमानास्पद आहे. आजच्या स्थितीत भारतात पंजाब आणि महाराष्ट्र ही दोन भरभराटीला आलेली राज्ये आहेत. महाराष्ट्रात शेतकी आणि औद्योगिक क्रांती घडवून आणण्यात यशवंतरावच मुख्यतः कारणीभूत आहेत.

मध्यवर्ती सरकारचे संरक्षणमंत्री व गृहमंत्री म्हणून त्यांनी लोकसभेतील कर्तृत्व, आपल्या कर्तव्याची जाणीव आणि कोणतीही घटना हाताळताना निःपक्षपातीपणा या फार महत्त्वाच्या गोष्टी दाखवून दिल्या आहेत. संपूर्ण देशाला जबाबदार असणाऱ्या उच्च नेत्यांपैकी ते एक आहेत. आपल्या देशात एकूण लोकसंख्येच्या शेकडा पंचाहत्तर लोक शेतकरी आहेत, अशा लोकांचे नेतृत्व करणाऱ्या यशवंतरावांचे देश कौतुकच करीत आहे.

देव त्यांना उदंड आयुष्य देवो आणि भारत बलवान आणि समृद्ध झाल्याचे सुंदर दृष्य पाहावयास मिळण्याची त्यांची इच्छा पूर्ण करो !   ॥ ॥ ॥

# जीवन-सागरातील दीपगृह

डॉ. हरिभाऊ पाटसकर, कुलगुरू : पुणे विद्यापीठ, पुणे.

१९५७ साली संयुक्त महाराष्ट्र चळवळीने वणव्याचे स्वरूप धारण केले होते. कोणत्या वेळी काय घडेल याची महाराष्ट्रातील मंत्रिमंडळासही कल्पना नव्हती. भाऊसाहेब हिरे आणि मुरारजीभाई देसाई यांचे आपापसातील मतभेद पराकोटीला जाऊन महाराष्ट्र बेचिराख होणार काय ? हा एकच प्रश्न सुज्ञांपुढे उभा होता, पण विधिलिखित वेगळेच होते. मुरारजीभाई देसाईंनंतर द्विभाषिकाचे मुख्यमंत्री म्हणून ना. यशवंतराव यांच्यावर जबाबदारी पडली, नव्हे त्यांना काळाने आव्हान दिले. त्यांनी रणरणत्या कुंडात उडी मारली. एका बाजूस मोडकेतोडके मंत्रिमंडळ आणि दुसऱ्या बाजूस तमाम महाराष्ट्रीय जनता उभी, सर्व वातावरण क्रांतीचे, चळवळीचे नि स्फोटक बनलेले. केव्हा मुख्य-मंत्र्याचा किंवा कुठल्या मंत्र्याचा बळी घेईल याची खात्री नव्हती. महाराष्ट्रापेक्षा नेहरू-निष्ठा मोठी मानणाऱ्या ना. यशवंतरावांच्याकडे जनता एक राष्ट्रद्रोही म्हणून पाहात होती, इतकेच नव्हे तर विरोधी पक्ष त्यांची राजकीय होळी करण्याप्रत जाऊन पोचले होते, पण नियतीस ते मान्य नव्हते.

यशवंतरावजींची अचूक पडणारी पावले काळास माहीत होती. वरिष्ठ नेत्याबद्दल असलेल्या निःसंशय श्रद्धेने दिल्लीश्वरास शरण न जाता महाराष्ट्राचा अमृतकलश घेऊन ते महाराष्ट्रीय जनतेस सामोरे झाले. यशवंतरावजी महाराष्ट्राचे यशवंत ठरले. त्यांच्या जीवनकार्यात नशिबाचाच फार मोठा वाटा आहे, असे पुष्कळ लोक नेहमी म्हणत असताना मी बरेच वेळा ऐकले आहे. पण मला वाटते, यशवंतरावांच्या यशात बुद्धिचातुर्य, खंबीर नेतृत्व आणि अफाट कर्तृत्व यांचा फार मोठा भाग आहे. एक सामान्य माणूस पार्लमेंटरी सेक्रेटरीपासून द्विभाषिकाचा मुख्यमंत्री, भारताचा संरक्षणमंत्री ही पदे कौशल्याने भूषवितो याच्यापाठीमागे यशवंतरावांची घोर तपश्चर्या आहे, यात तिळमात्र शंका नाही. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून राजकारणात यश संपादन करणे,

हेच त्यांच्या जीवनाचे सूत्र झाले आहे.

१९५७ च्या पेचप्रसंगातून ते सहीसलामत बाहेर पडले ते थेट भारताचे संरक्षणमंत्री म्हणून राष्ट्रीय पातळीवर जाऊन पोहोचले. अगदी अल्पशा काळात त्यांनी सैन्यात आत्मविश्वास नि चैतन्य निर्माण केले. चिनी युद्धाचा शेवट झाला नि आमचे यशवंतराव भारतीय यशवंत म्हणून चमकू लागले. त्यांच्यासारखा निधड्या छातीचा नि कर्तबगार संरक्षणमंत्री भारताला मिळाला म्हणून भारतीय जनता आनंदात बुडून गेली. तोच दिल्लीवर साधूंचा हल्ला झाला. राजकीय क्षितिजावर परत ढग आले नि राजकीय परिस्थिती धोक्यात आली. ना. नंदा गृहखात्याची सूत्रे खाली ठेवून मोकळे झाले व यशवंतरावजींना गृहखात्याकडे पाचारण करण्यात आले. दिल्लीतील परिस्थिती प्रमाणाचे बाहेर गेली होती. अशा रीतीने ज्या ज्या वेळी राजकीय पेचप्रसंग निर्माण झाले त्या त्या वेळी चव्हाणांना पाचारण करण्यात आले. पेचप्रसंगांचा राजकीय गुंता सोडविण्यात काँग्रेस-श्रेष्ठींना सतत यशवंतरावजींची आठवण होते. त्यांची प्रतिमा नेहमीच वादळातून तयार होत आहे, हे उघड सत्य आहे.

यशवंतरावजींच्यावर गुंडगिरी, संधिसाधू वृत्ती आणि दुटप्पी धोरणांनी वावरणारा नेता म्हणून काही लोकांकडून आरोप केले जातात, पण खऱ्या अर्थाने त्यात काडीचेही सत्य नाही. जर ह्यांपैकी कुठलाही दोष त्यांच्यामध्ये असता तर ते आजपर्यंत कोट्यधीश झाले असते. प्रत्येक निर्णय ते स्वतंत्र व खंबीरपणे घेऊ शकतात, हे राजेरजवाड्यांचे तनखे आणि संजीव रेड्डींच्या उमेदवारीस पाठिंबा, याबाबतीत स्पष्ट झाले आहे. बंगलोरला आर्थिक मसुदा तयार करताना व तो मंजूर करवून घेताना त्यांचे पडलेले पाऊल स्वतंत्र व शहाणपणाचेच द्योतक समजावे लागेल. त्यांचे हे गुण लोकसभेतील अधिवेशनात तर नेहमीच अनुभवास येत असतात, विरोधकांना वेळप्रसंगी चुचकारून आपला मुद्दा त्यांच्या गळी उतरविण्याचे कसब तर इतर कुठल्याच नेत्यात दिसून येत नाही.

देशकालाची मर्यादा ओलांडून अखिल मानवजातीस ज्यांच्यापुढे आपले मस्तक आदराने नमवावेसे वाटते अशा थोर पुरुषांत नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांची गणना होते. पंडित जवाहरलाल नेहरूंचे आणि लालबहादूर शास्त्रीजींचे आध्यात्मिक वारस असलेले यशवंतराव म्हणजे नव्या युगाचे, नव्या भारताचे बौद्धिक नेतृत्व, नैतिक सामर्थ्य आणि राजनैतिक चातुर्य यांचे एकमेव प्रतीक होय.

यशवंतराव यांची जीवनगाथा म्हणजे एक अपूर्व उत्साहाचे थयथयते कारंजे आहे. त्यांच्या अलौकिक जीवन-कार्यात आणीबाणीच्या प्रसंगांना तोंड देण्यासाठी अपार धैर्य त्यांच्यामध्ये आहे. क्षितिजापलीकडे पाहणारी दूरदृष्टी आहे. अन्यायाचा प्रतिकार करणारी झुंजारवृत्ती आहे. विरोधी पक्षांशी सहिष्णुतेने वागण्याची शांतवृत्ती त्यांच्यात आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सरकारला दहशत बसविणारे आणि स्वातंत्र्योत्तरकाळात संपूर्ण भारताचे मन जिंकून घेणारे एक दुर्मिळ व्यक्तिमत्त्व म्हणजेच यशवंतराव चव्हाण. या साऱ्या गुणांच्या जोरावर भारतमंदिरातील तेहतीस कोटी

देवतांच्या या पुजाऱ्याने आपल्या जीवनकार्यात अपूर्व लोकप्रियता आणि कल्पनातीत यश मिळविले आहे. स्वातंत्र्ययज्ञात यशवंतरावांनी उडी घेतल्यावर त्यांनी त्यासाठी आपले तन, मन, धन अर्पण केले आहे. स्वातंत्र्यसूर्य मिळवू पाहणाऱ्या पन्नास कोटी जनता जनार्दनाने भावभक्तीने तुडुंब भरलेल्या हृदयांतून यशवंतरावांवर अमृतवर्षाव केला. त्यांचे देशप्रेम, देशसेवा व ध्येयनिष्ठा हे गुण भारतीय तरुणांना मार्गदर्शक आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून त्यांनी आपल्या जीवनाचा प्रत्येक क्षण राष्ट्राच्या प्रगतीसाठी वेचला आहे.

नामदार यशवंतराव फार कमी पण मार्मिक व सूत्रबद्ध असे बोलतात. त्यांच्या बोलण्यात जितका जिव्हाळा तितकाच प्रेमळपणा तर प्रसंगी तेवढाच खंबीरपणा असतो. परिस्थितीचा अंदाज घेतल्याशिवाय ते कधीही शब्द वाया घालवणार नाहीत. आज तर दिल्लीच्या क्षितिजावर स्वयंभू चमकणारा दुसरा राजकीय तारा दिसत नाही. बँक राष्ट्रीयीकरणावरून पक्षाची विघटना टाळण्यात ते प्रथम यशस्वी झाले आहेत. आजच्या परिस्थितीत कॉंग्रेस पक्षामध्ये डावे नि उजवे यांचा सुवर्णमध्य सांधणारा जर कोणी भारतीय प्रभावी नेता असेल तर यशवंतरावजींच्याकडेच बोट दाखवावे लागेल.

नामदार यशवंतरावांनी आपल्या देशास योग्य मार्गदर्शन करून लोकशाहीची इमारत भक्कम पायावर उभी करण्याचे महनीय कार्य केले आहे. राजकीय क्षेत्रात व स्वतःच्या कचेरीत मोठ्या जबाबदारीची कामे ते सहजगत्या पार पाडतात. ही त्यांची कार्यशक्ती जनमनात उच्च कोटीची भावना निर्माण करते. खेळीमेळीचा आनंदी स्वभाव व प्रतिभाशाली व्यक्तित्व, यामुळे त्यांनी जनमनमंदिरात मानाचे स्थान मिळविले आहे. भारतातील विविध सांस्कृतिक संस्थांना साह्यरूप होऊन त्यांनी सांस्कृतिक क्रांतीचे रणशिंग फुंकले आहे. त्यांच्या जीवन-चरित्रापासून नवीन पिढीला पुष्कळ शिकण्यासारखे आहे. भारतीय तरुणांच्या जीवन-सागरात ते दीपस्तंभाप्रमाणे निश्चित मार्गदर्शक आहेत, यात तिळमात्र शंका नाही.

卐 卐 卐

# लोकमान्य नेते

डॉ. पी. व्ही. चेरियन, राज्यपाल : महाराष्ट्र राज्य, मुंबई.

महाराष्ट्राचा राज्यपाल म्हणून माझी नेमणूक होण्याच्या पूर्वीही मी यशवंतरावांचे कर्तृत्व ऐकून होतो. स्वातंत्र्योत्तर काळात आपल्या देशात नव्याने उदय पावलेल्या नेत्यांत यशवंतरावजी एक प्रमुख लोकनेते होत. स्वातंत्र्याच्या चळवळीत वयाच्या ऐन सोळाव्या वर्षी तुरुंगवास पत्करून यशवंतरावांनी स्वातंत्र्यदेवतेची पूजा प्रथम बांधली व त्यानंतर गेली तीन चार दशके देशाची, महाराष्ट्राची व काँग्रेसची सेवा करण्याची संधी त्यांना लाभलेली आहे.

त्यांनी काँग्रेसश्रेष्ठींचा विश्वास संपादन केला व महाराष्ट्रातील जनतेची बाजू श्रेष्ठींपुढे पटवून देऊन मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळविण्यात ते यशस्वी झाले. महाराष्ट्रीय जनता व दिल्लीपती या दोहोंचा विश्वास संपादन करणे ही तारेवरची कसरत होती. या कसोटीच्या काळात आपल्या धीमेपणाने व समजूतदारपणाने यशवंतरावांनी द्विभाषिक राबविले. संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला आणि महाराष्ट्राच्या कर्णधाराचा मान श्री. यशवंतरावांना मिळाला. मुंबईतील तसेच मराठवाडा व विदर्भ येथील लोकांचा विश्वास संपादन करून महाराष्ट्राचे भावनिक एकीकरण करण्यात चव्हाण यशस्वी झाले. सर्व जाती-जमातींमध्ये त्यांनी विश्वास उत्पन्न केला, ही एक विशेष गोष्ट होय.

महाराष्ट्र राज्यात मिळालेल्या यशामुळे भारतातील अनेक लोकांचे लक्ष चव्हाणांच्या नेतृत्वाकडे गेले. जयप्रकाश नारायणांसारख्या अखिल भारतील कीर्तीच्या नेत्याने सुद्धा यशवंतराव भारताचे भावी पंतप्रधान होऊ शकतील, असा अभिप्राय व्यक्त केला. चीनच्या आक्रमणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी यशवंतरावांना दिल्लीला पाचारण करण्यात आले. " आम्ही मरू पण पराभव पत्करणार नाही. देश निर्मनुष्य झाला तरी चालेल पण निर्माल्यवत होता कामा नये. " या

जिद्दीच्या भावनेने त्यांनी संरक्षणमंत्रिपदाचा स्वीकार केला. सध्या आक्रमण थांबलेले आहे. परंतु चीन व पाकिस्तान यांच्या दुष्ट युतीमधून सीमेवर केव्हा भडका उडेल हे आज सांगता येत नाही. तशा प्रकारची आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास यशवंतराव समर्थपणे कार्य करू शकतील असा विश्वास त्यांच्या आजपर्यंतच्या यशाकडे पाहता वाटू लागतो. परदेशी पत्र-पंडित सुद्धा नेहरूंच्या भावी वारसदारांमध्ये यशवंत-रावांची गणना करीत आहेत. या गोष्टीवरून चव्हाणांचा प्रभाव किती पडलेला आहे हे दिसून येते. काळाच्या उदरात काय साठवलेले आहे हे कोणालाही सांगता येणार नाही. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की, नामदार चव्हाण ज्या स्थानावर असतील त्या स्थानावरून आपल्या मातृभूमीची सेवा अत्यंत निष्ठेने व समर्थपणे करतील यात शंका नाही.

卐 卐 卐

# शिक्षण-प्रेमी नेतृत्व

पद्मश्री डॉ. दादासाहेब घोगरे, संस्थापक : श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्था, धुळे.

भारतास ललामभूत ठरलेले व सामान्य माणसांच्या हृदय-सिंहासनावर अधिष्ठान पावलेले आजचे आपले लाडके गृहमंत्री नामदार यशवंतरावजी चव्हाण हे सामान्य माणसांच्या गुणांचीही किती दखल घेतात, शैक्षणिक संस्थेबद्दल किती आस्था आणि आपुलकी दाखवितात याबद्दलची माझी आठवण मी सांगतो.

नामदार यशवंतरावजी यांचा व माझा परिचय ते नामदार खेर मंत्रिमंडळाचे वेळी पार्लमेंटरी सेक्रेटरी होते तेव्हा कै. अप्पासाहेब जेधे यांनी मुंबई येथे प्रथम करून दिला. तेवढाच परिचय. पण ते पुढे स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री झाले त्यावेळी संस्थेच्या कामानिमित्त त्यांचेकडे जाण्याचा योग आला. ते साल १९५६ चे होते. त्याच वर्षी आमच्या धुळे येथील श्री शिवाजी विद्याप्रसारक संस्थेने आर्टस् कॉलेज सुरू करण्याचे धाडस केले. धाडस म्हणण्याचे कारण सन १९५६ पावेतो धुळे हे जिल्ह्याचे ठिकाण असूनही येथे कॉलेज नव्हते, मग जिल्ह्यात इतरत्र कोठून असणार ?

कॉलेजसाठी येथील नगरपरिषदेने त्यावेळी संस्थेस सुमारे दहा हजार रुपयांची ग्रँट देण्याचा ठराव केला. पण कॉलेज त्यावेळी नगरपरिषदेच्या हद्दीत नव्हते. ते दोन फर्लांग नगराबाहेर होते. या तांत्रिक अडचणीवरून कमिशनर साहेबांनी ग्रँट देता येत नाही असे कळविले. झाले, अनेक अडचणींत ही एक भर पडली. त्यातून मार्ग काढण्यासाठी त्यावेळी असलेले स्थानिक स्वराज्य मंत्री नामदार यशवंतरावजी चव्हाण यांना भेटावे म्हणून संस्थेचे सभासद आजचे खासदार अण्णासाहेब चुडामण पाटील व आमदार एन्. एस्. पाटील व मी असे गेलो. योगायोग असा की, त्याच वेळी मुख्यमंत्र्याच्या निवडणुकीचा प्रश्न चालू होता. अशा भाऊगर्दीत आमची दाद कोण घेणार ? पण खासदार श्री. अण्णासाहेब चुडामण पाटील यांनी आमची भेट घडवून आणली. पुढे नामदार यशवंतराव चव्हाणांनी मला ऑफिसमध्ये अर्ज घेऊन या म्हणून



कें. म. म. व बा. ग्रंथ संग्रह

सांगितले. त्याप्रमाणे मी ऑफिसात त्यांचेकडे अर्ज दिला. तो फक्त त्यांनी ठेवून घेतला. मी बाहेर आलो. मला आश्चर्य वाटले की, सकाळीं त्यांच्या निवासस्थानी बोलणी झाली आणि आता तर मला काहीच ओळख न दिल्यासारखे केले. यावरून मी अनुमान काढले की, बहुधा आपणास यश मिळणार नाही. मी निराश अंतःकरणाने धुळ्यास परतलो. येथे वर्तमान कळले की, नामदार यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले व स्थानिक स्वराज्य खाते नामदार तपासे यांचेकडे आले. मी यशवंतरावजींना अभिनंदनपर तार पाठविली एवढेच. परंतु दोन तीन दिवसांनी नामदार तपासे यांचा काँग्रेस भवनमध्ये मला फोन आला की, तुमच्या संस्थेची नगरपरिषदेची ग्रँट मंजूर झाली, असे कळविण्यास यशवंतरावजी यांनी मुद्दाम सांगितले आहे. एरवी ते (मी) काळजीत राहतील. असे आहेत यशवंतरावजी! कार्यतत्पर व सेवाभावी. सामान्य कार्यकर्त्यांची दखल घेणारे! शिक्षणसंस्थेवर प्रेम करणारे!

यशवंतरावजी मोठे राजकारणी खरे; पण त्याचबरोबर भारतातील बहुजनसमाज हा आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रांत मागासलेला आहे, ही जाणीव ठेवून त्यासंबंधी सामाजिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्यांबद्दल त्यांना आदर आणि आत्मीयता वाटते. प्रसंग-विशेषी शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचा ते नामोल्लेख करतात व त्यांच्या कामाचा गौरव करून समाजाने त्यांचे अनुकरण करावे असाही उपदेश ते आवर्जून करतात. समाज असल्या कार्यकर्त्यांची दखल घेत नाही, मोठमोठ्या समारंभात ही मंडळीं हजर असली तरी त्यांची उपेक्षा केली जाते हे दृश्य समाजास निश्चितच भूषणावह नाही असे ते सांगतात.

पुण्यास गांधी प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजच्या इमारतीचा अनावरण समारंभ यशवंतरावजींच्या शुभ हस्ते झाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री प्रमुख पाहुणे असल्यावर अमाप जनसमुदाय असणे अपरिहार्यच होते. मीही त्या समारंभात जनसमुदायात होतो. व्यासपीठावर मंत्रिमहाशयांच्या बाजूला गर्दी करून सुमारे शे-सव्वाशे मोठी मंडळी बसली होती. त्यावेळी भाषण करताना यशवंतरावजींनी समाजातील थोर कार्यकर्ते म्हणून महात्मा ज्योतिराव फुले, महर्षी अण्णासाहेब शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांचेबरोबर खानदेशचे डॉ. दादासाहेब घोगरे, असा माझाही उल्लेख केला आणि ते पुढे म्हणाले की "आजच्या या समारंभात डॉ. दादासाहेब घोगरे हजर असूनही त्यांची दखल कोणी घेऊ नये हे आश्चर्य! असली माणसे समाजाच्या हिता-करिता आपले कार्य निष्ठेने, श्रद्धेने व त्यागाने करीत असतात, त्यांना स्वतः मान-मरातबाची अपेक्षा नसते व ते अशाबद्दल कोणतीही क्षिती बाळगीत नाहीत. त्यांना समाज कोणाच्या मागे असतो याची पूर्ण जाणीव असते, हे जरी असले तरी समाजाने असल्या कार्यकर्त्यांचे ऋण मानले पाहिजे, नव्हे ते त्यांचे कर्तव्यच ठरते." या मंत्रिमहाशयांच्या उद्गारामुळे समारंभाचे कार्यकर्ते चकित झाले. ते ओशाळले व मी कोठे बसलो याचा शोध घेऊ लागले. वास्तविक समारंभापूर्वी माझी यशवंतरावजींशी

गाठ झाली नव्हती, असे असूनही मी त्या भाऊगर्दीत त्यांना कसा दिसलो याचे मलाही आश्चर्य वाटले. नंतर चहापानप्रसंगी माझी दखल घेतली गेली हे सांगणे नकोच.

यशवंतरावजींची नेमक्या व्यक्ती टिपण्याची सूक्ष्म दृष्टी कशी आहे हेच नम्रपणे मी सांगू इच्छितो. उपस्थित असलेल्या आमच्या शिक्षक-प्राध्यापक मंडळींनाही आश्चर्य वाटले व ते उद्गारले की, नामदार यशवंतराव म्हणजे सामान्यांतील असामान्य पुरुष होय.

आमच्या श्रीशिवाजी विद्याप्रसारक संस्थेच्या शाखोपशाखांची व ती करीत असलेल्या शैक्षणिक कार्याची त्यांना जवळून माहिती आहे. संस्थेच्या या कार्याने मोहित होऊन भारताचे भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सुवर्णमहोत्सव प्रसंगी भाषणाच्या वेळीं यशवंतरावांनी संस्थेचा गौरव केला; या प्रसंगाची सुवर्णस्मृती म्हणून सरकारतर्फे तीन लाख रुपयांची देणगी शिक्षणमंत्री माननीय बाळासाहेब चौधरी यांचे मार्फत जाहीर केली आणि महोत्सव अक्षरशः सुवर्णमय केला. या प्रसंगी नामदार यशवंतराव चव्हाण व राज्यपाल डॉ. पी. व्ही. चेरियन हेही उपस्थित होते. सामाजिक व विशेषत: शैक्षणिक कार्याबद्दल यशवंतरावांना किती माया व ममत्व आहे हे त्याचेच प्रत्यंतर नाही काय ?

● असे आहेत आपले यशवंतराव ! दलितांचे कैवारी, सज्जनांचे साहाय्यकर्ते, प्रामाणिक कार्यकर्त्यांची प्रेरणाशक्ती, दुर्दम्य आशावादी आणि निष्ठावान व्यक्ती ! त्यांच्या संबंधीचे महाराष्ट्रीय माणसांच्या मनातील अव्यक्त आणि अमूर्त स्वप्न लवकरच व्यक्त व मूर्त स्वरूपात साकार होवो हीच त्या जगन्नियंत्या परमेश्वरपदी प्रार्थना !

卐 卐 卐

# शब्द आणि शस्त्र राखणारा नेता

डॉ. गजानन श्रीपत खैर, एम्.ए., पीएच. डी., एम्.एल्.सी. (एक्स्) पुणे.

ज्यांनी स्वातंत्र्यसंग्रामात आपले सर्वस्व पणाला लावून भाग घेतला आणि त्यानंतर स्वातंत्र्याच्या काळात ज्यांनी राष्ट्रसंवर्धनाचे काम अंगावर घेतले, अशा देशभक्तांचा एक आदर्श म्हणून मी माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनाकडे व कार्याकडे पाहतो.

१९५२ ते १९५८ या काळात मी विधान परिषदेचा सभासद होतो, त्या मुदतीत माझा त्यांच्याशी निकटचा संबंध आला. त्यावेळी ते प्रथम स्थानिक स्वराज्य-मंत्री आणि नंतर मुख्यमंत्री होते. महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक अशा तिन्ही विभागांचे मुंबई राज्य त्यावेळी होते. नंतर ते महाराष्ट्र व गुजराथ असे द्विभाषिक झाले. त्यानंतर स्वतंत्र महाराष्ट्र राज्य झाले. त्रिभाषिक आणि द्विभाषिक राज्य असताना नामदार श्री. मोरारजी देसाई, डॉ. जीवराज मेहता, नामदार शांतीलाल शहा, नामदार दिनकरराव देसाई, नामदार हितेंद्र देसाई इत्यादी कर्तबगार व हुशार असे गुजराथी मंत्री होते. त्यांच्या तोलाचे असे कानडी किंवा मराठी मंत्री फारसे नव्हते. पण नामदार यशवंतराव यांचा मात्र एक अपवाद वाटत होता. मला त्यांचे मराठी व इंग्रजी दोन्ही भाषांवर प्रभुत्व दिसून आले. आपल्या विषयाचे पूर्ण आकलन करून ते पूर्वतयारी करीत. विधिमंडळात त्यांचे काम आत्मविश्वासाने व वजनदारपणे होई. आपल्या विषयाची मांडणी व समर्थन ते अत्यंत सुबोध व सोप्या भाषेत करीत. मनोवृत्ती शांत व समतोल ठेवून विरोधी पक्षालाही विश्वासात घेत त्यांच्या भाषणात फाजिल आग्रहीपणा किंवा विरोध करणाऱ्या व्यक्तीविषयी तुच्छपणाची भावना कधीही दिसून आली नाही. त्यामुळे नामदार यशवंतराव यांचेविषयी विरोधी पक्षातही आदराची भावना असे.

माध्यमिक शिक्षक मतदार संघातर्फे मी विधान परिषदेत निवडून गेलो होतो.

राजकारणापेक्षा शिक्षण व समाजसेवा हा माझा आवडीचा, व्यासंगाचा व कार्याचा विषय होता, म्हणून कोणत्याही राजकीय पक्षाला न मिळता मी स्वतंत्र राहिलो होतो. नामदार यशवंतराव चव्हाण यांनी मांडलेल्या बिलांवर मी विधायक स्वरूपाची टीका करून काही सुधारणा व नव्या कल्पना सुचवीत असे. उत्तराच्या भाषणात नामदार यशवंतराव नवीन सूचनांचे व कल्पनांचे स्वागत करून त्यावर विधायक विचार करण्याचे आश्वासन देत. या त्यांच्या गुणग्राहक वृत्तीमुळे विरोधी सभासदांच्या विरोधातही एक प्रकारची विधायक वृत्ती निर्माण होण्याला उत्तेजन मिळे.

१९६५ मध्ये अनाथ विद्यार्थी गृह संस्थेतील काही वास्तूंचा अनावरण समारंभ करावयाचा होता. नामदार चव्हाण त्यावेळी संरक्षणमंत्री होते. ते नुकतेच रशियाला भेट देऊन आलेले होते. भारत-पाकिस्तान-चीन यांच्यातील विरोधाचे वातावरण बरेच तापलेले होते. भारताचा संरक्षणमंत्री म्हणून नामदार चव्हाण यांना पाहण्याची व त्यांचे भाषण ऐकण्याची पुणेकरांना बरीच उत्सुकता लागून राहिलेली होती. म्हणून संस्थेच्या चालकांनी अनावरण समारंभाचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याविषयी त्यांच्याशी पत्रव्यवहार सुरू केला. त्याच सुमाराला मी एका सभेकरिता दिल्लीला गेलोच होतो म्हणून माझे स्नेही श्री. रमेश मुळगुंद यांना घेऊन समक्ष विनंती करण्याकरिता नामदार चव्हाण यांचेकडे गेलो. त्यांनी अत्यंत अगत्याने माझे स्वागत करून काहीही सबबी न सांगता अत्यंत खुषीने माझे निमंत्रण स्वीकारले व समारंभाचा दिवस मुक्रर केला.

समारंभ ठरला होता त्याचे आदले दिवशी सायंकाळी नामदार चव्हाण खास विमानाने पुण्याच्या विमानतळावर आले. त्यांच्या स्वागताकरिता सरकारी अधिकारी, पुणे महानगरपालिकेचे पदाधिकारी व सभासद, स्थानिक काँग्रेस कार्यकर्ते इत्यादींची खूप गर्दी होती. त्या सर्व गर्दीत माझी व त्यांची भेट कशी होणार या विवंचनेत मी त्या घोळक्यात उभा होतो. त्यांनी लांबूनच मला पाहिले व जवळ येऊन नमस्कार करून म्हणाले–" आय् हॅव्ह केप्ट माय् वर्ड. " मी त्यांचे आभार मानले व दुसऱ्या दिवशीच्या समारंभाचा कार्यक्रम सांगितला. समारंभाला पुणेकरांची खूप गर्दी जमली होती. नामदार चव्हाण यांचे भाषण त्यावेळच्या भारताच्या राजकीय परिस्थितीला अनुलक्षून असल्याने अत्यंत तळमळीचे असे झाले. श्रोत्यांनाही ते फार आवडले. आभाराचे भाषणात मी म्हणालो, " नामदार चव्हाण विमानातून उतरल्याबरोबर मला म्हणाले–आय हॅव्ह केप्ट माय वर्ड. मी त्यांच्याविषयी विश्वास प्रगट करून असे म्हणतो की,– यू वुईल ऑल्सो कीप युअर सोर्ड. " वर्ड आणि सोर्ड या शब्दांवरील कोटी समर्पक, अर्थपूर्ण व भविष्यसूचक होती हे नंतरच्या थोडयाच काळात झालेल्या पाकिस्तान बरोबरच्या युद्धात दिसून आले. नामदार चव्हाणांची तरवार अशीच सतत धारदार राहो व भारताचे स्वातंत्र्य टिकविण्याच्या कामी तिचा उपयोग होवो हीच माझी सदिच्छा.

卐 卐 卐

# रसिक साहित्यिक सज्जन

डॉ. प्रभाकर माचवे, अध्यक्ष, हिंदी साहित्य अकॅडेमी, दिल्ली.

यशवंतराव ' धडपडणारी मुले ' म्हणून साने गुरुजींनी ज्यांना संबोधिले त्या वर्गातले. लहानपणापासून त्यांचा पुस्तके वाचनाकडे कल. मराठी, इंग्रजी, हिन्दीमधून जे काही उपलब्ध झाले व धकाधकीच्या सत्याग्रही चळवळीतून जो काही वेळ मिळत गेला, त्याच्या पूर्ण सदुपयोगाने त्यांनी आपल्या तरुणपणी गांधीवाद, हिंदुत्ववाद, मार्क्सवाद, समाजवाद, मानवतावाद यांचा सखोल अभ्यास केला. त्यांचे संस्कार इतके प्रबळ झाले म्हणूनच ' संयुक्त महाराष्ट्र की जवाहरलाल नेहरू ' असा पेचप्रसंग उभा राहिला असता त्यांनी दृढपणे ' नेहरू ' असा कौल दिला. त्यांनी बहुजन समाजाची नाडी नीट हेरली व महाराष्ट्रात विष्णुबुवा ब्रह्मचारी, ज्योतिबा फुले, लोकहितवादी, आगरकर व आंबेडकर यांनी जी पुनरुज्जीवनाची मुहूर्तमेढ रोवली होती, त्याच धर्मनिरपेक्ष लोकशाही जातिभेदरहित व्यापक आणि उदार अशा अखिल भारतीय राष्ट्रीय ध्येयाकडे वाटचाल केली. महाराष्ट्राचे उत्तम व यशस्वी नेतृत्व करून ते केंद्रस्थानी आले. अत्यंत नाजुक अशा परचक्राच्या वावटळीत त्यांनी संरक्षणासारखे कठीण काम जवाहरलाल व लालबहादूर यांचा विश्वास संपादन करून उत्तम रीतीने सांभाळले. आता ते इंदिरा गांधीच्या राजवटीत अत्यंत मूल्यवान असे राष्ट्र-निर्माण कार्य करीत आहेत. अशा व्यक्तीबद्दल मला साहजिकच एक मराठी भाषिक हिंदी लेखक या नात्याने फार अभिमान वाटतो.

दिल्लीला आल्यावर यशवंतरावांना मराठी साहित्यापासून दूर पडल्याची व नित्य सह्याद्रीचे वारे आनंदाने अंगावर घेण्याचे वातावरण जे होते ते मिळत नसल्याची थोडीशी खंत वाटत असावी. पण दिल्लीला येऊन त्यांनी हिंदी व इंग्रजी वक्तृत्वही उत्तम रीतीने कमावले. येथे मराठी बोलण्याचा सार्वजनिक प्रसंग कमी येत असला तरी ते शब्दांची किंमत उत्तम रीतीने ओळखतात. ते मितभाषी आहेत पण अमित अर्थसघन

असे सूचक व भेदक वक्तव्य देण्यात पटाईत आहेत. कुणाचे मन न दुखवता निर्भीडपणे सत्य पटवून व बिंबवून सांगणे हा त्यांचा हातखंडा आहे. मी त्यांना अनेक सभांतून ऐकले आहे. दिल्लीच्या लाल किल्ल्यात भरलेल्या कविसंमेलनप्रसंगी घडलेली ही घटना आहे. मेजर जनरल चौधरी यांना भारत-पाक संघर्षाच्या वेळी शंभराच्या नोटांची माळ श्रीमती रमा जैन यांनी घातली, त्या रात्री प्रचंड जनसागरापुढे यशवंतरावांनी नम्रपणे केलेली भाषणाची सुरवात अशी होती. " मी कवी नाही की या प्रसंगी बोलण्याचा मला अधिकार नाही. पण आज सीमा-क्षेत्रावरील रणांगणावर आपल्या जवानांनी व वीर हुतात्म्यांनी रक्ताने जे महाकाव्य लिहिले आहे त्यांना मी वंदन करतो. " सतत पाच मिनिटे टाळ्यांचा गडगडाट झाला.

शिव जयंतीच्या प्रसंगी रफी मार्गावरील मावळणकर हॉलजवळची विराट सभा आजही मला आठवते. तसे जयंतीनिमित्त पक्षाचे नेते बोलले ! अटलबिहारी वाजपेयीसारखा कसलेला हिंदी वक्ता बोलला. आता यशवंतराव अध्यक्षीय भाषणात काय सांगतात याची उत्सुकता होती. त्यांनी विनोबा भावे यांनी दिलेली वीर पुरुषांची व्याख्या सांगितली. शिवाजी महाराज केवळ महाराष्ट्राचे नसून अखिल भारताचे कसे आहेत हे मोजक्या शब्दांत सांगितले. यशवंतरावांच्या वाक्‌चातुर्याने श्रोते भारावून गेले होते. तामिळी संत तिरुवल्लुवर यांच्या निमित्ताने दिल्लीमधील मद्रासी स्कूलमध्ये एक मोठी सभा झाली होती.

संत तिरुवल्लुवर सभेत मी त्यांच्या ग्रंथातील " मंत्र्यासाठी सदुपदेश " हा भाग हिंदीत अनुवादून सांगितला व विनोदाने म्हटले की, या वचनांच्या प्रती तरी मंत्र्याकडे पाठविण्याची व्यवस्था तामिळ संगमने करावी. यशवंतरावांनी अध्यक्षीय भाषणात माझी कोटी मलाच प्रत्युत्पन्नमतीने परत केली. ते म्हणाले, " ही वचने तामिळनाडूच्या मंत्र्यांकडे आधी पाठवावीत " सभेत प्रचंड हशा पिकला. केशवसुतांच्या शताब्दीनिमित्त दिल्लीच्या साहित्य अकादेमीत ग्रंथ-विमोचनाचा समारंभ झाला. साहित्यिकांच्या निवडक श्रोतृसभेत केशवसुतांबद्दल विं. दा. करंदीकरांनी इंग्रजीत वक्तृत्व करून आपला प्रोफेसरी अभिप्राय दिला की, ' केशवसुतांच्या केवळ तीन-चार कविताच श्रेष्ठ साहित्य कक्षेत मोडतील ' वगैरे. यशवंतरावांनी अध्यक्षीय भाषणात उत्तम उत्तर दिले : " कवी, प्राध्यापक, टीकाकार काही म्हणोत, तरुणपणी आम्ही ज्या ध्येयाने भारावून गेलो होतो, त्या सामाजिक समतेची प्रेरणा केशवसुतांनी दिली. ' ब्राह्मण नाही, हिंदुहि नाही, न मी एक धर्माचा ' हा साकल्याचा संदेश केशवसुतांचा. " स्वतःला गाढ व्यासंगी म्हणविणाऱ्या कित्येक विद्वानांना यशवंतरावांनी आपल्या मार्मिक वक्तव्याने सहज निष्प्रभ केले आहे.

यशवंतराव भारताचे गृहमंत्री आहेत. महाराष्ट्राचे प्रिय पुढारी आहेत. उत्तम वक्ते आणि राजकारणात रंगलेले मुरब्बी मुत्सद्दी आहेत. पण या सर्व गोष्टींपेक्षाही जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते एक निस्पृह आणि त्यागशील देशभक्त आहेत.

मानवतावादाचा धडा त्यांनी केवळ पुस्तकातून घेतलेला नाही. तो निव्वळ बौद्धिक विकास म्हणून त्यांनी अंगिकारलेला नसून त्यांच्या जीवनात आणि कृतीत उतरलेला तो मराठी बाणा आहे. ते कर्तव्यकठोर पण अत्यंत सहृदय असे बुद्धिवंतांचे मित्र आहेत. साहित्यिकांच्या स्नेहादराचे स्थान आहे. त्यांच्यात उत्तम विनोदबुद्धी आहे व गुणाचे चीज करण्याची त्यांची सत्शील वृत्ती आहे.

मी पश्चिम जर्मनीत दोन वर्षांपूर्वी एका सांस्कृतिक यात्रेवर गेलो होतो. तेथे एका राजकीय पत्रकाराने सांगितले की, भारताचा भविष्यकाळचा महत्त्वाचा पुढारी यशवंतरावच. यावर चर्चा चालली असताना मी त्यांना विचारले की, " हे कसे ? " त्याने लगेच सांगितले की, " यशवंतराव हे आधुनिक बुद्धिनिष्ठ युगाचे नेते आहेत. पुरीच्या शंकराचार्याने गोहत्याविरोधी उपोषणाची धमकी दिली तेव्हा त्यांनीच त्याला लगेच दिल्लीहून अटक करून पुरीला पाठवून दिले व हिंदू जनमत प्रक्षुब्ध न होता आधुनिक शास्त्रीय दृष्टीने या प्रश्नाकडे पाहू लागले. " यशवंतरावांच्या रूपाने राजकारणातील आधुनिकता आणि साहित्यरसज्ञता एकवटलेली दिसत आहे. नेहरूनंतर आता दिल्लीला राजकारणाच्या क्षेत्रात साहित्य-रसिक फार थोडे उरले आहेत. अशा वेळी यशवंतरावांसारखा दिल्दार व खंदा नेता बहुसंख्याक सामान्यजनांचा प्रतिनिधी म्हणून आम्हांला लाभला आहे, हे मोठे आशास्थान आहे. एरवी राजकारण हे गढूळ पंकासारखे पण त्यातूनही आपले निर्मळ व प्रसन्न व्यक्तित्व टिकविण्याची ही जी कला त्यांनी साध्य केली आहे यामागे आत्मसंयम व निग्रहीपणाची मोठी तपश्चर्या आहे असे मला वाटते. या प्रसंगी मी भारताच्या सर्व भाषांच्या साहित्यिकांतर्फे त्यांना प्रणाम करतो.

卐 卐 卐



युगायुगाची स्वप्ने अचल निष्ठेने, दिव्य त्यागाने आणि स्वत:चे बलिदान करून साकार करणारे लाल बहादूर शास्त्री म्हणजे भगवान श्रीकृष्णच आणि आपल्या गांडीव धनुष्याच्या टणत्काराने त्या अति पवित्र स्वप्नाची सांगता करण्यासाठी अखंड साथ देणारे यशवंतराव म्हणजे आधुनिक युगातील अर्जुनच होत. या कृष्णार्जुनाच्या अनंत ऐक्याने पाकिस्तानची हड्डी नरम झाली आणि पिवळ्या संकटाच्या सावल्या अंतरिक्षातच विरून गेल्या.





" हिमालयावर संकट आल्यास महाराष्ट्राचा सह्याद्री आपल्या छातीचा कोट करून त्याचे संरक्षण करील " अशी भीष्म प्रतिज्ञा करून तिचे प्रत्यक्ष पालन करणारा हाच तो भारताचा भाग्यविधाता !




पक्षसंघटना आणि लोकसेवा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. निस्सीम लोक-सेवेच्या बळावर पक्षसंघटना उभी राहते. आणि अभंग ऐक्याच्या रूपाने पक्ष स्थिर होतो. अशी अभंग आणि अतूट संघटना पाठीशी उभी करणारा भारतीय एकमेव नेता.

' भारतभूमीच्या स्वातंत्र्यासाठी, प्राणपणाने लढणाऱ्या शूरसैनिकांचे आपणांस स्मरण असले पाहिजे. तारुण्याच्या उंबरठ्यावर नुकतेच पाऊल ठेवलेल्या जवानांनी चीन व पाकिस्तानी युद्धात आपले रक्त सांडले आहे. भारतमातेच्या या सुपुत्रांना माझे शतशः प्रणाम. '





महाविद्यालयीन आणि शालेय जीवनातही लष्करी शक्तीची जोपासना झाली पाहिजे असे आग्रहाने प्रतिपादन करणारा भारताचा द्रष्टा पुरुष.




संरक्षणमंत्र्यांना फक्त कागदी घोडे नाचवूनच भागत नाही. तो असा धोका पत्करून दुर्गम प्रदेशाची पाहणी करतो. सरहद्दीवरील बांधवांना दिलासा देतो. आणि सैनिकात आत्मविश्वास निर्माण करतो.




पाकिस्तानच्या हल्ल्याची पूर्वतयारी.
" वीर हो ! भारतमातेच्या संरक्षणाची जिम्मेदारी आता तुमच्यावरच आहे. "




भूदल, घोडदल, नौदल आणि वायुदल आता सज्ज आहेत. कळिकाळाचीही आता तमा नाही.
मग पाकिस्तान किस झाड की पत्ती !



पाकिस्तानी पॅटर्नचे पेकाट मोडणारे हेच ते भारतीय वायुदल.



हेच ते पाकिस्तानी घूसखोर. पण चूक तुमची नाही. तुमच्या उद्दाम राजकर्त्यांचे हे पाप आहे.



शिंग फुंकले रणी, वाजताति चौघडे, सज्ज व्हा उठा चला, सैन्य चालले पुढे ।
यासाठीच ही नाविक दलाची पाहणी चालली आहे.



युद्धाच्या आयुधांची पाहणी करून सेनाधिकारी व सैनिकांच्या सुखदुःखाशी
समरस होणारे हेच पहिले संरक्षणमंत्री.



संरक्षणाची जय्यत तयारी. जवाहरलाल समवेत यशवंतराव खंदकाची पाहणी करीत आहेत.



पराक्रमाचे कौतुक. पोलिसदलातील कर्तबगार अधिकारी वर्गाचे अभिनंदन. आणि प्रोत्साहन.

# लोकसंग्राहक नेता

डॉ. प्र. चिं. शेजवलकर, प्रा. बृहन् महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे.

एक राजकीय नेता म्हणून यशवंतरावांना आज अत्यंत योग्य अशी प्रतिष्ठा लाभली आहे. ती त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या आणि अंगच्या गुणांवर मिळविली आहे. गुणी व्यक्ती राजकारणाच्या धकाधकीत नेहमी मागे पडते असे आपण म्हणतो. परंतु यशवंतराव हे केवळ वैयक्तिक गुणावरच अल्पावधीत लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन पोहोचले. हे एक ठळक उदाहरण उद्योगी आणि कर्तृत्ववान तरुणांना राजकीय आणि सामाजिक क्षेत्रांत विधायक कार्य करण्याच्या दृष्टीने आवाहन करणारे आहे. म्हणूनच राष्ट्रीय नेत्यांमध्ये यशवंतरावांचे स्थान वरच्या दर्जाचे आहे, हे विरोधक सुद्धा कबूल करतात.

खरे म्हणजे चव्हाणांच्या गुणांची खरी पारख राष्ट्रीय पातळीवरून महाराष्ट्रीयेतरांनी केलीच नाही. उलट त्यांना बदनाम करण्यासाठी ते वरच्या दर्जाचे प्रांतिक पुढारी आहेत असा छुपा प्रचार दिल्लीच्या उच्चभ्रू वर्तुळात केला जातो हे मी स्वतः कानांनी ऐकले आहे. अर्थात् राजकारणात असा द्वेषमूलक प्रचार व्हायचाच. केंद्रीय राजकारणात अजूनही उत्तरेकडील लोकांचे व त्याखालोखाल दाक्षिणात्यांचे प्रस्थ बरेच आहे. ते संरक्षणमंत्री म्हणून प्रथम जेव्हा दिल्लीला गेले आणि त्यानंतर लोकसभेत त्यांचे पहिलेच भाषण झाले, त्यानंतरच्या काही दिवसांत मी दिल्लीत होतो. दिल्लीकरांनी चव्हाणांचे प्रसंगावधानी गुण अद्याप जवळून पाहिले नव्हते. त्यामुळे त्यावेळी त्यांच्याविषयीचे हेटाळणीचे उद्‌गार माझ्या कानावर आले. परंतु एक वर्षानंतर पुन्हा मी दिल्लीस गेलो आणि तेच दिल्लीकर चव्हाणांविषयी फार कौतुकाने मजजवळ बोलले. दिल्लीच्या वर्तुळात आणि केंद्रीय सत्तास्पर्धकांत आपले व्यक्तिमत्त्व ठसविण्यात चव्हाणांच्या अंगी असलेली दीर्घोद्योगी वृत्ती, लाघवीपणा, दुसऱ्याचे समजावून घेण्याची आस्था आणि निष्ठा याच कारणीभूत झाल्या असल्या पाहिजेत. यशवंतरावांनी

केंद्रस्थानी आज मिळविलेले स्थान केवळ गटबाजी किंवा राजकीय मुत्सद्देगिरी यातून मिळविलेले नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

इंदिरा गांधी यांच्यानंतर चव्हाणांकडे देशाचे नेतृत्व यावे असे जेव्हा मी म्हणतो तेव्हा त्यात सर्वसाधारण महाराष्ट्रीयांना एक मराठी माणूस या देशाचा अधिपती व्हावा असे जे स्वाभाविकपणे मनापासून वाटते, तेवढ्याच दृष्टिकोनातून मी म्हणत नाही; परंतु देशाला एकजिनसी आणि स्थिर शासन आणि नेतृत्व देऊ शकणाऱ्या ज्या अगदी बोटावर मोजता येणाऱ्या थोडया व्यक्ती मला राजकीय रंगमंचकावर दिसतात त्यांमध्ये यशवंतराव एक आहेत, म्हणून तेच पंतप्रधान व्हावेत असे मला वाटते. चव्हाणांच्या नेतृत्वगुणाचे रहस्य आपल्या अनुयायांना आणि विरोधकांनाही आपल्याबरोबर घेऊन जाण्याच्या वृत्तीत आहे.

यशवंतरावांचे राजकीय क्षेत्रातील यश ठसठशीत असल्यामुळे त्यांचे महाराष्ट्राच्या इतर क्षेत्रांतील कार्याचे मूल्यमापन करण्याचा प्रश्न गौण मानला जातो. परंतु माझ्या मते महाराष्ट्राच्या सहकारी क्षेत्रांत त्यांनी निर्माण केलेले चैतन्य अतुलनीय आहे. सहकारी चळवळीला पुनरुज्जीवित करून खेडोपाडी सहकाराचे जाळे पसरविण्यासाठी राज्यशासनाने उपक्रमशीलता दाखविली पाहिजे, ही गोष्ट ओळखून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना चव्हाणांनी आपल्या कारकीर्दीत सहकारक्षेत्र समृद्ध करण्यासाठी अनेक गोष्टी केल्या. गेल्या बारा वर्षांमध्ये जी महाराष्ट्रात सहकारी साखरकारखान्यांची भरभराट झाली, त्याचे मोठे श्रेय यशवंतरावांच्या राजवटीलाच आहे. महाराष्ट्राच्या सर्व भागांत अगदी तालुक्याच्या गावापर्यंत महाविद्यालयीन शिक्षणाचे कार्य जाऊन पोहोचावे याचे श्रेयही मुख्यमंत्री म्हणून काम करीत असताना चव्हाणांनी या बाबतीत जे प्रोत्साहन दिले त्यालाच आहे.

यशवंतरावांची पुरोगामी, समाजवादी आणि निर्भीड भूमिका तरुण पिढीला विशेष आकृष्ट करते. हा समाजवादी दृष्टिकोन पोथीनिष्ठ नाही. तो व्यवहार्यता प्रथम लक्षात घेतो. येथील सामाजिक परिस्थिती, लोकांच्या गरजा आणि वृत्ती, विरोधकांचे आक्षेप आणि प्रतिक्रिया आणि दीर्घकालीन परिणाम यांचाही विचार त्यात असतो. त्यांनी केवळ संघटनात्मक कार्याला वाहून घेतले असते तर क्रियाशील तरुण कार्यकर्त्यांची फळी उभारण्याची आज जी गरज आहे ती निश्चितच भागविता आली असती. गुणी लायक व्यक्तींना जोडून घेऊन त्यांच्यावर योग्य ती जबाबदारी टाकण्याचे कौशल्य यशवंतरावांनाच साधते. कै. स. गो. बर्वे यांच्या अंगचे कर्तृत्व महाराष्ट्राला चव्हाणांमुळेच उपयोगी पडले. खाजगी वैयक्तिक संभाषणातही त्यांच्या आर्जवी, लाघवी आणि मोहक बोलण्याने आपल्याला प्रसन्नता वाटते, असा माझा अनुभव आहे. फारशी ओळख नसतानाही मी त्यांना भेटावयास गेलो असताना त्यांनी एखाद्या जुन्या स्नेह्याप्रमाणे चौकशी केली. ते लाघवीपणाने व प्रसन्नतेने आमच्याशी बोलले, म्हणूनच चव्हाणांचा अनुयायांवर कसा ठसा उमटतो हे समजले, कारण माझ्यावरही त्यांचा ठसा उमटला आहे! 卐 卐 卐

# शिबिरातील दर्शन

डॉ. सरोजिनी बाबर, एम्. ए., पीएच. डी. संचालिका, लोकसाहित्य समिती, महाराष्ट्र सरकार, पुणे.

" गेल्या दीडदोन महिन्यांत तुम्ही मला जे जे दिलंत ते ते एवढं मोठं आहे की, माझ्या हातून हे ऋण कधीच न फिटणारं असं आहे. "...सप्टेंबरातील मुंबईला भरलेल्या महाराष्ट्र कॉंग्रेसच्या शिबिराचा समारोप करताना जनतेच्या अमाप प्रेमाच्या ओझ्यानं भारावलेल्या साहेबांनी आपल्या भाषणाची अखेरी अशी साधली. " गावातील माणसांनी आपल्या कामानं वाढलं पाहिजे " असं आग्रहानं वेळोवेळी सांगणारे ते स्वतःच आणखी मोठे झाले. समोरच्या श्रोत्यांच्या काळजाची पकड त्यांनी घेतली. " मला माझ्या महाराष्ट्रानं सगळं दिलंय. " असं सांगणाऱ्या साहेबांच्याबद्दल आम जनतेत नितांत आदराची भावना उसळून वर आली.

" वैयक्तिक महत्त्वाकांक्षेची दृष्ट महाराष्ट्राच्या कॉंग्रेसला लागू देऊ नका. " असं वारंवार बजावणाऱ्या साहेबांनाच त्यावेळी कुणाची नजर लागू नये, असं प्रत्येकाच्या मनात येऊन गेलं. देशाच्या संरक्षणाची जिम्मेदारी पत्करलेला हा पुरुषोत्तम आपले डोळे व मन उघडं ठेवून काम करणारा एक मोठा कार्यकर्ता आहे, याची दखल घेणारांनी मनातल्या मनात मीठ-मोहऱ्या उतरून साहेबांची दृष्ट काढली. आपला हा माणूस आपल्या कर्तबगारीनं आणखी मोठा होऊ दे असं मानलं ! जनतेच्या इच्छा आकांक्षांची कोंडी न करता त्यांची फलप्राप्ती करण्याचं धोरण स्वीकारणारे व पुरोगामी विचार धारण करणारे हे आपले साहेब " मला सत्तेचा मोह नाही, पण विचारांचा जरूर आहे " असं सांगतात. वेळप्रसंगी स्वतःचं व्यक्तित्व विसरून देशाच्या पुढाऱ्यांना मान देणारे आणि काय वाटेल ते झालं तरी कॉंग्रेसचं ऐक्य दुभंगता कामा नये, असं म्हणणाऱ्या साहेबांनी शिबिरातील कार्यकर्त्यांना आत्मपरीक्षणात्मक संदेश दिला.

" सत्तेचा वापर करीत असताना पक्षांनी किंवा माणसांनी आपणाला मिळालेला वापर दररोज कशासाठी करीत आहोत हे तपासून घेतलं पाहिजे. " असा १९६५ सालच्या राहुरीच्या काँग्रेस शिबिरात प्रगट केलेला साहेबांचा विचार घरी परतताना एकसारखा मनात घोळत राहिला. जनतेला दिलेल्या अभिवचनांची पूर्तता करून देणे, हा या सत्तेचा वापर करण्यामागचा हेतू असावा, ही त्यावेळी त्यांनी बोलून दाखविलेली कल्पना मनात घोळू लागली. शिवाय ज्या जनतेचं प्रतिनिधित्व आपण करतो त्या जनतेच्या सुखदु:खांशी आपण एकरूप होण्यातच आपली कसोटी आहे असं मानणाऱ्यांपैकी ते एक आहेत, याचीही भूल पडू दिली नाही. त्या संदर्भात बंगलोर अधिवेशनानंतर देशाच्या राजकीय वातावरणात झपाट्यानं घडून येणारे बदल लक्षात घेऊन साहेबांनी सर्वांना एकत्र आणून काँग्रेसमधील एकता साधण्याचा जो प्रयत्न केला त्याची आपल्या मनाशी छाननी केली. अनेक प्रकारच्या अडीअडचणींना तोंड देत देत आणि विविध तऱ्हेच्या यातना सहन करीत त्यांचेकडून काँग्रेसची केली जाणारी सेवा जेव्हा माझ्या लक्षात आली तेव्हा संघटना ही एक प्रचंड शक्ती आहे, याचा पडताळा घेता आला.

संसदीय पक्ष आणि संघटना ह्या दोघांनीही एकमेकांना पोषक काम करूनच जिवंत राहिलं पाहिजे, हा साहेबांचा आग्रह कशासाठी आहे हे तेव्हा लक्षात आलं. पक्षाची निष्ठा कार्यक्रमावर असली पाहिजे असं सांगणारे साहेब " काँग्रेस मोडायला निघालेला माणूस कितीही मोठा असला तरी मी त्याचं ऐकणार नाही " असं का म्हणाले, याचा अर्थ लागू शकला. " समाजवादाचं निशाण हाती घेऊन जीवनातल्या अखेरच्या क्षणापर्यंत मी निर्धारानं लढा देईन पण काँग्रेसचं ऐक्य दुभंगू देणार नाही. " असंही ते म्हणाले म्हणजे नेमकं काय त्याचाही उलगडा होत गेला. स्वत:ला विसरून इंदिराजींच्या मागं जाईन, त्याशिवाय देश पुढं जाऊच शकत नाही. " असं निर्धारानं साहेब का बोलले हे आता समजू-उमजू शकलं. त्यामुळं हिंदुस्थानला लोकशाही समाजवाद देण्याची साहेबांनी घेतलेली भूमिका ध्यानीमनी येत गेली. या संदर्भात बंगलोरला काय घडलं आणि दिल्लीला काय घडत गेलं यापेक्षा साहेब आपल्या वागण्या-बोलण्याशी कसे प्रामाणिक राहात गेले, याचं आम्ही गणित मांडू शकलो. जे घडलं ते किती दुर्दैवी अन् किती क्लेशकारक होतं याहीपेक्षा आता पक्षातील अंतर्गत भेदभाव विसरून उद्याचं उज्ज्वल भवितव्य कसं घडवणं शक्य होईल या विचारांनी आम्हांला घेरून सोडलं.

卐 卐 卐

# तेथे कर माझे जुळती

डॉ. कमलाताई मोरे ( मराठे ) संचालिका, महिला-मंडळ, नंदुरबार, ( धुळे ).

महाराष्ट्रात अशा कितीतरी अज्ञ व्यक्ती असतील की, त्या यशवंतरावजींना कळत न कळत गुरुस्थानी मानतात. या गुरूजवळ बसून त्यांच्या शिष्यांना दीक्षा घेणं कदाचित् कधीही जमणार नाही. त्यातील मी एक शिष्या आहे आपल्या गुरूबद्दल आदरभाव व्यक्त करणं माझं परमकर्तव्य आहे.

केवळ आपल्या महाराष्ट्रालाच नव्हे तर सबंध भारताला यशवंतरावांचं नेतृत्व लाभलं आहे. त्यातल्या त्यात महाराष्ट्र तर त्यांचा सदैव ऋणी राहील. त्यांचा जीवन-पट अत्यंत कलात्मक आहे. त्या जीवन-पटातील ते स्वतःच सर्वश्रेष्ठ असे नटराज आहेत. असे असूनही हा कलात्मक जीवन-पट सर्वांना उमजलेला नाही तसं दर्शन होऊ न देणं हीच त्यांची कला आहे. कला ही दिसू न देण्यातच कला आहे. हे अर्थपूर्ण वाक्य त्यांच्या जीवनाला बरोबर लागू पडते.

आपल्या मौलिक शब्दांच्या जोरावर धारदार भाषा वापरून यथार्थ बाजूचं वास्तव दर्शन घडवून त्यांनी सर्वांना आपल्याकडे लोहचुंबकाप्रमाणं खेचून घेतलं आहे. त्यांच्या कलात्मक जीवनात कुठलाही दुरावा निर्माण न करता परिस्थितीचं मार्मिकतेनं विश्लेषण करून आपलं म्हणणं पटवून देण्यात ते अत्यंत वाकबगार ठरले आहेत. आपल्या विधानाची वास्तवता प्रभावीपणे पटवून देऊन मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या अमृतकलशाची स्थापना त्यांनी मोठ्या श्रद्धेनं केली. या कलशातील काठोकाठ भरलेल्या त्यांच्या विचार-मंथनाचं अमृत कधीही न संपणारं असं आहे.

द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांची ठिकठिकाणी जी वक्तव्ये झाली, त्यात त्यांनी सर्वप्रकारचे विचार-मंथन केले आहे. त्यांनी सामाजिक, राजकीय, शासकीय व पक्षीय विचारांची अत्यंत बहुमोल भर घातली आहे. लोकशाही समाज-वादाची त्यांना ओढ आहे. समाजवादाचा फायदा सर्व थरांतील जनतेला पुरेपूर

मिळावा ही त्यांची अविरत धडपड आहे. भारताच्या ऐक्यासाठी आणि पक्षाच्या अभंगतेसाठी त्यांचा जीव तिळतिळ तुटत असतो. जेथे जेथे ऐक्य भंग पावते असे त्यांना वाटते तेथे तेथे ते आपल्या वैचारिक कलाकृतीचे यथार्थ दर्शन घडवितात. अशा वेळी त्यांना कधीकधी तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागतो. अत्यंत यातना होतात त्यांना, पण ते आपला संयम सोडत नाहीत. अगदी हळुवारपणे ऐक्य अभंग ठेवण्यात यशवंतराव यशस्वी होतात.

लोकशाही समाजवादाचे निष्ठेने दर्शन घडविणारे यशवंतराव असंख्य किसान-कामगारांचे प्रतिनिधी बनले आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण बरीच प्रगती केली असली तरी अजून हवी ती मजल गाठलेली नाही. किंबहुना अजूनही आपल्याला स्थैर्य प्राप्त झालेलं नाही. सामान्य माणसाचं जीवन तर अस्थिरच आहे. श्रीमंतांची श्रीमंती वाढते आहे आणि गरीब अधिकच खचत चालला आहे.

नेहरूंनी निर्माण केलेल्या पंचशीलेची विटंबना होते की काय याची भीती वाटू लागली आहे. काँग्रेसला नेस्तनाबूत करण्याची आणि देशात अराजकता माजविण्याची कुप्रवृत्ती दुर्दैवाने वाढीस लागली आहे. अशा या संघर्षाच्या आणि आणीबाणीच्या वेळी महाराष्ट्राचे मान्यवर नेते श्री. यशवंतराव चव्हाण यांची भूमिका ही श्रीकृष्णा-सारखी आहे असे मला वाटते.

महात्माजींची सत्य व अहिंसा, जवाहरलाल नेहरूंचे पंचशील उजळून निघण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या खंद्या मुत्सद्याचे नेतृत्व अत्यावश्यक आहे. त्यांच्या उज्ज्वल भवितव्याची दीप-ज्योत अखंड तेवत राहील. भारतीय जनतेच्या मनीषा त्यांच्या हातून पूर्ण होवोत, यासाठी परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देऊन त्यांचे आरोग्य चांगले ठेवो, अशी माझी प्रभुचरणी अनन्यभावे प्रार्थना आहे. माझ्या परमपूज्य गुरूला माझे शतशः प्रणाम !

卐 卐 卐

# भारताचा भाग्यविधाता

डॉ. बी. एन्. सावंत, अध्यक्ष, आरोग्य केंद्र, मुंबई.

महाराष्ट्राच्या आणि अखिल भारताच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र झगडणाऱ्या या थोर नेत्याला माझे शतशः प्रणाम. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यापासून ते केंद्रीय गृहमंत्री झाल्यापर्यंतच्या काळात त्यांनी केलेल्या अलौकिक कर्तृत्वाकडे नजर टाकल्यास नियतीच्या संकेतानेच त्यांचा अवतार झाला आहे असे वाटते. नामदार यशवंतरावांना प्रती शिवाजी असे म्हणतात ते किती सार्थ आहे हे त्यांच्या अद्वितीय कामगिरीवरून सिद्ध झालेलेच आहे.

स्वराज्य संस्थापनेच्या श्रीगणेशापासून त्याचे सुराज्य निर्माण करण्यापर्यंतच्या काळापर्यंत श्री. शिवाजीमहाराजांना जसे अनेक खडतर संकटांना तोंड द्यावे लागले तसेच नामदार यशवंतरावांनाही विस्कळीत झालेल्या महाराष्ट्राचे एकीकरण करून स्वराज्याचे सुराज्य निर्माण करण्याकरता अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. त्याग, प्रामाणिकपणा, कर्तव्यपरायणता, सेवा, स्वामिनिष्ठा, श्रद्धा आणि राष्ट्रप्रेम या महाराष्ट्रीयांच्या अंगी उपजत असलेल्या गुणांचा महाराजांनी जसा उपयोग करून घेतला त्याच धूर्ततेने नामदार यशवंतरावांनीही महाराष्ट्रीयांच्या अंगी वसत असलेल्या गुणांचा योग्य तो उपयोग करून महाराष्ट्राचा विकास केला आणि सुराज्य-निर्मिती केली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर उद्‌भवलेल्या अनेक संकटांनी विचलित न होता, त्यांचे निराकरण त्यांनी मोठ्या युक्तीने आणि कुशलतेने केले.

नामदार यशवंतरावांनी पंचायत राज्याची स्थापना करून श्रीमंताच्या महालापासून ते गरिबांच्या झोपडीपर्यंत सर्वांना व्यक्तिस्वातंत्र्याबरोबर राजनैतिक कारभारातही मगदुराप्रमाणे स्थान दिले. नामदार यशवंतराव यांच्या सत्त्वपरीक्षेच्या वेळा अनेक ठिकाणी आल्या. विशेषतः केंद्रीय गृहमंत्री झाल्यावर त्यांच्या नेतृत्वालाही आव्हान देणाऱ्या अशा बिकट वेळा आल्या, परंतु सर्वांवर त्यांनी मात करून प्रत्येक

वेळेस आपला अविस्मरणीय ठसा उमटविला आहे.

नामदार यशवंतराव यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारत प्रत्येक क्षेत्रात प्रगति-पथावर झपाट्याने पावले टाकीत आहे. भारताच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनातील एक सामर्थ्यशाली व्यक्तिमत्त्व म्हणून नामदार यशवंतराव यांचा प्रथम श्रेणीत उल्लेख करणे हे किती सार्थ आहे हे त्यांच्या अद्वितीय कामगिरीवरून सिद्ध होईल. ते आपल्या नावाप्रमाणे खरोखरीच यशवंत आहेत आणि त्यांच्या यशवंत नौकेतून सर्व भारतीयांना ते सुखरूपपणे पैलतीरी नेण्यात यश मिळविणार आहेत. मात्र त्या कुशल नावाड्यावर आपणा सर्वांची एकनिष्ठा असली पाहिजे. त्यांच्यावर आपली असलेली श्रद्धा, विश्वास व प्रेम कोणत्याही परिस्थितीत ढळू देता कामा नये. अखिल भारताने त्यांच्या पाठीशी उभे राहणे आवश्यक आहे. भारताला आज अशा निष्ठावंत कार्यकर्त्यांची किती आवश्यकता आहे हे जगात चाललेल्या घडामोडींवरून सहज लक्षात येईल. राज्यकारभारात निष्ठावंत माणसांची फार आवश्यकता आहे. महाराष्ट्राच्या व अखिल भारताच्या भाग्याने नामदार यशवंतराव चव्हाणांसारखा यशवंत नेता आपणाला लाभला आहे. त्यांनी केलेल्या अद्वितीय राष्ट्रीय कामगिरी-बद्दल अखिल भारतीय जनता त्यांची ऋणी आहे. त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

卐 卐 卐

# एकमेव नेतृत्व

महामहोपाध्याय डॉ. दत्तो वामन पोतदार, अध्यक्ष, इतिहास संशोधक मंडळ, पुणे.

यशवंतरावजींच्यामध्ये आणि माझ्यामध्ये वीस-पंचवीस वर्षांचे अंतर आहे. त्यांचे सर्व जीवन राजकीय धकाधकीत गेले आणि जात आहे. ते रॉयिस्ट म्हणून ओळखले जातात. मला त्यांची पहिली भेट घ्यावी लागली, त्यावेळेस ते पार्लमेंटरी सेक्रेटरी होते. पुढे संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या बैठकीत ते भेटत. मंत्री, मुख्यमंत्री आणि आता दिल्लीत गृहमंत्री असे ते झपाट्याने चढत गेले.

संस्था-समारंभांच्या निमित्ताने त्यांची काही छोटी भाषणे ऐकावयास मिळाली. टिपणे जवळ न घेता ते फार मुद्देसूद भाषणे करतात. मोठा आशय वेचक शब्दांत थोडक्यात मांडतात. त्यात एखाद्या तरी नवीन विचाराला चालना देणारा मुद्दा असतो. त्यांच्या ठायी सूक्ष्म दृष्टी आहे. संघटनाचातुर्य आहे. साहित्याचीही त्यांना आवड आहे. क्वचित लेख लिहितात. त्यामध्ये वर वर्णन केलेले गुण प्रतिबिंबित झालेले दिसतात.

ते एक अनुभवी आणि हुशार राजकीय कार्यकर्ते आहेत. ते भरमसाट आश्वासने देत नाहीत. महाराष्ट्राविषयी त्यांना आस्था आहे. फ्लोरा फाउंटन शिव-स्मारक प्रकरणी त्यांचे राजकीय धाडस मुंबईत दिसून आले. त्यांनी महाराष्ट्र एकवटून काँग्रेसच्या पाठीशी उभा केला. दिल्लीत श्री. केळकर यांच्या द्वारा त्यांच्या माझ्या गाठीभेटी झालेल्या आहेत. आम्ही राजकीय चर्चा कधी केलेली नाही. अद्याप तरी ते महाराष्ट्राचे एकमेव नेते आहेत. भारतीय संस्कृतीत जे जे म्हणून काही चांगले आहे ते ते यशवंतरावांनी आत्मसात केले आहे. पाश्चिमात्य आणि पौर्वात्य विचारांची योग्य सांगड घालून भारताचा उत्कर्ष साधण्याचा त्यांचा अहर्निश प्रयत्न चालू आहे. त्यांच्याबद्दल मला जो नितांत जिव्हाळा वाटतो तो याच कारणामुळे. परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो.

卐 卐 卐



# यशवंत—साहित्यसरोवरातील
# कमल-पुष्पे

या विभागातील सन्माननीय संपादक

* प्रा. ना. सी. फडके, पद्मभूषण, एम. ए., संपादक 'अंजली'
* प्रा. मा. का. देशपांडे, एम. ए., संपादक, 'इंग्रजी-मराठी-शब्दकोश'
* प्रा. स. शं. देसाई, एम. ए., इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ
* श्री. बाळासाहेब पाटील, पद्मश्री, संपादक, 'सत्यवादी'
* श्री. वामनराव सावंत, संपादक, 'लोकमत'
* श्री. विश्वनाथराव वाबळे, संपादक, 'शिवनेर'
* श्री. य. ल. सांबारे, संपादक, 'अनुप्रिता'
* श्री. रामभाऊ जोशी, सहसंपादक 'केसरी'
* श्री. पां. वा. गाडगीळ, माजी संपादक, 'लोकमान्य'
* श्री. ह. रा. महाजनी, संपादक, 'लोकसत्ता'
* श्री. द्वा. भ. कर्णिक, माजी संपादक, 'महाराष्ट्र टाइम्स'
* श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, संपादक, 'तरुण भारत'
* श्री. सदानंद रेगे, एम्. ए.

* * *

# इथे जाहला सुंदर संगम तीन अमोल गुणांचा !

पद्मभूषण प्रा. ना. सी. फडके एम्. ए., संपादक ' अंजली ' पुणे.

संयुक्त महाराष्ट्राचा " मंगल कलश " माननीय यशवंतराव चव्हाण यांनी आणला असं अतिरेकी विधान करणं चुकीचं होईल. एकभाषी संयुक्त महाराष्ट्र राज्य-निर्मितीला पंडित नेहरूंचा विरोध होता ही गोष्ट लपविण्यात अर्थ नाही. पंडित नेहरूंना आपला दुराग्रह सोडावा लागला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला संमती द्यावी लागली, याचं मुख्य श्रेय सामान्य जनतेच्या उग्र चळवळीला, शौर्याला आणि त्यागाला दिलं पाहिजे. द्विभाषिक महाराष्ट्र राज्य आम्हांला पसंत नाही. गुजराथ आणि महाराष्ट्र अशी दोन विभक्त राज्ये करा. आम्हांला एकभाषी महाराष्ट्र राज्य द्या अशी महाराष्ट्रीय जनतेनं सतत जोरदार मागणी केली म्हणूनच स्वतंत्र संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आलं, हे सत्य कुणालाही नाकारता येण्यासारखं नाही. परंतु हे जितकं खरं तितकंच हेही अविवाद्य की, केवळ जनतेच्या चळवळीनं संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आलं नसतं, स्वतंत्र भारताचा कारभार लोकशाहीच्या तत्त्वानुसार चालतो, लोकांना ज्या प्रकारचं शासन हवं असतं त्याप्रकारचं शासन त्यांना मिळविता येतं. जनतेची इच्छा हीच लोकशाहीची अखेरची निर्णायक शक्ती आहे. या साऱ्या गोष्टी बोलायला ठीक आहेत. प्रत्यक्षात वस्तुस्थिती अशी असते की, सामान्य जनता आणि केंद्रीय राजकारणाची सूत्रं ज्यांच्या हाती आहेत ते दिल्लीचे राज्यकर्ते यांच्यात फार मोठं अंतर रहातं. त्या त्या राज्यातल्या लोकांच्या आशा, आकांक्षा, लोकांचं मनोगत यांची खरी ओळख दिल्लीतल्या राज्यकर्त्यांना सहसा नसते. सभा, निदर्शनं, मोर्चे, उपोषणं, क्वचित घातपाताची कृत्यं या प्रकारांना इतक्या ठरीव साच्याचं स्वरूप आलेलं आहे की, त्यावर " बेजबाबदार लोकांची चळवळ " असा छाप मारण्याकडे आणि चळवळ कितीही उग्र असली तरी ती दुर्लक्षित करण्याकडे वरिष्ठ सरकाराचा कल असतो. याचा परिणाम असा होतो की,

जनतेच्या चळवळीला कुशल मुत्सद्दीपणाची जोड मिळाली तरच जे हवं असतं ते मिळतं.

संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतीत असंच घडलं. लोकांच्या मागणीला यशवंतराव चव्हाणांच्या मुत्सद्दीपणाची जोड मिळाली म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश उशीरा का होईना परंतु हस्तगत झाला. द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री या नात्यानं राज्यकारभार करताना जी चतुराई आणि लोककल्याणाची तळमळ यशवंतरावांनी दाखविली तिच्यामुळे ते अत्यंत लोकप्रिय झाले खरे. परंतु लोकांना मनापासून नको असलेल्या द्विभाषिक राज्याला यशवंतरावांनी संमती दिली आणि त्या राज्याच्या मुख्यमंत्रिपदाचा स्वीकार त्यांनी केला, ही गोष्ट जनतेला पसंत नव्हती. यशवंतरावां-विषयीच्या नाराजीचं शल्य जनतेच्या मनात खोल कुठेतरी होतंच. नेहरूंच्या लहरीपणापुढे मान तुकविणारे, सत्तेच्या लोभानं महाराष्ट्रद्रोह करणारे संधिसाधू पुढारी असं यशवंतरावांचं वर्णन त्यांच्या टीकाकारांनी आणि विरोधकांनी केलंही. त्या काळात यशवंतरावांनी जी भूमिका स्वीकारली होती ती खरोखरच अवघड होती. द्विभाषिक राज्याची योजना महाराष्ट्रीय जनतेला जशी पसंत नव्हती तशीच यशवंत-रावांनाही नव्हती. परंतु त्यांनी असा विचार केला असावा की, द्विभाषिक राज्याची योजना किती चुकीची आहे ते ती योजना राबवूनच आपण सिद्ध करू. त्यांच्या या विचाराला पोषक असा एक दाखला काँग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात होता. मंत्रिमंडळ मोडण्यासाठीच मंत्रिमंडळात प्रवेश करण्याचा डाव काँग्रेसचे कार्यकर्ते खेळले होते. द्विभाषिक राज्याचे होणारे दुष्परिणाम केंद्रसरकारला पटविण्याचा उत्तम मार्ग म्हणजे ते राज्य प्रत्यक्ष राबवून दाखवावं अशा हेतूनं यशवंत-राव द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले. विरोधकांनी त्यांच्याविषयी गैरसमज करून घेतले. टीका आणि अप्रियता यशवंतरावांच्या वाट्याला आली. परंतु मनाशी ठरविलेल्या धोरणापासून यशवंतराव विचलित झाले नाहीत. द्विभाषिक राज्याचा कारभार उत्कृष्टपणे त्यांनी चालविला आणि तो चालवीत असताना अशा द्विभाषिक राज्याचे दुष्परिणाम कोणते होतात ते नेहरूंना पटविण्याचं आणि एकभाषी संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्याखेरीज महाराष्ट्रात शांतता आणि सुव्यवस्था नांदणार नाही, याबद्दल नेहरूंची खात्री करण्याचं कामही त्यांनी सतत चालू ठेवलं. यामुळेच अखेर नेहरूंच्या दुराग्रहाची आणि गैरसमजाची भिंत ढासळली. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आला. महाराष्ट्रीय जनतेच्या चळवळीचा हा विजय होता यात शंकाच नाही. परंतु असंही म्हटलं पाहिजे की, यशवंतरावांच्या चतुर मुत्सद्दीपणाचा, दूरदृष्टीचा, खिम्या धोरणाचा आणि आत्मविश्वासाचा हा विजय होता.

एखाद्या अवघड पेचप्रसंगातून मार्ग काढण्याचा आणि समीप आलेला जनतेचा प्रक्षोभ टाळण्याच्या यशवंतरावांच्या कौशल्याचा जेव्हा जेव्हा मी विचार करतो तेव्हा १९५७ सालातील एका प्रसंगाची मला आठवण होते. प्रतापगडावरील शिव-

छत्रपतींच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ पंडित नेहरूंच्या हस्ते होणार होता. हा समारंभ अपूर्व थाटात करण्याचं सरकारनं ठरविलं होतं. उलट या समारंभाचं निमित्त करून पंडितजींच्या आणि यशवंतरावांच्या सरकारच्या निषेधासाठी अभूतपूर्व उग्र निदर्शन करण्याचं संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांनी ठरविलं होतं. या समारंभासाठी लाखो लोक येणार होते. विरोधी निदर्शनासाठीही लाखो लोक जमणार होते. एकंदर वातावरण विलक्षण तंग होऊन गेलं होतं. काही तरी अभद्र, अनिष्ट होणार अशी चिन्हं दिसत होती. यशवंतरावांच्या मुत्सद्दीपणाची कसोटी पाहणारा हा प्रसंग होता. समितीच्या नेत्यांना न दुखविता पंडित नेहरूंच्या प्रयाणाची आणि एकूण समारंभाची योजना अशा धोरणानं आणि चातुर्यानं यशवंतरावांनी आखली की, दोन विरोधी पक्ष एकमेकांसमोर कुठेही येऊच नयेत. या धोरणाचा परिणाम असा झाला की, निषेधाच्या आरोळ्या ठोकण्याचं आणि निदर्शनं करण्याचं समाधान समितीच्या लोकांना मिळालं. समारंभ थाटामाटात आणि अपूर्व उत्साहात पार पडल्याचं समाधान सरकारला झालं. प्रक्षोभाचा स्फोट टळला. प्रतापगडावरील समारंभ म्हणजे यशवंतरावांच्या मुत्सद्दीपणाचा, शांतपणाचा, व्यवहारचातुर्याचा एक मोठा विजय समजला पाहिजे.

चालू शतकातल्या पहिल्या वीस वर्षांत महाराष्ट्राला लोकमान्य टिळकांचे नेतृत्व लाभलं होतं. टिळकांच्या निधनानंतर स्वातंत्र्यचळवळीची सूत्रं गांधीजींच्या हाती गेली. सबंध देशाचं पुढारीपण गांधीजींकडे गेलं आणि त्यांच्या असामान्य व्यक्तित्वापुढे प्रांताप्रांतातले पुढारी खुजे आणि निष्प्रभ वाटू लागले. नेतृत्वाच्या बाबतीत महाराष्ट्रात पोकळी निर्माण झाली. ज्याचा प्रभाव अखिल भारतीय राजकारणात पडावा असा नेता महाराष्ट्रात दिसेनासा झाला. जवळ जवळ पस्तीस वर्षांची ही पोकळी नेतृत्वाच्या क्षितिजावर यशवंतराव चव्हाणांचा उदय झाला तेव्हा भरून निघणार अशी आशा उत्पन्न झाली. द्विभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रिपदावर यशवंतराव आरूढ झाले तेव्हा ही आशा खरी ठरू लागली. महाराष्ट्राला एक प्रभावी नेता मिळाला. यशवंतरावांचं कर्तृत्व अधिकाधिक प्रगट होऊ लागलं आणि त्यांच्या नेतृत्वाला अखिल भारतीय स्वरूप येऊ लागलं. चीननं अकस्मात भारतावर आक्रमण केलं तेव्हा संरक्षणमंत्रिपदावरून कृष्ण मेनन यांना दूर करणं नेहरूंना भागच पडलं. देशाच्या संरक्षणाची जबाबदारी उचलण्यासाठी नेहरूंनी यशवंतराव चव्हाणांना पाचारण केलं. गंमत अशी की, यशवंतराव दिल्लीस पुरते पोचले नव्हते तोच चीननं माघार घेतली. मराठा वीरांच्या घोडदौडीची चाहूल लागल्याबरोबर मुसलमान सैनिक शस्त्र टाकून पळ काढीत असत, अशी एक दंतकथा सांगितली जाते. तसंच काहीसं झालं. “ आले ! यशवंतराव चव्हाण आले ! ” अशी आरोळी ऐकल्याबरोबर जणू चीननं युद्धाचा विचार सोडून दिला आणि समरांगणातून माघार घेतली. संरक्षणमंत्री या नात्यानं चीनशी मुकाबला करण्याची संधीच यशवंतरावांना मिळाली नाही. ती संधी पुढे पाकिस्ताननं कुरापत काढली तेव्हा यशवंतरावांना मिळाली आणि त्या प्रसंगी

यशवंतरावांनी आपलं नेतृत्व आणि कर्तृत्व पूर्णपणे सिद्ध केलंही. केवळ महाराष्ट्राचंच नव्हे तर सबंध देशाचं नेतृत्व करण्याच्या यशवंतरावांच्या पात्रतेवर शिक्कामोर्तब झालं.

१९६० सालच्या डिसेंबर महिन्यात साहित्य गौरवाच्या निमित्तानं मुंबईत माझा सत्कार झाला. समारंभाचं अध्यक्षस्थान यशवंतरावांनी भूषविलं होतं. त्यांचे आभार मानताना मी असं म्हणालो होतो की, " आज महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर असलेले आणि केव्हा ना केव्हातरी भारताचे पंतप्रधान होणार असलेले माननीय यशवंतराव आजच्या या समारंभाचे अध्यक्ष आहेत, याचा मला विशेष आनंद होतो. माझ्या तोंडचे हे शब्द ऐकल्याबरोबर सभेला उपस्थित असलेल्या हजारो श्रोत्यांनी टाळ्यांचा एकच गजर केला होता. कारण जी भावना आणि अपेक्षा मी बोलून दाखविली होती ती सबंध महाराष्ट्रीय जनतेची होती.

यशवंतराव भारताचे पंतप्रधान झालेले पाहावे हे माझं एकट्याचंच नव्हे तर अखिल महाराष्ट्रीयांचं एक प्रिय स्वप्न आहे. ते खरे होईल अगर न होईल. राजकारणाच्या क्षेत्रात निश्चित भविष्य कुणी करू नये ! संस्कृत सुभाषितकारांनी राजकारणाला वेश्येच्या चंचल चेष्टितांची उपमा दिली आहे. ती उगीच नव्हे. तेव्हा भविष्यात काय घडेल ते सांगता येणार नाही. परंतु यशवंतराव आम्हांला किती प्रिय आहेत आणि त्यांच्या कर्तबगारीवर आमचा किती विश्वास आहे ते सांगण्याची एक रीत म्हणून आम्ही असंच म्हणणार की, ते भारताचे पंतप्रधान झालेले आम्ही बघू !

आदर्श राज्यकर्ता कसा असावा याबद्दलची काही विशिष्ट कल्पना डोळ्यांपुढे ठेवून संयुक्त महाराष्ट्राचा कारभार यशवंतरावांनी चालविला. दिल्लीत गेल्यावर प्रथम संरक्षणमंत्री म्हणून आणि आता गृहमंत्री म्हणून जे कार्य यशवंतरावांनी केलं तेही हा आदर्श नजरेसमोर नित्य ठेवूनच, या कारणासाठी ते मला प्रिय आहेत आणि त्यांचा मोठेपणा मी मानतो.

परंतु यशवंतराव मला अधिक प्रिय वाटतात ते साहित्यिक आणि वक्ता या दोन्ही नात्यांनी त्यांचं जे कौतुकास्पद नैपुण्य मला दिसतं त्यामुळे. हजारो लोकांची विराट सभा असो किंवा शे-पाचशे निवडक श्रोत्यांची सभा असो, ती हमखास जिंकण्याचं कौशल्य यशवंतरावांनी कमावलेलं आहे. श्रोत्यांच्या भावनांना आवाहन करण्याचं आणि त्याचप्रमाणे वैचारिक प्रतिपादनानं श्रोत्यांना जिंकण्याचं, दोन्ही प्रकारचं कौशल्य त्यांच्या वक्तृत्वात आढळतं. प्रतिपक्षाला घायाळ करण्याचं चातुर्य ते अनेक वेळा प्रगट करतात. त्यांच्या भाषणाला अवश्य तेवढी विनोदाची झालरही असते. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही की, त्यांचं भाषण अत्यंत प्रमाणबद्ध आणि आटोपशीरही असतं. ते अशाप्रकारे आपलं भाषण संपवितात की, श्रोत्यांना वाटावं यशवंतराव आणखी बोलले असते तर बरं झालं असतं. महाराष्ट्राच्या नामांकित वक्त्यांत यशवंतरावांची गणना अवश्य करावी लागेल.

यशवंतरावांची प्रभावी वाणी जशी स्पृहणीय आहे तसाच त्यांच्या लेखणीचा संचारही कौतुकास्पद आहे. नेता आणि शासनकर्ता अशी जोड भूमिका यशवंतरावांना करावी लागत असल्यामुळे त्यांच्या वाणीचा विलास नित्य होत असतो. त्यामानानं त्यांचं लेखन अधून मधून क्वचितच वाचावयास मिळतं. परंतु जेव्हा जेव्हा ते लेखणी उचलतात तेव्हा तेव्हा अशा काही उत्कृष्ट दर्जाचं साहित्य त्यांची लेखणी निर्माण करून जाते की, वाचक थक्क होऊन जातो. लोकमान्य टिळक नेहमी म्हणत असत की, " मी राजकारणात पडलो तो योगायोगानं, माझा खरा पिंड आहे संशोधकाचा. " यशवंतरावांच्या बाबतीत असाच काहीसा प्रकार घडलेला आहे, असं वाटतं. राजकारण आणि राज्यकारभार यांची धुरा यशवंतरावांनी खांद्यावर घेतली आहे खरी, परंतु त्यांच्या मनाला खरं आकर्षण आहे साहित्याचं नी कलांचं. साहित्यिकांच्या आणि कलावंतांच्या सहवासात ते मनापासून रमलेले दिसतात. मला लिहिलेल्या एका पत्रात ते लिहितात, " आवडीच्या विषयांवरील पुस्तकं जमविणं आणि सवडीनं ती वाचणं हा माझा एक छंद आहे. प्रसंगोपात कुणा संपादकानं विशेष आग्रह केला आणि कामाच्या धकाधकीतून वेळ काढता आला तर एखादा लेख लिहिणं हा त्यांचा दुसरा एक आवडीचा छंद म्हणावा लागेल. मात्र स्वतःचा हा छंद पुरा करण्यासाठी त्यांनी काहीही लिहिलं तरी ते दर्जेदारच असतं. यशवंतरावांचं पडलेलं भाषण जसं कधी कुणी ऐकलेले नाही, त्याचप्रमाणे त्यांचा फसलेला लेख मी कधी वाचलेला नाही. क्वचित प्रसंगी त्यांची लेखनाची पातळी इतक्या उंचीवर गेलेली असते की, ती पाहून मी स्तिमित होतो.

१९६४ साली ' सह्याद्री ' मासिकाच्या दिवाळी अंकात त्यांनी ' शांति-चितेचे भस्म ' या मथळ्याचा जो एक लेख लिहिला तो केवळ अविस्मरणीय म्हणावा लागेल. यशवंतरावांच्या या लेखात भाषेची शैली, विचार-विलसित भावनेचा आवेश इत्यादी अस्सल साहित्य-गुण प्रकर्षानं प्रगट झाले होते. यशवंतराव नुकतेच रशियाला जाऊन आले होते. तिकडून परत येताना कोणती स्मृती आपण सगळ्यात मोलाची म्हणून आणली ते त्यांनी या लेखात सांगितलेले आहे. त्यांचा तो लेख अथपासून इतिपर्यंत सुंदर उतरला होता. व्होल्गा नदीच्या तीरावरील टेकडीवर दुसऱ्या महायुद्धाच्या काळात धारातीर्थी पडलेल्या रशियन जवानाचं जे स्मारक यशवंतरावांनी पाहिलं त्याबद्दलचा हा त्यांचा लेख आहे. या लेखात ते लिहितात...

" व्होल्गाच्या काठावरील स्मारक पाहिलं, आणि स्मारकाविषयीची माझी कल्पनाच साफ बदलून गेली,...एक रशियन माता लेकराला मांडीवर घेऊन बसली आहे. लढाईत कामाला आलेला तो तरणाबांड जवान. त्याच्या अंगावर लष्करी पोषाख आहे. त्याचं तोंड मात्र झाकलेलं आहे. माता त्याला कुरवाळीत आहे. असं हे अगदी साधं दृश्य. त्या मातेच्या चरणाशी जाऊन मी हे सारं न्याहळीत होतो. पण मला तिथे काही आवाज ऐकू आले. कोणी स्फुंदत होते, कोणी कुजबुजत होते,


म. व. बा. वा

कोणी म्हणत होते हा माझा राजहंस, कोणी म्हणत होते हा माझा सखा, बंधू म्हणून कोणी त्याला साद घालीत होते तर वीर पुरुष म्हणून कुणी त्याला वंदन करीत होते. मी दिङ्मूढ झालो तिथे. कारण येथे येणाऱ्या प्रत्येकाची तो कोणीतरी आपलाच आहे अशी भावना होती आणि ते खरं होतं. दुसऱ्या महायुद्धात रशियातल्या घराघरातला कुणी ना कुणी धारातीर्थी पडला आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लाख जीवांची बलिदानं झाली आहेत. मागं उरलेल्या ज्या पिढीला आपला पिता स्मरत नाही, भाऊ आठवत नाही, माता दिसत नाही, पुत्र गवसत नाही, त्या पिढीतील प्रत्येकजण इथे येऊन मूक बातचीत करीत असतो. आणि लेकराला कुरवाळणारी ती माता मूक संदेश देते, " तो रक्ताळलेला चिखल पाहा, आणि हा बाळ पाहा, " तुम्ही माणसं सुखाच्या शोधात नाही असं काहीसं ती म्हणते, मी तिथून परत फिरू लागलो तेव्हा ( ज्यानं हे स्मारक घडविलं ) त्या शूर कलावंतानं मला थांबविलं. माझ्या हातात एक वस्तू देऊन तो म्हणाला, " ही व्होल्गाग्राडची आठवण. रक्तामांसात भिजलेली ही मूठभर माती. मानुष आणि अमानुष याचा सारा इतिहास या मातीत आहे "- शांततेच्या चितेतील ते भस्म ! त्या कलावंताची देणगी मी स्वीकारली आहे. हिमालयात भडकलेल्या चितेतील भस्म माझ्या संग्रही आहे. गिरिजा-शंकराला रोज ताज्या चिताभस्माची पूजा आवडते हे मला माहीत आहे. ' व्होल्गा ' ची ती माती ते शांतिभस्म मी जपून ठेवलं आहे. "

भावनेने ओथंबलेलं, प्रभावी भाषेनं नटलेलं हे लेखन जी लेखणी करू शकते, ती साधीसुधी लेखणी नाही. श्रेष्ठ दर्जाच्या अस्सल साहित्यिकाच्या हातात शोभावी अशीच ती आहे. यशवंतरावांच्या लिखाणाचा आस्वाद जेव्हा जेव्हा मी घेतो तेव्हा तेव्हा माझ्या मनात येतं यशवंतरावांच्या रूपानं महाराष्ट्राला आणि भारताला एक पहिल्या दर्जाचा नेता मिळाला खरा, परंतु त्यांच्यावर पडलेल्या नेतेपणाच्या ओझ्यामुळे यशवंतरावांच्या ठिकाणी जो श्रेष्ठ साहित्यिक आहे त्याचं पूर्ण कर्तृत्व प्रगट होत नाही, ही खेदाची गोष्ट म्हणावी लागेल. असे जरी असले तरी भावी काळात त्यांच्यावरच प्रचंड साहित्य निर्माण होईल याबद्दल मला तिळमात्र शंका नाही.

卐 卐 卐

# संपन्न व्यक्तिमत्व

प्रा. मा. का. देशपांडे, एम. ए., संपादक, इंग्रजी-मराठी शब्दकोश, पुणे.

आज भारताच्या राजधानीत जबरदस्त सामर्थ्याचे जे राजकीय नेते आहेत त्यांत यशवंतराव चव्हाण यांना फार मानाचे स्थान आहे. ही प्रतिष्ठा त्यांनी स्वतःच्या कर्तबगारीवर आणि राजकीय मुत्सद्देगिरीच्या जोरावर मिळविलेली आहे हे उघडच आहे. आज त्यांच्या शब्दाला जो मान आहे तो फारच थोडया पुढाऱ्यांच्या शब्दांना आहे. गरीब कुटुंबात जन्म घेतलेला एक मराठा दिल्लीच्या राजकारणात मोठया वैभवाने चमकत आहे ही बाब महाराष्ट्रीय या नात्याने मला विशेष अभिमानाची वाटते.

महाराष्ट्रात जे राजकारणधुरंधर होऊन गेले त्यांचे एक आदरणीय वैशिष्ट्य असे की, समाजसेवा आणि विद्वत्ता यांचा सुवर्णसंगम त्यांच्या ठायी दिसून येई. चव्हाण हे लोकमान्य टिळकांच्याप्रमाणे गाढे पंडित नसले तरी त्यांचा व्यासंग दांडगा आहे. राजकारणाच्या धकाधकीत त्यांना निवांत वाचनाला भरपूर वेळ मिळत नसला तरी त्यांचे वाचन चौरस आहे हे त्यांची भाषणे तपासून पाहता सहज कळून येते. पण यशवंतरावजी नुसतेच ग्रंथवाचक नाहीत. असंख्य लोक रात्रंदिन ग्रंथ-वाचनात निमग्न असताना आपणाला आढळतात. पण त्यांना स्वतंत्र विचारांची देणगी यथातथाच असते. यशवंतरावांचे वैशिष्ट्य असे की, ते विचारवंत आहेत. प्रत्यक्ष अनुभवातून निश्चित झालेली अशी त्यांची काही मते आहेत. त्यामुळे त्यांची भाषणे ऐकताना काहीतरी नवे खाद्य बुद्धीला लाभल्याचा आल्हाद होतो.

त्यांची वक्तृत्वाची शैली फारच आकर्षक आहे. भरत नाट्यमंदिरात प्रा. ना. सी. फडके यांच्यावर लिहिलेल्या एका टीकाग्रंथाचे प्रकाशन करण्यासाठी ते आले असताना असेच बहारीचे वक्तृत्व त्यांनी केले. प्रा. फडके यांच्या ललित भाषेचे वर्णन त्यांनी फडक्यांच्या उपमांचा उल्लेख करून असे सुंदर थाटात केले की, असले

ललितपूर्ण वक्तृत्व करणारा वक्ता हा राजकारणी आहे हे सांगूनही खरे वाटले नसते. चव्हाणांच्या वक्तृत्वात पांडित्य-प्रदर्शन नसते. पाटावर बसून जेवताना जसे मनमोकळेपणाने बोलावे इतकी सहजता त्यांच्या शैलीत असते. त्यामुळे त्यांची भाषणे ऐकताना एका निपुण कलावंताचे रसाळ वक्तृत्व आपण ऐकत असल्याचा मधुर आभास मनाला होतो.

यशवंतरावांची समाजवादावरील श्रद्धा नकली अगर नाटकी नाही. जर स्वतंत्र भारताला जागतिक राजकारणात मानाचे स्थान मिळवावयाचे असेल तर समाज-वादाचा स्वीकार करण्यावाचून गत्यंतर नाही असे ते नेहमीच सांगत आलेले आहेत. ते राजकारणात शिरले ते केवळ सत्तेच्या अभिलाषेने नव्हे. त्याद्वारे समाजसेवा जास्त सकसपणे करता येईल याची खात्री पटल्यामुळेच ते राजकारणी झाले. ज्या काँग्रेसमध्ये त्यांना आज बडे स्थान आहे ती काँग्रेस गरिबांची सेवा करणारी, शेतकऱ्यांची दुःखे समजावून घेणारी संस्था आहे याची खात्री करून घेतल्यानंतरच ते या संस्थेत शिरले.

पंडित नेहरूंच्या प्रगत विचारसरणीबद्दल त्यांना नेहमी निस्सीम आदर वाटला आहे. म्हणूनच जेव्हा नेहरूंनी आवडी येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात समाजवादाची घोषणा केली तेव्हा चव्हाणांनी त्यांचे सहर्ष स्वागत केले. परवा परवा महामंत्री इंदिरा गांधी यांनी जेव्हा बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची योजना मांडून ती झटपट अंमलात आणली तेव्हा प्रागतिक वृत्तीच्या चव्हाणांनी आनंदाने या योजनेचे स्वागत केले. त्यासाठी त्यांना कमी टीका सहन करावी लागली नाही. तथापि चव्हाण हे तत्त्वनिष्ठ वृत्तीचे असल्यामुळे त्यांनी विरोधकांच्या टीकेला जुमानले नाही. आपणाला दीर्घ चिंतनानंतर जे पटले त्याला चिकटून राहण्याचे धैर्य प्रगट करून आपल्या ध्येय-प्रीतीचे स्वच्छ दर्शन सर्वांना घडविले.

" नेहरूनिष्ठा " हा शब्द वापरून चव्हाणांचा उपहास करणारे विरोधक होऊन गेलेच. पंडित नेहरूंची हांजी हांजी करून चव्हाणांनी मुंबई राज्याचे मुख्य-मंत्रिपद मिळविले असा अपप्रचार त्यांचे राजकीय विरोधक करीत असतात. याला पुरावा काय ? तर सांगली येथील एका जाहीर सभेत त्यांनी केलेले भाषण. या भाषणात चव्हाण म्हणाले होते, " नेहरू की संयुक्त महाराष्ट्र असा माझेसमोर प्रश्न निर्माण झाला तर मी नेहरू असे उत्तर देईन. मी नेहरूनिष्ठ आहे. नेहरू हे महाराष्ट्रापेक्षा मोठे आहेत. "

उथळ विरोधकांच्या हातात हे भाषण म्हणजे चांगले कोलीतच सापडले. नेहरू म्हणजे मोतीलाल नेहरू यांचा मुलगा, ऊर्फ चांगल्या चेहऱ्याचा, तरतरीत नाकाचा, जवाहरलाल नावाचा पंतप्रधानकी करणारा माणूस असा शब्दशः अर्थ विरोधकांनी घेतला. त्याला वर्तमानपत्रांनी साथ दिली आणि चव्हाणांना जहाल टीकेच्या ज्वालेत होरपळून टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु यशवंतरावजींच्यावर हा फार मोठा अन्याय करण्यात आला असे माझे स्वतःचे मत आहे. नेहरू हा शब्द प्रतीक म्हणून त्यांनी

वापरला होता. नेहरू म्हणजे नेहरूंचे तत्त्वज्ञान असे त्यांना म्हणावयाचे होते. नेहरूंचा समाजवाद, त्यांचा विशाल राजकीय दृष्टिकोन, अखंड भारतासाठी त्यांची चालणारी धडपड, त्यांचे पंचशील आणि सर्वोदय या सर्वांना एक सुटसुटीत शब्द म्हणजे नेहरू. नेहरू म्हणजे एक व्यक्ती नसून नेहरूप्रणीत तत्त्वज्ञान असा व्यापक अर्थ लक्षात घेतला पाहिजे.

राजकारण म्हणजे शब्दांचे वरवरचे अर्थ उचलून घेऊन त्या निमित्ताने केलेली हुल्लडबाजी ! या हुल्लडबाजीचा चव्हाणांना एकेकाळी बराच त्रास झाला. संयुक्त महाराष्ट्राविषयी चळवळीच्या त्या दिवसांत काही वृत्त-पत्रांना हा एवढाच विषय चार-सहा महिने शिवीगाळी करण्यासाठी पुरेसा ठरला. महाराष्ट्राचे दुष्मन असाही आहेर त्यांना बहाल करण्यात आला. चव्हाणांच्या मनोधैर्याची ती कसोटी होती. पण चव्हाण या कसोटीतून सन्मानाने आणि ताठ मानेने उत्तीर्ण होऊन बाहेर पडले. विरोधकांचे शिवीगाळीचे घाणेरडे तंत्र न वापरता शांत आणि समंजस रीतीने त्यांनी विरोधकांची समजूत घातली. त्यांच्या चुका त्यांना दाखवून दिल्या. गैरसमजाचे गढूळ वातावरण हळूहळू स्वच्छ झाले. या निमित्ताने जनतेला चव्हाणांच्या एका सुंदर गुणाचे दर्शन घडले. तो गुण म्हणजे विरोधकांशी सभ्य वागणूक. विरोधकांना उत्तर देताना चव्हाण कधी संतापले नाहीत, अगर त्यांनी कधी सभ्यताही सोडली नाही. पंडित नेहरू यांचा स्वभाव बराचसा चिडखोर होता. विरोधकांना उत्तर देताना प्रसंगी ते फार संतापत. चव्हाण हे नेहरूनिष्ठ खरे, पण त्यांनी नेहरूंचे फक्त गुणच उचलून घेतले. विरोधकांना जो मानाने वागवितो, शास्त्रशुद्ध विवेचन करून जो त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करतो तोच खरा सुसंस्कृत माणूस. चव्हाणांची सुसंस्कृतता या दृष्टीने निरपवाद आहे.

त्यांचे मनमोकळे हास्य तपासून पाहा. त्यांच्यात कर्तबगार माणसाचे सारे चांगले गुण प्रगट झालेले दिसतील. त्यांच्या मनाचे सौंदर्य त्यात स्वच्छपणे दिसून येईल. गांधींजींसारखे त्यांचे हास्य त्यांच्या अमृतमय अंतःकरणाची ग्वाही देईल. पंडितजींसारखे त्यांचे कोवळे हास्य त्यांच्या उमद्या रसिकतेची साक्ष देईल. यशवंतरावांच्या यापुढील वादळी आयुष्यात हे गोड हास्य त्यांच्या ओठावर सदैव फुलत राहो अशी सदिच्छा व्यक्त करतो.

卐 卐 卐

# राष्ट्रधुरीण राज्यकर्ता

प्रा. स. शं. देसाई, अध्यक्ष, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

१९६२ च्या ऑक्टोबरमध्ये चीनने भारतावर नेफा भागातून स्वारी केली. या आक्रमणाचा बीमोड करण्यासाठी पाठविलेल्या भारतीय सैन्याची पूर्णपणे वाताहत झाली. आपला सपशेल पराभव झाला व आपल्याला माघार घ्यावी लागली. भारतीय सैन्य हे जगातील एक उत्तम दर्जाचे सैन्य असूनही चीनने केलेला मोठा पराभव हा आपल्या सैन्याच्या प्रतिष्ठेला गेलेला तडाच होता. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने प्रथम श्रेणीचे राष्ट्र म्हणून मिळविलेला लौकिक पार धुळीला मिळाला. हा आघात पंडित नेहरूंना सहन झाला नाही. त्यांच्या पंचशील तत्त्वज्ञानाचा पूर्ण बोजवारा वाजल्याने ते संभ्रमात पडले. काय करावे हे त्यांना कळेना. अशा बिकट प्रसंगी त्यांना महाराष्ट्र आठवला. त्यांनी संरक्षण खात्याची सूत्रे हाती घेण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांना पाचारण केले. परंतु यशवंतराव दिल्लीत जाऊन स्थिरस्थावर होतात न होतात तोच चिन्यांनी एकतर्फी युद्धबंदी करून युद्ध थांबविले.

या मोठ्या पराभवाचा कलंक धुऊन काढण्यासाठी सैन्याची व्यवस्थित पुनर्घटना करणे आवश्यक होते. या दृष्टीनें यशवंतराव कंबर कसून कामास लागले. मराठा हा युद्धांना आणि लष्करी पराभवांना भीत नाही. कारण इतिहासकाळात महाराष्ट्रानें मोठे लष्करी पराभव पचविले आहेत. मोठे विजयही संपादन केले आहेत. त्यामुळे शत्रूशी लढताना चिवटपणा व धीर सोडता कामा नये, हे मराठी माणसाला पक्के ठाऊक झाले आहे. महाराष्ट्राच्या लष्करी परंपरेचा बाणा यशवंतराव चव्हाण यांच्या अंगी पुरेपूर उतरला असल्याने एखाद्या कसलेल्या अनुभवी सैनिकाप्रमाणे त्यांनी भारताच्या संरक्षण खात्याच्या पुनर्घटनेचे काम हाती घेतले.

युद्ध–शास्त्राची फारशी माहिती नसताना देखील त्यांनी त्या शास्त्रावरील अनेक ग्रंथांचे पारायण केले. त्यांनी मुरब्बी व तज्ज्ञ अशा लष्करी सल्लागारांचे एक

मंडळ बनविले. त्यांचे सल्ले घेऊन त्याप्रमाणे सैन्याची रचना करण्यास सुरुवात केली. अशा प्रकारे प्रदीर्घ व्यासंगाने, चिकाटीने, आत्मविश्वासाने अवघ्या दोनच महिन्यांत भारतीय सैन्याच्या पुनर्घटनेचे कार्य करून दाखविले. नवनवीन शस्त्रास्त्रांचे कारखाने काढले. दारूगोळ्यांचे कारखाने अहोरात्र काम करू लागले. आपल्या देशात जी प्रभावी शस्त्रे तयार होत नाहीत अशी शस्त्रे परदेशातून आयात केली. डोंगरी युद्धात पहाडी लष्करी तुकड्या अत्यंत आवश्यक असल्याने तशा तुकड्या तयार करण्याचा आदेश लष्करी अधिकाऱ्यांना दिला. चीनच्या युद्धामुळे भारतीय सैन्याने गमावलेले नैतिक धैर्य पुन्हा प्रस्थापित करण्याचे काम यशवंतरावांच्या प्रभावी नेतृत्वामुळेच झाले. यशवंतराव जवानांमध्ये व अधिकाऱ्यांमध्ये फार लोकप्रिय झाले. कारण ते स्वतः शेतकरी कुटुंबातून आले असल्याने भारतीय सैन्यात भरती होणाऱ्या बहुसंख्य जवानांची सुखदुःखे व अडीअडचणी त्यांना माहीत होत्या. स्वतंत्र भारताला असा एकच संरक्षणमंत्री लाभला की, जो सैन्यामध्ये बहुसंख्य जवानांना आपल्याच हाडा-मांसाचा वाटत होता. लष्करी अधिकाऱ्यांनाही हे संरक्षणमंत्री दुजे वाटत नव्हते. कारण ते सर्वांत मिळून मिसळून वागत होते. संरक्षण खात्यातील वशिलेबाजीने माजलेला सावळा गोंधळ बराच कमी करून असंतुष्ट आणि भ्रमनिरास झालेल्या अधिकाऱ्यांच्या तक्रारी कमी करून त्यांना कार्यप्रवण करण्याची कामगिरी यशवंतरावांना करावी लागली. अधिकाऱ्यांचे मनोदौर्बल्य व विफलता दूर होऊन देशप्रेमाने व कर्तव्य-बुद्धीने ते काम करू लागले.

भारताला पुन्हा ताठ मानेने वावरण्याची संधी १९६५ मध्ये पाकिस्तानने आणून दिली. गनिमी युद्धाचे शिक्षण घेतलेले पाकिस्तानी घातपाती हल्लेखोर काश्मिरी देशभक्तांचा बहाणा करून काश्मिरमध्ये घुसू लागले. त्यांनी सगळीकडे घातपाती व दहशतीची कृत्ये करून काश्मीरी जनतेत गोंधळ व घबराट उडविण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती भयंकर गंभीर होती. या पाकिस्तानी सैनिकांचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. त्यावेळचे प्रधानमंत्री श्री. लालबहादूर शास्त्री यांना संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण जाऊन भेटले. त्यांनी शास्त्रींना सांगितले की, "आता काश्मीर गमावणे किंवा पाकिस्तानवर हल्ला करणे हे दोनच पर्याय आपल्यापुढे आहेत !" त्याप्रमाणे पाकिस्तानवर स्वारी करण्याच्या हुकुमावर पंतप्रधानांनी मध्यरात्री सही केली. पाकिस्तानने पश्चिम पंजाबमधून जम्मूवर स्वारी करताच भारताच्या फौजा दुसऱ्या बाजूने पाकिस्तानात घुसल्या ! पाकिस्तानास हा डाव अनपेक्षित होता. अमेरिकेचे पॅटन रणगाडे व जेट विमाने भारतीय सेनेच्या क्रोधाच्या हुंकारात दग्ध होऊन गेली. या अपूर्व पराक्रमाने सर्व जग थक्क झाले ! पाकिस्तान तर भयंकर हादरले ! मग भारताला दमदाटी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण भारत अशा धमक्यांच्या पलीकडे गेला आहे, हे त्यांना उमगले. भारतीय सेना लाहोरपर्यंत घुसल्या ! १९६२ चा पराभव पार धुऊन काढला ! या देदीप्यमान पराक्रमाला संरक्षणमंत्री

यशवंतराव चव्हाण यांचे कुशल धुरिणत्व कारणीभूत झाले हेही जगाला कळून चुकले.

भारतीय सैन्य हा पराक्रम कसा करू शकले हे पाहण्यासाठी अमेरिका व युरोपमधील अनेक मुत्सद्दी येऊन गेले. भारतीय सैन्याची एवढी अफाट प्रगती करण्याचा असा पराक्रम जगाच्या इतिहासात सर विन्स्टन चर्चिलनंतर चव्हाणांशिवाय अन्य कुणी युद्धमंत्र्याने केला नसेल असे त्यांना वाटले असावे. भारतीय संरक्षण खात्यात चव्हाणांनी अल्पावधीत विस्मयकारक सुधारणा केल्या आहेत. भारतीय सैन्याची संख्या चारवरून अकरा लक्षांवर गेली आहे. त्या खात्याची कार्यक्षमताही प्रचंड आहे. नेफा व लडाखमध्ये सुमारे पाच हजार मैल लांबीचे रस्ते संरक्षण-खात्याने अवघ्या चारपाच वर्षांत तयार केले आहेत ! हेच काम चीनला करण्यास दहा वर्षे लागली ! यावरून यशवंतराव चव्हाण यांच्या कामाचा उरक केवढा दांडगा आहे याची कल्पना येते. या अफाट प्रगतीची प्रशंसा अमेरिकेचे माजी संरक्षण मंत्री श्री० मॅकमारा यांनी त्यांच्या अहवालात केली आहे. असे प्रचंड कार्य करणारा कुशाग्र बुद्धिमत्तेचा कष्टाळू नेता देशास लाभला हे देशाचे भाग्य म्हटले पाहिजे.

गोवधबंदीच्या प्रश्नावर गृहमंत्री गुलजारीलाल नंदा यांनी राजीनामा दिल्याने खंबीर वृत्तीचे श्री. यशवंतराव चव्हाण यांना गृहमंत्री करण्यात आले. भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व देऊन त्यांनी गोवधबंदीचा प्रश्न अशा कौशल्याने हाताळला की, त्यांच्या मुत्सद्देगिरीची सर्वांनीच तारीफ केली. याप्रमाणे गृहमंत्रीपदावरून केंद्रीय कर्मचाऱ्यांचा व दिल्ली पोलिसांचा संप त्यांनी असाच खंबीरपणे मोडून काढला. परंतु ते मनाने हुकूमशाही वृत्तीचे नसल्यामुळे व गरिबांविषयी त्यांना कळकळ असल्याने त्यांनी अटक केलेल्या कर्मचाऱ्यांना व पोलिसांना मुक्त करून गंभीर गुन्हे न केलेल्यांना पुन्हा कामावर घेतले. ह्या दयाबुद्धीमुळे सर्वच त्यांना दुवा देऊ लागले. एका बाजूने शिस्तीचा बडगा दाखविणारा व दुसऱ्या बाजूने त्या बडग्याखाली गेलेल्या कर्मचाऱ्यांची बायकामुले उघड्यावर पडतील म्हणून कळवळून त्यांना माफ करणारा गृहमंत्री हा पहिलाच असेल ! या धोरणामुळे त्यांचा राज्यकारभारात दबदबा व वचक निर्माण होऊन श्रेष्ठ दर्जाचा मुत्सद्दी म्हणून त्यांची कीर्ती जगभर पसरली.

आज देशात सामान्यांतून वर आलेले थोर नेते हाताच्या बोटावर मोजण्याइतके सुद्धा नाहीत. त्यात पुन्हा यशवंतरावांसारखा नेता मिळणे कठीण ! सुदैवाची गोष्ट ही की, त्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानात वर्गविग्रहाला थारा नसल्याने व सगळ्यांच्या कल्याणाची तळमळ त्यांना असल्याने समाजाच्या सर्वच थरांतील माणसे त्यांच्याकडे आशेने बघतात ! आजचे व उद्याचे राष्ट्रधुरीण यशवंतराव म्हणजे भारताचे महान मानवरत्न आहे. त्यांना परमेश्वर दीर्घायुषी करून भारतमातेची अधिक सेवा करण्यास सामर्थ्य देवो, हीच परमेश्वरचरणी प्रार्थना.

卐 卐 卐

# खंदा मुत्सद्दी पुरुष

पद्मश्री श्री. बाळासाहेब पाटील, संपादक, " दैनिक सत्यवादी " कोल्हापूर.

भारताचे कर्तबगार गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे लाडके नेते नामदार यशवंतराव चव्हाण यांचे कर्तृत्व, थोरपण व नेतृत्व हे त्यांनी स्वतः कष्टपूर्वक मिळविलेले आहे. काही लोक उपजत थोर असतात. पण ते भाग्य त्यांच्या वाट्याला आले नाही. तसेच त्यांच्यावर मोठेपणा लादलेला नाही. अगदी हायस्कूलमधील विद्यार्थी दशेपासून त्यांनी अपार कष्ट सोसले आहेत. " जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण " हे संत वचन त्यांच्या बाबतीत अगदी तंतोतंत खरे आहे.

व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाल्यावर नामदार चव्हाण यांनी राजकीय जीवनातील एकेक पाऊल पुढे टाकण्यास सुरुवात केली. कॅाँग्रेसचा स्वातंत्र्यलढा, बेचाळीसचे आंदोलन यात त्यांनी जो हिरीरीने पुढाकार घेतला, त्यामुळे सातारा जिल्हा त्यांच्या उद्योन्मुख तरुण नेतृत्वाकडे आशेने व विश्वासाने पाहू लागला. जिल्हा कॅाँग्रेसचे नेतृत्व त्यांच्याकडे चालून आले आणि प्रांतिक कॅाँग्रेसच्या नेतृत्वातही त्यांना स्थान द्यावे लागले. देशभक्ती व स्वातंत्र्यप्रेम, त्याग, स्वातंत्र्याला लोकशाहीचा व समाजवादाचा आशय, महात्मा गांधी व पंडित नेहरू यांच्यावर निष्ठा यामुळे नामदार चव्हाण यांचे कर्तृत्व एकेक पायरी वर चढू लागले. १९४६ साली त्यावेळच्या मुंबई असेंब्लीवर ते मुख्यमंत्र्यांचे पार्लमेंटरी सेक्रेटरी झाल्यापासून त्यांच्या कर्तृत्वाला व नेतृत्वाला नवी दिशा मिळाली. ते १९५२ मध्ये प्रथम मुंबई राज्याचे मंत्री झाले आणि नोव्हेंबर १९५६ मध्ये विशाल मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांच्या नेतृत्वाचे नवे पान उघडले गेले.

संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते असूनही कॅाँग्रेस व पंडित नेहरू यांच्यावरील निष्ठेमुळे कसल्या लोकक्षोभाला त्यांनी तोंड दिले याची आता लोकांना फारशी आठवण राहिलेली नसेल. पण ते दिव्य नामदार चव्हाण यांनी केले आणि त्यातून

त्यांचे नेतृत्व तावून सुलाखून बाहेर पडले. विशाल मुंबई राज्याची धुरा वाहताना मुंबईतील व्यापारी व उद्योगपती यांचा त्यांनी निःपक्षपातीपणामुळे विश्वास संपादन केला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेस त्यांची संमती मिळविली. त्यामुळे महाराष्ट्र व गुजरात ही गुण्यागोविंदाने विभक्त झाली. या घडामोडीत नामदार चव्हाण यांच्या मुत्सद्दीपणामुळे पंडित नेहरू मोहित झाले आणि त्यांच्या कर्तृत्वाची पंतप्रधानांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली.

सामान्य शेतकऱ्याचा मुलगा संधी मिळाल्यास स्वतःच्या कर्तृत्वाने किती महत्पदास पोहचू शकतो, याचे नामदार चव्हाण हे उत्तम उदाहरण ठरले. त्यामुळे जनतेला तर ते अतिशय प्रिय झालेच शिवाय सर्व थरांतही त्यांच्याबद्दल आदरभाव निर्माण झाला. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वेळी त्यांनी जी आश्वासने दिली, त्यामुळे देशातही त्यांच्याबद्दलचा विश्वास वाढला आणि अपेक्षाही निर्माण झाल्या. राष्ट्राच्या संरक्षणाची जबाबदारी पंडित नेहरूंनी नामदार चव्हाण यांच्यावर सोपविली. त्यांनी लगेच संरक्षणाची व फौजांची पुनर्रचना केली आणि पाच वर्षांत चीनला चांगलाच धडा शिकविण्यास समर्थ असे देशाचे सामर्थ्य वाढवून दाखविले.

पाकिस्तानशी झालेल्या १९६५ च्या युद्धात तर भारतीय जवानांनी शत्रूला त्याच्या मुलखात पिटाळून लावले आणि भारताचा लष्करी सामर्थ्याचा दबदबा पुन्हा निर्माण झाला. पंडित नेहरू व लालबहादूर शास्त्री यांच्याशी एकनिष्ठ राहून त्यांनी जे कर्तृत्व दाखविले त्यामुळे पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधीनीही गृहमंत्रिपद रिकामे झाल्यावर ते नामदार चव्हाण यांच्यावरच सोपविले. देशातील कायदा, सुव्यवस्था व स्वास्थ्य सांभाळण्याची केवढी खडतर व अवघड जबाबदारी गेल्या अडीच वर्षांत नामदार चव्हाण यांनी पार पाडली. सरदार पटेल व पंडित पंत यांच्यानंतर गृहमंत्रिपद तसे पोरके झाले होते. ते नामदार चव्हाण यांनी अतिशय समर्थ बनविले.

बऱ्याच राज्यात काँग्रेसविरोधी मंत्रिमंडळे, काँग्रेसश्रेष्ठीतही हेवेदावे व भांडणे वगैरे अनेक कारणांमुळे दिल्लीत काम करणे अत्यंत बिकट असताही नामदार चव्हाण एकेक संकटावर मात करीत चालले आहेत. देशाला अशावेळी त्यांच्या तोलाचा गृहमंत्री लाभला हे खरोखरच सुदैव म्हटले पाहिजे. त्यांचे हे वर्धिष्णू कर्तृत्व व नेत्रदीपक नेतृत्व पाहून महाराष्ट्राला तर आनंद, अभिमान व धन्यता वाटते. दिल्लीत वरिष्ठ नेत्याविरुद्ध अनेक कारवाया चालत असतात. पण नामदार चव्हाण त्यांना धीराने तोंड देत आहेत. त्यांच्या या कर्तृत्वाचा आधार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच त्यांच्यावरील जनतेच्या विश्वासात व पाठिंब्यात आहे. नामदार चव्हाण यांचे भले चिंतून जनता आपलेच भले पाहात आहे.

卐 卐 卐

# आगळे व्यक्तिमत्व !

श्री. वामनराव सावंत, संपादक, 'लोकमत', बेळगाव.

भारताचे गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते श्री. यशवंतराव चव्हाण हे एक अखिल भारतीय कीर्तीचे पुढारी आहेत. त्या क्षेत्रातील त्यांचे स्थानही बरेच वरच्या दर्जाचे आहे. राजकीय क्षेत्रातील बहुधा सर्वच वादळे त्यांना स्पर्श करून गेली आहेत. काही वादळांमध्ये ते स्वतः सापडले आहेत. परंतु त्यामधून ते सहीसलामत बाहेर पडले आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे कटू प्रसंग टाळण्याची त्यांची प्रवृत्ती ! सहसा कटू प्रसंग निर्माण होऊ नयेत याची ते फार दक्षता घेतात. आपला मुद्दा इतरांना पटवून देण्याची कला त्यांना चांगली अवगत झाली आहे आणि म्हणूनच ते राजकारणामध्ये यशस्वी झाले असल्याचे दिसून येते. त्यांची जाहीर व खासगी स्वरूपाची भाषणे या त्यांच्या प्रवृत्तींची द्योतक आहेत. त्यांची जाहीर सभांतील व्याख्याने मूलग्राही, उद्बोधक व नवनव्या विचारांनी ओथंबलेली असतात. त्यांमधून त्यांचे व्यक्ति-वैशिष्ट्य व संशोधक वृत्ती दिसून येते. सुशिक्षित आणि अशिक्षित श्रोत्यांना ती सारखीच आकर्षून घेतात व आपण काहीतरी नवे विचारधन आपल्या संग्रही जमा केले असे श्रोत्यांना वाटल्याखेरीज राहात नाही. तसेच त्यांची भाषणे ऐकत असताना एक आगळी भावना आपल्या मनामध्ये निर्माण झाल्याखेरीज राहात नाही. याला मुख्य कारण म्हणजे त्यांनी परिश्रमपूर्वक विकसित केलेले स्वतःचे व्यक्तिमत्त्व होय. त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा महाराष्ट्रातील विद्वानांपासून तो शेतकऱ्यांपर्यंत सर्वांवर उमटविला आहे. महाराष्ट्रातील काही काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांच्या पेहरावाची सहीसही नक्कल करण्यास प्रारंभ केल्याचे आढळून येते. तसेच काही कार्यकर्त्यांनी त्यांच्या वक्तृत्वाची ढब उचलण्याचा प्रयत्न चालविला आहे. मात्र त्यांची सर्वंकष विचारसरणी फारशी कुणी आत्मसात करण्याचा प्रयत्न चालविला असल्याचे आढळून येत नाही.

श्री. यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या वक्तृत्व कलेला पोषक ठरले आहे. प्रसंगाला अनुरूप अशी परिणामकारक भाषणे करण्याची कला त्यांनी साध्य केली आहे. श्रोत्यांची मनें प्रसन्न होतील अशा भाषेत ते बोलतात, व त्यांची ही चित्तवेधक वक्तृत्वशैली ऐकणाऱ्यांना एक आगळा आनंद देऊ शकते. व्यावसायिक परिषदांच्या उद्‌घाटनप्रसंगी झालेली त्यांची भाषणेही विचारप्रवर्तक वाटतात. यावरून त्यांची वक्तृत्वकला विशिष्ट विषय असला तरच खुलते अशातील भाग नाही, यामुळे तिला कोणताही प्रसंग आणि विषय सहजसुगम असा वाटतो. सर्वांना ही कला साध्य होऊ शकेल असे नाही. एखाद्या पूर्वनियोजित विषयावर वक्तृत्व खुलविणे वेगळे आणि बहुविध विषयांवर विचारपरिप्लुत व परिणामकारक वक्तृत्व गाजविणे वेगळे ! राजकारणात यशस्वी व्हायला ही कला त्यांना उपयोगी पडली आहे. राजकीय क्षेत्रात प्रकर्षाने चमकायला याखेरीज आणखी काही गुण व्यक्तीच्या ठिकाणी असावे लागतात हा भाग वेगळा !

श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वावर स्वर्गीय पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विचारसरणीची छाप पडली असल्याचे दिसून येते. पंडित नेहरू यांनी आपल्या हयातीमध्ये आपले व्यक्तिमत्व इतके उंचावले की, ते शेवटी आंतरराष्ट्रीय पातळीवर गेले. पण त्याही व्यक्तिमत्त्वाचे काही अनिष्ट परिणाम देशावर घडून आले. त्यामुळे देशाच्या काही भागांत व केंद्र सरकारातही खालच्या पातळीवर माजलेल्या गोंधळाची यथार्थ कल्पना त्यांना शेवटपर्यंत येऊ शकली नाही. अशीच काहीशी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. सर्वसामान्य जनतेच्या हिताआड येणाऱ्या प्रवृत्ती विशिष्ट गटामध्ये बळावत चालल्या आहेत. त्यांना पायबंद घालण्याचे धाडस श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाने केले पाहिजे. आपले नव्या दिल्लीतील आसन अढळ राहावे हे धोरण ठीक आहे. पण त्यापायी महाराष्ट्राच्या राजकारणात प्रतिगामी शक्तींना वाव मिळत जावा हे केव्हाही अनिष्टच !

महाराष्ट्रालाच काय पण साऱ्या देशाला निर्भिडपणाने सुयोग्य मार्गदर्शन केले जाण्याची सद्यःपरिस्थितीत अत्यंत निकड आहे. या महत्त्वाच्या कार्यातील सिंहाचा वाटा अजून त्यांना उचलावयाचा आहे. हे अत्यंत अवघड कार्य करीत असताना त्यांनी नेहमीच आपल्या आवडीचा समन्वय साधण्याचा सिद्धांत पुढे केल्यास त्यांना त्यांच्या कार्यात अपेक्षित यश मिळण्याची शक्यता कमी दिसते. देशातील भिन्नभिन्न विचारसरणीच्या गटांना सदासर्वकाळ संतुष्ट ठेवणे कठीण असते. श्री. यशवंतरावांचे नव्या दिल्लीतील स्थान अढळ राहावयाचे झाल्यास, महाराष्ट्राची नाडी त्यांच्या मुठीत असणे अपरिहार्य आहे. याचाच अर्थ असा की, आज महाराष्ट्रात जे विशिष्ट व स्वार्थी गट आपले लोकावरील वर्चस्व अबाधित राहावे म्हणून धडपड करीत आहेत, त्यांना बाजूला सारून जरूर पडल्यास राज्यपातळीवर नव्या नेतृत्वाचा त्यांनी उदय घडवून आणला पाहिजे. देशात अथवा एखाद्या प्रांतामध्ये समाज-

वादाची दिंडी निघत असताना तीत भाग घेणारे कोण भले आहेत ते पाहण्याची ताकद वरिष्ठ नेतृत्वामध्ये असली पाहिजे. याचाच अर्थ असा की, ते नेतृत्व डोळस, खंबीर व दूरदृष्टीचे असले पाहिजे. ही कठोर भविष्यकाळाची मागणी नसून, वर्तमान काळही अशा निर्भय नेतृत्वाचा भुकेला बनला आहे हे स्पष्ट सांगण्याची आज गरज निर्माण झाली आहे.

नजीकच्या काळात देशाला सामुदायिक नेतृत्वाची गरज भासेल असा एकंदरीत रागरंग दिसत आहे व अशा प्रकारचे नेतृत्व यशस्वी ठरण्याची बरीच शक्यता दिसून येत असल्यामुळे, या बदलत्या परिस्थितीत एखाद्या व्यक्तीचे केवळ असामान्य व्यक्तिमत्त्व देशाच्या दृष्टीने अपुरे पडेल असे वाटते. कारण खऱ्या लोकशाहीच्या जमान्यात एका व्यक्तीचे सतत स्तोम माजविणे आणि तिच्या भोवताली अद्वितीयतेचे तेजोवलय निर्माण करणे हे शेवटी हानिकारक ठरेल. या संदर्भात श्री. यशवंतराव चव्हाण यांनी जे आपले व्यक्तिमत्त्व दीर्घकाळच्या प्रयत्नाने विकसिक केले आहे, ते खुरटून जावे अशी कुणाचीच इच्छा असणार नाही. त्याकरिता कुणाचीही अशीच अपेक्षा राहील की, त्यांच्या अचूक मार्गदर्शनामुळे हिंदी जनता प्रभावित व्हावी व तिच्यामध्ये नवा भारत निर्माण करण्याची जिद्द यावी यातच त्यांच्या नेतृत्वाचा खरा गौरव आहे. काळाने दिलेले हे आव्हान ते समर्थपणे पार पाडतील अशी आपण आशा करू या.

卐 卐 卐

# व्यक्ती नव्हे शक्ती

श्री. विश्वनाथराव वाबळे, संपादक, " शिवनेर " मुंबई.

संयुक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावर यशवंतरावांचा मुंबईत सत्कार झाला त्यावेळीं ते आपले हृद्गत प्रगट करताना म्हणाले, " महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या थोर नेत्यांच्या सामाजिक चळवळीच्या मंथनातून बाहेर पडलेले बहुजनसमाजाचे नेतृत्व आज आपण प्रत्यक्ष पाहात आहोत. माझे मुख्यमंत्रिपद हे त्याचेच प्रतीक असल्याचे मी समजतो." ही गोष्ट जशी चव्हाणांनी ओळखली होती, तशी जनतेनेही ओळखली होती. म्हणूनच अनेक आपत्तींच्या काळीं केवळ बहुसंख्यांक सामान्य जनतेच्या भक्तीमुळेच ते टिकाव धरू शकले.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतही केवळ बहुजनसमाजाच्या पाठिंब्यामुळे चव्हाणांचा टिकाव लागला. याचे कारण त्यांचे वैयक्तिक मोठेपण नसून सामान्य जनतेचा त्यांच्या-वरील विश्वास हेच होते. मराठेशाहीनंतर दीडशे वर्षांनी आपला माणूस राज्यावर आल्याचे अपार समाधान जनतेला होत होते. या समाधानातून " महाराष्ट्राचे नवे शिवाजी आमचे लाडके यशवंतरावजी " ही घोषणा उगम पावली. खुद्द चव्हाणांनी जरी या तुलनेला विरोध केला व विरोधी पक्षांनी या घोषणेची थट्टा केली तरी जनतेची भावना मात्र कोणी दडपून टाकू शकणार नाही. १९५७ च्या विजयादशमीस परळ येथे झालेल्या विराट सत्कार समारंभात त्यांनी " पोलिसांच्या कमीतकमी बळावर आपण आपले राज्य चालवू " हा निर्धार व्यक्त केला, त्यावेळीं बहुजनसमाज एकमुखाने यशवंतरावांच्या पाठीशी उभा असल्याचा साक्षात्कार विरोधकांना झाला.

श्री. शिवाजीमहाराजांचा पुतळा पंडित नेहरूंच्या हस्ते उभरण्याच्या वेळीं याचे दुसरे प्रत्यंतर प्रतापगडावर दिसून आले. " पंडित नेहरूंना आमच्या प्रेतावरून जावे लागेल " अशा शब्दांत संयुक्त महाराष्ट्र समितीच्या लोकांनी विरोध केला.

याला टोला म्हणून " अफझलखानाच्या कबरी शेजारी समितीची कबर बांधण्याचा " निर्धार शंकरराव मोऱ्यांच्या मुखातून बाहेर पडला. अटीतटीचा सामना होणार असे चिन्ह दिसू लागले. पण सामान्य जनतेनं आपला कौल चव्हाणांच्या बाजूने देऊन समितीचा प्रचंड पराभव केला.

चव्हाणांना विरोध करण्यासाठी पांढरपेशा पुढाऱ्यांनी एकजूट केली. जनतेचं राज्य हिसकावून घेण्यासाठी या पांढरपेशा मंडळींची ही आघाडी आहे असा बहुजन-समाजाचा समज झाला. उच्चवर्णीय सुशिक्षितांनी हे राज्य मराठा की मराठी हा वाद उकरून काढला. तेव्हा यशवंतराव चव्हाणांनी " हे राज्य तमाम जनतेचं आहे. कोण्या एका धर्मासाठी, जातीसाठी स्वराज्य मिळविण्याचे प्रयत्न गांधी-नेहरूंनी केले नाही तर पन्नास कोटी जनतेसाठी केले " असे समर्पक उत्तर देऊन त्यांची तोंडे बंद केली. इतकेच नव्हे तर महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद सोडून श्री. कन्नमवारांना त्यांनी मुख्य-मंत्री केले. कन्नमवार गेल्यावर श्री. वसंतराव नाईक यांनाच मुख्यमंत्री करून बोले तैसा चाले हा आदर्श ठेवला. हाच चव्हाणांच्या बहुजन सुखाय व बहुजन हिताय अशा राष्ट्रवादी दृष्टिकोनाचा पुरावा होय.

शिवाजीमहाराज, महात्मा फुले, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू ही त्यांची दैवते आहेत. यांना साक्ष ठेवून त्यांनी खेड्यापाड्यांतील सामान्य जनते-पर्यंत समतेचा झेंडा फडकवला. लोकशाहीतील लोकराज्याची सत्ता खेड्यापाड्यांत पोहोचविली. यशवंतराव चव्हाणांचा सामाजिक व राजकीय पिंड म्हणजे महात्मा ज्योतिराव फुल्यांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत चाललेल्या चळवळींची पूर्तता आहे. यामुळे यशवंतराव ही एक व्यक्ती राहिली नसून सामान्य जनांची ती एक शक्ती झाली आहे. या शक्तीची नवी नीती केवळ महाराष्ट्राला नव्हे तर अखिल भारतालाही पोषक ठरत असल्याचा साक्षात्कार होत असल्यास नवल ते काय ?

卐 卐 卐


# सामान्यातील असामान्यत्व

श्री. य. ल. सांबारे, संपादक ' अनुप्रिता ' मुंबई.


काही माणसे त्यांच्या उच्च, नामवंत, श्रीमंत व प्रतिष्ठित घराण्यामुळे जन्मतःच मोठेपणा प्राप्त करून घेतात. तथापि काही माणसे स्वकर्तृत्वाने मोठेपणा प्राप्त करून घेतात. महाराष्ट्राचे लाडके, झुंजार, अष्टपैलू नेते व केंद्रीय गृहमंत्री नामदार श्री. यशवंतराव चव्हाण हे स्वकर्तृत्वाने मोठे झाल्यांपैकी एक आहेत. त्यांनी जरी आपले राजकीय कार्य दोन तपांपेक्षाही अधिक केलेले असले तरी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यावरच त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले.

१ नोव्हेंबर १९५६ रोजी द्विभाषिक राज्याचे बिल लोकसभेने मान्य केल्यावर यशवंतरावांनी विशाल मुंबई द्विभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची अधिकारसूत्रे हातात घेतली. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या विचाराने जनता मात्र प्रक्षुब्ध झाली होती. " यशवंतराव हे महाराष्ट्राचे विरोधक आहेत. " असा प्रचार त्यांच्या विरोधकांनी चालविला. इतकेच नव्हे तर " सूर्याजी पिसाळ, महाराष्ट्र-द्रोही " अशा शेलक्या उपमा देण्यासही सुरुवात केली. ही परिस्थिती फारच बिकट होती. राज्याचा गाडा चालविणे अवघड होते. यशवंतरावांनी मनाचा तोल न जाऊ देता महा मुंबई राज्याचा दौरा काढून या राज्याचा प्रचारच केला. १९५७ च्या निवडणुकीच्या धामधुमीतही सत्तेवरून खाली खेचण्याचे प्रयत्न चालू असतानासुद्धा त्यांनी याच घोषणेचा प्रसार प्रखर विरोधास न जुमानता केला.

निवडणूक झाली आणि संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाने महाराष्ट्रात काँग्रेसचे अनेक थोर महारथी पडून चांगलाच पराभव झाला. परंतु आपल्या कऱ्हाड मतदार संघातून मात्र कोणत्याही मोठ्या काँग्रेस पुढाऱ्याची मदत न घेता, संयुक्त महाराष्ट्र समितीचा प्रखर विरोध असताना प्रचंड बहुमताने ते निवडून आले. पुन्हा मुख्यमंत्री म्हणून विराजमान झाले. त्यांच्या त्यागाची, सचोटीची, त्यांच्या नेतृत्वावर



कुठे चालले हे धारकरी ? समाजवादाची आद्य पंढरी रशिया, इकडे तर हे वारकरी चालले नाहीत ना ?




रशियन नेत्यांची आणि सैनिकांची मानवंदना स्वीकारणारा भारतीय महापुरुष.





मानवी स्वातंत्र्याचा उद्गाता, समाजवादाचा प्रणेता,
लोकनेता लेनिन यांच्या ऐतिहासिक पुतळ्यासमीप रशियन नेत्यांच्या समवेत
संरक्षणमंत्री यशवंतराव व सौभाग्यवती वेणुताई.




राष्ट्रपतींच्या समवेत कसले विचारमंथन चालू आहे ? हे दोन महान मुत्सद्दी कोणत्या समस्यांची उकल करीत आहेत ?




युरोपीय मुत्सद्याला सुद्धा तोंडात बोट घालावयास लावणारा हाच तो भारतीय मुत्सद्दी पुरुष.



राजकीय आणि शैक्षणिक परिसरातील वायु-वेगाने वाहणाऱ्या या विचारगंगा
जेव्हा समाज-जीवन सागरास मिळतात !




शिक्षण, समाजकारण आणि राजकारण ही भिन्न असूच शकत नाहीत.




संसदीय नेतृत्वाचा अजब नमुना. भल्याभल्यांशी दोन हात करून
आपल्या वाक्पटुत्वाने अजिंक्य ठरलेला राज्यकार्य धुरंधर.



आकाशवाणीवरून हे नवसमाज जागरण चालले आहे.




सामान्य वक्ता, ख्यातनाम पंडित आणि गाढा अभ्यासू म्हणून आपणास सारा भारतवर्ष ओळखतो.



यशस्वी राजकारणाची केवढी ही पूर्वतयारी! ग्रंथवाचनाची केवढी ही लालसा!
उगीच का सरस्वती जिभेवर नाचते आहे!



सरदार वल्लभभाई पटेल, पंडित गोविंदवल्लभ पंत यांची धुरा आता खांद्यावर घेतली आहे.



भारतीय नौदलाच्या " विक्रांत " नौकायनीचे जलावतरण करताना
हे लक्ष्मीनारायण भारताचे अखंड सौभाग्यच चिंतीत आहेत.

असलेल्या विश्वासाची जनतेने त्यांना पोच-पावतीच दिली होती !

संयुक्त महाराष्ट्राच्या भावनेने जनता मात्र स्वस्थ बसली नव्हती. तिच्या भावना चेतविल्या गेल्या होत्या. राजकीय कारणासाठी द्विभाषिक राज्य-योजना जरी आवश्यक असली तरी राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने हा प्रयत्न संपूर्ण फसला होता. जनतेच्या तीव्र भावना लक्षात घेऊन यशवंतरावांनी या द्विभाषिक राज्याचा फेरविचार होण्यासाठी पंडित नेहरू, गोविंद वल्लभपंत व मोरारजी देसाई यांच्याजवळ मागणी केली व ती लगेच मान्य झाली. १० सप्टेंबर १९५९ रोजी एकभाषिक महाराष्ट्र राज्य स्थापन करण्याचे सर्वाधिकार महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने यशवंतरावांना दिले. यशवंतराव चव्हाणांच्या व संयुक्त महाराष्ट्र समितीच्या भगीरथ प्रयत्नास यश येऊन पंडित नेहरूंनी मुंबईच्या जाहीर सभेत १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्याचे जाहीर केले. अर्थात यशवंतरावच पुन्हा मुख्यमंत्री झाले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतानाच २० ऑक्टोबर १९६२ रोजी "भाई-भाई" म्हणविणाऱ्या चीनने भारतावर आक्रमण केले. घोला, तावांग इ. महत्त्वाची ठाणी देखील घेतली ! भारताचा मोठा पराभव झाला ! व्ही. के. कृष्ण मेनन हे संरक्षणमंत्री म्हणून वादग्रस्त ठरले आणि याचा परिणाम म्हणजे त्यांना राजीनामा द्यावा लागून नेहरूंनी तो ७ नोव्हेंबर १९६२ ला स्वीकारला. आता संरक्षणमंत्री कोणास नेमावे असा प्रश्न नेहरूंना पडला. पण अत्यंत खंबीर, कुशल व संरक्षणमंत्रि-पदास योग्य अशी एकच व्यक्ती नेहरूंना दिसली. ती म्हणजे यशवंतराव चव्हाण ! पण योगायोगाने चव्हाणांनी ज्या दिवशी संरक्षणमंत्रिपदाची शपथ घेतली त्याच दिवशी चीनने युद्धबंदी जाहीर केली. संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांची कामगिरी सुपरिचित आहेच !

आज यशवंतराव चव्हाण भारताचे गृहमंत्री आहेत. एका सामान्य शेतकऱ्याच्या घरात जन्म घेऊन अंगी असलेल्या असामान्य कर्तृत्वाने, कर्तबगारीने, ध्येयवादाने प्रेरित होऊन ते आज उच्चपद भूषवीत आहेत. लोकशाही राज्यात काय घडू शकते हे त्यांनी दाखविले आहे. अशा सर्वमान्य राष्ट्रनेत्याकडून आज सर्व भारतीयांच्या अनेक आशा-आकांक्षा आहेत. यशवंतराव त्या पूर्ण करतील अशी आशा आहे. या उर्वरित कार्यासाठी परमेश्वराने त्यांना दीर्घायुष्य द्यावे अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो !

卐 卐 卐

# घट्ट ओठांचा निग्रही नेता

श्री. रामभाऊ जोशी सहसंपादक, ' केसरी ', पुणे.

सैल ओठानं बोलण्यापेक्षा घट्ट ओठानं, पण ठामपणानं काम करण्याचा गुण कुशल आणि कर्तृत्ववान नेत्याच्या ठिकाणीच असू शकतो असं कुठंतरी वाचल्याचं स्मरतं. ' मितभाषी ' असणं हा माणसाचा—विशेषतः कर्तृत्ववान माणसाचा—मोठा गुण मानण्याची प्रथा आहे. किंबहुना या गुणाची गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी ' बोलेल तो करेल काय ' असे वाक्संप्रदायही पूर्वजांनी रूढ करून ठेवले आहेत. बोलण्यासारखे खूप असतानाही न बोलता ज्यांनी फक्त मोठं काम केलं त्यांच्याबद्दल आदर बाळगण्याची म्हणूनच सर्वत्र प्रथा असली पाहिजे.

पण हे झालं पूर्वीच्या जमान्यातलं. जग जिंकावयास निघालेला नेपोलियन हा प्रचंड सभांतून तासन्‌तास भाषणे करीत असे असा उल्लेख क्वचितच आढळेल. छत्रपती शिवाजीमहाराज हे तर म्हणे नजरेनंच बोलत असत. नजरेच्या जरबेत त्यांचं हिंदवी स्वराज्य होतं. तुफान वक्तव्य न करताही हजारो मावळ्यांना त्यांच्या कृतीतून संदेश मिळत राहिला. अगदी अलीकडे अलीकडे, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात विन्स्टन चर्चिल यांनी तर आपल्या बोलण्याची खूण उजव्या हाताची उभी दोन बोटे हीच ठेवली होती. त्या ' व्ही'च्या मूक संदेशाने हजारो योद्धे समरांगणा-वर कृतीने बोलू लागलेले आढळले. समर्थ रामदासांनी ' वाचाळता व्यर्थ आहे.' असे स्पष्टच म्हणून ठेवले. सूत्रबद्ध बोलणं, वागणं आणि करणं ही मुत्सद्दीपणाची लक्षणं त्या जमान्याला मान्य असली पाहिजेत. त्या जमान्यानं तशी ती पाळली पण आज......

आज आहे लोकशाही जमाना. सैल ओठानं बोलणं आणि हवं ते, हवं तसं करणं हा आजचा युगधर्म. या काळात घट्ट ओठानं आणि धारदार नजरेनं बोलणं—वागणं कसं रुचणार. प्रसंग निवडणुकीचा असो, नियोजनाचा असो नाहीतर युद्धाचा

असो; बोलणे, बोलणे आणि बोलणे हीच लोकशाहीची इतिकर्तव्यता !

भारत-पाकितान युद्धाच्या वेळचा प्रसंग. सगळा देश ( म्हणजे तथाकथित पुढारी ) बोलत होता, गर्जत होता. बोलण्याचा उठाव दिशादिशांतून होत होता. बोलण्यासाठी मुठी आवळल्या जात होत्या. शत्रूचा शाब्दिक चेंदामेंदा करणारी काव्ये म्हणण्यासाठी मुठी आवळल्या जात होत्या. ठराव गाजत होते. सभा आरोळ्या देत होत्या. सीमेवरील संगिनींच्या कानठळ्यांनी धास्तावलेली मनें शब्दाने भारावून टाकण्याचा प्रचंड उद्योग देशाच्या कानाकोपऱ्यात सुरू होता.

माझे मनही त्यावेळी भारावले आणि त्या भारावलेल्या मनानेच एक दिवस दिल्लीत पोहोचलो. दिल्लीच्या वाटेवर असताना दोन मूर्ती माझ्यासमोर सारख्या उभ्या होत्या. महामंत्री लालबहाद्दूर शास्त्री आणि संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण. सारा देश बोलत असताना हे दोघे नेते त्या धुमश्चक्रीच्या काळात कमीत कमी बोलत आहेत हे माझ्या लोकशाही मनाला एकसारखे खटकत होते. ते जेवढे केवढे बोलत होते त्यामधून निर्धाराचे, कणखरपणाचे दर्शन घडे. पण तरीही या लोकशाहीत काही तरी मला उणीव भासत होती.

मी दिल्लीत पोहोचलो त्याआधी दोनतीन दिवसच युद्धविराम झाला होता. पाकिस्तानच्या प्रदेशावर भारताने कब्जा करून विजयाचा झेंडा तेथे रोवला होता. धास्ती संपली होती आणि विजयोत्सव सुरू झाले होते. सभेतल्या गर्जना बदलल्या होत्या. जो तो बोलत होता, गर्जत होता. विजयाच्या स्पष्टीकरणासाठी, जवानांच्या गुणवर्णनासाठी हजारो शब्द खर्ची पडत होते. देशात सर्वत्र शब्दांचे पूर वाहू लागले होते आणि तरीही हे दोघे नेते घट्ट ओठानेच काम करीत राहिले होते.

माझा हा अनुभव मला नवीन नव्हता. यशवंतराव महाराष्ट्रात वावरले ते अशीच विवेकाची चूळ तोंडात ठेवून, आज देशात वावरत आहेत तेही विवेकानं. यशवंतराव पुष्कळ सांगतात, पुष्कळ त्यांना सांगायचंही असतं. पण त्यात पाल्हाळ नसतो, हा नेहमीचाच अनुभव आहे. देशातल्या प्रत्येक समस्येबद्दल त्यांची मतं ठाम आहेत. पण अधिकात अधिक अर्ध्या तासाच्या भाषणात ते ती सांगून मोकळे होतात.

यशवंतराव लोकशाहीचे कट्टे पुरस्कर्ते आणि प्रभावी समर्थक आहेत. पण खोल पाण्यात न शिरता लोकशाहीची व्याख्या सांगताना ते मुक्त मराठीत एवढेच म्हणतील की, सर्व भयांपासून मुक्त असा समाज निर्माण होणं, वैयक्तिक विकासाला पूर्ण वाव असणं आणि जीवनमूल्ये जतन केली जाणं म्हणजेच लोकशाही. त्यांच्या काही ठाम मतांपैकी एक मत असं आहे की, ' इतिहासाची पुनरावृत्ती होईल तर मानवाचा पुन्हा माकड होईल. ' मनुष्य एकसारखा पुढे जात आहे. वाढतो आहे. वैचारिक प्रगती सतत चालू आहे. नदी एकसारखी वाढते तशी. समुद्रावर रागावून

नदी कधी परत फिरली आहे काय ? मग इतिहासाची पुनरावृत्ती ती काय होणार ?

शेती, पंचायती राज्य, औद्योगिक क्रांती, जातीयवाद, राष्ट्रीय एकात्मता, आणि पक्षोपपक्षांचे राजकारण यासंबंधीही यशवंतराव यांची स्वच्छ आणि सुस्पष्ट अशी मतं आहेत. संपूर्ण भारत समोर ठेवून ते आपले विचार व्यक्त करताना आढळतात. लोकशाही समाजवाद आणि राष्ट्रीय एकात्मता याबाबत प्रसंगी ते आग्रही भूमिकाही स्वीकारतात. पण कुठेही आपल्या भूमिकेला अतिरेकी स्वरूप येणार नाही याचीही काळजी घेतात. तसे ते मध्यममार्गी आहेत. पण हे पटविण्यासाठी लांबलचक बोलणे तर राहोच पण एखाद्या प्रश्नासंबंधी इतरांप्रमाणे आपलेही काही मत प्रदर्शित करण्याची त्यांची घाई नसते आणि त्यामुळेच त्यांचे एखाद्या घटनेसंबंधीचे मत अजमावून घेण्यासंबंधीची उत्कंठा कित्येक वेळा शिगेला पोहोचलेली आढळते.

सदासर्वकाळ राजकीय जीवनातील चढावरून, प्रलोभनांना पाठीवर बांधून धिमेपणाने धावण्यात यशवंतरावांची सत्तावन्न वर्षे निघून गेली. या चढावरील अनेक वळणे, खाचखळगे आणि टप्पे त्यांनी ओलांडले. पण विवेक सुटू दिला नाही. त्यांचे अर्थपूर्ण मौन, त्यांचा मितभाषीपणा, अनेकांच्या मनात संशयाचे काहूर माजवतो, टीकेला प्रवृत्त करतो, अनेक राजकीय संकटे त्यांच्या अंगणात आणून उभी करतो, पण ओठ घट्ट ठेवून प्रत्यक्ष कृतीला त्यांचा जेव्हा प्रारंभ होतो त्या वेळीं त्यांची प्रतिमा अधिकच सतेज बनते.

ऊन-पावसाचा हा खेळ यशवंतरावांच्या जीवनात अव्याहत सुरू आहे. प्रश्न आहे त्याचा अर्थ समजून घेण्याचा !

卐 卐 卐

# मजबूत नेतृत्व

श्री. पां. वा. गाडगीळ, संपादक " लोकमान्य " मुंबई.

महाराष्ट्र विधान परिषदेसाठी महाराष्ट्र कॉंग्रेसनें सात उमेदवार उभे केले आणि ते सातही निवडून आले. तसेच बुलढाणा मतदारसंघातर्फे लोकसभेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत जुन्या कॉंग्रेसचा पराभव करून महाराष्ट्र कॉंग्रेसने श्री. वाय. एस. महाजन यांना प्रचंड बहुमतानें निवडून आणले. हे विजय यावेळी ऐतिहासिक महत्त्वाचे ठरणार आहेत.

महाराष्ट्रातील सर्व कॉंग्रेसविरोधी पक्षांनी बेळगावचे निमित्त करून यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांचे नेतृत्व उखडून काढण्याचा चंग गेल्या काही महिन्यांत मोठ्या निर्धारानें बांधला आहे. त्याला बुलढाणा निवडणुकीत महाराष्ट्र कॉंग्रेसचा पराभव झाला असता तर अचानक यश आले असते. त्यामुळे महाराष्ट्राला बेळगाव मिळाला असता असे नव्हे. पण उंच झाडाच्या उंच फांदीवर बसलेल्या एका मूर्खाला खाली उतरता येईना म्हणून त्याने फांदी तोडण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याची जी दशा झाली ती महाराष्ट्रातील सर्वच पक्षांची झाली असती. अनेकांच्या लक्षात एक गोष्ट येत नाही ती ही की, यशवंतराव चव्हाणांकडे महाराष्ट्र कॉंग्रेसचे नेतृत्व असणे आणि त्यांनी महाराष्ट्र कॉंग्रेसच्या पाठिंब्यावर दिल्लीत मंत्रिमंडळात असणे ही गोष्ट महाराष्ट्र कॉंग्रेसच्याच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्राच्या हिताची आहे.

दिल्लीत मंत्रिमंडळात जाऊनही ज्यांनी महाराष्ट्रात आपला पाठिंबा टिकविला. महाराष्ट्राच्या दैनंदिन प्रश्नांत आपले लक्ष कायम ठेवले आणि महाराष्ट्राची प्रतिष्ठा दिल्लीत वाढवली — या तीनही गोष्टी एकट्याने करणारे यशवंतराव चव्हाण हे पहिलेच महाराष्ट्रीय पुढारी आहेत. आर्थिक दृष्ट्या महाराष्ट्र मागासलेला आहे आणि म्हणून अंतर्गत राजकीय तेढी महाराष्ट्रास परवडणार नाहीत, याची

पूर्ण जाण असलेले व ती सतत मनाशी बाळगून गेली कित्येक वर्षे वागत आलेले यशवंतराव हेच पहिले महाराष्ट्रीय पुढारी आहेत. संयुक्त महाराष्ट्र समितीने महाराष्ट्र राज्य मिळविले पण त्या समितीला सर्वमान्य असा पुढारी मिळविता न आल्याने महाराष्ट्रात बजबजपुरी माजण्याचा धोका उद्‌भवला होता. चव्हाणांनी त्यावेळी महाराष्ट्र काँग्रेस संघटित करून व राज्यसत्ता हाती घेऊन महाराष्ट्रातील बजबजपुरी टाळली. विरोधी पक्षाशी कमीत कमी विरोधाने व जास्तीत जास्त सलोख्याने यशवंतराव वागत आले आहेत. काँग्रेस पक्षातील एकोपा अत्यंत अडचणीच्या काळात चव्हाणांनी जितका टिकविला तितका दुसऱ्या कोणालाही टिकवता आला नाही. निंबाळकर वगैरेंबद्दल चव्हाणांनी गैरवाजवी आपुलकी दाखवली. पण काँग्रेस-मधील एकोपा टिकविण्यासाठी अशा काही गोष्टी आवश्यक होत्या. यशवंतरावांनी थोडाफार अन्याय केला असावा अशा पुढाऱ्यांनीही त्यांना मानले आहे. येथे एक उदाहरण देतो :

खानदेशातील एक जुने पुढारी ज्यांना आपली चव्हाणांनी उपेक्षा केली असे वाटत होते ते एकदा भाऊसाहेब हिरे यांच्याकडे गेले. द्विभाषिक महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात भाऊसाहेब हिरे यांना चव्हाणांनी घेतले नव्हते; त्यानंतरची ही घटना आहे. सदर खानदेशी पुढारी भाऊसाहेबांना म्हणाले, " तुम्हा-आम्हांला यशवंतराव बाजूला सारतात. आपण एकजूट होऊन त्यांना शह देऊ. " त्यावर भाऊसाहेबांनी जे उत्तर दिले ते फार महत्त्वाचे होते. १९६२ च्या निवडणूक तयारीसाठी महाबळेश्वरला भरलेल्या महाराष्ट्र काँग्रेसच्या शिबिरात मी व भाऊसाहेब हिरे एकत्र राहिलो होतो त्यावेळी भाऊसाहेबांनी मला ही कथा स्वतः सांगितलेली आहे. भाऊसाहेब म्हणाले, " मी त्या पुढाऱ्याला म्हटले की, बाबारे बहुजन समाजातून एक पुढारी वर येतो आहे. आपल्या कर्तबगारीने त्याने लोकप्रियता मिळवली आहे. सर्वांच्याच महत्त्वाकांक्षा पूर्ण करणे त्याला शक्य होणार नाही. पण महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने व काँग्रेस वरिष्ठांशी निष्ठा कायम ठेवून हा पुढारी प्रत्येक पाऊल टाकतो आहे. गेल्या चार वर्षांचा तरी हा अनुभव माझ्या लक्षात आला आहे. त्याच्या पुढारीपणाला आव्हान देण्याचे धाडस न करता त्यांना जरूर तेवढे सहकार्य मी देत राहीन. "

हिरे यांनी मला सांगितलेल्या या कथेत हिरे यांच्या मनाची थोरवी जशी दिसून येते त्याप्रमाणे यशवंतरावांच्या मुत्सद्देगिरीबद्दल खात्री पटण्यासारखा पुरावाही मिळतो. यशवंतरावांनी आपल्या नेतृत्वाच्या सर्व अमदानीत मुंबईस असताना व दिल्लीसही असताना महाराष्ट्राचे आर्थिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील एकोपा यास सतत महत्त्व दिले आहे. हिरे यांच्या ठिकाणी असलेला उमदेपणा निंबाळकरांच्या ठिकाणी नसल्यामुळे निंबाळकरांनी चव्हाणांचा विश्वासघात केला तरीही चव्हाण डगमगले नाहीत. पण बुलढाण्याची निवडणूक ही एक अडचणीची जागा होती.

राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीच्या वेळेपासून काँग्रेसमध्ये जी दुफळी पडली ती टाळण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न चव्हाणांनी केला. त्यात त्यांना यश आले असते तर ते इतिहासातले थोर मुत्सद्दी ठरले असते. पण त्यांना अपयश आल्यामुळे दुटप्पी-पणाचा दोष त्यांच्यावर आला. महाराष्ट्र काँग्रेसमध्येच त्यांच्याविरुद्ध डावपेची राजकारण सुरू झाले. जिथे सत्तालोभासाठी अथवा स्वार्थासाठी माणसे राजकारणात घुसतात तिथे अशा सर्व घुसाऱ्यांचे समाधान करणे अशक्य असते. आणि मग ज्याचे समाधान होत नाही तो शिंग उगारतो. असे लोक चव्हाणांच्याविरुद्ध गेल्या जुलैपासून कारस्थान करीत होते. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रातील एकोप्याच्या दृष्टीने ज्यांची आर्जवे केली असे स. का. पाटील इत्यादी लोक चव्हाणांच्याविरुद्ध उलटले व महाराष्ट्र काँग्रेसमधील घरभेद्यांना हाताशी धरण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे चव्हाणांच्या पायाखालच्या विटा सरकल्या असा प्रचार सुरू झाला. बुलढाण्यास महाराष्ट्र काँग्रेसचा पराभव झाला असता तर चव्हाणांच्या पायाखालचा बुरूज कोसळून चव्हाणांचा कडेलोट झाला असाच प्रचार झाला असता. ते संकट टळले इतकेच नव्हे तर चव्हाणांचे नेतृत्व खुंटा हलवून व पुन्हा ठोकून बळकट करावा त्याप्रमाणे बळकट झाले असून ज्यांनी घरभेदेपणा केला त्यांचे परभारे कपाळ फुटले आहे.

चव्हाणांना नेतृत्वाचा ताम्रपट दिला आहे अथवा द्यावा असे माझे म्हणणे नाही. पण चव्हाणांच्या कारकीर्दीत व त्यांच्याच नेतृत्वगुणामुळे महाराष्ट्रातील दर जिल्ह्यात नवकर्तृत्वाची तरुण माणसे पुढे येत आहेत. महाराष्ट्रात राजकीय क्षितिजा-वर जी स्पर्धा दिसते ती अशुभ नसून नव्या कर्तृत्वाच्या स्फुरणाची द्योतक आहे. अशा नवतरुणांतील कोणीतरी पुढे येऊन चव्हाणांच्या नेतृत्वास राजकीय सत्ताबाजीने नव्हे तर आर्थिक उत्कर्ष साधण्याच्या प्रयत्नाने आव्हान देईल व नेतृत्व मिळवील तर त्यावेळीं नेतृत्व बदलेलही. महाराष्ट्रात जिल्हा परिषदांसाठी ज्यावेळी प्रत्यक्ष निवडणुकीचे धोरण अवलंबण्यात आले त्यावेळी तसेच सहकारी चळवळीचा पाया सुधारण्याचे प्रयत्न करीत असता नवे नेतृत्व पुढे येऊन जुन्या नेतृत्वाला आव्हान देऊ शकेल अशी परिस्थिती चव्हाणांनी स्वतः निर्माण केली आहे. बेळगावसारख्या प्रश्नावर नेत्यांची उलथापालथ करण्याचा अविचार कोणत्याही पक्षाने करू नये. अंतर्गत आर्थिक प्रश्न आणि राष्ट्रीय एकोपा अशासारख्या प्रश्नांवर नवे नेतृत्व पुढे आले पाहिजे. बुलढाण्याच्या निवडणुकीत महाराष्ट्र काँग्रेसचा प्रचंड विजय झाला आणि चव्हाणांचे नेतृत्व मजबूत असल्याचे निर्विवादपणे सिद्ध झाले ही गोष्ट मला फार महत्त्वाची वाटते.

卐 卐 卐

# महाराष्ट्रातील बुद्धिशक्ती

श्री. ह. रा. महाजनी, संपादक " लोकसत्ता " मुंबई.

संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन ही भारतीय इतिहासात नमूद करण्यासारखी घटना आहे. आता महाराष्ट्र राज्य झाल्याने आंदोलनाचा धुरळा खाली बसला आहे. किमान अल्पसंख्य विचारवंत तरी डोके शांत ठेवून विचार करू शकतील. या आंदोलनात जे घडले ते सारे महाराष्ट्र बुद्धिवादी असल्याचे लक्षण समजावे काय ? मला तसे वाटत नाही. पाणी ढवळल्यानंतर तळाचा गाळ वरती यावा तशा सर्व अपप्रवृत्ती वरती आल्या. असहिष्णुतेने परिसीमा गाठली होती. या प्रकारात विवेकाला कोठे स्थान होते ? आणि हे सारे महाराष्ट्रनिष्ठेने चालले होते काय ? नाव नको. प्रत्येक पक्षाला आपली पोळी भाजून घेण्याची नामी संधी प्राप्त झाली होती. ज्यांना राष्ट्रनिष्ठेचेही वावडे ते क्षणात महाराष्ट्रनिष्ठ बनले. कशासाठी ? तर मतासाठी ! लोकांच्या प्रामाणिक श्रद्धेचा आणि भावनेचा दुरुपयोग करून घेण्याचा एवढा प्रयोग महाराष्ट्राच्या इतिहासात यापूर्वी कधी झाला नसेल. महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्या-नंतर हे पितळ आता उघडे पडले आहे. लोकांना आता स्पष्ट दिसले की, अखेर महाराष्ट्रनिष्ठा हे एक पांघरूण होते. म्हणजे महाराष्ट्र बुद्धिवादी आहे या विधानाला अर्वाचीन इतिहासाचा पोषक आधार मिळत नाही.

या अराजकातून सुराज्य निर्माण करण्याच्या प्रयत्नात ना. यशवंतराव चव्हाण यांना थोडेबहुत यश लाभले याबद्दल त्यांना धन्यवाद. आंदोलनात त्यांची खरी कसोटी लागली. लोकमताच्या प्रवाहाविरुद्ध जाण्याला विचाराचेच बळ असावे लागते. आपल्या वैचारिक भूमिकेवर ठाम श्रद्धा असल्याखेरीज हे बळ अंगी येत नाही या दिव्यातून पार पडल्यानंतर महाद्विभाषिकाचे सतीचे वाण पत्करणे ही दुसरी कसोटी होती. त्या कसोटीलाही ना. यशवंतराव पक्के उतरले. कारण महाद्विभाषिक राबवीत असताना त्यांनी दोन गोष्टी केल्या. त्यामध्ये त्यांच्या अंगी असलेले विचारप्राधान्य

आणि मुत्सद्देगिरी हे दोन गुण प्रकर्षाने प्रगट झाले. एक, लोकमताचे वास्तव स्वरूप त्यांनी कधीही दृष्टीआड केले नाही. त्याला तुच्छ लेखले नाही किंवा त्याचे फाजील लाड केले नाहीत. लोकमत विरोधी आहे हे सत्य ओळखणे ही बुद्धिवादाची पहिली पायरी. पण ते विरोधी आहे म्हणून बदलून घेण्याची खटपट करावयाची नाही असा याचा अर्थ नाही. द्विभाषिक राबवणे याचा अर्थ लोकमत बदलण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणे असा होता. यापुढची पायरी म्हणजे असा प्रयत्न करूनही लोकमत बदलले नाही तर आपला प्रयत्न अयशस्वी झाला अशी प्रांजल कबुली देणे. स्वपक्षातील सर्वश्रेष्ठ नेत्यांना आपले स्पष्ट मत सांगण्यालाही तितकेच धैर्य असावे लागते.

ना. यशवंतरावांनी द्विभाषिकाचा कारभार पाहताना दुसरी चांगली गोष्ट ही केली की, त्यांनी विरोधकांच्या विरोधाची नांगीच मोडून काढली. खरे सांगायचे तर लोकमत–लोकमत असा जो ओरडा केला जातो, ते वास्तविक असते अल्पसंख्य ओरडयाचे मत. या अल्पसंख्यांना आरडाओरड करण्यास संधी दिली नाही की, लोकमताचे वास्तव स्वरूप कळू लागते. आणि या कार्यात ना. यशवंतरावजींच्या अंगच्या गुणांचा खरा आविष्कार दिसून आला. आंदोलनानंतर झालेल्या निवडणुकीत मिळालेल्या भरघोस यशाने विरोधकांच्या डोळ्यावरही यशाचा कैफ चढल्यासारखा झाला होता. ना. यशवंतराव झाले तरी मागच्याची री ओढणार आणि मग आपले चांगलेच फावणार या अपेक्षेने विरोधक खुषीत होते. द्विभाषिक राबविताना महाराष्ट्रावर अन्याय होणार ही अपेक्षाही त्यांनी सफल होऊ दिली नाही. कारण द्विभाषिक राबविण्याचे वचन दिले याचा अर्थ त्या द्विभाषिकातील काही विशिष्ट गटांना राजी राखण्याचे वचन दिले असा कधीच नव्हता. जे दोन समाज एकत्र आले त्यांना धारवाडी काटयाने न्याय देणे हाच द्विभाषिक राबविण्याचा वास्तव अर्थ होता. विरोधक त्याविषयी अवास्तव अपेक्षा बाळगून त्या अर्थाचा अनर्थ करता येईल की काय याची वाट पाहातच होते. तशी संधी न देण्याच्या कामी ना. यशवंतरावांनी अभूतपूर्व यश मिळविले. ना. यशवंतरावांनी घेतलेल्या ठाम बुद्धिवादी भूमिकेचा हा महान विजय आहे. पण त्याचबरोबर ते एक सतीचे वाण आहे. महाराष्ट्र राज्य निर्माण करण्याचे कार्य तर मोठेच. पण त्या महाराष्ट्राचा एकसंध विकास करून राष्ट्रीय कोंदणांत त्याला योग्य स्थान प्राप्त करून देण्याचे कार्य त्याहीपेक्षा मोठे आहे. पूर्वीचे विरोधक आताचे भक्त बनले. फार चांगली गोष्ट झाली. पण हे यश जसे चमकणारे तसेच डोळ्यांपुढे अंधार निर्माण करणारे असे असते. ज्या धिमे-पणाने त्यांनी पूर्वी पावले टाकली, ज्या सौजन्याने त्यांनी विरोध शमविला आणि ज्या दृढबुद्धीने त्यांनी भावना विचाराच्या काबूत राखल्या, त्या सर्व सद्‌गुणांची आता खरी कसोटी आहे. या सलग महाराष्ट्रात भावनात्मक ऐक्य निर्माण करून आणि महाराष्ट्रातील बुद्धिशक्ती विधायक कार्यास जुंपून, अखिल देशाच्या राजकीय जीवनात महाराष्ट्र एक मान्यवर व मातबर घटक बनविण्याच्या कार्यात ना. यशवंतराव चव्हाण यांना सुयश लाभावे, अशी सदिच्छा मी या प्रसंगी व्यक्त करतो. 卐 卐 卐

# दिल्लीतील महाराष्ट्राचा मान

श्री. द्रा. भ. कर्णिक; संपादक, " महाराष्ट्र टाइम्स् " मुंबई.

प्रादेशिक मुख्य मंत्रिपद हे मानाचे तसेच सत्ता गाजविण्याचे एक प्रमुख स्थान आहे. प्रदेश राज्यात कोठे दंगल झाली, जुल्मजबरदस्ती झाली, दंडुकेशाहीचे थैमान माजले तरी सार्वभौम संसदेला सहज रीतीने त्यात हस्तक्षेप करता येत नाही. संसदेने हा विषय चर्चेला काढला तर, सभापती लगेच आपला निर्णय देऊन मोकळे होतात की, ' हा प्रदेश–राज्याच्या कायद्याचा व सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. त्या राज्याच्या स्वायत्ततेत मी आपल्याला ढवळाढवळ करू देणार नाही. ' केंद्रीय मंत्रिमंडळ व काँग्रेस श्रेष्ठी यांनीही साधारणपणे असा संकेत घालून दिला आहे की, प्रदेश राज्यातील विधानसभा पक्षाने निवडून दिलेल्या नेत्याच्या म्हणजेच प्रदेश-मुख्य मंत्र्याच्या मार्गात शक्यतोवर कोणतेही अडथळे आणू नयेत. त्या दृष्टीने प्रादेशिक मुख्यमंत्री हा दिल्लीच्या दृष्टीने एक जबाबदार कारभारी व काँग्रेसच्या दृष्टीने एक विश्वासू सुभेदार असतो. हा कारभारी सुभेदार स्वायत्त खरा. पण त्याच्या स्वायत्ततेला लोकसत्तावादी घटनेच्या जशा मर्यादा पडलेल्या असतात त्याचप्रमाणे पक्षीय संघटनेच्या परंपरागत बंधनांनीही ती जखडलेली असते. त्याशिवाय या देशात अद्याप तरी केंद्रीय सत्ता व प्रदेश राज्ये ही एका नाजूक पण अभंग अशा धाग्याने एकमेकांशी निगडित झालेली दिसून येतात.

यशवंतराव चव्हाण यांनी पंडितजींवर, काँग्रेसश्रेष्ठींवर आणि दिल्लीवर छाप टाकली ही आपल्या निष्ठेची त्यांना जाणीव करून देऊन. ही जाणीव त्यांनी अबोल कर्तृत्वाने करून दिली हे विशेष आहे. यशवंतराव चव्हाण दिल्लीच्या लोकांना उठून दिसतात ते त्यांच्या मुंबई व महाराष्ट्र राज्यातील कर्तृत्वाने. त्यांचे दर्शन वा भेट ज्यांना होते त्यांना ते अघळपघळ बोलतानाही दिसत नाहीत आणि अवास्तव घोषणा करताना तर मुळीच आढळून येत नाहीत. यशवंतराव चव्हाण यांचा व्यासंग चांगला

आणि बोलण्यातही ते वाकबगार आहेत. पण त्यांनी मितभाषित्व हा आपला बाणा केला आहे आणि जे काही ते बोलतात ते मोजके व मुद्देसूद असते. राजकीय जीवनात लोकांना कृतिशून्य पण शब्दशूर लोकांच्या तोंडाचा पट्टा चाललेला ऐकण्याची सवय झाल्यामुळे या अबोल व मितभाषी अशा यशवंतरावांची त्यांच्यावर साहजिकच अधिक मोहिनी पडते.

दिल्लीचा नूर काही वेगळा आहे. येथे मोगल साम्राज्याची शान आहे. ब्रिटिश राजवटीचे वैभव आहे. खानदानी उर्दूची अदब आहे. आणि या सर्व संस्कृतीत रस घेणाऱ्या पण त्याच वेळीं लोकशाहीच्या परंपरा आत्मसात करणाऱ्या नेहरूंच्या सुसंस्कृत राजवटीचाही येथे पाया घातला गेला आहे. त्या राजवटीत कोणालाही परके वाटण्याचे कारण नाही. आणि आकसानें कोणाला वेगळे लेखले जाण्याची तर येथे मुळींच भीती नाही. त्या राजवटीबद्दल कोणाला प्रेम वाटो न वाटो, तिच्या धोरणाची दिशा कोणाला आवडो न आवडो, पण येवढे मात्र खरे की, कोणीही निःशंकपणे त्या राजवटीबद्दल आपले विचार मांडू शकतो. आणि ते मत राजवटीला मान्य नाही म्हणून कोणाच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर येथे सहसा घाला घातला जात नाही. दुर्दैवानें या राजधानीत आपल्याला मानाचे नव्हे, कसलेच स्थान राहिले नाही अशी एक भावना आजवर महाराष्ट्राच्या अंतःकरणात घर करून राहिली होती. ती भावना निर्माण होण्याला काही सबळ, दुर्बळ कारणे घडलीही असतील. पण त्या भावनेमुळे महाराष्ट्रात दिल्लीबद्दल एक प्रकारचा कडवटपणा निर्माण झाला खरा. त्याची प्रतिक्रिया या ना त्या कारणामुळे राजधानीतही उमटली. आणि महाराष्ट्रात घडणाऱ्या कृतीची चिकित्सा करताना थोडीफार विकृत भावना थोरामोठ्यांच्या अंतःकरणातही प्रगट होत असलेली आढळून येऊ लागली. मग महाराष्ट्राच्या इतिहासातील काही अनिष्ट घडामोडी, गांधीवादी राजकारणाच्या वाहत्या प्रवाहाला अडथळा आणणारे महाराष्ट्रातील काही नेत्यांचे वर्तन आणि अलीकडील काळात राज्यपुनर्रचनेच्या वेळी महाराष्ट्राने दाखविलेला आग्रहीपणा या सर्वांवर काही वेगळा प्रकाशझोत टाकला जाऊ लागला आणि सर्वसाधारणपणे येथे एक अशी भावना प्रचलित होऊ लागली की, " महाराष्ट्रात समजूतदारपणा असा राहिलेलाच नाही, भारतीय जीवनाशी हे लोक समरस होऊ शकत नाहीत ".

त्या भावनेला धक्का देण्याचे कार्य श्री. यशवंतराव चव्हाण यांनी अत्यंत यशस्वीपणे केले. महाराष्ट्राच्या भवितव्याच्या दृष्टीनें त्यांची ही सर्वांत महत्त्वाची कामगिरी होय.

卐 卐 卐

# मराठी भाषिकांचे आशास्थान

श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, संपादक, " तरुण भारत " नागपूर

श्री. यशवंतराव चव्हाण यांना १९५३ सालाच्या सप्टेंबरमध्ये ज्या वेळी नागपूर करार झाला, त्यावेळी मी प्रथम पाहिले. त्या कराराच्या पूर्वतयारीसाठी अखिल महाराष्ट्रातील ज्या कार्यकर्त्यांना निमंत्रणे देण्याची सूचना संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष श्री. शंकरराव देव यांनी मला केली होती, त्यात श्री. यशवंतराव हे प्रमुख होते. नागपुरात दोन दिवस झालेल्या वाटाघाटीत त्यांचे स्वभावविशेष माझ्या निदर्शनास येऊन गेले. श्री. शंकरराव देव यांची भूमिका साहजिकच अशी होती की, विदर्भ आणि मराठवाडा यांचा संतोष साधण्यासाठी पश्चिम महाराष्ट्राने या कराराच्या बाबतीत जास्तीत जास्त देण्याची दिल्दार वृत्ती दाखविली पाहिजे. बॅ. रामराव देशमुख, स्वामी रामानंद तीर्थ आणि डॉ. आबासाहेब खेडकर हे विदर्भ आणि मराठवाडा यांची बाजू, तर श्री. भाऊसाहेब हिरे, श्री. यशवंतराव चव्हाण, व श्री. कुंटे प्रभृती पश्चिम महाराष्ट्राचे कार्यकर्ते हे त्या भागाची बाजू मांडीत होते. अशा प्रकारच्या वाटाघाटीत प्रत्येक मुद्याची सर्व बाजूंनी छाननी करण्यासाठी बुद्धीची कुशाग्रता जितकी अवश्य असते, तितकीच त्या वाटाघाटी होण्याकरिता प्रसंगी जुळते घेण्यासाठी तिचा उदार लवचिकपणाही अवश्य असतो. यशवंतरावांच्या ठिकाणी हे दोन्ही गुण असल्याचा प्रत्यय त्या दिवशी झालेल्या वाटाघाटीत मला आला.

१९५६ च्या ऑक्टोबरमधील आमच्या भेटीत श्री. यशवंतराव यांच्या मनोगताची जी कल्पना मला आली होती, तिच्यामुळे माझ्या मनाची अशी खात्री होऊन गेलेली होती की, संयुक्त महाराष्ट्राच्या भूमिकेपासून ते ढळलेले नाहीत. ज्या कॉंग्रेस संघटनेचे ते सदस्य होते, तिची दृढता आणि शिस्त या दोहोंना आपल्या राजकीय जीवनात जे पहिले स्थान त्यांनी पक्षनिष्ठेने दिले होते, त्यामुळे आणि कदाचित वैयक्तिक महत्त्वाकांक्षेमुळेही जरी त्यांनी द्विभाषिक चालविण्याची जबाबदारी

शिरावर घेतली असली, तरी संयुक्त महाराष्ट्राचे तत्त्व आणि मागणी ही दोन्ही त्यांनी सोडून दिलेली नाहीत, असा माझा ग्रह पक्का होऊन गेलेला होता. त्यामुळे त्यांच्या कारभारातील काही गोष्टी जरी मला अतीशय टीकास्पद वाटल्या, तरी त्यांच्या नेतृत्वाला पाठिंबा देण्यात आपले काही चुकले आहे, असे मात्र कधीच वाटले नाही. उलट, आम्हा दोघांमधील अविश्वासाचे पटल दूर होऊन आमचे संबंध पूर्ण स्नेहभावाचे झाल्यावर, त्यांचे कर्तृत्व आणि धोरण यांच्याविषयीची माझी आदरबुद्धी आणि खात्री वाढत गेली. " राजकारणात फक्त उपयुक्ततेला स्थान आणि मान आहे, स्नेहाला नाही," हे ब्रिटिश मुत्सद्दी डिस्रायली यांचे नीतिसूत्र मला माहीत आहे. पण त्याबरोबरच केवळ विधानसभेच्या व्यासपीठावर दिलेला शब्दच नव्हे, तर खाजगी भेटीत दिलेला शब्दसुद्धा श्री. यशवंतराव किती कसोशीने पाळतात, याचा प्रत्यक्ष अनुभव विदर्भातील एका मंत्र्याच्या बाबतीत मी घेतलेला आहे. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी जसे संघटनेविषयीचे इमान उत्कटतेने वसत आहे, तसेच ज्यांना आपण एकदा सहकारी किंवा स्नेही म्हणून जवळ केले, त्यांच्याविषयीचे इमानही तितक्याच उत्कटतेने वसत आहे, असे म्हणावयाला मला शंका वाटत नाही. इतकेच नव्हे, तर कॉंग्रेस विरोधी पक्षातीलसुद्धा काही प्रमुख कार्यकर्त्यांचा जो स्नेह आणि विश्वास त्यांनी संपादन केलेला आहे, तो खरोखरी त्यांच्या या असामान्य राजकीय चारित्र्यामुळे ! त्यामुळेच कदाचित ते इतके मितभाषी आणि संयमी, नेमके आणि मोजके बोलणारे व सौजन्याने पण सावधपणाने वागणारे झाले असावेत, असे मला वाटते. " सत्याय मितभाषिणाम् " हे कालिदासाचे वचन या दृष्टीने त्यांना यथार्थतेने लागू पडते. स्वतःच्या शब्दाला जागणारा आणि चारित्र्याला जपणारा इतका संग्राहक वृत्तीचा पण सावध राज्यधुरीण मी तरी पाहिलेला नाही. मराठी मनात निर्माण झालेल्या त्यांच्याबद्दलच्या आशा सफल झाल्याचे सुखद दृश्य भावी काळात सर्वांना पाहावयास मिळो हीच माझी प्रभुचरणी मंगल प्रार्थना.

卐 卐 卐

# उज्वल भवितव्य

श्री. सदानंद रेगे, एम. ए., मुंबई.

इतिहास यशवंतरावांच्या कार्याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन जेव्हा करावयाचे तेव्हा करीलच. सार्वजनिक जीवनात वावरणारी कोणतीही व्यक्ती या दिव्यातून वाचलेली नाही. आज एवढी एक गोष्ट मात्र सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे की भारतवर्षाच्या नकाशावर इतर प्रांतीयांच्या मनातील विकल्पांची मुळीसुद्धा तमा न बाळगता, महाराष्ट्र ताठ मानेनें वावरण्यास अलीकडील काळात कुणा एका नेत्याचे प्रयत्न कारणीभूत झाले असतील तर ते यशवंतरावांचेच. आपल्या देशातील राजकीय मुत्सद्देगिरीचे महत्त्व आपणांस कळू शकेल. केवढ्या मुत्सद्देगिरीनें, चातुर्यानें अन् तरीही तात्त्विक शरणागती न पत्करता त्यांनी राजशकट हाकला. हल्लीच्या अस्थिर अशा राजकीय वातावरण सागरातील मार्गदर्शक दीपगृहाप्रमाणे ते प्रकाशमान आहेत. धैर्याचा महामेरू म्हणजेच श्री. यशवंतराव चव्हाण.

दोन दगडांवर पाय ठेवण्याचे आरोप अगदी आजसुद्धा त्यांच्यावर होत आहेत. दिल्लीत जी शोकांतिका होऊ लागली होती ती काही काळ तरी त्यांच्याच मुत्सद्देगिरीमुळे टळली. ही गोष्ट त्यांच्या शत्रूंनाही मान्य करावी लागेल.. व्यवहाराचे भान ठेवून सावधगिरीनें पावले टाकणे म्हणजे स्वार्थी होणे, असे ज्यांना वाटत असेल त्यांना वाटो बापडे ! पण त्यामुळे यशवंतरावांच्या यशाला डाग लागण्याचे काही कारण नाही. त्यांच्या तरुण वयाला त्यांच्यावर झालेले बुद्धिवादाचे संस्कार अभिजात आहेत. ते त्यांना स्वार्थाच्या, सत्तेच्या मार्गानं जाऊन देणार नाहीत. यशवंतरावांच्या यशात महाराष्ट्राचेच नव्हे तर उभ्या देशाचे उज्ज्वल भवितव्य सामावलेले आहे. देव करो नि यशवंतरावांचे यश उत्तरोत्तर आभाळाएवढे वाढो !

卐 卐 卐

# यशवंत-जीवनसृष्टीतून
# वाहणाऱ्या विचार-सरिता

या विभागातील विचारवंत

(४५) ★ श्री. **द्वा. वा. केळकर**, बी. एस्‌सी., बी. टी.
(४६) ★ श्री. **मधुकर केचे**, एम्. ए.
(४७) ★ श्री. **हरि पिराजी धायगुडे**, सदस्य, सत्यशोधक समाज
(४८) ★ श्री. **शंकरराव खरात**, बी. ए., एल्‌एल्. बी. ॲडव्होकेट
(४९) ★ श्री. **मा. कृ. शिंदे**, कॅप्टन, जे. पी.
(५०) ★ श्री. **एन्. पी. नागपुरे**, एम.ए., बी.कॉम., एफ. आर. ई.एस. (लंडन)

★ ★ ★

# बहिरी ससाणा

प्रा. द्रा. वा. केळकर, बी. एस्सी., बी. टी., पुणे

माझ्या बालपणापासूनच यशवंतरावांना एक वर्धिष्णू नेता म्हणून मी मानीत आहे. त्यांच्या अनेक सभांना मी अथपासून इतिपर्यंत उपस्थित राहिलो आहे. त्यांची अनेक उद्‌बोधक व मनोरंजक भाषणे ऐकण्याचा योग मला लाभला आहे. कऱ्हाडच्या एका सभेचा प्रसंग मला आठवतो. काँग्रेस सरकारला लेव्ही घालणाऱ्या लोकांचा निषेध करण्याचा यत्न काही मंडळी करीत होती. अशा वेळी या धीरवृत्तीच्या नेत्याने शेतकऱ्यांमध्ये इतका विश्वास निर्माण केला की, त्यांनी लेव्ही म्हणून धान्य सरकारला दिले, नुसतेच दिले नाही तर धान्याच्या गाड्यांची वाजत-गाजत मिरवणूक काढून दिले. त्यावेळच्या सभेत बोलताना यशवंतरावांनी आत्मविश्वासपूर्वक भाषण केले. आपल्या ज्या निकटवर्ती सहकाऱ्यांनी काँग्रेसचा त्याग केला, त्याबद्दल बोलताना ते म्हणाले, " एखाद्या मंदिराचे बांधणीचे काम चालू असावे, सर्व मजूर, गवंडी, तंत्रज्ञ यांनी एकजुटीने मोठ्या कौशल्याने ते करीत आणावे. अशा वेळी चार गवंडी उठले आणि म्हणू लागले की, आता आम्ही कामाला नाही येणार तर त्यांचे म्हणणे कोणी ऐकेल काय ? बाकीचे सर्वजण ते कार्य पूर्ण केल्याविना राहणार नाहीत. फक्त इतकेच म्हणतील, अरेरे ! मंदिराच्या पूर्ततेला आता थोडासा विलंब होणार ! ज्या लोकांनी पाया घातला ते कळसाच्या उभारणीला पण हवे होते. "

याच सभेत बोलताना त्यांनी एक गमतीदार दृष्टांत दिला. " एका इंग्रजी कादंबरीत एका नायिकेची अशी हकीगत आहे; ती नायिका एका सज्जन गृहस्था-बरोबर सुखाने संसार करीत होती. तिला अपत्येही होती. पतीवर तिचे प्रेमही होते. पण एक दिवस ती रेल्वे स्टेशनवर फिरावयास गेली असताना एका निळ्या डोळ्याच्या कप्तानाशी तिची ओळख झाली आणि त्यानंतर तिच्या ध्यानात आले की, आपल्या पतिराजांच्या उजव्या कानापेक्षा डावा कान गहूभर आखूडसा आहे ! लोकहो, तुम्हीच ओळखा त्या नायिकेच्या बाबतीत खरे काय घडले असेल ते ! " इतके म्हणून यशवंतराव हसले. मग यशवंतराव बोलू लागले, " आमच्या माजी सहकाऱ्यांना असा कोणी निळ्या डोळ्याचा कप्तान तर भेटला नाही ना ? " अशाप्रकारे भाषण करताना श्रोत्यांची वैचारिक पातळी स्वतःच्या भाषणाने वाढविण्याचा, त्यांना खेळकरपणे विचार करण्याची सवय लावण्याचा यत्न यशवंतराव करतात.

त्यांचा विकास काही एकाएकी झालेला नाही. तो क्रमाक्रमाने झाला आहे. तालुका, जिल्हा, प्रांत, राज्य अशी एकापेक्षा एक मोठी क्षितिजे मोठ्या यशस्वी

रीतीने पार करीत हा महापुरुष अखिल भारतीय पातळीवर गेला आहे. पृथ्वीच्या आकर्षणातून निसटून चांद्रयान चंद्राच्या क्षेत्रात जाताना त्याला सुद्धा हबका बसतो. पण यशवंतरावांपाशी " सौजन्यरूपी " स्प्रिंगा आहेत. त्या धक्क्यांचे शोषणच जणू काही करतात. काश्मिरात मुजाहिद घुसविण्याची कारागिरी करणाऱ्या पाकिस्तानला जबरदस्त तडाखा देणारा मंत्रिमंडळाचा निर्णय केवळ यशवंतरावांच्यामुळेच होऊ शकला. भारत–पाक संघर्षाचे वेळी त्यांच्या कर्तृत्वाची खरी किंमत साऱ्या देशालाच नव्हे तर परदेशांना सुद्धा कळून आली. " बहिरी ससाणा " म्हणून त्यांचे वर्णन करण्यात येऊ लागले. स्वतः संरक्षणमंत्री असताना सुद्धा केवळ लष्कराच्या कारवाईला महत्त्व येऊ नये ही गोष्ट यशवंतरावांनी घडविली. देशामधील सर्वसामान्य माणसात स्वातंत्र्यासाठी मूल्य देण्याची त्यागाची भावना निर्माण करण्याचा नेटाचा प्रयत्न त्यांनी केला. गृहमंत्री असताना सुद्धा जनतेची विधायक प्रवृत्ती वाढविण्याचा यत्नच ते अधिक करीत असतात. बृहन्महाराष्ट्रामध्ये वावरताना ते स्थानिक परिस्थितीशी समरस होण्याचा उपदेश मराठी भाषिकांना देतात. सुशिक्षितांना ते वारंवार सांगतात की, औदासिन्य व न्यूनगंड सोडून देऊन समाजाची सेवा करण्यास पुढे या. त्यात तुमचे कल्याण आहे.

मराठी माणूस भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य कधी विसरत नाही. याच संदर्भात तो साधुता, विद्वत्ता व पराक्रम यांचा सदैव आदर करतो, ही गोष्ट यशवंतराव स्वतःच्या आचरणाने सिद्ध करीत असतात. वेदसंपन्न ब्राह्मणांचा सन्मान करताना ते बिचकत नाहीत. विद्वानांचा परामर्ष ते मार्मिकतेने घेतात तर पराक्रमी सैनिकांचा सत्कार ते अत्यादराने करतात. आपल्या इतिहासाबद्दल विशेषतः शिवराय आणि महाराष्ट्रातील संतमंडळी यांच्याबद्दल परम आदराचा एक खास कप्पा यशवंत-रावांच्या हृदयामध्ये आहे. परमेश्वराशी निष्ठा व्यक्त करताना अगदी पारंपरिक पद्धत त्यांच्या आचरणात दिसते. भारताचा हा गृहमंत्री सज्जनगडावर जाऊन येण्या-साठी मुद्दाम वेळ राखून ठेवतो आणि समर्थांच्या समाधीपुढे अगदी श्रद्धायुक्त भावाने मस्तक लववितो एवढेच नव्हे तर आपल्या बरोबरीच्या सहकाऱ्यांच्या हाताला धरून तेथे त्यांना नेतो व सर्वांच्या सान्निध्यात प्रार्थना करतो, ही आपणास दिसणारी अगदी हृद्य घटना नव्हे काय? इतर साऱ्या धर्मांना समानतेने वागवीत असताना स्वतःची दैवते यथाशक्ती पुजण्याचा जो धडा छत्रपती शिवाजीराजांनी घालून दिला त्याचे प्रतिपालन यशवंतराव करीत असतात ही त्यांची विशेषता आहे. ते ज्या संतांचा गौरव करीत असतात त्यायोगे त्या संतांचा संप्रदाय साहजिकच तुष्ट होतो... पण त्यासाठी यशवंतराव असे वागतात असे मात्र नव्हे! संतांचा आदर करणे हा त्यांचा देहस्वभाव आहे. आजच्या लोकशाही जमान्याला यशवंतराव यांचे नेतृत्व खचितच उपयुक्त आहे. त्यांचा अधिकाधिक उत्कर्ष आपणास पाहावयास मिळावा हीच प्रत्येकाची भावना आहे.

# अदृश्य सान्निध्य

श्री. मधुकर केचे, एम. ए., अमरावती.

माणसाला जवळून पाहण्याची संधी उपलब्ध करून देणारे सान्निध्य मला नामदार यशवंतराव चव्हाणांच्या बाबतीत मिळाले नाही. दोन व्यक्ती एकत्र येऊन बोलणे म्हणजे सान्निध्य होय. नामदार चव्हाण कऱ्हाडचे तर मी वऱ्हाडचा. म्हणजेच आमचे गाव एक नसल्याने सान्निध्य नाही. ते राजकारणी तर मी या क्षेत्रापासून दूर त्यामुळे संबंध येण्याचा प्रश्नच नाही. परंतु याव्यतिरिक्त दुसऱ्या प्रकारचेही एक सान्निध्य असू शकते. दृश्य सृष्टीत नसला तरी मानसिक असा एकत्रपणा असू शकतो. कारण हजारो वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या श्रीकृष्णाचेही ज्ञानेश्वर माउलीला मानसिक सान्निध्य होते. अशा प्रकारच्या मानसिक सान्निध्यांना स्थळ-काळाचे बंधन नसते. नामदार यशवंतराव चव्हाणांबद्दल मला फार आदर आहे. म्हणूनच त्यांचे मानसिक सान्निध्य मी गृहीत धरतो. या सान्निध्याला मात्र मी कारण देऊ शकत नाही. मला अनेक माणसे अशा अज्ञात कारणांनी आवडली आहेत. यशवंतराव चव्हाणही अशा अज्ञात कारणांनीच मला आदरणीय झाले आहेत.

खरे म्हणजे मी त्यांच्याकडे ओढला जाण्यास एकही कारण अजून घडले नाही. उलट वऱ्हाड महाराष्ट्रासोबत राहावा हे चव्हाणांचे म्हणणे मला मुळीच मान्य नव्हते. मी राजकारणी नसल्याने मला हे मत मांडण्यात काहीच अडथळा नाही. चव्हाणांची वक्तव्ये, काही वेळचे त्यांचे वागणे मला आवडले नाही. तरीही माझ्या मनात त्यांच्याबद्दल आदर वाटत आला आहे.

फक्त माझीच का ? प्रत्येकाचीच त्या विलोभनीय व्यक्तिमत्त्वाशी जवळीक करण्याची धडपड आहे. श्री. वि. गो. देशमुख चव्हाणांच्या विरुद्ध होते. महाविदर्भाची चळवळ भयंकर स्वरूप घेत होती. चव्हाणांसमोर उग्र निदर्शने होत होती. याही स्थितीत मला असे वाटे की, वि. गो. देशमुखांच्या मनात चव्हाणांविषयीचे प्रेम आहे. त्या प्रेमाचेच एक स्वरूप म्हणजे ती उग्रता आहे. पुढे जेव्हा वि. गो. देशमुख काँग्रेसमध्ये गेले, तेव्हा माझा अंदाज खरा ठरला असे वाटले. केवळ चव्हाण होते म्हणूनच ते काँग्रेसमध्ये गेले. एवढेच नव्हे तर चव्हाणांमुळे विदर्भाची उपेक्षा होत आहे असे म्हणणाऱ्यांच्याही मनात चव्हाणांबद्दल छुपा आदर असल्याची साक्ष मला पटत होती.

असे हे गमतीचे व्यक्तिमत्त्व आहे. विदर्भ आंदोलनात चव्हाणांचे एक चित्र अवहेलनेने लावले होते. एका पारड्यात चव्हाण आहेत व दुसऱ्या पारड्यात विदर्भाला आदर्शवत् असे डॉ. पंजाबराव देशमुख आहेत, असे ते चित्र होते. चव्हाणांच्यामुळे न्यायाचे पारडे आमचेकडे येण्यास अडथळा येतो असा त्या चित्राचा

आशय असावा. हेच चित्र इतक्या उत्साहानें लावणारे तरुण चव्हाणांचे आगमन होताना त्यांचा जयजयकार करतानाही आढळले आहेत. जेव्हा चव्हाणांना दिल्लीचे बोलावणे आले तेव्हा इतक्या लोकांतही मराठी माणसांना न्याय मिळाला असे वाटले. त्यांच्या कर्तबगारीबद्दल त्यांच्या शत्रूलाही संशय नाही. तो विश्वासच मग त्यांच्या विरुद्धच्या आंदोलनातही आदर कायम ठेवीत असावा.

हे असे चालू असतानाच मी एक पत्र लिहावयास घेतले. अगदी मायन्या-पासून अडलो. त्या थोर अनोळखी माणसाला संबोधावे कसे ? पण हात मात्र नकळत लिहून गेले, " ती. स्व. यशवंतराव ", पत्र लिहून झाल्यावर मी ते वाचून काढले. अगदी खूप दिवसांची ओळख असल्यासारखा मजकूर मी लिहिला होता. बरेच दिवस न भेटलेला पण ओळख न विसरलेल्या एखाद्या वडिलधाऱ्या मित्राला लिहावे तसे मी यशवंतरावांना लिहिले होते. अशा पत्राचे उत्तर येण्याची मी अपेक्षा केली नव्हती. उलट, ' मी गृहमंत्री असल्यानें हा अनोळखी माणूस या आदराचा देखावा करत आहे ' असे यशवंतरावांना वाटणे रास्त होते.

पण घडले मात्र विपरीत. माझी अदृश्य मैत्री त्यांनी मान्य केली. त्यांनी स्वतः पत्र पाठविले. मी त्यांच्या बरोबर काही वेळ राहू इच्छितो, या माझ्या विनंतीला होकार आला होता. त्यांनी मानसिक सान्निध्य मान्य केले, हेही नसे थोडके ! एका महान व्यक्तीनें आपल्या आदरास मान्यता दिली ही आठवण सुद्धा मला पुरेशी आहे. त्यांच्याबरोबर काही काळ वास्तव्य करण्याचा प्रसंग येवो ! ते पत्र मी आल्या-गेल्याला उत्साहानें दाखवितो. म्हणून मला राहून राहून वाटते की, माझ्यासारख्या अनोळखी माणसालाही आपुलकी दाखविणारा हा माणूस नक्कीच थोर आहे. क्षुद्र मातीच्या कणांना जीवन देण्यासाठी त्यांना देवानें आभाळ करावे.

卐 卐 卐

## लक्ष्यवेधी पत्राचे सूचक उत्तर

श्री. हरि पिराजी धायगुडे, सदस्य, सत्यशोधक समाज, बारामती.

नामदार श्री यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्री,
" महाराष्ट्र राज्य " मुंबई ३२. ता. ५-९-६०
यांचे सेवेसी.......

अत्यंत नम्रतापूर्वक विनंती की भारताच्या सुदैवानें पंडित जवाहरलाल नेहरू लाभले. तद्वतच महाराष्ट्राच्या नशिबानें आपण मुख्यमंत्री म्हणून लाभलात. या म्हणण्यात अतिशयोक्ती किंवा तोंडपुजेपणा मुळीच नसून अगदी सत्य वस्तुस्थिती आहे.

( १ ) आपण हरप्रयत्नांनी द्विभाषिक मोडून दोन स्वतंत्र प्रांत वेगळे करून अखिल महाराष्ट्रीय जनतेला संतोषित केलेत.

( २ ) प्रतापगड व शिवनेरी येथे श्री. शिवछत्रपतींचे भव्य पुतळे उभारण्याचे प्रचंड समारंभ घडवून आणलेत.

( ३ ) मराठवाडा व विदर्भ यांना एकत्र आणून विशाल महाराष्ट्र निर्माण करून आपले बुद्धिकौशल्य व मुत्सद्दीपणा व्यक्त केलात.

( ४ ) गांधी खुनानंतर जाळली गेलेली ब्राह्मणांची घरे पुन्हा बांधण्यास व दुरुस्त करण्यास दिलेल्या कर्जाची सूट देऊन ब्राह्मण समाज आनंदित केलात.

( ५ ) नवबौद्धांच्या पूर्वसवलती चालू ठेवून अखिल हरिजनसमाज संतोषित केलात.

( ६ ) बाराशे रुपयांच्या आतील उत्पन्नवाल्या सर्व जातींच्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे मोफत शिक्षण ठेवले.

( ७ ) उत्तम साहित्यिक, गवई, तमासगीर, कुस्तीगीर, शाहीर वगैरे कलावंतांना देणग्या सुरू केल्या.

( ८ ) पण अत्यंत खेदाची गोष्ट ही की, ज्या सत्यशोधक व ब्राह्मणेतर पक्षाचे कार्यकर्त्यांनी वृत्तपत्रके, पुस्तके, सत्यशोधक जलसे, सभा, भाषणे व लेखन-रूपाने उभ्या महाराष्ट्रातील अस्पृश्य व शेतकरी आदी समाजामध्ये अपूर्व क्रांती निर्माण करून व अहिंसकरीत्या जोरदार चळवळ सुरू केली आणि त्यावेळच्या अधिकारारूढ पुढारलेल्या वर्गातील अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या जुलमाला व अन्यायी त्रासाला न जुमानता त्या चळवळींचा जोरदार व परिणामकारक पुरस्कार केला; ज्यामुळे हल्ली महाराष्ट्रामध्ये आमदार, खासदार, उपमंत्री तयार होऊन राज्याचा गाडा सुरळीतपणे चालवीत आहेत, त्या सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीच्या कार्यकर्त्यांची वरील अधिकारारूढ व्यक्तींना व पुढाऱ्यांना आठवणही होऊ नये, हा कृतघ्नपणा नव्हे काय ?

महात्मा ज्योतिराव फुल्यानंतर कै. राजर्षी शाहू छत्रपती, कै. भास्करराव जाधव, कै. दिवाणबहाद्दूर लठ्ठे, कै. रा. ब. डोंगरे, कै. कृष्णराव भालेकर, कै. श्रीपतराव शिंदे, कै. द. भि. रणदिवे, कै. बाबुराव यादव, कै. केशवराव बागडे, कै. दिनकरराव जवळकर, कै. खंडेराव बागल, कै. भिमराव महामुनी, कै. सोनोपंत कुलकर्णी, कै. रामभाऊ वाडगे, कै. भाऊराव पाटोळे, कै. कर्मवीर अण्णासाहेब शिंदे, कै. केशवराव विचारे, कै. खंडेराव दौंडकर, कै. रघुनाथराव राणे, कै. कर्मवीर भाऊराव पाटील, कै. केशवराव जेधे, इत्यादी दिवंगत कार्यकर्ते व सांप्रत असलेले शेतकीमंत्री पंजाबराव देशमुख, खासदार बाळासाहेब मोरे, श्री. बाबुराव जेधे, श्री. रावसाहेब थोरात, क्रांतिसिंह नाना पाटील, भाई माधवराव बागल, श्री. वा. रा. कोठारी, श्री. मुकुंदराव पाटील, राष्ट्रवीरकार शामराव देसाई, श्री. नानासाहेब

अमृतकर, श्री. पंढरीनाथ सिताराम पाटील, श्री. ज्योतिराव फाळके, नगरचे श्री. रावसाहेब नवले, दीनबंधुकार डॉ. नवले, खासदार शांताराम मोरे, जागृतिकार श्री. पाळेकर, प्रबोधनकार श्री. के. सी. ठाकरे, खासदार श्री. तुळशीदास जाधव इत्यादी कार्यकर्त्यांच्या तळमळीच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील बहुजन समाजात राजकीय, सामाजिक व शैक्षणिक इत्यादी क्षेत्रांत प्रचंड जागृती झाली आहे.

वरील मंडळींपैकी काहींची समिती नेमून तिचे मार्फत एकंदर सर्वच कार्यकर्त्यांची माहिती मिळवावी, व बहुजन समाजाचा गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांचा इतिहास लिहून त्या सर्वांचे शक्य तो उतराई व्हावे. मला कृपोत्तर आल्यास मी समक्ष भेटीस येईन. तेव्हा या विषयावर चर्चा करू. ही विनंती

आपला नम्र,
हरि पिराजी धायगुडे, वय ६८,
ता. बारामती.

—०—

## मुख्यमंत्र्यांचे उत्तर

मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य,

सचिवालय, मुंबई ३२.
२४ सप्टेंबर १९६०.
२ आश्विन १८८२.

श्री. हरि पिराजी धायगुडे यांना सप्रेम नमस्कार वि. वि.

आपले पत्र मिळून बरेच दिवस झाले. मीं एकसारखा प्रवासात होतो. त्यामुळे पत्रोत्तर तातडीनें देऊ शकलो नाही. आपण ज्या कार्यकर्त्यांचा उल्लेख केला आहे, त्यांना मी निश्चित विसरलो नाही, हे मी आपणांस सांगू इच्छितो. महात्मा फुले यांचेपासून सुरू झालेली परंपरा कर्मवीर भाऊराव पाटील यांचेपर्यंत आहे आणि या परंपरेतून निर्माण झालेल्या पुरोगामी शक्तीतूनच मी जन्मलो आणि वाढलो. तेव्हा मी या सर्वांना कसा विसरेन ? आपण ज्या लोकांची नावे मला सांगितली, त्यांपैकी कोणी जर हे काम करू इच्छित असतील तर त्यांना साहाय्यभूत होण्याचा प्रयत्न मी करीन. परंतु यासाठी एखादी कमिटी सरकारमार्फत नेमणे फारसे व्यवहार्य होणार नाही.

आपल्या या वयात मुद्दाम भेटीसाठी मुंबईस येण्याचा त्रास देणे योग्य होणार नाही. परंतु मी जेव्हा पुणे, बारामतीस येईन तेव्हा आपणास जरूर भेटेन. कळावे.

आपला
यशवंतराव चव्हाण

卐 卐 卐

# अस्पृश्यांचा आधार

श्री. शंकरराव खरात, बी. ए., एल्‌एल्‌. बी., अॅडव्होकेट, पुणे.

भारताचे गृहमंत्री नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांचा पिंड विचारवंताचा आहे. त्यांच्या कार्याला पुरोगामी व शास्त्रीय विचाराची बैठक असून त्यांच्या ठायी तळमळ, कळकळ आणि भावनेचा ओलावा आहे. त्याचबरोबर त्यांच्या विचारात व कृतीत दूरदृष्टीही आहे. त्यांचे नेतृत्व खालच्या सामान्य जनतेच्या थरांतून निर्माण झालेले आहे. म्हणूनच ते सर्वसामान्य जनतेची विशेषतः खालच्या थरातील जनतेची दुःखे व प्रश्न काय आहेत हे जाणू शकतात. ते सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाशी समरस होऊ शकतात आणि जनतेची दुःखे निवारण्याच्या दृष्टीने निश्चित पावले टाकतात. ते विचाराने लोकशाही समाजवादी असल्याने जनतेच्या प्रश्नांची उकल करण्यासाठी आपल्या पुरोगामी व शास्त्रीय विचाराच्या आधाराने पुढची पावले टाकतात. या गुणवत्तेमुळेच ते सर्व भारतीय सामान्य गोरगरीब जनतेचे आज आशा—स्थान बनले आहेत.

नामदार श्री. यशवंतराव यांनी मुख्यमंत्री म्हणून प्रथम मुंबई राज्याची व नंतर महाराष्ट्र राज्याची सूत्रे हाती घेतल्यावर अस्पृश्य व बौद्ध यांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने भारतातील इतर राज्यांना आदर्शभूत होईल असेच मूलगामी स्वरूपाचे बहुमोल कार्य केले आहे. प्रथमतः त्यांनी गुलामी पद्धतीची महार-वतन पद्धती नष्ट करणारा बॉम्बे इन्टीरिअर व्हिलेज वतनस् अॅबॉलिशन अॅक्ट १९५८ चा कायदा केला. या वतनी पद्धतीमुळे महार समाजाचा सर्व दृष्टीने अधःपात झालेला होता. त्यांचे जीवनच सर्वस्वी गुलामाप्रमाणे बनलेले होते.

नामदार श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी तारीख ६-१-१९६० रोजी सांगली येथे महाराष्ट्रातील समस्यांवर मूलगामी विचार मांडले. आपल्या भाषणात त्यांनी नव-दीक्षित बौद्धांचा प्रश्नही प्रामुख्याने मांडला ते म्हणाले की, " महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात महत्त्वाचा प्रश्न नव-बौद्धांचा आहे. महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एक नव-जागृती निर्माण केली आहे. आपण सर्वांनीच विचार केला पाहिजे की, हजारो वर्षे आपल्या समाजाचा एक घटक अंधारात होता, तो आता जागृत झाला आहे. त्याची जिद्द व जागृती आपण ओळखली पाहिजे. जिद्दीच्या जागृत मनाच्या हक्कांची मागणी म्हणून त्यांचे माणुसकीचे अधिकार त्यांना मिळाले पाहिजेत. मोठ्या शहरापेक्षा खेड्यापाड्यांतून या समतेच्या भावनेची आज गरज आहे..."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे तारीख १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली व आपल्या लक्षावधी अनुयायांनाही ती दिली. त्यावेळे-पासून विशेषतः महाराष्ट्रातील खेडोपाडी व शहरांतून बौद्धधर्म स्वीकाराची प्रचंड लाट पसरली. अस्पृश्य मंडळींनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याने अस्पृश्य म्हणून त्यांना मिळणाऱ्या सवलती सरकारने बंद केल्या. नव-दीक्षित बौद्धांनी व त्यांच्या नेत्यांनी सभा परिषदा भरवून याविरुद्ध ठराव केले. त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यापुढे शिष्टमंडळामार्फत ते मांडले. अस्पृश्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याने त्यांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणा नष्ट होऊ शकत नाही. सवलती मागण्यामागील ही मूलभूत भूमिका त्यांना पटली. त्यांनी पूर्वीच्या सवलती देण्याचे महाराष्ट्र सरकारचे धोरण जाहीर केले. या धोरणात नामदार यशवंतरावजींचा उच्च व उदात्त हेतू स्पष्ट आहे. त्यांच्या या धोरणाचा खासदार दादासाहेब गायकवाड यांनी तारीख १९-८-१९६० रोजी आपल्या भाषणात कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. त्यात खासदार दादासाहेब म्हणाले, "महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांनी धर्म दाखवून सर्व राज्यांच्या अगोदर नव-दीक्षित बौद्धांना सवलती देण्याचे जाहीर केले आहे."

नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांनी रिपब्लिकन पक्षाच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या भूमिहीन सत्याग्रहींच्या मागण्या मान्य करून क्रांतिकारक पाऊल टाकले. त्यांच्या या कार्याबद्दल महाराष्ट्रातील लक्षावधी भूमिहीन त्यांना दुवा देत राहतील हे निश्चित. नागपूर येथे ज्या भूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्धधर्माची दीक्षा घेतली त्या भूमीला बौद्ध हे पवित्र दीक्षा-भूमी म्हणून मानतात. ही दीक्षा-भूमी आम्हांला द्यावी अशी बौद्ध समाजाने मागणी केली. ही मागणी त्यांनी मुख्य मंत्री असताना तत्त्वतः मान्य केली आणि ही पवित्र दीक्षा-भूमी बौद्धांना मिळाली. त्या जागी आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा दिल्लीत लोकसभागृहाच्या समोरच उभा आहे. "भारतीयांनो! घटनाबद्ध लोकशाहीच्या मार्गानेच पुढे जा!" असाच जणू ते भारतीयांना संदेश देतात. डॉ. आंबेडकर स्मारक-कमिटीचे नामदार यशवंतराव चव्हाण हे अध्यक्ष होते. त्यावरून त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल व त्यांच्या समतावादी लोकशाहीबद्दल केवढा आदर आहे याची कल्पना येते. ऑक्टोबर १९६९ च्या तारीख २० ला अहमदनगर जिल्ह्यात दौऱ्यावर असताना ते म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य थोर होते. ते आपण आता पूर्ण केले पाहिजे." त्यांच्या या विचारावरून त्यांना डॉ. आंबेडकरांच्या कार्याची थोरवी केवढी उदात्त व मोठी वाटते याची प्रचीती येते.

"माझ्या कल्पनेतील खेडे" या विषयावर नामदार यशवतरावजी यांनी पुणे आकाशवाणीवरून आपले मनोगत व्यक्त केले. त्यांच्या मते, ज्या खेड्यातला

समाज आपले सगळे प्रश्न एकमेकांच्या जिव्हाळ्याने आणि समजुतीनें सोडविण्यासाठी एकत्र बसून त्याचा निर्णय करू शकतो, असे पंचायतीचे जीवन जगणारे खेडे तुमच्या माझ्यापुढे असले पाहिजे." आणि असे नवे खेडे, नवा माणूस नामदार यशवंतरावजी चव्हाण निर्माण करू शकतील अशी आशा मनात घर करून आहे. यासाठीच नामदार यशवंतरावजींना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो अशी प्रार्थना करतो.

卐 卐 卐

## पोपटकंठी सिंह

कॅप्टन श्री. मा. कृ. शिंदे, जे. पी. मुंबई

भला माणूस बडा असू शकतो. परंतु बडा माणूस भला असतोच असे नाही. अशा स्थितीत भलेपण आणि बडेपण यांची दुर्मिळ जोडी, आपले मित्र पुढारी नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या ठिकाणी अगदी हातांत हात घालून नांदते आहे असे मी म्हटले, तर त्यांचे शत्रूदेखील अगदी मनापासून माझ्या वाक्याला टाळ्या देतील ! पुढारी, मग तो कोणीही असो, त्याच्या बडेपणाचा गुणाकार होऊन तो जसजसा पूज्य होत जातो, तसतसा त्याच्यातील भलेपणाचा भागाकार होतो नि अखेर बाकी "पूज्य" राहते ! हा नेहमीचा अगदी सर्वसाधारण नियम. परंतु या नियमाला अपवाद म्हणून श्री. यशवंतरावजींकडे बोट दाखविता येईल. म्हणूनच त्यांना पाहणाऱ्यांची किंवा भेटणाऱ्यांची "तेथे कर माझे जुळती" अशी अवस्था होते.

इमर्सनच्या म्हणण्याप्रमाणे मोठ्या माणसांबद्दल नेहमीच गैरसमज निर्माण होत असतात. किंबहुना गैरसमज असणे हे मोठ्या माणसाचे एक भासमान लक्षणच असते, असे म्हटले तरी चालेल. त्या दृष्टीने पाहिले तर श्री. यशवंतरावांविषयी साधक आणि बाधक अशी दुहेरी मते असलेली आढळतात. श्री. चव्हाण यांच्या बाबतीत असा एक अबोल आक्षेप घेतला जातो की, ते आपल्या हितचिंतकांकडे पाठ फिरवितात आणि हितशत्रूंचे पाठीराखे होतात. त्यांना ते आठवणीने सांभाळतात. आणि याच गैरसमजावर आधारलेल्या तत्त्वज्ञानातूनच त्यांच्यावर तोंडसुख घेणारे टीकाकार निर्माण होत असावेत. वास्तविक त्यांना शत्रू असणे हे त्यांच्या कर्तबगारीचेच द्योतक होय. जो कर्तबगार असतो त्याला शत्रू असणारच. "अजातशत्रू" ही एक शिवी आहे, असे निदान मी तरी मानतो. आणि म्हणूनच श्री. चव्हाण यांना कोणी अजातशत्रू म्हणत नाहीत, याचा मला खरोखरच आनंद वाटतो. त्यांनी मिळविलेला नावलौकिक हा त्यांच्या पराक्रमाचा सुगंध आहे.

श्री. चव्हाण महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात असताना किंवा आता केंद्रीय सरकारच्या मंत्रिमंडळात असताना, त्यांनी जी जी खाती सांभाळली, त्या त्या वेळी त्यांचा दूरदर्शीपणा, मुत्सद्दीपणा आणि त्वरित परंतु अचूक निर्णय घेण्याची कुवत स्पष्टपणे दिसून आलेली आहे. ते संरक्षणमंत्री असताना त्यांनी केलेली भाषणे ज्यांनी ऐकली, वाचली असतील त्यांना त्यांच्या अमोघ वक्तृत्वाची आणि शब्द-सामर्थ्याची खात्रीने कल्पना आली असेल. मी तर असेही म्हणेन की, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मिस्टर चर्चिल यांनी जी आवेशयुक्त हजारो स्फूर्तिदायक भाषणे केली, त्यांचा आटीव अर्क श्री. चव्हाणसाहेबांच्या एकेका भाषणात भरलेला आढळतो.

जागतिक कीर्तीचे एक थोर विचारवंत व राजकीय तत्त्वज्ञानी श्री. मानवेंद्र रॉय यांच्या विचारसरणीचा चोखंदळपणे सूक्ष्म अभ्यास करून, आपल्या राजकीय विचारांचा पिंड पिळदार बनविलेले श्री. चव्हाण हे आपल्या मताचा पाठपुरावा करण्यासाठी अगदी अखेरचो कडा गाठायलाही कचरणार नाहीत. कारण त्यांचो मते प्रामाणिक आणि समतोल असतात. राजकारणात कितीही डावपेच खेळावे लागले तरी सत्पक्ष हाच त्यांचा पक्ष असतो, हे त्यांच्या अगदीच अलिकडच्या हालचालोवरून आणखी एकदा सिद्ध झाले आहे.

सिंडिकेट-इंडिकेट भाषा बोलणाऱ्यांनी श्री. चव्हाण यांचा वैचारिक पिंड अजून ओळखलेला नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. ते प्रागतिक विचारसरणीचेच पुरस्कर्ते आहेत. कारण ते स्वतः पुरोगामी वृत्तीचे आहेत. पक्षहिताबरोबरच देश-हिताचाही विचार करण्याचे, किंबहुना आधी देश मग पक्ष, असे त्यांचे राजकीय क्षेत्रात वागण्याचे सूत्र असावे. म्हणूनच ते तत्त्व आणि त्या तत्त्वासाठी पाळावयाचे पथ्य पाळण्यासाठी पुष्कळदा "धर्माचा काटा" बनण्यासाठी ते जिवाचा आटापिटा करीत असलेले दिसतात. परंतु इतर अनेक पुढाऱ्यांप्रमाणे ते केवळ राजकारणाचेच अभ्यासक नाहीत. साहित्याचाही त्यांचा गाढ व्यासंग आहे. १९५२ साली मुंबईत माझा जो सत्कार झाला, तो त्यावेळच्या मुंबई सरकारचे स्थानिक स्वराज्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्याच अध्यक्षतेखाली झाला होता. त्यावेळीं त्यांनी जे प्रदीर्घ भाषण केले, त्यात केवळ मराठी आणि भारतीय साहित्याचाच नव्हे तर जागतिक साहित्याचा साक्षेपी आढावा साठलेला होता. ते भाषण आजही माझ्या कानात घुमते आहे. मी मी म्हणणाऱ्या व आपल्या टीचभर ज्ञानाचा टेंभा मिरविणाऱ्या तथाकथित विद्वानांनी तोंडात बोट घालावे, असेच त्यांचे ते भाषण होते.

महाराष्ट्र कसा आहे, असे जर मला कोणी विचारले तर मी स्पष्ट सांगेन की, महाराष्ट्र कसा आहे हे जर पाहायचे असेल तर श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या-कडे पाहा. त्यांच्या पराक्रमात महाराष्ट्राच्या पराक्रमाचे प्रतिबिंब पडलेले आहे. विशेष हे की, निसर्गाने श्री. चव्हाण यांना अशी एक असामान्य शक्ती दिलेली

आहे की, ते कितीही कडक बोलले तरी ऐकणाराला ते बोलणे आणखी ऐकावे इतके नरमच वाटते! वाणी नरम परंतु आशय कडक! म्हणूनच मी त्यांना "पोपटकंठी सिंह" असे म्हणतो. गोड गोड बोलून प्रतिपक्षाला घायाळ करण्याची हातोटी साधलेला हा आमचा परमप्रिय प्रतापशाली यशवंत नेता, आणखी अनेक वर्षे आमचे नेतृत्व करो! देशाला मार्गदर्शन करो!!

卐 卐 卐

## सिंडिकेट इंडिकेट संघर्ष

प्रा. एन्. पी. नागपुरे, एम्. ए., बी. कॉम्., बी. टी.,
एफ्. आर. ई. एस्., (लंडन) अमरावती.

कोणत्याही व्यक्तीपेक्षा पक्षाची शिस्त व ध्येय धोरण यांविषयी दृढ निष्ठा असणे राजकीय पक्षाच्या स्थैर्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे असते. ही निष्ठा पाळणारा भारतातील एकमेव नेता म्हणून चव्हाणांचाच उल्लेख करावासा वाटतो. असेच धैर्य दाखविणारा पुढील प्रसंग उद्धृत करावासा वाटतो. एकदा माजी पंतप्रधान पंडित नेहरू अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले असता सरदार वल्लभभाईंच्या पोलादी संघटनेने अर्थात कॉंग्रेस वर्किंग कमिटीने आर. एस्. एस्. ला कॉंग्रेस सभासदत्वाची मोकळीक देणारा जो निर्णय घेतला त्या निर्णयाला सर्व देशात प्रभावी विरोध करणाऱ्या दोघांपैकी एक यशवंतराव होते. वरील उदाहरणावरून कॉंग्रेस सारखी महान संघटना आर. एस्. एस्. सारख्या जातीयवादी संघटनेने पोखरू नये हीच त्यांची आंतरिक तळमळ असावी. या त्यांच्या कामगिरीमुळेच माजी कॉंग्रेसाध्यक्ष श्री. ढेबरभाईंनी असे उद्गार काढले होते की, "कॉंग्रेस संघटनेस श्री. चव्हाण हे एक उत्कृष्ट तरुण नेते मिळाले आहेत." पुढे राष्ट्रपतींची निवड झाल्यानंतर पंतप्रधान व त्यांचे दोन सहकारी यांच्यावर शिस्तभंगाच्या कारवाईचा प्रश्न निर्माण झाला. कॉंग्रेस पक्ष दुभंगण्याची वेळ आली. याही वेळी श्री. चव्हाण यांनी ऐतिहासिक कामगिरी बजावून कॉंग्रेसच्या कुडीत ऐक्याचा प्राणवायू आणला. कारण कोणत्याही वादग्रस्त प्रश्नात दोन्ही पक्षांना ते हवेहवेसे वाटण्याची एक अजोड हातोटी त्यांच्यात आहे. या आणीबाणीच्या वेळी त्यांनी कॉंग्रेस पक्षाला मोठ्या संकटातून वाचवून सिंडिकेट व इंडिकेटचा प्रथमतः तरी एकोपा घडवून आणला.

यानंतर तामिळनाडू कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. सी. सुब्रह्मण्यम यांनी अतिशय महत्त्वाचे व सत्य असे निवेदन केले. त्यामुळे यशवंतरावांची अत्यंत उज्ज्वल अशी प्रतिमा दिसू लागली. श्री. सी. सुब्रह्मण्यम् म्हणाले की, "गृहमंत्री श्री. चव्हाण

यांनी राष्ट्रपति-पदाच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतरच आपल्या वृत्तीत पालट केला असा त्यांच्यावर आरोप करण्यात येत आहे खरा; परंतु त्या निवडणुकी पूर्वींदेखील श्री. चव्हाण यांनी श्री. कामराज यांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, श्री. संजीव रेड्डी यांना पाठिंबा देण्याच्या बाबतीत फक्त मी वचनबद्ध झालेलो आहे. त्यानंतर मला सिंडिकेटशी काहीही करावयाचे नाही. " श्री. चव्हाण यांनी पक्ष–हिता-साठी व देशहितासाठी स्वार्थ बाजूला ठेवला व पंतप्रधानकी मिळत असता तिचा अव्हेर केला याबद्दल मी श्री. चव्हाणांचा गौरव करीन " असेही त्यांनी स्पष्ट शब्दांत नमूद केले. हे उद्गार श्री. चव्हाण यांच्या लोभातील महाराष्ट्रीयन व्यक्तीचे नसून श्रीमती इंदिरा गांधींच्या अत्यंत विश्वासातल्या पुढाऱ्याचे आहेत, हे लक्षात घेतल्यावर " लोकशाही समाजवादाच्या ध्येयासाठी पंतप्रधानपदाचे आमिष ठोकरून लावून मनाचा मोठेपणा दाखविणारा हा भारताच्या इतिहासातील एकमेव नेता होय याची मूर्तिमंत साक्ष पटते. "

या उद्गारावरून श्री. यशवंतराव चव्हाण यांची थोरवी स्पष्ट होते. ते पंडित नेहरूंच्या विचारसरणीशी किती समरस झालेले आहेत हे दिसून येते. त्यांची नेहरूनिष्ठा म्हणजे नेहरूंच्या विचाराशी एकरूप होण्याची बौद्धिक पातळी होय.

चिरतरुण यशवंतराव, आपण देदिप्यमान कीर्तीचे नित्यनूतन वीराग्रणी असे धीरोदात्त नेते आहात ! महाराष्ट्रीय जनतेच्या गळ्यातील ताईत आहात. महामना यशवंतराव, आपण, तरुणांचे स्फूर्तिस्थान, ध्येयवाद्यांचे आशास्थान व बहुजनसमाजातील उदयास आलेली शक्ती आहात. हे यशशेखर यशवंतराव, आपल्या राजकीय कर्तृत्वाची इमारत लोकप्रेमाच्या मजबूत पायावर उभी आहे.

卐 卐 卐

यशवंत–जीवनमंदिरातील

चि रं त न स्मृ ति–गं ध

## या विभागातील स्मृतिकार

- ★ तर्कतीर्थ **लक्ष्मणशास्त्री जोशी**, अध्यक्ष, महाराष्ट्रराज्य साहित्य मंडळ
- ★ श्री. **शंतनुराव किर्लोस्कर**, संचालक, किर्लोस्कर ऑईल एंजिन्स
- ★ श्री. **धोंडो वासुदेव गद्रे** ऊर्फ काव्यविहारी, बी. ए., एल्एल्. बी.
- ★ सौ. **लीलाबाई भगवानराव पवार**, अध्यक्ष, महिला कॅांग्रेस मंडळ
- ★ श्री. **गोपीनाथ तळवलकर** संचालक, बालविभाग, आकाशवाणी
- ★ श्री. **सोपानदेव चौधरी**, कवी, ' सोपानदेवी '
- ★ श्री. **गोपाळ नीळकंठ दांडेकर**, ले. महाराष्ट्र दर्शन
- ★ श्री. **राम निसळ**, संपादक, ' आझादहिंद '
- ★ श्री. **का. न. केळकर**, एम्. ए., एल्एल्. बी. ॲडव्होकेट
- ★ श्री. **शिवाजीराव शेळके**, मेजर, सैनिक अधिकारी
- ★ श्री. **ग. ना. आंबेकर**, संपादक ' प्रियदर्शन '
- ★ श्री. **बाळ जगन्नाथ पंडित**, एम्. ए. एलएल. बी. ॲडव्होकेट
- ★ श्री. **बापूसाहेब भापकर**, एम्. ए. एल्एल्. बी. ॲडव्होकेट
- ★ श्री. **माधवराव बागल**, माजी अध्यक्ष, प्रजापरिषद
- ★ श्री. **भवानीशंकर पंडित**, बी. ए. एल्एल्. बी. ॲडव्होकेट
- ★ श्री. **वामन नारायण देशपांडे**, एम्. ए., एल्एल्. बी. ॲडव्होकेट
- ★ श्री. **वसंतराव शा. वैद्य**, चिटणीस, केंद्रीय कर्मचारी मंडळ
- ★ श्री. **बापूजी साळुंखे**, संचालक, श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था
- ★ श्री. **रामचंद्रराव नामदेवराव भांगरे**, सदस्य, नाशिक जिल्हा परिषद.
- ★ श्री. **गो. ध. टेकाळे**, एम्. ए., बी. एड. प्रा. सैनिकी स्कूल.
- ★ श्री. **ज. शं. जमदग्नी**, प्राचार्य, एम्. इ. एस. कॉलेज
- ★ सौ. **ज्योत्स्ना भोळे**, स्वरवंदना पुणे
- ★ सौ. **शिरीष पै**, संपादिका, ' दैनिक मराठा. '

★ ★ ★

# राजकीय सहयात्री

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, वाई

श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यासंबंधी १९३० सालापासून आठवाव्या अशा अनेक आठवणी सांगता येतील. त्यावेळी श्री. यशवंतराव चव्हाण हे माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी होते. त्या सुमारासच राजकारणाकडे आकृष्ट होऊन सामील झालेल्या विद्यार्थ्यांपैकी म्हणून मी त्यांना ओळखू लागलो. ही ओळख १९३४-३५ च्या सुमारास दृढ झाली. त्यावेळी काँग्रेसच्या नेतृत्वावर परंपरागत राष्ट्रवादी विचाराची छाप फार खोल होती. ब्रिटिशांचे राज्य नष्ट करणे हीच भावना प्रभावी होती. सामान्य जनतेच्या जीवनातील क्रांती किंवा सामान्य माणसाची सामाजिक व आर्थिक बंधमुक्ती हा राजकीय स्वातंत्र्याचा खोल आशय बनला पाहिजे, अशी वैचारिक बैठक परंपरागत राष्ट्रवादाला तोपर्यंत लाभली नव्हती. सातारा जिल्ह्यातील काँग्रेसजनांत राष्ट्रीय क्रांतीचा असा नवा अर्थ पाहणारा जो नवा लहानसा गट तयार झाला त्यांत माझ्याबरोबर जी विशीच्या आतबाहेर असलेली तडफदार तरुण मंडळी सामील झाली त्यात श्री. यशवंतराव अधिक चमकून दिसू लागले. मनाने प्रौढ व वयाने लहान असे उमेदीने भरलेले हे तरुण गृहस्थ या आमच्या नव्या गटाचे नेतृत्व आत दाखल होताच थोडयाच वर्षात करू लागले. सातारा जिल्ह्याच्या काँग्रेसचे श्री. चव्हाणांचे नेतृत्व निर्विवादपणे मान्य करून मी त्यावेळी काम करीत होतो. संघटनेची शिस्त ही राजकारणातील एक पवित्र गोष्ट आहे, याची जाणीव त्या लहान वयातच दाखविण्याचा श्री. चव्हाण यांचा हा पहिला प्रसंग होता.

आमच्या या नव्या गटाला क्रांतिकारक विचारसरणीचे शिक्षण एम. एन्. रॉय यांच्या लिखाणातून मिळाले होते. सातारा जिल्हा काँग्रेसने जिल्ह्याच्या राजकीय परिषदेचे अधिवेशन त्यांच्या अध्यक्षतेखाली तासगाव येथे १९३७ साली भरविले. श्री. चव्हाण यांनी भारतीय सामाजिक क्रांतीतील किसानांचे स्थान आणि राजकीय क्रांतीचे तंत्र या विषयावर रॉय यांच्याशी सविस्तर खल केला. श्री. चव्हाण यांच्या विचाराची चमक पाहून रॉय यांना विशेष कौतुक वाटले.


१९४० साल म्हणजे दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा प्रारंभ काल होय. जागतिक लोकशाहीचे संरक्षण झाले तरच वसाहतींचा व विशेषतः भारताचा स्वातंत्र्यसंग्राम सफल होईल. ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध भारतीय स्वातंत्र्य हा लढा आता महत्त्वाचा राहिला नाही. तो जिंकण्याकरिता प्रथम जागतिक लोकशाहीचा लढा जिंकला पाहिजे, असा विचार एम्. एन्. रॉय यांनी मांडला. ब्रिटिश साम्राज्यशाहीचा आर्थिक पाया दुसऱ्या महायुद्धात पूर्ण खतम होऊन जाईल, भारत

मुक्त होण्यास नंतर अधिक अनुकूल परिस्थिती उत्पन्न होईल, त्याची चिंता आता यावेळी नको, असे रॉय मोठ्या भविष्यवाद्याच्या आत्मविश्वासाने प्रतिपादू लागले. मला ही रॉय यांची मीमांसा पूर्ण मान्य झाली. या समयी मी व माझे अनेक राजकीय सहकारी यांचे मतभेद होऊन रॉय यांचे बरोबर कॉंग्रेसमधून बाहेर पडलो. श्री. चव्हाण हेच यास अपवादभूत ठरले. त्यांचे कॉंग्रेस संघटनेवरील प्रेम फार खोल होते. नव्या उमेदीत निर्माण झालेले होते. त्यांच्या प्रेमाचाच शेवटी विजय झाला.

१९५५-५६ हे साल राज्य-पुनर्रचनेच्या प्रचंड आंदोलनाचे साल होय. महाराष्ट्रातील राजकारणात प्रचंड उलथापालथी याच वेळी झाल्या. कॉंग्रेस संघटनेवर प्राणघातक प्रहार यावेळीच पडले. या कालखंडापासूनच महाराष्ट्र राजकारणातील श्री. चव्हाण पर्व सुरू झाले, असे म्हणता येईल. या संघटनेवरच सर्व राष्ट्राची मदार व जबाबदारी आहे. राष्ट्राची जबाबदारी वाहणारी दुसरी कोणतीच व्यापक संघटना या देशात आज उपलब्ध नाही. राष्ट्राच्या सुरक्षिततेकरिता कॉंग्रेस ही बलशाली राहिलीच पाहिजे. कॉंग्रेसचे बळ म्हणजे श्री. नेहरूंचे नेतृत्व, असे समीकरण त्यांनी मांडले. या विचाराने प्रेरित होऊनच संघटनेच्या नीतिशास्त्राचे परिपूर्ण पालन श्री. चव्हाण यांनी आणीबाणीच्या प्रसंगी केले. कॉंग्रेस संघटनेला व राष्ट्रनेत्यांना महाराष्ट्रातील आघाडी सांभाळणारा नवा माणूस श्री. चव्हाणांच्या स्वरूपात सापडला. त्यामुळे द्विभाषिक मुंबई राज्याचे नेतृत्व श्री. चव्हाणांना प्राप्त झाले. श्री. चव्हाणांच्याबद्दल महाराष्ट्रात या क्षणापर्यंत खूपच विविध प्रकारचे गैरसमज होते. त्यामुळेच द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्रिपद प्राप्त झाल्यानंतर अनेक आश्चर्याचे धक्के देत श्री. चव्हाणांचे कर्तृत्व उजळून विकसित होऊ लागले.

आमच्या सत्ताधाऱ्यांशी जगातील इतर सत्ताधाऱ्यांची तुलना करण्याच्या प्रसंगी आमच्या मंडळींचा गांधीवादी वारसा प्रथम लक्षात येतो. राज्यसत्ता वापरताना हा अहिंसावादी वारसा, नव्या लोकशाही नेतृत्वाचे रहस्य ज्यांस समजेल तेच चालवू शकतील. खरेखुरे आधुनिक लोकशाही नेतृत्व म्हणजे पक्षीय नेतृत्व नव्हे, कारण विसाव्या शतकाच्या मध्यान्हात डावे व उजवे भेद सुद्धा पाश्चात्त्य राष्ट्रात वरपांगी ठरत आहेत. भारतातही तसे ते ठरू शकतील. पक्षातीत भावनेचे लोकशाही नेतृत्व भारतात काय किंवा अन्यत्र काय, वाढीस लागले तरच त्याला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाचे मर्मग्रहण होऊ शकेल. हे मर्म ज्या प्रज्ञावंतास अधिक समजू शकेल तोच राष्ट्रीय वा जागतिक राजकारणास योग्य वळण देऊ शकेल. श्री. यशवंतराव चव्हाण राज्यकारभारात विरोधी पक्षांनाही विश्वासात घेतात, हे अशा व्यापक लोकशाही नेतृत्वाचेच लक्षण आहे. धीरोदात्त व मधुर व्यक्तिमत्त्व श्री. चव्हाणांच्या ठिकाणी विकास पावत आहे याचा प्रत्यय आता केवळ महाराष्ट्रासच नाही तर सर्व भारताला येऊ लागला आहे.


卐 卐 卐



इंदिराजी, कसली काळजी करता ? तिकडची खासी स्वारी आपल्या
सहकार्याला सज्ज असताना आपणाला चिंता करण्याचे कारण ते काय ?



सौ. वेणूताई चव्हाण आणि सौ. कमलादेवी जाधव, श्री. यशवंतराव चव्हाण व
डॉ. पंजाबराव जाधव यांचा हा कौटुंबिक जिव्हाळ्याचा भोजन-प्रसंग.



भारतीय काँग्रेसच्या अंतर्गत फुटीमुळे निर्माण झालेली ही चिंता तर नव्हे ?
काँग्रेसच्या इतिहासात असे अनेक प्रसंग आले तरी काँग्रेस नष्ट झाली नाही.
देशाचे ऐक्य अभंग राहून समाजवादाची द्रुतगतीने वाटचाल करण्यासाठी
कंबर कसली पाहिजे. या तुमच्या चिंतनात भारताच्या भावी जडणघडणीचे
चित्र तयार होत आहे हे खास !

# कर्तृत्ववान स्नेही

## श्री. शंतनुराव लक्ष्मणराव किर्लोस्कर, संचालक, किर्लोस्कर ऑईल इंजिन्स, पुणे

श्री. यशवंतराव चव्हाणांचा आणि किर्लोस्करवाडीचा संबंध ते शाळेत शिकत होते तेव्हापासून आला. एकदा त्यांच्या शाळेतल्या मुलांना किर्लोस्करवाडीचा कारखाना पाहायला नेलं. निघताना त्यांच्या मुख्याध्यापकांनी त्यांना सांगितलं, "वाडीला पाहण्यासारख्या दोन गोष्टी, एक कारखाना आणि दुसरे कारखान्याचे मालक लक्ष्मणराव किर्लोस्कर." ही आठवण त्यांनी स्वतःच सांगितली. कै. पपांबद्दल त्यांना लहानपणापासून आदर आणि अभिमान वाटायचा.

शेजाऱ्यांचा घरोबा वाढतो तसा आमचा हा संबंध सारखा वाढत राहिला. यशवंतराव कऱ्हाडचे, किर्लोस्करवाडी आणि कऱ्हाड ह्या दोन गावांतलं अंतर फक्त बत्तीस मैलांचं आहे. पण तरीही आमचं जाणंयेणं कमीच. कारण आमची व्यवसायक्षेत्रं निरनिराळी आहेत. मी उद्योगक्षेत्रातला आणि यशवंतराव राजकारणातले. असं अंतर असलं आणि जरी आमच्या वरचेवर गाठी-भेटी होत नसल्या तरी एकमेकांबद्दल आम्हांला वाटणारा व्यक्तिगत आदरभाव मात्र कमी झालेला नाही. यशवंतरावांनी मिळविलेल्या यशाबद्दल मला नेहमीच आदर आणि अभिमान वाटतो. राजकारणात त्यांनी मिळविलेलं यश महाराष्ट्रातल्या फारच थोड्या पुढाऱ्यांनी मिळवलं आहे.

त्यांच्या यशाचं मर्म त्यांच्या मनाच्या घडणीत आणि व्यक्तिगत विचारसरणीत आहे. आजच्या राजकीय परिस्थितीत अतिरेकी भूमिका घेऊन अनेक गट निर्माण होतात. तसे ते होणं आवश्यक आहे असंही मानलं जातं. मला वाटतं, यशवंतराव ही अतिरेकी भूमिका शक्य तो टाळतात. आताच्या क्षणाला बरोबर किंवा चूक काय वाटते ह्याबरोबरच नजीकच्या आणि दूरच्या भविष्यकाळी आजच्या घटनांचे काय प्रतिसाद उमटतील ह्याचा विचार करून ते आपली भूमिका ठरवितात आणि अतिरेक टाळतात, असा माझा समज आहे.

त्यांच्या ह्या विचारसरणीमुळे मला ते जवळचे वाटतात. व्यवसायक्षेत्रातही यश मिळविण्यासाठी ह्या प्रकारच्या विचारसरणीची आवश्यकता असते. राजकारणात यशवंतराव ज्या संथ भूमिकेतून समाजाच्या भविष्याकडे पाहतात, तीच संथ भूमिका व्यवसायक्षेत्रातही संभाळावी लागते.

शासनाच्या आर्थिक धोरणाबद्दल आमचे मतभेद जरूर आहेत. पण ह्या मतभेदांमुळे आमच्या वैयक्तिक मित्रत्वाच्या संबंधाला बाध आलेला नाही. आमची दोघांची गाठ पडली म्हणजे आम्ही राजकारण आणि अर्थकारण ह्यावर चर्चा न करता आमच्या संबंधितांच्या आणि जुन्या मित्रांच्या आठवणींमध्ये रमून जातो. एकमेकांच्या प्रकृतीपासून मुलाबाळांच्या शिक्षणापर्यंतचे सगळे विषय निघतात. क्वचित

होणाऱ्या आमच्या अशा भेटीत, म्हणूनच मला वाटते, जिव्हाळाही अधिक असतो. जे राजकारणात नाहीत पण ज्यांचे आणि यशवंतरावांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत त्यांचाही अनुभव असाच असावा, असे मला वाटते.

पण आम्ही राजकारणाबद्दल कधीच बोलत नाही, असं मात्र नाही. एकदा राजकारणाबद्दल आम्ही नुसतेच बोललो नाही तर एकमेकांविरुद्ध निश्चित भूमिका घेऊन पैजही मारली होती. मुद्दा होता की मागच्या अमेरिकन अध्यक्षीय निवडणुकीत अध्यक्ष म्हणून कोणाची निवड होणार, निक्सन की हंफ्रे ? मी म्हणालो, " निक्सन येतील. " गणित बांधून यशवंतराव म्हणाले, " हंफ्रे जिंकणार. " मी म्हणालो, " मी पैज मारायला तयार आहे. " यशवंतराव म्हणाले, " कबूल, पण मला झेपली पाहिजे. " आम्ही एक रुपयाची पैज मारली.

अध्यक्षीय निवडणुकीचा निकाल लागला, तेव्हा मी परदेशी होतो. परत आल्यावर यशवंतरावांना पत्र लिहून मी पैजेचा रुपया मागितला. यशवंतरावांचं उत्तर आलं. " मी पैज हरलो हे खरं आहे; पण पैजेचा रुपया वसूल करायला तुम्हांला दिल्लीला आलं पाहिजे. "

पुढे आठवडाभराने मी दिल्लीला गेलो तेव्हा यशवंतरावांनी आठवणीने पैजेचा रुपया मला दिला आणि त्या रुपयाबरोबर आपलेपणाचं मनमोकळं हास्य करीत ते म्हणाले, " तुम्ही जिंकलात खरे ! "

आमच्या स्नेहाचं स्वरूप असं आहे !

卐 卐 卐

## साहित्यप्रीती

### श्री. धोंडो वासुदेव गद्रे, ( काव्यविहारी ) बी. ए., एल्एल्. बी., सांगली.

भारताचे कर्तबगार गृहमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांचा व माझा प्रत्यक्ष परिचय फार थोडा म्हणजे फक्त एक तासाचा आहे. त्यांचा व माझा पत्रोपत्री परिचय बराच आहे. नामदार चव्हाण पत्रव्यवहारात अत्यंत नियमित आहेत. गृहमंत्रालयाच्या बहुविध कामात मग्न असतानासुद्धा माझ्या पत्रांची उत्तरं नियमित येतात आणि ही पत्रे औपचारिक नसून जिव्हाळ्याने भरलेली असतात. यशवंतरावांनी ज्याला आपला म्हटले त्याच्याबद्दलची आत्मीयता या त्यांच्या पत्रोत्तरावरून दिसून येते.

माझ्यावर व माझ्या काव्यावर यशवंतरावांचा फार लोभ आहे. सन १९३५ ते १९४० या काळात मी कऱ्हाडला अनेकवेळा गेलो होतो. तेथील टिळक

हायस्कुलात व माझे परम मित्र श्री. बाळासाहेब पाठक यांच्या घरी माझी अनेक काव्यगायनें झाली होती. त्यांतील काही काव्यगायनांना यशवंतराव उपस्थित होते; पण त्यावेळी त्यांचा व माझा परिचय नव्हता. मी त्यावेळी गायिलेल्या कवितांपैकी " कृष्णेच्या पुलावरून " ही कविता यशवंतरावांना विशेष आवडली होती. सांगली येथील स्टेशन चौकातील एका जाहीर सभेत यशवंतरावांनी या कवितेचा व तिचा कर्ता म्हणून माझा उल्लेख आपल्या भाषणात केला होता, असे मला माझ्या काही मित्रांकडून कळले. तेव्हा मला स्वभाविकपणेच आनंद झाला. या जाहीर सभेनंतर मला पाठविलेल्या एका पत्रात आपण या कवितेचा मुद्दाम उल्लेख केल्याचे यशवंतरावांनी मला कळविले होते. ही गोष्ट माझी प्रतिष्ठा म्हणून मी सांगितलेली नाही. पण यशवंतरावांसारख्या अत्यंत कार्यमग्न असलेल्या अखिल भारतीय नेत्याची साहित्यप्रीती किती उत्कट आहे हे दाखविण्यासाठी मी या घटनेचा उल्लेख येथे केला आहे. यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी वेळोवेळी दिलेली अनेक व्याख्याने " सह्याद्रीचे वारे " या महाराष्ट्र सरकारच्या एका प्रकाशनात संग्रहित केलेली आहेत. ही व्याख्याने मननपूर्वक वाचली म्हणजे यशवंतरावांचे राष्ट्रप्रेम किती उत्कट आहे याचा प्रत्यय येतो.

परमेश्वराने त्यांना आयुरारोग्य द्यावे व भारताची उज्ज्वल सेवा त्यांच्या हातून घडावी अशी उत्कट इच्छा त्यांचा नम्र चाहता म्हणून मी व्यक्त करतो.

卐 卐 卐

# क्रांतिकारक राजकारणी

सौ. लीलाबाई भगवानराव पवार, अध्यक्ष, महिला काँग्रेस मंडळ, कोल्हापूर.

१९४२ साल ! परकीयांच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करण्यासाठी साऱ्या भारतीयांनी आपले प्राण पणास लाविले होते. " चले जाव " च्या घोषणांनी सर्व भारत दुमदुमला होता. चळवळी दडपून टाकण्यासाठी ब्रिटिश सत्तेच्या गोळी-बारांच्या फैरी झडत होत्या. रक्ताचे पाट वाहिले जात होते. हजारो कार्यकर्ते रोज तुरुंगात जात होते. त्यांना उघड्या पाठीवर फटके बसत होते !

कोल्हापूर जिल्हाही १९४२ च्या क्रांतिलढ्यात आघाडीवर होता. सत्याग्रह, सभा, मिरवणुका, प्रभातफेऱ्या यांच्या उठावाने सर्व कोल्हापूर जिल्हा पेटला होता. अनेक कार्यकर्त्यांनी ब्रिटिश राजवट उलथून पाडण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. मी तेव्हा दहा-अकरा वर्षांची होते. आमच्या घराशेजारीच आमच्या मामांचे घर होते. मामांच्या घरात त्यावेळी क्रांतिकारकांच्या पुढील चळवळींच्या

कार्यक्रमाचा खल चालत असे. त्यांतील एका व्यक्तीकडे त्या सर्व क्रांतिकारकांचे नेतृत्व होते. ती व्यक्ती म्हणजे यशवंतराव चव्हाण होत! तहान, भूक, थंडी, वारा, पाऊस, कष्ट, गोळीबार यांची पर्वा न करता यशवंतराव त्या काळात भारतीय स्वातंत्र्यासाठी अहोरात्र झटत होते. ब्रिटिश पोलिसांची त्यांच्यावर त्यावेळी कडक नजर होती. ते आमच्या मामांचे घरी येत तेव्हा मी त्यांना आमच्या घराच्या मागील बाजूने मामांच्या घरी नेत असे. इतर क्रांतिकारकांच्याकडून आलेली पत्रे मी त्यांना नेऊन देत असे. स्वातंत्र्य लढयात त्यांच्या सहवासात राहून त्यांचे छोटेसे का होईना काम करीत होते, याचा आज मला अभिमान वाटतो. यशवंतरावांचे मला जे पहिले क्रांतिमय दर्शन घडले ते असे!

आज तेच क्रांतिकारक यशवंतराव भारताच्या गृहमंत्रिपदावर विराजमान झाले आहेत. महत् कष्टाने मिळालेल्या स्वातंत्र्याची जणू ते जोपासना करीत आहेत. क्रांतिकारक यशवंतराव असे मानाने मोठे होत गेले पण ते सामान्य कार्यकर्त्यांजवळ गेले की, आपले मोठेपण पार विसरून जातात. सामान्य कार्यकर्त्यांशी मनमोकळेपणाने बोलतात. मग तो कोणत्याही पक्षाचा असो.

ते एकदा विश्रांतीसाठी पन्हाळा किल्ल्यावर आले होते. कोल्हापूरच्या काही ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या बरोबर मीही पन्हाळ्यावर गेले होते. सर्वांचा परिचय करून देण्यात आला. मी संयुक्त महाराष्ट्र समितीविरुद्ध नगरपालिकेत कॉंग्रेस पक्षाची स्थापना केली आहे, असे सांगताच माझा त्यांनी गौरव केला. कॉंग्रेसचं कार्य असंच जिद्दीनं करा, असे प्रोत्साहन दिले. तो जिव्हाळ्याचा उपदेश शिरसावंद्य मानून मी कार्य करीत आहे. काही मोठी माणसं सामान्य कार्यकर्त्यांत इतक्या आत्मीयतेने मिसळत नाहीत. नीट बोलत देखील नाहीत. नामदार यशवंतराव हे मात्र या गोष्टीला अपवाद आहेत. सामान्य कार्यकर्त्यांत मिसळून वागणे, हा त्यांचा मोठा गुण आहे. छत्रपती शिवाजी-महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देण्याऱ्या पन्हाळा किल्ल्यावर मला राजकारणी यशवंतरावांचे दर्शन झाले.

卐 卐 卐

## संयमी आणि विदग्ध नेता

श्री. गोपीनाथ तळवलकर, प्रोड्यूसर, बालविभाग, आकाशवाणी, पुणे.

१९४८ साली दैनिक मन्वंतर निघाले आणि माझे मित्र श्री. कोकाटे यांनी माझी अग्रलेख लिहिण्यासाठी नेमणूक केली. त्यानंतर काही दिवसांनी त्यांनी श्री. यशवंतराव चव्हाण यांना मन्वंतराला भेट देण्यासाठी बोलाविले.

जवळ जवळ दोन तास त्यांनी मन्वंतर कार्यालयात काढले. तीच त्यांची माझी पहिली भेट. ती प्रदीर्घ होती, जिव्हाळ्याची होती आणि त्याच भेटीत यशवंतराव इतक्या आपुलकीने बोलले आणि इतक्या कौतुकाने त्यांनी माझ्या अल्पस्वल्प गुणाबद्दल आस्था दाखविली की जणू काय आपण अनेक वर्षे एकमेकांना ओळखत आहो असे मला वाटले. तो पहिला ऋणानुबंध पुढे अधिक दृढ होत गेला. त्या काळानंतर यशवंतरावांच्या जबाबदाऱ्या सतत वाढत गेल्या आणि आज तर ते अखिल भारतीय नेतृत्वाच्या पहिल्या रांगेत प्रमुख होऊन राहिले आहेत. आता ते क्वचितच भेटतात आणि भेटतात तेव्हाही कार्यव्यग्र असतात. पण दहा पाच मिनिटे भेट झाली तरी त्यांना आपली विशेष आठवण येते, असा भाव माणसांच्या मनात उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाही.

संयम हा यशवंतरावांचा विशेष गुण आहे. ते मताचे आग्रही आहेत. त्यांच्या आवडी-निवडी उत्कट आहेत. परंतु बोलताना त्यांचा तोल कधीही ढळत नाही. त्यांची अनेक भाषणे मी ऐकली आहेत. अगदी प्रख्यात साहित्यिकांच्या मैफलीतही यशवंतराव फड मारून जातात. कारण ते हाडाचे रसिक आहेत. आपल्या विचार-कल्पनांना गोंडस शब्दरूप कसे द्यावे हे त्यांना उत्तम कळते. शब्दांची निवड मोठ्या कसोशीने केलेली असते. समोर श्रोते कसे आहेत हे पाहून ते आपल्या भाषणाची पट्टी ठरवितात. आठवणी आणि विनोद यांचा समप्रमाण मसाला घालून जे सांगायचे ते रुचकर करणे यात त्यांचा हातखंडा आहे. अगोदरच्या वक्त्याने काही बंडखोर विधान केले असले किंवा उग्र मतभेद दाखविलेला असला तर ते नेमके लक्षात ठेवून आपल्या भाषणात अशी काही गमतीदार पलट घेतात की निरुत्तर झालेल्या वक्त्यालाही आनंद व्हावा.

आपले ऋणानुबंध टिकविण्यात ते तत्पर आहेत. यशवंतरावांची ज्ञानलालसा आणि ध्येयनिष्ठेबद्दल त्यांना वाटणारा आदर या दोन गोष्टी मला त्यांच्या रसिकते-इतक्याच विलोभनीय वाटतात. आज महाराष्ट्रात त्यांनी आपले एकछत्री नेतृत्व निर्माण केले आणि ऐतिहासिकदृष्ट्या नवीन पुरोगामी वळण देण्याची महान कामगिरी बजावली. प्रतिस्पर्धीही त्यांच्याजवळ विश्वासाने जाऊ शकतात आणि त्यांच्याशी मतभेद असणारेही त्यांच्याबद्दल आदर दाखवितात. ते मनमिळाऊ असले तरी उथळ नाहीत आणि राजकारणाच्या धकाधकीतही त्यांनी आपली ज्ञानलालसा कायम ठेवली आहे. त्यांची प्रत्येक भेट मला संस्मरणीय आणि स्फूर्तिदायक वाटते. यशवंतरावांचे प्रभावी नेतृत्व या देशाला बराच काळ लाभावे अशी प्रार्थना.

卐 卐 卐

# अमृताच्या वेली, अमृताची फळे

श्री. सोपानदेव चौधरी, कवी ' सोपानदेवी ' नासिक.

यशवंतराव चव्हाण हे मुख्यमंत्री असताना धुळे येथील आर्टस् आणि सायन्स कॉलेजचे उद्‌घाटक म्हणून लाभले होते. त्या प्रसंगी तेथील प्राचार्यांनी कवि-संमेलनही आयोजित केले होते. कविवर्य यशवंत, श्री. बोरकर, सौ. संजीवनी मराठे, सौ. पद्‌मा गोळे आणि मी अशा पाच कवि-कवयित्रींना निमंत्रित करण्यात आले होते. त्या समारंभातील नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणाचे पडसाद अजून माझ्या कानी आहेत. प्रथम आम्हां पाचही कविजनांना संबोधून त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. विद्यार्थिवर्गाला आदेश देताना ते म्हणाले, " विश्वविद्यालय म्हणजे काय ? दगड–विटांच्या भिंतीच्या आतच ते असते काय ? अशा या शाळा–कॉलेजांमध्ये तर आपण शिकतोच, शिकणे क्रमप्राप्तच असते. परंतु त्याचबरोबर जगाच्या शाळेचा अभ्यासही हवा. अनुभवातून मिळालेले ज्ञान हे अधिक मोलाचे असते. तुमचे स्वत्व तुम्हांला शोधायला पाहिजे. " सामाजिक कार्यात उडी घेतल्या-नंतर कष्टाचे ओझे कसे वाटत नाही, याबद्दल त्यांनी उदाहरण दिले होते ते येथे आठवते म्हणून मी सांगतो. ते म्हणाले, " गंगेतून एक एक घागर भरून आणली म्हणजे शिरावर पाण्याचा भार पडतो. मान खिळखिळी होते. परंतु गंगेत बुडी मारल्यानंतर आपल्या शिरावर लाखोगणती टन पाणी असते ! त्यांचा भार आपणांस काहीच वाटत नाही. लोकगंगेत बुडी घेणाऱ्याचे असेच असते. समारंभ नुसते साजरे होऊन उपयोगी नाही. तर ते सार्थ व्हावयास हवेत. " वगैरे गोष्टी विद्यार्थ्यांना त्यांनी प्रभावीपणे सांगितल्या.

मी मुंबईला असताना मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा मला एक निरोप आला. त्यांचा मला निरोप यावा इतका त्यांचा व माझा परिचय नव्हता. मला फार आश्चर्य वाटले. मी त्यांना सचिवालयात भेटायला गेलो. त्यांच्या भेटीला जाण्याची अशी माझी पहिलीच वेळ होती. " घोडे कधी न दमती रविच्या रथाचे, उल्लंघितो पवन भाग सदा नभाचे. " अशा व्यापात भेट घ्यायला खूपच वेळ लागेल असे मला वाटले. परंतु मी आल्याची वर्दी मिळताच त्यांनी मला बोलावून घेतले. त्यांना भेटायला आलेल्या लोकांची भलीमोठी रांग बघून त्यांचा जास्त वेळ घेणे मला दुष्टपणाचे वाटले. तरीपण मला अपेक्षा होती त्यापेक्षा जास्त वेळ त्यांनी माझ्याशी चर्चा केली. विशेषतः " प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा " या महाराष्ट्र-गीता-बद्दल बोलताना ते मला म्हणाले, " विदर्भाप्रमाणे मराठवाड्याचे काही लोक या गीतासंबंधी एक आढी घेऊन बसले आहेत की, या महाराष्ट्र-गीतात विदर्भ आणि मराठवाडा यांचा उल्लेख नाही. वास्तविक हे महाराष्ट्र-गीत विदर्भातील श्रीपाद कृष्ण

कोल्हटकरांचेच आहे. त्यांना त्याची जाणीव झाली नसती का ? या महाराष्ट्र गीतात महाराष्ट्राची शक्ती आणि आकांक्षा सामावलेल्या आहेत. " मर्यादा पौरुषासि जेथ दुःसहा, आकांक्षापुढति जिथे गगन ठेंगणे, " ही शक्ती आहे. यात भूगोलाला स्थान नाही. इतिहासाला आहे त्यातील तेजाला, शौर्याला आहे. सह्याद्री हा महाराष्ट्राचा म्हणजे सर्वांचा आहे. सह्याद्रीचा उल्लेख असह्य होऊन कसे चालेल ? कारण याच सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून क्रांती स्फुरलेली आहे. गडागडावर विजयध्वज फडकलेले आहेत ! " जनता थोडी जरी नाराज झाली तरी त्यावर यशवंतराव किती विचार करतात, याचा मला यावेळी प्रत्यय आला.

नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय पैलूबद्दल मी काय सांगणार. त्यांचे या क्षेत्रातले यशापयश, जयविजय सर्वांना माहीत आहेत. अनेक मुखांनी ते बोलले गेले आहेत. अनेक लेखांनी लिहिले गेले आहेत. राजकारणी पुरुषाचे असे हे व्यक्तिमत्त्व जाहीरच असते. परंतु व्यक्तिगत स्वभावाचे पैलू मात्र जनतेला फारसे माहीत नसतात. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतरची त्यांची मुख्यमंत्री म्हणून जी कारकीर्द गाजली ती आणि पाकिस्तान युद्धाच्या वेळी त्यांचे जे कर्तृत्व फुलले आणि फळाला आले ते म्हणजे त्यांच्या राजकीय कीर्तीचा कळसच होय. त्यांचे हे यशोपमान कुणालाही नाकबूल करता येणार नाही. उठलेली व उठविलेली वादळे शांत करणे, उभय पक्षांतील मतभेद नाहीसे करणे यात तर त्यांचा हातखंडा आहे. मातृभूमीच्या या सुपुत्राची झेप अजून संपलेली नाही. पुढत पुढत पुढती, म्हणून सर्वोच्च मानाचे स्थान त्यांना विभूषित करावयाचे आहे. आमच्या सदिच्छाच तसे बोलून उठत आहेत. आज ग्रंथरूपाने त्यांच्या गौरवाचा गौरीशंकर आपण उभा केला. गौरव हे येतात आणि जागीच ठेवून निघून जातात. " गौरव गौरवापुरते, फळ सत्यसंकल्पाचे ! " या सत्य संकल्पाची वाटचाल अजूनही ते करीत आहेत. " अमृताच्या वेली, अमृताची फळे " हा अमृतयोग त्यांच्या बाबतीत घडून येईलच !

विधात्याने मानवाच्या वाट्याला जेवढे म्हणून आयुष्य दिले आहे तेवढे कार्यक्षमतेसह त्यांना लाभो, ही शुभेच्छा !

卐 卐 卐

## एक मऱ्हाठे व्यक्तिमत्त्व

श्री. गोपाल नीलकंठ दांडेकर, तळेगाव दाभाडे, ( पुणे )

मी व श्री. पु. ना. देशमुख यांनी स्वतः मुख्यमंत्र्यांना भेटून त्यांना " आम्ही भगीरथाचे पुत्र " हे पुस्तक सप्रेम भेट म्हणून देण्याचे ठरविले. या कादंबरीच्या पूर्ततेसाठी प्रत्यक्ष जागेच्या ठिकाणी मनसोक्त हिंडून सगळा बुडणारा प्रदेश आम्ही पायाखाली घातला होता. असे कष्ट सहन केल्याने नव्या भारताच्या घडणीतले एक अनमोल रत्न जे भाक्रा धरण त्याच्या विषयीची ही कादंबरी त्यांना समक्ष भेटूनच देणे योग्य होते.

आम्ही दोघे सचिवालयात गेलो. अगदी वरच्या मजल्यावर मुख्यमंत्र्यांचे कार्यालय आहे, तेथे जाऊन थडकलो. तेथील शिपायाला एका कागदावर आमचे नाव व काम लिहून दिले. तो गेल्यावर आम्ही इकडे तिकडे पाहू लागलो. अनेक प्रकारची माणसे मुख्यमंत्र्यांच्या कचेरीत शिरत होती. ताटकळून आमची पाठ दुखू लागली होती. पण तासाभराने चपराशी आला व म्हणाला, " अहो, पुस्तकवाले, चला. " आम्ही बिचकतच त्याच्या मागे गेलो. दरवाजा लोटून पाहिले की फाईलींचा ढीग हातावेगळा करून एक थोराड बांध्याचा पुरुष बसला आहे. वर्ण काळासावळाच आहे पण तेजस्वी आहे. हाताच्या कोपऱ्यावर फाटलेल्या सदऱ्याला ठिगळ लावलेले पाहून मात्र हा माणूस आपल्यातलाच वाटू लागला.

चष्म्यातून किंचित रोखून आमच्याकडे पाहिल्यावर यशवंतराव म्हणाले, " या, काय आणलेत ? बसा ! " आम्ही खुर्चीवर बसलो. आमची नावे व येण्याचे प्रयोजन सांगून पुस्तक त्यांच्यासमोर ठेवले. ते उलथे-पालथे-हाताळीत यशवंतराव म्हणाले, " काय पंजाबात गेला होतात ? किती दिवस राहिला तेथे ? " थोडक्यात पुस्तकाची जन्मकथा ऐकविली. यशवंतराव कुतूहलाने ते सगळे ऐकत होते. शेवटी मी म्हणालो, ' सवड होईल तेव्हा पुस्तक चाळून एखादी ओळ लिहाल ? '

" अवश्य ! आपण निश्चिंत असा. आणखी काय ? "

" आणखी एक. एकदा कोयना धरणाचे काम लक्षपूर्वक पाहावयाचे आहे. "

" जरूर ! केव्हा जाता तिकडे ? जाल त्यापूर्वी मला लिहा, न विसरता. "

आमचे काम संपले. स्मितहास्यपूर्वक नमस्कार करून आम्ही बाहेर पडलो. वर्षभरानेच कोयनानगरमध्ये शाळेच्या वार्षिक समारंभानिमित्त जाण्याचे ठरले. त्याआधी मुख्यमंत्र्यांना ते कळविले. चौथ्या दिवशी कोयनानगरच्या कार्यकारी अभियंत्याकडून पत्र आले की, आपण केव्हा येता ते कळवा म्हणजे आपल्या निवासाची व धरण पाहण्याची व्यवस्था केली जाईल. त्याप्रमाणे आम्ही कोयनानगरला

गेलो. तेथील समारंभातून मुक्त होतो तोच कोयनानगरच्या शाही मोटारी आम्हांला नेण्यास आल्या. सर्व व्यवस्था अगदी नेटकी ठेवली होती. सर्व प्रत्यक्ष हिंडून पाहिले. आज ज्या बोगद्यातून पाणी वाहात आहे, त्यातून केलेला प्रवास चित्तथरारक आहे. ही सर्व व्यवस्था पाहून शेवटी माझी इच्छा पूर्ण झाली. तेव्हा लक्षात आले की, हे नगण्य प्रकरण यशवंतरावांनी हाताळून आपला शब्द नेटकेपणाने पाळला आहे.

卐 卐 卐

## प्रेस उभा राहिला !

**श्री. राम निसळ**, संपादक, ' आझाद हिंद ', अहमदनगर.

१९६२ सालची गोष्ट ! मी मराठी पत्रकार परिषदेचा अध्यक्ष होतो आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार श्री. यशवंतराव चव्हाण हे परिषदेचे उद्‌घाटक होते. चौपाटीवरील सुंदर बीचवर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे पत्रकारांना मेजवानी होती. आम्ही पत्रकार नामदार यशवंतरावांशी मोकळ्या हवेत गप्पा मारीत बसलो होतो. माझ्याबरोबर माझी मुलगी कु. निवेदिता आणि मुलगा प्रकाश हे होते. लहानग्या प्रकाशला यशवंतरावांनी जवळ घेतले; पण प्रकाशने हसत हसत त्यांच्या हातातून आपली सुटका करून घेतली. तेव्हा यशवंतरावही हसत म्हणाले, " हा बापासारखाच बंडखोर दिसतोय ! " असे म्हणताच सर्वच मंडळी हसली.

थोड्याच दिवसांनंतर नामदार यशवंतरावांचा दौरा नगर जिल्ह्यात येण्याचे जाहीर झाले. मी कलेक्टर साहेबांना यशवंतरावांच्या भेटीबद्दल बोललो. वेळ नाही, कारण सर्व कार्यक्रम निश्चित झालेला आहे, असे त्यांनी सांगितले. अधिकाऱ्यासमोर काय बोलणार ? संगमनेर तालुक्यातील एका पाझर तलावाच्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमास नामदार यशवंतराव येणार होते तेथे मी गेलो. पूजन व सभा झाल्यावर सर्वांनी यशवंतरावांना घेरले. मला पाहताच यशवंतराव म्हणाले, " हे बघ, मी आलोय. कधी तुझ्याकडे यायचं बोल ? " " केव्हाही या, पण कलेक्टरसाहेब तर वेळ नाही म्हणतायत ! " नंतर वेळ नसल्याची तक्रार सर्व कार्यक्रम सांगून कलेक्टर साहेबांनी यशवंतरावांना खोड्यात टाकले. पण निश्चयाच्या स्वरात ते म्हणाले, " नाही, वेळ काढलाच पाहिजे ! उद्या सकाळी ७ वाजता पहिली भेट रामकडे ! " आणि अगदी तसेच घडले.

चार वर्षांनंतर नगरला न होणारा मोठा पाऊस झाला आणि माझ्या छापखान्याची इमारत खाली आली. इमारत पडल्यावर मला यशवंतरावांची आठवण झाली. तुम्ही ज्या छापखान्याला भेट दिली ती इमारत मुसळधार पावसाने पडली

असल्याचे मी त्यांना कळविले. त्यांचे उत्तर आले नाही. तथापि त्यांचा पुन्हा दौरा नगरला आला. मी त्यांना भेटलो आणि मला पाहून ते म्हणाले, " काय तुझ्या छापखान्याची इमारत पडली आहे ? मग काय तुझं म्हणणं आहे. " मी म्हटले, मला दहा हजार रुपये कर्ज मिळवून द्या. ते हसले. त्यानंतर त्यांनी आपल्या एका सहकाऱ्याजवळ माझी जी स्तुती केली ती माझ्या आयुष्यात कोणी केली नाही. " हा राम मोठा सत्याग्रही माणूस आहे. त्याच्याजवळ कमालीची जिद्द आहे. तो माझ्याविरुद्ध लिहील. त्याचा विचार करावयाचा नाही. त्याचा प्रेस उभा राहिला पाहिजे. " यशवंतरावांच्या एका शब्दाने माझे काम झाले आणि खरेच माझा प्रेस नव्या इमारतीत उभा राहिला.

卐 卐 卐

## दिल्लीतील महादजी शिंदे

श्री. का. न. केळकर, बी. ए. एल्एल्. बी., ॲडव्होकेट, पुणे.

नामदार यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल माझ्या मनात अत्यंत आदराची भावना आहे. अनेक मतमतांतराच्या वैफल्यामुळे जनतारूपी सागरावर उफाळलेल्या भयंकर लाटा ज्या एका व्यक्तीने परतवून लावल्या ती व्यक्ती म्हणजे श्री. यशवंतराव चव्हाण होय. त्यांचेशी विशेषतः कोणताही संबंध न आणता गेली वीस वर्षे त्यांचे राजकारण तटस्थपणाने मी पाहात आहे. त्यांचेबद्दल माझा आदर दिवसेंदिवस वाढतच आहे. अमूक एका प्रश्नावर त्यांनी राजीनामा देऊन स्वाभिमानाने तत्त्वाचा अभिमान दाखवावयास हवा होता, असे लोकमत काही प्रसंगी प्रगट झाले होते. पण मला तसे वाटले नाही. राजीनामा देणे म्हणजे राजकारणाच्या डावातून उठून जाणे आहे. राजकारणात ज्याला अखेरी जिंकावयाची आहे त्याने आपले स्थान टिकविले पाहिजे. प्रसंगी गांगरून न जाता तो डाव धिमेपणाने शेवटपर्यंत खेळला पाहिजे.

अनेक प्रसंगी यशवंतराव आपले मत मुळीच व्यक्त करीत नाहीत. काही वेळा ते फक्त एकच वाक्य बोलतात. हा त्यांचा एक गुण मला फारच आवडतो. कारण त्यामुळेच त्यांच्यावर बोललेले शब्द परत घेण्याची पाळी आजवर आली नाही. याबाबतीत मराठ्यांच्या इतिहासातील महादजी शिंद्यांची आठवण होते. त्यांचेही दुहेरी धोरण होते. याला काहीसा स्वभाव कारणीभूत असतो. पण महादजी शिंदे यांचे कर्तृत्व राष्ट्रपुरुष होण्याच्या लायकीचे ठरले. तसेच मत यशवंतरावांच्याबद्दल द्यावे लागेल.

केवळ राजकारणच नव्हे तर इतिहास, वाङ्मय, प्राचीन संस्कृती, रंगभूमी, सामाजिक जीवन इत्यादी अनेक बाबींकडे लक्ष देऊन त्यांनी गुणीजनांना प्रोत्साहन दिले आहे. राजकारणात अनेकांनी त्यांचेवर टीका केली आहे. पण कोणत्याही प्रतिपक्षीयाबद्दल त्यांनी अनुद्गार काढले नाहीत. अनेकांचे मन समजावून घ्यावे लागते, त्याशिवाय जनता राजी होत नाही.

माझे जावई फ्लाईट लेफ्टनंट कमलाकर कानिटकर १९६४ चे फेब्रुवारीत विमान अपघातात बेपत्ता झाले. त्यावेळी यशवंतरावजी हे संरक्षणमंत्री होते. त्या विमानाचा शोध पुष्कळ झाला आणि तीन महिन्यांत त्याचे तुकडे झालेले अवशेष सापडले. मध्यंतरीच्या विवंचनेच्या काळात जावयाचा शोध घेण्याचे कामात मी व्याही व मुलीला घेऊन दिल्ली येथे यशवंतरावांना भेटण्यास गेलो होतो. त्यावेळी यशवंतरावांनी फार आस्थेवाईकपणे आमची चौकशी केली आणि जावयाचा शोध लागेपर्यंत मुलीने आता चंदिगड येथे न राहता पुण्यास जावे, असा सल्ला दिला. या एका प्रसंगाखेरीज यशवंतरावांची खाजगी भेट घेण्याचा प्रसंग असा आलाच नाही. मला सार्वजनिक रीतीनेच त्यांची अधिक ओळख आहे. गेली वीस वर्षे त्यांचेबद्दल माझे जे मत कायम राहिले याला कारण त्यांच्या ठिकाणी मानवी स्वभावाचे झालेले उदात्तीकरण हे होय.

卐 卐 卐

# नेता ऐसा मिळे आम्हाला


मेजर शिवाजीराव शेळके, सैनिक अधिकारी, कोल्हापूर.


१९६५ मध्ये भारत–पाकिस्तान संघर्षाचे वेळी आजचे गृहमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण भारताचे संरक्षणमंत्री होते, त्यावेळची ही एक अविस्मरणीय आठवण. माझी नेमणूक राजस्थान सीमेवरील एका विमान तळावर होती. विमान तळावरील शत्रूचे हल्ले विमानविध्वंसक तोफा डागून परतवावयाची जबाबदारी माझ्याकडे होती. एका हल्ल्यात मी जबर जखमी झालो होतो व त्यात माझा डावा कान अगदी कामातून गेला होता. एक दिवस तळावरून हुकूम आला, " भारताचे संरक्षणमंत्री आज ११ वाजता तळाला भेट देतील. ११ वाजून ५५ मिनिटांनी ते विमानविध्वंसक तोफेपैकी एका तोफेला भेट देतील व संरक्षण तयारी पाहतील. तुम्ही ठीक ११–३५ वाजता तोफ नंबर ए ५ वर हजर राहा. "

भारताच्या संरक्षण मंत्र्यांना मी दुरूनच पाहिले होते. पण आज प्रत्यक्ष भेट होणार, किती भाग्यवान मी ! एक विचार निघून गेला तोच, अरे बापरे ! संरक्षण-

मंत्री मला कोणते प्रश्न विचारतील ? या विचाराने मी घाबरून गेलो. किती तोफा डागल्यास ? किती गोळे उडविलेस ? किती विमाने पाडलीस ? एकामागून एका प्रश्नांचा भडीमार झाल्यास माझी अक्षरशः गाळण उडणार ! तोफेचा कमांडर मी, तेव्हा तेथे दुसरा कोणीही माझे बाजूने वकिली करणार पण नाही, काय करावे ?

एकीकडे आनंद व दुसरीकडे भीती यातच संरक्षणमंत्र्यांच्या भेटीचा दिवस उजाडला. मी नेहमीप्रमाणे तोफेवर हजर झालो. कवायतीची फेरतपासणी घेतली आणि तळावरील साहेबांच्या येण्याच्या रस्त्याकडे नजर लावून उभा राहिलो. पुढे पायलट कार व त्याच्या मागे डौलदार झेंडा फडकवीत एक जीप तोफेजवळ येऊन थांबली. मी पुढे गेलो, एक लष्करी सलाम केला. नामदार यशवंतरावजी खाली उतरले. एअर कमांडर श्रीहरींनी माझी ओळख करून दिली. हातात हात मिळविले गेले. पुढे काय प्रश्न विचारणार या चिंतेत मी सावधान स्थितीत ताठ उभा राहिलो. साहेब माझ्याजवळ आले. " कसं काय शेळके ? तुमचा कान कसा आहे ? लढाईचा अनुभव कसा काय वाटतो ? सर्व जवान कसे आहेत ? " असे अत्यंत जिव्हाळ्याचे प्रश्न त्यांनी मला विचारले.

स्वातंत्र्यपूर्व भारतातील गोऱ्या अधिकाऱ्यांची वरकरणी चौकशी कुणीकडे आणि आजची आपलेपणाची, घरोब्याची प्रेमळ चौकशी कुणीकडे ! मला धन्य वाटले. इतके मोठे संरक्षणमंत्री आणि माझ्यासारख्या एका लहान अधिकाऱ्याबद्दल इतकी पितृतुल्य प्रेमाने चौकशी ! मी भीत भीत तुटक तुटक उत्तरे दिली. नंतर तोफांची तयारी पाहून संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाणांनी " ठीक आहे, शेळके ! आम्ही चलतो. " असे म्हणून माझ्या हातात हात मिळविला. मनमोकळेपणाने स्मित करून ते परतले. मी मनात म्हटले, " धन्य धन्य ह्या भारताच्या संरक्षण-मंत्र्याची. " हवाई हल्ल्यात झालेल्या माझ्या कानाची दुखापत मी पार विसरलो. असा नेता पाहिल्यावर वाटते,

" नेता ऐसा मिळे आम्हांला
काय असे मग उणे ?
यशाने दुमदुमवू त्रिभुवने । "

卐 卐 卐

# रसिक मनाची तन्मयता

श्री. ग. ना. आंबेकर, संपादक, ' प्रियदर्शन ' नांदेड.

३१ जानेवारी १९६५ चा तो दिवस. हजारोंच्या संख्येने रसिक वर्ग नांदेड येथील सत्तेचाळीसाव्या मराठी नाट्य-संमेलनाच्या निमित्ताने कलामंदिराच्या गंधर्व नगरीत उभारलेल्या मंडपात रीघ लावून गर्दी करीत होता. संमेलनाचे नियोजित अध्यक्ष श्री. पु. ल. देशपांडे नटराजांचे पूजन करून नुकतेच रसिकांचे अभिवादन स्वीकारीत मंडपात प्रवेश करीत होते. दुसरीकडून संमेलनाचे उद्घाटक भारताचे लाडके नेते माननीय यशवंतरावजी चव्हाण संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. शामरावजी कदम यांचे खांद्यावर हात ठेवून रंगमंचावर पाय ठेवीत होते, तोच— " लवकर आटोपा बरं का हा कार्यक्रम, साहेबांना आणखी कंधारला जाऊन तिथल्या कार्यक्रमांना उपस्थित राहायचंय ! " हे उद्गार गृहमंत्र्यांचे खासगी नियंत्रक आमच्या कानाशी लागून बोलते झाले.

भोवताली पसरलेल्या सुगंधी व सुरंगी वातावरणाच्या पार्श्वभूमीवर या शब्दांनी आम्हांला अगदीच खट्टू केले. आम्हा सर्व कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर क्षणैक औदासिन्याची छाया पसरली. वाटले ! दिल्लीहून माननीय यशवंतरावजी केवळ या कार्यक्रमासाठी म्हणून मुद्दाम हजारो मैलांचा प्रवास करून येतात काय ! आणि त्यांच्या येथील उपस्थितीची संधी साधून पक्षीय कार्यकर्ते भरगच्च कार्यक्रमांची उतरंड रचून त्यांना हैराण करतात काय ! अत्यल्प वेळात अधिकात अधिक कार्यक्रम ठेवल्याने मंत्री झाले तरी त्यांना काय शारीरिक आणि मानसिक ताण पडत नसेल !

कार्यक्रम सुरू करण्याच्या घाईत तात्पुरते आम्ही हे विसरून गेलो. सुरू झालेल्या कार्यक्रमाची रंगत चढत्या श्रेणीने एकसारखी वाढतच गेली. नामदार यशवंतरावजींनी आपल्या भाषणात नाट्यक्षेत्रात बहरलेल्या सुगीचा कौशल्यपूर्ण उपयोग करून रसिक प्रेक्षकांच्या मनःक्षेत्रावर वासंतिक बहराची पेरणी करून सोडली. या पार्श्वभूमीवर अध्यक्ष श्री. पु. ल. देशपांडे बोलावयास उभे राहिले. ते म्हणाले, " यशवंतरावांनी भीत भीत स्वतःकडे धैर्यधराची भूमिका घेतली आहे. वस्तुतः ते खरोखरीचे धैर्यधरच आहेत. मराठी माणसाला धैर्यधर आवडतो तो " चंद्रिका ही जणूं " हे गाणे म्हणतो म्हणून नव्हे, तर तो " माता दिसली समरी विहरत " ही त्याची श्रद्धा असते म्हणून ! आमच्या देशाचे रक्षण करणारे यशवंतराव धैर्यधरच आहेत. " या वाक्याने जनता पुलकित झाली.

अशा धुंद वातावरणात चढत जाणारे भाषण ऐकत असतानाच मघाचे " लवकर आटोपा " असे म्हणणारे यशवंतरावांचे खाजगी कारभारी ' नामदारांना

कंधारला जाण्यासाठी निघण्याची वेळ झाली ' असा इशारा द्यावयाला आले. नामदार मंत्री महोदयांनी त्यांना गप्प बसविले. कारण त्यांच्यातला रसिक तिथून उठायला तयार नव्हता. त्या धुंद वातावरणाचा भंग करणे त्यांच्या रसिक हृदयाला मान्य नव्हते. यशवंतराव बसूनच राहिले, अगदी शेवटपर्यंत, तेही तन्मयतेने पु. ल. देशपांडे यांचे रसिले भाषण ऐकत. राजकारणी पुरुषांच्या ठायी अभावानेच आढळणारी ही तन्मयता रसिक मराठी मनाच्या दिव्यत्वाचीच साक्ष देत नाही का ?

卐 卐 卐

# मराठ्यांचे स्फूर्तिस्थान

श्री. बाळ जगन्नाथ पंडित, एम्. ए., एल्‌एल्. बी., ॲडव्होकेट, पुणे.

नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या नावातच यशवंत आहे ! त्यामुळे ते जिकडे जातील तिकडे यशस्वी होत गेले आणि जे स्थान भूषवतील त्यात यशवंत ठरत गेले. मुंबईचे मंत्रिमंडळ असो, महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद असो नाहीतर केंद्रीय सरकारचे संरक्षणमंत्रिपद असो वा गृहमंत्रिपद असो, यश त्यांचेसमोर हात जोडून उभे राहिले !

महाराष्ट्राच्या माणसाला उत्तरेत वाव नाही अशी तक्रार नेहमीच केली जाते. पण भारताच्या राजधानीत मोठा मान आणि मोठे स्थान मिळवून यशवंतरावांनी ती तक्रार खोटी असल्याचे सिद्ध केले. भारताच्या इतिहासात महाराष्ट्राच्या माणसाला एवढा मोठा मान कधीच मिळाला नव्हता. यशवंतरावांनी तो मिळवून दाखविला. राजकारणाचे अनेक हिवाळे-पावसाळे पाहिलेल्या पंडित जवाहरलाल नेहरूंचे मन जिंकायचे, ही काही सामान्य गोष्ट नव्हती. पण यशवंतरावांनी पंडित नेहरूंचा विश्वास तर संपादन केलाच, पण त्यांचेनंतर जे गढूळलेले अस्थिर वातावरण निर्माण झाले त्यातही भिन्न विचारसरणीच्या व प्रवृत्तीच्या लोकांचे आदरास ते पात्र ठरले.

या सर्व कर्तबगारीला आवश्यक असणारे सर्व गुण यशवंतराव यांचे अंगी असल्याचे माझ्यासारख्या राजकारणाशी संबंध नसलेल्या व्यक्तीलाही जाणवतात. कुशाग्र बुद्धिमत्ता, माणसाची योग्य पारख, मुत्सद्दीपणा, सारासार विचारशक्ती, हजरजबाबीपणा आणि लोकांशी वागण्याची आदब हे सगळे राजस आणि लोभस गुण त्यांचे अंगी आहेत. या सर्व गुणांना त्यांच्या भारदस्त व भरदार व्यक्तिमत्त्वाची जोड लाभलेली आहे. यामुळेच माझ्यासारख्या तरुणाला यशवंतरावांचे कार्य अभिमानास्पद वाटते. कुठल्याही मराठा तरुणाला स्फूर्तिदायक ठरेल असे त्यांनी आदर्श

उदाहरण घालून दिलेले आहे. महाराष्ट्र मागे आहे व मराठी जनतेला संधी नाकारली जाते असे म्हणणाऱ्यांनी यशवंतरावांचे उदाहरण सतत डोळ्यांसमोर ठेवावे. यशवंतरावांचा पुरोगामी दृष्टिकोन सर्वांना निश्चित मार्गदर्शक ठरल्याशिवाय राहणार नाही. यशवंतरावांसारखी प्रखर राष्ट्रनिष्ठा व ध्येयवाद प्रत्येक तरुणाने दृष्टीसमोर ठेवला पाहिजे. आज आमचा समाज मरगळलेल्या अवस्थेत आहे. सर्व थरांत किंकर्तव्यमूढता आलेली आहे. अशावेळी यशवंतरावांची धडाडी व झेप नुसती बघत बसण्यापेक्षा ती अंगी बाणविण्याचा प्रयत्न आजचे तरुणांनी करणे आवश्यक आहे.

माझ्या वडिलांचा म्हणजे सरदार श्री. जगन्नाथ महाराज पंडितांचा व यशवंतरावांचा प्रत्यक्ष परिचय होता. त्यांचे तोंडातून यशवंतरावांचे गुणगान ऐकायला मिळायचे. वडिलांचे तोंडून गुणगान ऐकल्याने साहजिकच आमचे मनावर यशवंतरावांच्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटला होता. हळूहळू त्यांची कामगिरी डोळ्यांनी बघताना हा आदर वाढतच गेला.

दि. ९ मार्च १९६६ रोजी आमचे घरी यशवंतराव चव्हाण आले असताना अनेक लोक भेटायला येत होते. अनेक तक्रारी त्यांचेसमोर मांडल्या जात होत्या. यशवंतराव सर्वांचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकून घेत होते आणि गोड शब्दांत प्रत्येकाला काहीतरी समजावून सांगत होते. काही वेळा बरोबरच्या मंडळींबरोबर त्यांच्या गप्पा होत. अशावेळी विनोद झाला की, ते मनमुरादपणे हसत. त्यांचा तो दिलखुलासपणा पाहून भारताचा हा नेता किती मनमिळाऊ व दिलदार असला पाहिजे याची कल्पना आली. मराठी भाषेवर त्यांचे किती प्रभुत्व आहे हे मी भाषणात ऐकले होतेच· आताही खाजगी संभाषणात त्याचा ठायी ठायी प्रत्यय येत होता.

शेवटी जाता जाता मी यशवंतरावांना वडिलांचे फोटो दाखविले. एका फोटोत वडील व गांधीजी होते, दुसऱ्यात वडील व श्री. राजेंद्रप्रसाद, तिसऱ्यात वडील व श्री. बी. व्ही. केसकर आणि चवथ्यात ते दोघे म्हणजे यशवंतराव व माझे वडील. माझे वडील नुकतेच हे जग सोडून गेले होते. त्यानंतर यशवंतराव प्रथमच आमचेकडे आले होते. त्यांनी प्रेमळ शब्दांत माझ्या वडिलांना आदरांजली वाहिली आणि हात जोडून ते कितीतरी वेळ माझ्या वडिलांचे फोटोकडे पाहात राहिले...कितीतरी वेळ पाहात राहिले !

卐 卐 卐

# आमचे मैत्रीचे संबंध

श्री. बापूसाहेब भापकर, एम्. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, अहमदनगर

माननीय यशवंतराव चव्हाण यांची व माझी प्रथम भेट केव्हा झाली हे आज निश्चित सांगता येत नाही. तथापि १९४२ च्या " चले जाव " चळवळीतील त्यांच्या पराक्रमाबद्दल मी खूप ऐकले होते व वाचलेही होते. नगर जिल्ह्यातील अच्युतराव पटवर्धन हे या काळात भूमिगत होते. चळवळीच्या निमित्ताने ते भूमिगत अवस्थेत असताना त्यांना दोन वेळा भेटण्याचा योग आला होता. या सुमारास अखिल भारतात असंख्य मंडळी ब्रिटिशांचे साम्राज्य उलथून पाडण्यासाठी भूमिगत अवस्थेत रात्रंदिवस आपला प्राण पणाला लावून लढा देत होती. शेवटी ब्रिटिश साम्राज्यशाहीचा शेवट झाला आणि भारतात स्वातंत्र्याचा सूर्य आपल्या तेजाने तळपू लागला.

१९४५ साली अहमदनगर जिल्ह्यात श्रीरामपूर येथे काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक झाली. त्यावेळी काँग्रेसमध्ये पटवर्धन बंधूंचे फारच प्रभुत्व होते. मी कम्युनिस्टांचा सहप्रवासी आहे म्हणून मला बाजूला सारण्याचा साहजिकच त्यांचा प्रयत्न असे. १९४६ साली महाराष्ट्रात सार्वत्रिक निवडणुका झाल्या. सातारचे श्री. रामभाऊ नलावडे, श्री. भाऊसाहेब फिरोदिया व मी एकाच मतदार संघातून निवडून आलो. भाई दत्ता देशमुख हे उत्तर भागातून निवडून आले. कामेरीचे श्री. के. डी. पाटील यांचे ते मित्र होते. त्यामुळे याच काळात प्रथम यशवंतराव चव्हाण यांचेशी आमचे अगदी नजीकचे मैत्रीचे संबंध आले आणि राजकीय मतभेद व संघर्ष असतानाही ते आजपर्यंत टिकून आहेत.

माझे मित्र भाई सत्था, देशभक्त केशवराव जेधे, भाई दत्ता देशमुख, खासदार शंकरराव मोरे, क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, श्री. भाऊसाहेब राऊत, खासदार तुळशीदास जाधव, श्री. काकासाहेब वाघ इत्यादी मंडळींनी १९४६ ते १९५१ पर्यंत पुढाकार घेऊन महाराष्ट्रात नवीन पक्षाचे राजकारण केले. महाराष्ट्राच्या राजकारणात शेतकरी कामगार पक्ष स्थापन करून त्यांनी पुढील टप्पा गाठण्याचा प्रयत्न केला. नामदार भाऊसाहेब हिरे आणि नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांना या पक्षाबद्दल जरूर आस्था व जिव्हाळा वाटे. श्री. यशवंतराव चव्हाण शेतकरी कामकरी पक्षात का सामील झाले नाहीत असा अनेकदा प्रश्न उपस्थित होई. खेर-मुरारजी मंत्रिमंडळाचा शेतकरी कामकरी पक्षाशी संघर्ष सुरू झाला त्यावेळीं यशवंतराव पार्लमेंटरी सेक्रेटरी होते. शासनाचा ते अनुभव घेत होते.

शेतकरी कामगार पक्ष वेळीच निश्चित कार्यक्रम घेऊन आपल्या पक्षाचे ध्येय-धोरण ठरवून धडाडीने कामाला लागला असता तर पुढे जी ओढाताण

झाली आणि काही मंडळी पुन्हा काँग्रेसमध्ये सामील झाली ते कदाचित टळले असते. याच वेळी श्री. यशवंतराव चव्हाणांना निश्चित भूमिका घेणे आवश्यक झाले असते. तथापि ते त्यांच्या सुदैवाने टळले. आजपर्यंत कष्टकरी जनतेच्या पुरोगामी चळवळी-पासून त्यांना काही अनुभव आले आहेत. त्यापासून ते शिकले आहेत आणि त्यांनी स्वतःला सावरले आहे.

भारताचा इंडोनेशिया होऊ नये असे आम्हांला वाटते. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरहद्द गांधी अब्दुल गफारखान या थोर नेत्यांनी ज्या जिद्दीनें थोर मानवतावादी निधर्मी राज्याचा पुरस्कार केला, कोणत्याही आंतरराष्ट्रीय गटात ते सामील झाले नाहीत, तेच धोरण इंदिरा गांधी आणि यशवंतराव चव्हाण यांनी जोराने पुढे रेटावे. असे केल्यानेच यशवंतरावांच्या महाराष्ट्राचा व भारताचा खरा गौरव होणार आहे.

卐

# राजकारणी संत

## भाई माधवराव बागल, माजी अध्यक्ष, प्रजापरिषद, कोल्हापूर

यशवंतराव चव्हाण कऱ्हाड तालुक्यातील एक अप्रसिद्ध सामान्य व्यक्ती असल्यापासून ते असामान्य व्यक्ती होईपर्यंत कोणत्या ना कोणत्या कारणाने त्यांचा माझ्याशी संबंध आला आहे. एकदा तर मी पुढारी व यशवंतराव एक अनुयायी असेही झाले आहे. पण या गोष्टीची जाणीव मात्र खुद्द त्यांनीच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतानासुद्धा दिली. खरोखरच खरी मोठी माणसं असतात ती मोठेपणा मिळाल्यावर अधिकच नम्र होतात. नाही तर एवढया उच्च पदावर राहून त्यांनी या गोष्टीची आठवण का दिली असती? साधा पोलिसही डगला चढवल्यावर ताठ होतो, हे आपण पाहातोच नाही का?

यशवंतरावांशी माझे संबंध आले ते संघर्षरूपानेच. संयुक्तमहाराष्ट्राच्या वेळी यशवंतरावांनी घेतलेल्या भूमिकेबद्दल मला वाईट वाटले. मी त्यांची भूमिका समजून घेण्यासाठी त्यांची भेट घेतली. पण माझी घोर निराशा झाली. संतापाच्या नशेतच मुंबईच्या सभेत मन मानेल ते मोकाट बोललो. यशवंतरावांच्यावर मात्र याचा परिणाम उलट झाला. त्यांनी मला जराही दोष न देता माझा गौरवच केला. मी ज्यांना शत्रू मानत आलो, ज्यांच्यावर तोंडसुख घेतले, अशा यशवंतराव चव्हाणांनी माझ्या कार्याचा गौरवच करावा, मुख्यमंत्रिपदावरून माझी स्तुतीच करावी हा केवढा मनाचा दिल्दारपणा?

यशवंतरावांनी भगीरथ प्रयत्न केले व नेहरूंचे मन वळवून संयुक्त महाराष्ट्र जनतेला मिळवून दिला, याबरोबरच मीही यशवंतरावांचा अनुयायी बनलो. तरी यशवंतराव म्हणाले, " माधवराव, तुम्ही काँग्रेसमध्ये आलेच पाहिजे असे नाही. काँग्रेसवर टीका करून दोष दाखविण्याचं स्वातंत्र्य तुम्ही घालवावं असं मला वाटत नाही. तुमचा आशीर्वाद असला म्हणजे दुसरे काही नको ! " यावरून यशवंतरावांचा थोर स्वभाव मला उमजला.

यशवंतराव गृहमंत्री झाल्यावर कोल्हापूरला आले व मी त्यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. यशवंतरावांनी माझी भेट अत्यंत आनंदाने घेतली. ते म्हणाले, " माधवराव, तुम्ही तुमच्या मनाला पटेल ते लिहून आमचे दोष दाखवीत चला, त्याशिवाय आम्हांला ते कसे कळणार ? " यावरून यशवंतरावांची लोकशाहीवृत्ती दिसून येते. हे पाहून असे वाटते की, भारताची लोकशाही यशवंतरावांच्या हातात सुरक्षित राहील यात शंका नाही.

यशवंतरावांवर जे अनेक आरोप करण्यात येतात त्यांपैकी पक्षफोडीचा आरोप करण्यात येतो, तो खरा नसल्याचा माझा अनुभव आहे. माझे मित्र श्री. डी. एस्. खांडेकर व श्री. पी. बी. साळुंके यांनी काँग्रेस पक्षात यावे म्हणून मी त्यांचे मन वळविले. पण यशवंतरावांनी सूचनाच केली, " मोठे पद मिळविण्याच्या लालसेने ते येत असतील तर मला ते नको आहेत. " यावरून वरील आरोप खोटा आहे हे आपोआपच सिद्ध होते.

यशवंतरावांचे मानवता-प्रेम, नम्रता, गरिबांविषयी त्यांची आत्मीयता, कार्यकर्त्यांविषयी वाटणारे प्रेम, सारासार विचार करण्याची शक्ती, मोठ्या पदावर राहून लहानात लहान व्यक्तीची पारख करण्याची हातोटी या त्यांच्या वैयक्तिक गुणांमुळेच त्यांच्यावरील राजकीय गुणांना शोभा आली आहे. यशवंतराव केवळ पुढारी, मंत्री नव्हेत तर ती एक थोर व्यक्ती आहे. सुसंस्कृतपणा असल्याने साहित्य व कला यांचे ते थोर उपासक आहेस. संगीताचाही ते तितक्याच तन्मयतेने आस्वाद घेतात. असा हा अष्टपैलू नेता भारताला मिळाला हे भारताचे केवढे भाग्य !

卐 卐 卐

## वऱ्हाडातील भाष्ये

श्री. भवानीशंकर पंडित, बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, नागपूर.

नागपूर महाविद्यालयाचा हीरक महोत्सव होता. त्याला मुख्य पाहुणे म्हणून नामदार यशवंतरावजी चव्हाण उपस्थित होते. त्यांच्याबरोबर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री

जोशी नागपुरास आले होते. या महोत्सवात एक दिवस नागपूर महाविद्यालयाच्या ग्रंथसंग्रहालयाच्या नवीन इमारतीचा कोनशिला–समारंभ होता. त्या प्रसंगी भाषण करताना यशवंतरावजी म्हणाले, " या इमारतीचा उपयोग ग्रंथ-संग्रहालयासाठी व वाचनालयासाठी झाला पाहिजे. हिच्यात शांतपणाने आणि स्वस्थपणाने अभ्यासकांना आपआपल्या विषयांचा अभ्यास करता आला पाहिजे. त्यासाठी नागपूर महाविद्यालयाच्या संचालकांनी या ठिकाणी त्यांना आजच्या घटकेला प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचा पुरवठा केला पाहिजे, तरच या इमारतीचे सार्थक होईल. या ग्रंथ संग्रहालयात जे ग्रंथ घेण्यात येतील ते अभ्यासकांना उपयुक्त व उपकारक असले पाहिजेत. उगाच जागा अडवणारे आणि अकारण शोभा वाढविणारे ग्रंथ या ठिकाणी नसावेत."

वस्तुतः यशवंतरावजींच्या भाषणात त्यांना विरोध करता येईल असे काही नव्हते. परंतु महाविद्यालयाच्या संचालकांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना दोन शब्द बोलण्याचा आग्रह केला, तेव्हा ते तावातावाने आपल्या भाषणात म्हणाले, " सर्वच ग्रंथ काही उगाच जागा अडवणारे किंवा उगाच शोभा वाढवणारे नसतात. ग्रंथालयात सर्वच ग्रंथांचा संग्रह हवा, तरच 'ग्रंथसंग्रहालय' हे त्याचे नाव उचित ठरेल. एखादा ग्रंथ एखाद्याच्या दृष्टीने अनुपयुक्त असेल, तो दुसऱ्याच्या दृष्टीने उपयुक्त असू शकेल. " तर्कतीर्थांचे भाषण चालू असताना यशवंतरावजी गालातल्या गालात हसत होते. कदाचित् त्यांना आपला नेम अचूक साधला असे वाटले असावे.

नागपूर विद्यापीठाला अंबाझरीजवळ महाराष्ट्र शासनाने कॅंपसाठी जागा दिली. विद्यापीठाने भूमिवितरणाचा समारंभ माननीय यशवंतरावजी चव्हाण यांच्या उपस्थितीत साजरा केला. त्या वेळी जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यापीठाला भूमी दिल्याची सनद यशवंतरावांच्या हाती दिली आणि यशवंतरावजींनी टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात ती सनद नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूंच्या स्वाधीन केली. त्या प्रसंगी भाषण देताना ते म्हणाले, " विद्यापीठाच्या विस्तारासाठी शासनाने ही जागा दिली आहे हे काही शासनाचे विद्यापीठावर उपकार नाहीत. ती देण्यात शासनाने आपले कर्तव्य पार पाडले आहे. आता विद्यापीठाने या ठिकाणी नवीन युगाला आवश्यक व विद्यार्थिवर्गाला सर्वतोपरी उपयोगी अशी यंत्रणा निर्माण करून दिलेल्या दानाचे चीज केले पाहिजे, म्हणजे शासनाला आनंद होईल. भविष्यकाळी आपल्या राष्ट्राला ललामभूत होतील असे विद्यार्थी या विद्यापीठातून बाहेर पडतील अशी मला आशा आहे. विद्येचे महत्त्व सर्वत्र सदैव आहे. सत्तेला ती ज्या ठिकाणी आहे, तेथेच मान मिळतो आणि कित्येकदा तर तो मिळवावा लागतो. "

यवतमाळला विदर्भ साहित्य संमेलनाचे विसावे अधिवेशन होते. संमेलनाला माननीय यशवंतरावजी चव्हाण हे उद्‌घाटक म्हणून लाभले होते. भाषण भावपूर्ण, समयोचित, संयमित व आटोपशीर असल्यामुळे पुढे कित्येक दिवस ते साहित्यिकांच्या

श्रवणेंद्रियात घोळत राहिले. या प्रसंगी ते म्हणाले, " आपण सर्व एकभाषी आहोत. मराठी ही आपल्या सर्वांची मायभाषा आहे. ज्ञानेश्वर हे तिचे लाडके पुत्र. त्यांनी प्रतिज्ञा केली की, मी माझे मराठी शब्द अमृतात बुचकळून काढीन. त्यामुळे ते इतके रसाळ होतील की, पैज लागल्यास गोडपणात अमृतालाही मागे टाकतील. त्यांनी ती प्रतिज्ञा खरी करून दाखविली. आज सात शतके लोटली तरी ज्ञानेश्वरीतील गोडवा तसाच कायम आहे. ज्ञानेश्वरांची जी भाषा तीच आपली भाषा आहे. आपण सर्व त्याच भाषेत बोलत आहोत. इंग्रजी राज्यात आपण एकभाषी एकमेकांपासून दुरावलो होतो. आज त्याच मायभाषेनें आपणास पुन्हा एकत्रित आणले आहे. या, सारेजण एकत्र या ! आणि या सुमुहूर्तावर त्या माउलीची पूजा बांधा. "

यशवंतरावांनी वरील केलेली वऱ्हाडातील भाष्ये म्हणजे त्यांच्या सुसंस्कृत मनाचे उत्कृष्ट दर्शन होय.

卐 卐 卐

## समन्वयवादी नेतृत्व

श्री. वामन नारायण देशपांडे, एम्. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, खामगाव.

लोकमान्य टिळकांनंतर भारतावर कमीअधिक प्रभाव पाडणारे दोनच महाराष्ट्रीय पुढारी झाले. ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व श्री. यशवंतराव चव्हाण हे होत. डॉ. आंबेडकर हे विद्वत्ता, देशभक्ती, चळवळ करण्याचे सामर्थ्य वगैरे गुणांत प्रथमश्रेणीचे होते. पण हरिजनांच्या कमालीच्या दुःस्थितीमुळे त्यांना राजकारणापेक्षा त्यांच्या प्रश्नांकडेच अधिक लक्ष द्यावे लागले. याउलट, श्री. चव्हाण हे मात्र राजकीय पुढारी होऊ शकले. श्री. यशवंतराव चव्हाण बहुजनसमाजातून पुढे आलेले असल्यामुळे त्यांना त्या समाजाचा तर विश्वास संपादन करता आलाच, पण संतुलित वृत्तीमुळे व व्यापक दृष्टिकोनामुळे त्यांना इतर समाजाचा विश्वास संपादन करणेही जड गेले नाही. आज महाराष्ट्राचे सर्वश्रेष्ठ पुढारी तेच आहेत व महाराष्ट्राच्या पाठिंब्यामुळे ते अखिल भारतीय नेत्यांच्या मालिकेत विराजमान झाले आहेत.

अलीकडील नेतृत्वात धर्म व जात यांच्या पलीकडे जाण्याची दृष्टी, सामाजिक न्यायाची जाणीव आणि अर्थव्यवस्थेबाबत समाजवादी विचारसरणी हे जे तीन गुण आवश्यक ठरतात, ते यशवंतराव चव्हाणांत मोठ्या प्रमाणात उतरले आहेत. रॉयवाद व गांधीवाद यांचा त्यांच्यात उत्तम समन्वय दिसून येतो. त्यांच्या लोकसंग्रह-बुद्धीची किती तरी उदाहरणे देता येतील. विरोधक असला तरी त्याच्याविषयी कटू उद्‌गार

न काढणे, इतरांस योग्य तो मोठेपणा देणे हे गुण लोकसंग्रहबुद्धीचेच समजता येतील. पश्चिम महाराष्ट्राला ठाऊक नसतील म्हणून विदर्भातील अशा दोन प्रसंगांचा येथे निर्देश करतो.

लोकनायक डॉ. मा. श्री. अणे हे महाराष्ट्राचे विरोधक असून स्वतंत्र विदर्भाचे पुरस्कर्ते होते हे सर्वश्रुतच आहे. डॉ. अणे यांची एखाद्या प्रश्नाबाबतची मते काहीही असली तरी त्यांची श्रेष्ठता वादातीत होती. अशा या नेत्याच्या " वणी " या गावी श्री. चव्हाण यांचे भाषण असताना यांनी श्री. अणे यांचा गौरव केला आणि त्यांचा महाराष्ट्राला आशीर्वाद मिळविण्याचा आपण नेहमीच प्रयत्न करू, असे भावपूर्ण उद्गार काढले.

दुसरा प्रसंग असा की, बुलढाणा जिल्ह्यातील सावरगाव डुकरे या गावी विदर्भ-साहित्य-संघाचे अधिवेशन श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. त्याचे उद्घाटन श्री.चव्हाण यांच्या हस्ते झाले.त्यावेळी श्री.चव्हाण यांचा मानसन्मान होत असताना ते लगेच म्हणाले, " अहो, आज शेंडे यांचा मान व्हावयास पाहिजे, माझा नव्हे ! " वरील दोन्ही घटना तशा किरकोळ आहेत. पण त्यांचे पर्यवसान जनतेची मने जिंकण्यात आहे, हे विसरून कसे चालेल ?

लोकशाही समाजवाद हे देशाचे उद्दिष्ट काँग्रेसने ठरविले आहे. त्याविषयी पुरोगामी विचारवंतांचे दुमत होणार नाही. परंतु अलीकडे देशातील कम्युनिस्ट व त्यांचे सहप्रवासी जोर धरू पाहात आहेत. यामुळे लोकशाही समाजवाद व कम्युनिझम यांतून निवड करण्याची वेळ आली आहे. भारतात कम्युनिझम व लोकशाही समाजवाद यांपैकी काय येणे श्रेयस्कर आहे आणि लोकशाही समाजवाद यावयाचा असल्यास त्याची रूपरेखा काय असावी याचा आघाडीच्या भारतीय नेत्यांनी निर्णय घेण्याचा समय आलेला आहे. यात कोणताही प्रमाद झाल्यास त्याचे दूरगामी परिणाम देशाला भोगावे लागणार आहेत. श्री. यशवंतराव चव्हाण आघाडीच्या नेत्यांपैकी आहेत आणि समधात वृत्तीबद्दल ते सर्वश्रुत आहेत. तेव्हा वरील निर्णय घेण्याच्या कार्यात त्यांचा मोठा वाटा राहील, अशी त्यांच्याविषयी आपणा सर्वांची अपेक्षा आहे

卐 卐 卐

## प्रसंगावधान !

श्री. वसंतराव शा. वैद्य, चिटणीस, केन्द्रीय कर्मचारी मंडळ, पुणे.

भारत सरकारच्या साऱ्या केंद्रीय कर्मचाऱ्यांनी १९ सप्टेंबर १९६८ चा दुर्दैवी संप घडवून आणण्याची सिद्धता चालविली. गृहमंत्री यशवंतरावांनी संपाविरुद्ध

बलशाली अशी सरकारी यंत्रणा उभी केली. संप झाला पण " झाला " एवढे म्हणण्यापुरताच तो झाला. संपावर गेलेल्या केंद्रीय नोकरांना सरकारने आवळलेल्या साखळ्यांवर डोके आपटावे लागले. हजारो लोक कामावरून कमी केले गेले. हजारो लोकांना कमीअधिक प्रमाणात शिक्षा झाल्या. कर्मचाऱ्यांच्या युनियनची मान्यता काढून घेण्यात आली.

संपानंतर दोनतीन महिन्यांनंतरचा प्रसंग. गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण काही कामासाठी पुण्यात आले. युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी ठरविले की, यशवंतरावांना भेटून सहानुभूतीचे धोरण अमलात आणण्याची विनंती करावी. सर्किट हाऊसवर शांततापूर्ण मोर्चा निघाला. चारपाचशे कर्मचाऱ्यांचा तो समूह सर्किट हाऊसच्या दरवाजावरच पोलिसांनी अडविला. अडवणे हेच जणू पोलिसांचे कर्तव्य असते ! पोलिस कमिशनर सर्किट हाऊसमध्ये धीरगंभीरपणे कार्यमग्न होते. त्यांनी श्री. यशवंतरावांच्या कानावर घातले की, केंद्रीय कर्मचारी भेटायला आले आहेत आणि त्यांना दारावरच अडविण्यात आले आहे.

पांढरेशुभ्र पायघोळ धोतर, सैलसर झब्बा आणि चेहऱ्यावर प्रसन्नता घेऊन यशवंतराव बाहेरच्या हिरवळीवर आले. त्यांनी पोलिसांना सांगितले, " येऊ द्या सर्वांना आत. " पाचशे कामगार निराश अंतःकरणाने हिरव्यागार जमिनीवर बसले. यशवंतरावांनी म्हटले, " बोला. " मोर्चाच्या नेत्याने आपले निवेदन वाचून दाखविले. निःस्तब्धपणे ऐकून घेतल्यावर यशवंतराव म्हणाले, " यावर आपण चर्चा करू या. तुमच्यापैकी निवडकजण आत या. " बरोबरीच्या नात्यानें चर्चा सुरू झाली. यशवंतराव सांगत होते, " अहो, एवढ्या मोठया देशाचा राज्यकारभार चालवायचा म्हणजे खंबीर व्हायला नको का ? माझ्या जागी तुमच्यापैकी कोणीही असता तरी त्यानें हेच केले असते. समजुतीने घेतले पाहिजे. धीराने घेतले पाहिजे. कर्मचाऱ्यांचे नेते यशवंतरावांच्या बोलण्यानें हरखून गेले. तक्रारी करायला आलेली माणसे जय-जयकार करीत परत गेली.—" यशवंतराव चव्हाण ! झिंदाबाद... "

यशवंतरावांचे सामर्थ्य हेच आहे. महाराष्ट्राची संस्कृती त्यांनी घेतली ती सुसंस्कृत होण्यासाठी. यदृच्छेनें मिळालेले यशवंत हे नाव त्यांनी आपल्या कर्तृत्वाने सार्थ केले.

हसतखेळत आणि खिलाडूपणे वागण्याची यशवंतरावांची हातोटी अनन्य-साधारण आहे. नांदेड येथे भरलेल्या मराठी नाट्य–संमेलनाच्या वेळची गोष्ट. यशवंतराव चव्हाण हे उद्घाटक म्हणून आलेले होते. आचार्य अत्रे यांनी सुरवातीच्या भाषणात खोडसाळपणे म्हटले, " मुंबईहून एवढा मोठा प्रवास करून मी आलो. रस्ते दगडाधोंड्यांनी भरलेले. धूळ तर अवर्णनीय होती. मराठवाड्यातल्या रस्त्यावरली धूळ खातखात येथपर्यंत येऊन पोचलो. यशवंतरावांच्या राज्यात रस्त्यांची ही स्थिती... ! " अत्र्यांच्या नंतर यशवंतराव उभे राहिले. हसतहसत म्हणाले,

" आचार्य अत्रे यांनी धुळीची तक्रार केली ! पण नेहमी दुसऱ्याला धूळ चारणाऱ्याने एकदा तरी स्वतः धूळ खावी ना ! " असे म्हणताच आचार्य अत्रे यांच्यासह सर्वच जण हास्याच्या कल्लोळात बुडून गेले. यशवंतरावांची हातोटी हीच आहे. विरोधकांनाही आपलेसे करून घेऊन कार्यभाग साधून घेणे ही शिवाजीमहाराजांची कला यशवंतरावांनी तंतोतंत आत्मसात केलेली आहे.

卐 卐 卐

## तरुणांचे स्फूर्तिस्थान

### श्री. बापूजी साळुंखे, संचालक, स्वामी विवेकानंद संस्था, कोल्हापूर.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्था महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शिक्षणाचे पवित्र कार्य अत्यंत शुचितेने आणि ऋजुतेने करीत आहे. संस्थेच्या सर्व मिळून शाखा — हायस्कुले, कॉलेजे, वसतिगृहे, टेक्निकल विद्यालये असे मिळून तीनशेच्या वर आहेत. त्यातून पन्नास हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विविध शाखांतून सुमारे दोन हजारांच्यावर अध्यापक व प्राध्यापक वर्ग कर्तव्यदक्षतेने व समाधानाने काम करीत आहे. संस्थेमध्ये या गुरुदेव शिक्षक-प्राध्यापक कार्यकर्त्यांचे स्थान, मान व कल्याण सुरक्षित असल्यामुळेच इतका गुरुदेवांचा वर्ग दहा-बारा वर्षांच्या अल्पावधीत एकत्र आला आहे. आणि त्यांनीच महाराष्ट्राच्या कडेकपारी व महाराष्ट्राच्या बाहेरही ज्ञानदानाचा प्रचंड महायज्ञ आपल्या ज्ञानाने व त्यागाने धगधगत ठेवला आहे.

या अशा चोख कारभाराला थोडेसे गालबोट लावता यावे म्हणून खोडसाळ प्रयत्न करण्यात आला. संस्थेच्या एका शिक्षकाने अफरातफर केल्याबद्दल संस्थेच्या नियमाप्रमाणे व कायद्याप्रमाणे त्याची रीतसर चौकशी झाली. संस्थेच्या लोकशाही सर्व मंडळींनी एकमुखाने निर्णय घेऊन त्याला कमी केले. म्हणून त्याने कांगावा करून संस्थेच्या विरुद्ध अपप्रचाराचा गदारोळ उडविण्याचा बराच प्रयत्न केला. ही गोष्ट भारताचे गृहमंत्री माननीय यशवंतरावजी चव्हाण यांच्या कानावर गेली. शिक्षणासारख्या संस्थेमध्ये अशा तऱ्हेचे प्रवाद निर्माण का होतात हे पाहण्यासाठी माननीय यशवंतरावांनी एक लवाद नेमण्याचा विचार केला. १८-८-१९६८ रोजी कऱ्हाड येथील सरकारी विश्रामधामातील मुक्कामात असताना सातारा जिल्ह्यातील त्यावेळी तेथे सुमारे दोनशेपेक्षा अधिक शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य, कार्यकर्ते यांच्यापुढे तो मांडला. वरील सर्व मंडळींसमक्ष बहुजनसमाजाच्या शिक्षणकार्याबद्दल त्यांनी आपली तळमळ खालील शब्दांत व्यक्त केली. ते म्हणाले, " महाराष्ट्रात बहुजनसमाजाच्या शिक्षणप्रसाराचे काम प्रामुख्याने कर्मवीर भाऊराव पाटील आणि श्री. बापूजी

साळुंखे यांनी केले आहे. या दोन व्यक्तींना मी दैवतासमान मानतो. "

या उद्गारांमध्ये यशवंतरावजींची बहुजनसमाजाच्या शिक्षणाबद्दल तळमळ व्यक्त होते. या त्यांच्या तळमळींमुळे महाराष्ट्रात बहुजनसमाजाचे शिक्षणकार्य मोठ्या प्रमाणात गुणवत्तेने, परिणामकारक रीतीने, सुरक्षिततेने व प्रतिष्ठेने व्हावे म्हणून त्यांनी महाराष्ट्राचे मुख्य मंत्री असताना ज्या लोकांचे वार्षिक उत्पन्न बाराशे रुपयांहून कमी आहे अशा पालकांच्या मुलांना सर्व शिक्षण मोफत करून बहुजनसमाजाला सर्व प्रकारचे शिक्षण त्यांनी मुक्तद्वार देण्याचे, शिक्षणक्षेत्रातील युगप्रवर्तनाचे कार्य केले आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही.

स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेच्या संदर्भात माननीय यशवंतराव चव्हाण यांनी शिक्षणासारख्या थोर पवित्र कार्यात कोणी वावदूकपणे, संकुचित हेतूने, स्वार्थ, प्रतिष्ठा आणि सत्ता मिळविण्याच्या हेतूने शिक्षणाचा वापर होऊ नये म्हणून स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेची एकही शाखा संस्थेतून तोडून देण्याचा विचार त्यांनी खोडून काढला. लवाद निर्णयानंतर " संस्थेचे कार्य चांगले आहे, ते टिकले पाहिजे, वाढले पाहिजे आणि जे कोणी दोषी असतील त्यांना काढून टाकले पाहिजे. " या त्यांच्या उद्गारात शिक्षणाच्या कार्याला शाश्वती देण्याचे त्यांचे धोरण व्यक्त होते. सर्व क्षेत्रातही त्यांची दृष्टी सखोल आणि दूरगामी आहे, हे स्पष्टपणे निदर्शनास येते. नेत्याच्या ठिकाणी असलेली ही दृष्टीच देशहिताला कारणीभूत होणार आहे. याउलट असणारा दृष्टिकोन देशघातकी होऊ शकेल.

गेली पंचवीस वर्षे माझा आणि माननीय यशवंतराव ह्यांचा दृढ संबंध आलेला आहे. १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्याच्या वेळीही मी सातारा जिल्हा विद्यार्थी काँग्रेसचा अध्यक्ष असताना आणि भूमिगत कार्यकर्त्यांबरोबर भूमिगत राहून स्वातंत्र्य-लढ्याचे काम प्राणपणाने करीत असतानाही माननीय यशवंतराव चव्हाण यांच्याकडे आम्हा तरुणांचे स्फूर्तिस्थान म्हणून आम्ही पाहात होतो. देशाला चिरस्वरूप आणि ललामभूत झालेल्या महात्मा गांधींसारख्या व्यक्तींच्या त्यागाची व सच्चारित्र्याची आणि सेवाधर्माची आत्माहुती देण्याची परंपरा टिकविण्यात देशाचा सर्वांगीण विकास आहे, यावर माझी अढळ श्रद्धा आहे. ह्या परंपरा नामदार यशवंतराव चव्हाण टिकवून ठेवतील असा मला विश्वास आहे.

卐 卐 卐

## सच्चा समाजवादी नेता

### श्री. रामचंद्रराव नामदेवराव भांगरे, शिंदे, सदस्य नासिक जि. प. ( नासिक )

नामदार श्री. यशवंतराव चव्हाण यांचेशी माझा प्रत्यक्ष संबंध कर्मवीर काका-साहेब वाघ यांच्या सान्निध्यामुळे आला. सामान्य जनतेची रास्त गाऱ्हाणी कर्मवीर काकांनी राज्यकर्त्यांच्यापुढे निधडया छातीने आजपर्यंत मांडली आहेत. नामदार श्री. यशवंतरावांनी त्यांना योग्य मान देऊन त्यांच्या समाजकार्याची प्रशंसा केली आहे. सार्वजनिक क्षेत्रातील त्यांचे संबंध अभ्यासण्याचा मला लाभ झाला आहे. श्री. यशवंतरावांची मी आजपर्यंत अनेक भाषणे ऐकली आहेत. त्यांतून खालच्या गरीब वर्गाबद्दलची त्यांची तळमळ सतत दिसून आली. नेहमी नवे विचार व ताजेतवाने मार्गदर्शन यामुळे कार्यकर्ते त्यांच्यावर बेहद्द खूष असतात. मला तर वाटते, महाराष्ट्राला गेल्या २५० वर्षांत असे विचारसंपन्न व प्रभावी नेतृत्व लाभले नाही. यशवंतरावांच्या रूपाने ते महाराष्ट्रात साक्षात उभे आहे.

आपसातील मतभेद विसरून श्री. यशवंतराव चव्हाण यांना आम्ही नासिक जिल्ह्यातून लोकसभेवर बिनविरोध पाठवून दिले. तदनंतर त्यांची संरक्षणपदाची कामगिरी किती मोलाची झाली हे सर्वांना माहीत आहे. त्यांचे सबंध राजकीय, सामाजिक, आर्थिक धोरणाविषयी खरोखर हंसक्षीर न्यायाने मूल्यमापन केले तर त्यातून सच्चा समाजवादी नेता हीच गोष्ट त्यांचेसंबंधी सिद्ध होईल. नासिक जिल्ह्याच्या दौऱ्यावर ते असताना प्रचंड सभेत त्यांनी बोलताना असे उद्‌गार काढले होते की, " भारतात जर समाजवाद आला तर त्याचा पाळणा महाराष्ट्रात पहिला हालेल. " याचा अर्थ महाराष्ट्र प्रत्येक पुरोगामी धोरणात आघाडीवर राहील. श्री. यशवंतराव चव्हाण हे अत्यंत मुत्सद्दी नेते असून समाजवादी चळवळ पुढे नेण्यासाठी लागणारे राजकीय डावपेच व धोरण यांचो ते बरोबर आखणी करतात. समाजवादाचा अग्रदूत कॉम्रेड लेनिन यांनी म्हटल्याप्रमाणे " एक पाऊल पुढे व दोन पावले मागे जाऊन जोरात उडी घेणे कसे हिताचे असते, ह्याचे प्रत्यंतर श्री. यशवंतरावांनी प्रत्यक्ष व्यवहारात उतरवून दिलेले आहे. त्यांच्या पाठीमागे तरुणवर्गाने उभे राहून त्यांना भारताचा सुयोग्य कारभार करण्यास व समाजवाद लवकरात लवकर आणण्यास हातभार लावावा, अशी माझी भारताच्या तरुणवर्गास विनंती आहे. " श्री. यशवंतराव चव्हाण यांना त्यांच्या कार्यात सुयश लाभो व भारताच्या कोंदणातील कोहिनूर ठरोत, हीच माझी सदिच्छा आहे.

卐 卐 卐

# सैनिकी शिक्षण

प्रिं. गो. ध. टेकाळे, एम्. ए., बी. एड्., प्रा. सैनिक स्कूल, त्रिवेंद्रम, ( केरळ )

छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेल्या सातारा शहरात सैनिक शाळा सुरू करण्यात यशवंतरावजींचा सिंहाचा वाटा आहे. ही सैनिक शाळा १९६१ साली ते महाराष्ट्राचे मुख्य मंत्री असताना स्थापन करण्यात आली. यशवंतराव भारताचे संरक्षणमंत्री झाल्यावर भारतातील सर्व शाळाकॉलेजांमधून ए. सी. सी. व एन्. सी. सी. चे शिक्षण देण्याची त्यांची दूरगामी दृष्टी आपणांस दिसून आली. राष्ट्राच्या सदैव संरक्षणासाठी भारतीय तरुण-तरुणींना सक्तीचे लष्करी शिक्षण घेणे किती आवश्यक आहे याची पूर्ण जाणीव या राष्ट्रधुरीण नेत्याला आहे.

संरक्षणमंत्री असताना ते भारतीय सैनिक शाळांच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष होते. या मंडळाच्या बैठकीच्या वेळीं ते या शाळांच्या प्रशिक्षण कार्यक्रमा-विषयी मोठ्या उत्साहाने चौकशी करीत व मंडळाच्या अडचणी दूर करण्याविषयी अत्यंत जागरूकता दाखवीत. ते जेव्हाजेव्हा अशा सैनिक शाळांना भेटी देत तेव्हा तेव्हा छत्रपती शिवाजीमहाराजांपासून आपण शिस्तबद्ध नागरिक व्हायला शिकले पाहिजे असे आवर्जून सांगत.

१९६४ साली केरळमधील त्रिवेंद्रमजवळील कळकूटम् येथील सैनिक स्कूलला त्यांनी भेट दिली. त्या वेळीं तेथील विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले, " सैनिक शिक्षणाने आपल्या जीवनात शिस्त, आज्ञाधारकपणा, अंगीकृत कार्याविषयी निष्ठा, वक्तशीरपणा हे गुण अंगी बाणण्यास मदत होते. देशसंरक्षणासाठी उत्तम सैनिकांची अत्यंत आवश्यकता असते. म्हणून आदर्श सैनिक तयार करण्यासाठी या सैनिक स्कूलची स्थापना झाली आहे. येथे मिळणाऱ्या सैनिक शिक्षणाच्या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन आपले राष्ट्र बलवान करण्यासाठी प्राणपणाने प्रयत्न करणे हे तुम्हा तरुणांचे मुख्य कर्तव्य आहे. भारताची सर्व भिस्त तुमच्यासारख्या नवजवानांवर आहे याची सतत जाणीव ठेवून तुम्ही आपला दैनंदिन कार्यक्रम पार पाडला पाहिजे. " यशवंत-रावांच्या या राष्ट्रप्रेमी विचारांनी आमची मने अक्षरशः भारावून गेली होती.

卐 卐 卐

# पानशेत–प्रलयातील देवमाणूस

श्री. न. शं. जमदग्नी, एम्. ए., प्राचार्य, एम्. ई. एस्. कॉलेज, पुणे.

१२ जुलै १९६१ ह्या दिवशी पानशेतच्या प्रलयाची पहिली धडक बसली ती एम्. ई. एस्. कॉलेजला. मुठा नदीच्या काठावर असलेल्या ह्या कॉलेजची वसती-गृहे, कॉलेजची लायब्ररी व फिजिक्सच्या प्रयोगशाळा ह्यांचे अतोनात नुकसान झाले. सबंध कॉलेज मांडीभर चिखलाने नुसते माखून निघाले होते.

अशा संकटात आम्ही सर्व मंडळी सापडलो असताना आम्हांस सर्वप्रथम धीर देणारे नेते म्हणजे श्री. यशवंतराव चव्हाण ! पुरानंतर दोन दिवसांनीच ते अचानक सकाळींच कॉलेजात येऊन दाखल झाले. मी लगेच ऑफिसमधून उठून त्यांना भेटण्यासाठी खाली गेलो. त्यांनी पहिला प्रश्न विचारला की, पानशेत फुटल्याचे तुम्हांला केव्हा कळले ? त्यांच्याबरोबर आलेले सर्व वरिष्ठ सरकारी अधिकारी कान देऊन ऐकू लागले की, मी काय उत्तर देतो. आम्हांला ही बातमी सकाळीं १० नंतर कळली होती व त्याप्रमाणे मी त्यांना सांगितले. त्या वेळीं चिखल तुडवीत मी त्यांना लायब्ररीकडे नेत होतो. लायब्ररीची ती दशा पाहून श्री. यशवंतराव ह्यांना काय वाटले असेल ते सांगणे शक्य नाही. मात्र मला त्यांनी पुनः एक प्रश्न विचारला की, "तुम्ही लोक धैर्याने कॉलेज सुरू करणार ना ?" ह्या प्रश्नाने मनाला इतका धीर आला की त्या क्षणी मी त्यांना उत्तर दिले "वाटेल ते कष्ट पडले तरी आम्ही कॉलेज एक महिन्याच्या मुदतीत निश्चित सुरू करणार." 'ठीक तर' असेच काहीसे ते बोलल्याचे स्मरते. सर्व कॉलेज हिंडून पाहिल्यानंतर पुनः एकदा ते दुःखातिशयाने सुन्न झालेल्या एखाद्या नातेवाइकाचे जसे आपण धीर देऊन सांत्वन करतो तसे बोलून भरकन् निघून गेले.

मा. यशवंतरावजींच्या बोलण्याने आमच्यात इतकी जिद्द निर्माण झाली की, खरोखरी एक महिन्यात कॉलेजची घंटा खणखणू लागली. आमच्या विद्यार्थ्यांनी कॉलेजातील चिखल काढून टाकला व ग्रंथालय पूर्ववत् चालू केले. प्रयोगशाळाही आपापली सेवा करण्यास सिद्ध झाल्या. घरोघरी जाऊन आम्ही दोनअडीच लाखांच्या देणग्या मिळविल्या. आम्हांला ही स्फूर्ती दिली मा. यशवंतरावांच्या वेचक शद्बांनी.

आम्ही 'पानशेत' विसरलो परंतु 'पुनश्च हरीः ॐ' ची मा. यशवंतराव यांनी दिलेली संथा कधीही विसरणार नाही !'

卐 卐 卐

# माझिया माहेरा जा

सौ. ज्योत्स्ना भोळे, स्वरवंदना, पुणे.

बारशाच्या दिवशी ठेवलेले नाव हे किती सार्थ असते याचे उदाहरण म्हणजे आमचे श्री. यशवंतरावजी ! कुठल्याही कठीण प्रसंगी त्यांना उभे करावे, कठीण वाटणारा तो प्रसंग मागे पळालाच पाहिजे. किती सहज लीलेने ते सर्व प्रसंग हाताळीत असतात. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना काही मोठ्या कार्यक्रमांच्या वेळी भेट होत असे. एवढे कर्तबगार असून सुद्धा वागणे किती साधेपणाचे ! राजकारणात पेचप्रसंग निर्माण व्हावेत, यशवंतरावांनी ते सोडवावेत. नावाप्रमाणे यश हे ठरलेलेच. म्हणूनच मी वर म्हटले की, यशवंत हे नाव त्यांना किती सार्थ आहे.

मी एक त्यांची आठवण सांगणार आहे, ती आहे एका भावगीताबद्दलची. चार-पाच वर्षांपूर्वी यशवंतरावांचे मोठे ऑपरेशन झाले. त्यांना फार त्रास व्हायला लागला. तेव्हा त्यांनी माझे, ' माझिया माहेरा जा ' हे भावगीत लावा म्हणजे बरे वाटेल असे सांगितले. हे ऐकून माझ्यासारख्या लहान कलावंताला किती आनंद झाला हे मी सांगू शकत नाही. यशवंतरावांना संगीताची अत्यंत आवड आहे पण ती अतिरेकी मुळींच नाही. कोणत्या गोष्टीचा स्वाद किती प्रमाणात घ्यायचा याचे त्यांच्या ठिकाणी तारतम्य आहे. कलावंताबद्दल त्यांना नितांत आदर वाटतो.

त्याचे असे झाले. चार वर्षांपूर्वी मी लंडनला होते. त्याच वेळी यशवंतरावही महत्त्वाच्या कामासाठी लंडनला आले होते. महाराष्ट्र मंडळात त्यांचे भाषण ठेवले होते. प्रथम मी महाराष्ट्रगीत म्हटले. त्याच वेळी यशवंतरावांची भेट व्हावी अशी मी इच्छा व्यक्त केली. लगेच त्यांनी त्यांच्या सेक्रेटरीस विचारून वेळ ठरविली. ते श्री. जीवराज मेहता यांचेकडे उतरले होते. ठरल्याप्रमाणे मी गेले, पण मला पाच-दहा मिनिटे उशीर झाला. जीवराजजी आमची वाटच पाहात होते. मला पाहिल्याबरोबर ते म्हणाले, " मॅडम, आपण फार उशीर केलात, आम्ही आता निघालो. " एवढ्यात यशवंतराव आले आणि म्हणाले, " नाही ! नाही ! ! प्लीज मला त्यांना पाच मिनिटं भेटलं पाहिजे ! " नंतर त्यांनी माझी आस्थेवाईक रीतीने चौकशी केली ! केवढे हे मोठे मन ! मला मात्र शरमल्यासारखे झाले. कलेचे मूल्य जाणणाऱ्या या थोर मनाच्या नेत्यास माझे शतशः प्रणाम ! त्यांना त्यांच्या कार्यात सदा यश लाभो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना.

卐 卐 卐

# थोर माणुसकीची साक्ष

## सौ. शिरीष पै, संपादिका, " दैनिक मराठा "

नामदार श्री. यशवंतरावजी चव्हाण ह्यांचा आणि माझा प्रत्यक्ष परिचय होण्याचा योग कधी आला नाही. त्यांच्याविषयी मी नेहमी ऐकत आणि वाचत आले आहे. कधी दुरून, कधी जवळून असे मी त्यांना पाहिले आहे. त्यांची व्याख्याने ऐकली आहेत. माझ्या " सोन्याची खाण " या नाटकाचा प्रयोग १९६७ च्या ऑगस्ट महिन्यात पुण्याच्या भरत नाट्यमंदिरात झाला असता ते थोडा वेळ प्रयोगाला उपस्थित होते. त्या वेळी ते नाटकात काम करणाऱ्या कलावंतांशी अतिशय खेळीमेळीने वागले होते. काही वर्षांपूर्वी शब्दरंजन मासिकातून संपादक ग. दि. माडगूळकर यांनी " माझी वरपरीक्षा " असा विषय देऊन माझ्याकडून एक लेख मागविला होता. याच परिसंवादात सौ. वेणुताई चव्हाण यांचाही लेख होता. त्या लेखातून नामदार यशवंतरावजींच्या प्रेमळ आणि कुटुंबवत्सल स्वभावाचा जो परिचय सौ. वेणुताईंनी घडविला होता तो अतिशय हृदयंगम वाटला होता.

नामदार यशवंतरावजींच्या राजकीय जीवनाचे समीक्षण करावे एवढी माझी योग्यता नाही, इतके माझे ज्ञान नाही. पण त्यांना पाहाताना, त्यांच्याविषयी ऐकताना एका गोष्टीविषयी माझ्या मनाची नेहमीच खात्री पटत गेली. ती ही की, नामदार यशवंतरावजी अत्यंत सहृदय आहेत. नेमक्या ह्याच गोष्टीचा प्रत्यय मला माझ्या वडिलांच्या दुःखद निधनानंतर त्यांच्या बाबतीत आला. दिनांक १३ जून १९६९ रोजी माझ्या वडिलांचे निधन झाले. दिनांक १४ जून रोजी नामदार यशवंतरावजींनी स्वतःच्या हाताने माझ्या आईला सांत्वनपर पत्र लिहिले. ते पत्र पुढीलप्रमाणे होते :

> " रात्री आचार्यांच्या दुःखद निधनाचे वृत्त समजताच अतोनात दुःख झाले. तुमचे दुःख तर अपार आहे. परंतु उभा महाराष्ट्र तुमच्या दुःखात सहभागी आहे. आचार्य अत्र्यांच्यासारखा पुरुष क्वचित निर्माण होतो. त्यांचे अष्टपैलू व्यक्तित्व, गरिबांची कणव व अन्यायाविरुद्ध क्रोध, या गुणांमुळे ते अधिकच विशाल व प्रभावी झाले होते. असा पुरुष पुन्हा होणे अवघड. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे व भारताचेही अपरिमित नुकसान झाले आहे. आम्ही पतिपत्नी आपल्या व आपल्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. "

माननीय यशवंतरावजींचे ते कापऱ्या अक्षरात लिहिलेले पत्र त्यांच्या हृदयाला होत असलेल्या वेदनांचे मूर्तिमंत प्रतीकच वाटले मला! माझे डोळे अश्रूंनी भरून आले. अनंत जबाबदाऱ्यांचे डोंगर मस्तकावर असताना त्यांनी स्वतः हे पत्र

लिहून पाठविले याची फार अपूर्वाई वाटली आणि पुन्हा एकवार त्यांच्यामधल्या थोर माणुसकीची साक्ष पटली.

माझ्या वडिलांचे आणि त्यांचे कितीही राजकीय मतभेद असले किंवा प्रसंगी त्यांच्यावर वडिलांनी आपल्या लेखणीच्या द्वारे कडाडून हल्लाही केला असला तरी ते मनातून सन्माननीय यशवंतरावजीवर लुब्ध होते. म्हणूनच की काय त्यांनी आपले " मोरूची मावशी " हे नाटक मोठ्या प्रेमाने त्यांना अर्पण केले आहे. ते अर्पण करताना माझे वडील म्हणतात.

" राजकीय वातावरणात राहूनही हास्यविनोदाचा मुक्तकंठाने आस्वाद घेण्याचे आपले सामर्थ्य ज्यांनी अद्याप गमावलेले नाही त्या भारताच्या संरक्षणमंत्र्यांना, यशवंतराव चव्हाणांना हे नाटक सप्रेम अर्पण. "


卐 卐 卐

# यशवंतराव चव्हाण
# गीत-गौरवांजली

या विभागातील सन्माननीय कवी :—

* श्री. **ग. दि. माडगूळकर**, गीतरामायणकार
* श्री. **नागेश मोगलाईकर**, धुळे
* श्री. **इब्राहीमअली वारणे**, राष्ट्रपति-पदक विजेते
* श्री. **भालचंद्र ल. रानडे**, बी. ए. ( ऑनर्स )
* सौ. **मीराबाई कागदे**, एम. ए.
* प्रा. **या. ब. हणमंते**, एम. ए., बी. टी.
* महाराष्ट्रकवी **यशवंत** ऊर्फ **य. दि. पेंढरकर**

* * *



महात्मा गांधीजींचा थोर वारसा आम्ही चालविला. भारताच्या अस्मितेची आम्ही प्राणापलीकडे जपणूक केली. ही धुरा आता आपल्या खांद्यावर घ्या. अखिल भारतात ही धुरा पेलणारा सामर्थ्यसंपन्न पुरुष एकच आहे. तो म्हणजे तुम्हीच यशवंतराव—असे तर नेहरूजींना सांगावयाचे नाही ना ?



भारताचे नेतृत्व आणि कर्तृत्व या दोन महान विभूतींच्या रूपाने साकार झाले आहे. आता उद्याची बात नाही. याची देही, याची डोळा समाजवादाची गंगा या भरतभूमीवर आणू हीच आपली प्रतिज्ञा.



पंच्याऐंशी वर्षांची परंपरा असलेली कॉंग्रेस दुभंगली. देशात अस्थिरता निर्माण झाली. अशा वेळी नेहरू कन्येच्या-इंदिराजींच्या-पाठीशी पहाडासारखा स्थिर उभा असणारा महापुरुष, समाजवादाचे स्वप्न साकार करू पाहणारा विश्वामित्र, लक्ष्मीपुत्रांच्या सान्निध्यात-बॅंकात- असणाऱ्या लक्ष्मीचा ओघ गोरगरिबांच्या झोपड्याकडे वळविणारा हाच तो भगीरथ.



मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास । कठिण वज्रासि भेदू ऐसे ॥ हा तुकोबारायांचा सत्‌शिष्य आता कळिकाळाशी सामना द्यायला धीट झाला आहे. एवढे प्रभावी नेतृत्व, शुद्ध चारित्र्य, लोकसंग्राहक वृत्ती, मूर्तिमंत सौजन्य, नवसमाजनिर्मितीची अखंड तळमळ, भारताच्या एकतेची आणि वैभवाची स्वप्ने रंगविणारा हा वाटसरू...एकविध आम्ही न करू पालटा। न संडू ती वाट सापडली ॥ असा संदेश देऊन कर्तव्यबुद्धीने वाटचाल करीत आहे.

हे भारतीय सुपुत्रा, अशीच तुझी यशस्वी वाटचाल होऊ दे.

## औक्षवंत व्हा !

पद्मश्री **ग. दि. माडगूळकर** गीत रामायणकार, पुणे

कोटि मुखांनी आशिर्वच दे, महाराष्ट्र माता
औक्षवंत व्हा, विजयवंत व्हा , प्रियतम यशवंता !
तुमच्या लेखीं नगरी नगरी देवराष्ट्र होई
घराघरांतुन उभ्या ठाकल्या वरद विठाबाई
" स्वस्ति " वांछितो जनपुरुषोत्तम, उंचावून शतां— ॥१॥

सह्याद्रीच्या शिखरीं उठती स्वायंभव नाद
सातपुड्याच्या कड्यांत घुमती त्याचे पडसाद
" अजातशत्रू " आज लाभला अम्हा राष्ट्रनेता ! ॥२॥

शिवस्मृतीची शाल अर्पिती, लोक लोकमान्यां,
टिळकपणाचा टिळक लाविती तुम्हां नागकन्या,
प्रतिपच्चंद्रापरी वाढुं द्या अशीच जय गाथा— ॥३॥

लोकशाहिचे तुम्ही पेशवे, सेवेचे स्वामी
तुमच्या मागें राहो जनता नित्य पुरोगामी
समर्थ होवो महाराष्ट्र हा, भारत-भू—त्राता— ॥४॥

卐 卐 卐

## यशवंत तुम्ही जयवंत तुम्ही !

**श्री. नागेश मोगलाईकर**, धुळे.

यशवंत तुम्ही जयवंत तुम्ही, तुम्ही विजयाचे मानकरी
धवल यशाचा तुरा खोविला विधिने तुमच्या शिरी ॥ धृ० ॥

तुमच्या रूपे सौजन्याला आला आकार
तुमच्या योगे जणू अस्मिता झाली साकार
तुम्हामुळे हा छाती फुगवुनि उभाच सह्यगिरी ॥ १ ॥

संत सज्जना विनम्रतेने शिर ते नमवावे
खल दुष्टांचे निष्ठुरतेने शिर ते नमवावे
शिवरायाच्या परंपरेची प्रचीति येत खरी ॥ २ ॥

भारतभूचे तुम्हि गृहमंत्री, महाराष्ट्राचे राम
विरोधकांचा विरोध पावे तुमच्या पुढे विराम
राष्ट्राची ही शान सुरक्षित असे आपुल्या करी ॥ ३ ॥

हिमालयासम उदात्त उज्ज्वल तुमचे कर्तृत्व
कठिण प्रसंगी कुशलपणे तुम्हि करिता नेतृत्व
स्वदेशहित चिंतनाविना नच अन्य भाव अंतरी ॥ ४ ॥

शुक्लेंदूपरि असेच व्हावे सदा वर्धमान
आइ भवानी जगदंबेचे तुम्हांस वरदान
यशवंत नि गुणवंत मराठा आला तुळजापुरी ॥ ५ ॥

卐 卐 卐

## हाक देशाची ती येता !

**इब्राहिमअली वारणे,** ( राष्ट्रपति-पारितोषिक विजेते ) महाबळेश्वर

हिमालय साथ घाली, या रे रक्षण कराया
यशवंतराव झणी, आणि गेले धाउनिया ॥ १ ॥

भारताचा हा सुपुत्र, कृष्णाखोऱ्यात नांदला
हाक देशाची ती येता, कधी मागे न राहिला ॥ २ ॥

शिवरायाची ही भूमि, शूर वीर निपजले,
स्वातंत्र्याच्या काजासाठी, पाट रक्ताचे वाहिले ॥ ३ ॥

इथे झाले ज्ञानेश्वर, तुकाराम एकनाथ,
हिन्दवी स्वराज्यासाठी, मावळ्यांनी दिली साथ ॥ ४ ॥

देशास्तव लढण्याचा, खास मराठ्यांचा बाणा,
कोसळोत संकटे ती, ताठ सदा त्यांच्या माना ॥ ५ ॥

अशा परंपरामधी, वाढलात सदा तुम्ही
कसोटीची वेळ खरी, पहातो वाट आम्ही ॥ ६ ॥

महाराष्ट्र राज्य मोठे, प्रश्न विविध तयाचे,
सौजन्ये, विचारान्ती, सोडविले तुम्ही साचे ॥ ७ ॥

भारताचे संरक्षण, नाही सुलभ हे काम,
चिनी दारात ठेपले, आता कसला आराम ॥ ८ ॥

सिद्ध सदा भारतीय, देशासाठी मरायास,
यशवंत नेतृत्वात, आहे आमुचेच यश ॥ १० ॥

卐 卐 卐

## सचिवोत्तम

**श्री. भा. ल. रानडे** बी. ए. (ऑनर्स), सांगली

शोभविती गुणविभवे राज्य हे अती । श्रीमान् यशवंतराव धन्य संम्प्रती ॥ धृ ॥
संगोपुनि मुदित होय आज कोयना,
कृष्णा करि कौतुकास मोद हो मना,
सौजन्या देखुनिया हरपली मती । श्रीमान् यशवंतराव धन्य संप्रती ॥ १ ॥
आन्दोलनि क्रांतिवीर म्हणुनि गाजले,
सुजन-हृदय-सिंहासनी छान बैसले
शक्ति-भक्ति-कीर्तियुक्त, मुळि न विकृती । श्रीमान् यशवंतराव धन्य संप्रती ॥२ ॥
एकान्ती चिन्तनपर वाढवी गुणा,
लोकान्ती चारु-चतुर, गाजवी रणा,
विद्येने मान्य पन्त-पंडिता प्रती । श्रीमान् यशवंतराव धन्य संप्रती ॥ ३ ॥

संघटनी कुशल, अचल काळि कठिणही,
फुलत अतुल गन्धमंत दिल-गुलाबही
सारथि हा निपुण ठरो भावि भारती । श्रीमान् यशवंतराव धन्य संप्रती ॥ ४ ॥

जिंकियले भावबळे स्वजनबांधवा,
सुमनांचा शिवमहाल बांधण्या नवा,
कृषिवल-कुल-तारकास गाउ आरती, श्रीमान् यशवंतराव धन्य संप्रती ॥ ५ ॥

卐 卐 卐

## तुम्हांला नमित अमित जनता !

**सौ. मीराबाई कागदे**, एम्. ए., डोंबिवली

हे हिन्दभूषणा महाराष्ट्र-सुता
जय जय यशवंता । तुम्हांला नमित अमित जनता ॥ धृ० ॥

पंकामाजी कमल विकसले,
जनमंदिरिं सद्गुणे विनटले,
नव-भारतिं या नव्या पिढीची
दिव्यतम तुम्ही स्फूर्ति-देवता । तुम्हांला नमित अमित जनता ॥ १ ॥

बहूजनाते देउनि दृष्टि,
तुम्ही दाविली त्या नव-सृष्टि
भावसुमांची कृतज्ञ वृष्टि,
करितसे मोदे ही जनता । तुम्हांला नमित अमित जनता ॥ २ ॥

अभाव पाहुनि नेतृत्वाचा,
विद्वत्वाचा-कर्तृत्वाचा,
सह्याद्रिसुत हिमालयाचा
ठरला "यशवंत" चि त्राता । तुम्हांला नमित अमित जनता ॥ ३ ॥

शक्ती-बुद्धी अन् धृति-संयम,
इथे गुणांचा घडला संगम,
व्यक्तिमत्त्व ते अति हृदयंगम,
भारती जागविते अस्मिता । तुम्हांला नमित अमित जनता ॥ ४ ॥

प्रतापशाली वीर शिरोमणी,
शिवप्रभु पुनरपि की अवतरुनि
सार्थ नाम ते दुर्जन दमुनि,
केले तुम्हीच यशवंता । तुम्हांला नमित अमित जनता ॥ ५ ॥

यशवंतांचा यशोदिनमणि,
चिर तळपू दे भारत गगनी,
आइ भवानी तुला विनवणी,
तयावर ठेव वरद हस्ता । तुम्हांला नमित अमित जनता ॥ ६ ॥

卐 卐 卐

## मराठा वीर चालला पुढे !

**प्रा. या. ब. हणमंते**, एम्. ए., बी. टी. आर्वी ( वर्धा )

निज मातेची आर्त हाक ती जेव्हा कर्णी पडे, मराठा वीर चालला पुढे ॥धृ०॥

मरेल पण हटणार रणी ना
म्हणुनि " मराठा " संज्ञा ज्यांना
शिवरायाचा ओजस बाणा
असता, अमुचे धजेल का कुणि करायास वाकडे ? मराठा वीर चालला पुढे ॥१॥

गिरिराजावर अरिष्ट येता
करिल कोट आपुल्या छातीचा ।
सह्यगिरी, प्रत्यय वचनाचा
आणाया, मानाया आज्ञा प्रयाण दिल्लीकडे, मराठा वीर चालला पुढे ॥ २ ॥

तुफान भीषण जरी अनावर
नेले तारू पैलातिरावर
कर्णधार हा असला कणखर
प्रांतहिता गौणत्व देउनी देशहिताच्या पुढे, मराठा वीर चालला पुढे ॥ ३ ॥

उरला ना आम्हांला वाली
ओघळती नयनाश्रू गाली ।
शोकसागरा भरती आली,
तारणार या महाराष्ट्राला ? प्रश्नचिन्ह हो खडे, मराठा वीर चालला पुढे ॥ ४ ॥

कर्णी मोदद वार्ता आली
महाराष्ट्राची छाती फुलली ।
आनंदाला उर्मी आली
जिकडे तिकडे वाजतात की " यश " चिंतन चौघडे, मराठा वीर चालला
पुढे ॥ ५ ॥

तळपतील तेजे तलवारी
चढतिल त्यांना आता धारी
लढतिल धैर्ये बंदुकधारी
चीनी सेना किती असेना, चारिल त्यांना खडे, मराठा वीर चालला पुढे ॥६॥

भिन्न धर्म जरी एक भावना
विभिन्न भाषा भिन्न भावना
प्रांत अलग तरि सलग भावना
खरीखुरी जाणीव अंतरी राखुनि लक्ष्याकडे, मराठा वीर चालला पुढे ॥ ७ ॥

यश उजळाया महाराष्ट्राचे
यश धवलाया भारतभूचे
पृथ्वीराजाच्या वंशाचे
मदोन्मत्त शत्रुशी लढाया, वाराया साकडे, मराठा वीर चालला पुढे ॥ ८ ॥

卐 卐 卐

## स्नेह–भावांजली

**महाराष्ट्रकवी–यशवन्त** ( य. दि. पेंढरकर )

[ जाती : लीलारती ]

रसिकतेस येथे औदार्यलिंकृती
कसल्याहि झापडी इथे न ल्याली मती
दिलखुलासपण:बिंबले इथे लोचनीं
घेतली विवेकाकडुनि आणि शिकवणी
शालीनपणा पतिदेवाचि सत्तेप्रती
[ मग केवि थोर ते उच्चपदी बिघडती ? ]
हो !' समूर्त झाले असे येथ सौहार्द
ज्यामुळे सद्य परिपार-जनांते दर्द
मिळतसे दिलासा येथे तेजोहता
अन्तराय नाही येथे स्नेहांकिता ॥१॥

कृष्णा नि कोयना यांच्या चिरसंगमीं
डुंबले,–तयांची गुणवन्तांना हमी
कीं " प्रेमभरे जरि रमाल निज उद्यमीं
तरि यशोवैभवा पडेल काहि न कमी "
हे जीवित म्हणजे साक्षात् संदेश हा
कोणासहि प्रत्यय येइल याचा पहा ॥२॥

हा महाराष्ट्र बलवंत असावा सदा
रगडून पदतळी येणाऱ्या आपदा
इतिहासा याच्या नवीन तेजस्विता
लाभुनी, ठरावा सखाचि हा भारता
ही अंतर्यामीं बाळगुनी लालसा
वर्तेतो – पहा त्या इथे महा-मानसा ॥३॥

" विश्ववंद्य आहे भारतीय संस्कृती
गातात अशी दिग्ललना जरि आरती
आरतीमधे त्या गुंगुनि जाउनि परी
मुडपून पडावे काय खाटल्यावरी ?
अवतरती नूतन युगामागुनी युगे
स्वीकारिल त्यांची आव्हाने तो तगे
तरि सांभाळावे कोठवरी कुंपणा ?
अंबरासारखी असीमता अंगणा
हो, आणायाची उरीं ज्योत चेतवा
तरि संस्कृतिला लाभेल तजेला नवा "
ही समूर्त कळकळ येथ उभी ठाकली
निज समर्पितो ही स्नेहादर-अंजली ॥४॥

卐 卐 卐



# श्री. यशवंतराव चव्हाण : विचार मंथन

ज्ञानेश्वराच्या रूपाने संतप्रवृत्ती, शिवरायाच्या रूपाने पराक्रम, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या रूपानें स्वार्थत्याग आणि लोकमान्य टिळकांच्या रूपाने विद्वत्ता व राजकारण महाराष्ट्रापुढे उभे आहे. विकासकार्याच्या मोहिमेवर आपण निघालो, सिंहगड चढून आलो आहोत. या गडावरून पळून जाण्याचा प्रयत्न कोणी करीत असतील तर त्यांना सांगावेसे वाटते की, पळून कोठे जाता? दोर केव्हाच तोडून टाकले आहेत.

★ ★ ★

या देशातील लोकशाही जर यशस्वी व्हावयाची असेल तर शिक्षण, सहकार, शेती आणि आरोग्य या चार खात्यांचे काम यशस्वी झाले पाहिजे. आपल्या देशाच्या विकासकार्यात हातभार लावून लोकशाही वृत्ती आणि संकेत यांची जोपासना करण्याचे काम करणे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे.

★ ★ ★

विकास हा जरी निव्वळ विकासाची साधनें निर्माण करण्यामुळे होत असला तरी त्या साधनांचा वापर करणारा त्यातला जो मनुष्य आहे, त्याचा विकास हाच विकास योजनेतील शेवटी फार महत्त्वाचा भाग आहे. लोकशाहीत सरकारवर टीका होणे हे कारभार सुधारण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. पण ती टीका विधायक व तात्त्विक असावी.

★ ★ ★

घोड्यावर बसणाऱ्यालाच घोड्याची खोडी माहीत असते. त्याप्रमाणे राज्यकार-भाराचे प्रश्न आम्ही हाताळतो म्हणून त्यात काय दोष आहेत ते आम्हाला जास्त माहीत आहेत. तथापि राज्ये चालविणाऱ्या माणसापेक्षा राज्यशक्तीच्या बाहेर जी माणसे कार्य करीत असतात त्यांच्या पुण्याईनेंच ती चालतात. ती माणसे ज्या परंपरा आणि ज्या शक्ती निर्माण करतात त्यांचा राज्ययंत्रणेवर प्रभाव पडतो.

★ ★ ★

लोकांचे समाधान हीच चांगल्या राज्यकारभाराची खरी कसोटी आहे. म्हणून राज्यकारभारामध्ये सुधारणा व प्रगती करण्यासाठी आत्मसंशोधनाची, आत्मटीकेची आपल्याला फार जरूरी आहे. विलंब हा सबंध राज्यकारभाराच्या पाठीमागे लागलेला एक राक्षस आहे, असे माझे मत आहे. नित्य जागरूकता ठेवल्याशिवाय हा राक्षस पराभूत होणार नाही.

★ ★ ★

सरकारी अधिकारी हे जनतेचे सेवकच आहेत, पण ते सरकारला जबाबदार आहेत, जनतेला नाहीत. अधिकाऱ्यांना जनतेची जी सेवा करावयाची आहे ती अधिकारावर असलेल्या सरकारच्या कार्यक्रमामार्फत करावयाची आहे. वर्दी देऊन केलेली तपासणी ही खरी तपासणी नव्हे. ते तपासणीचे नाटक असते. सेवकांच्या वागण्याची पद्धत सुधारावयाची असेल तर मधूनमधून अगाऊ वर्दी न देता अचानकपणे तपासणी केली पाहिजे.

★ ★ ★

कल्याण हे शांततेप्रमाणेच अविभाज्य आणि परस्पर पूजक आहे. दुसऱ्यांचे कल्याण करणे या तत्त्वाचा स्वीकार केल्याने स्वतःच्या कल्याणास विरोध होत नाहीच, इतकेच नव्हे तर ते स्वतःच्या कल्याणास अधिक उपयुक्त आहे. व्यक्तीचे हित हे समाजाच्या हितात आहे. सेवेचे जीवन हेच खरे जीवन आहे. आणि कोणतेही लहान काम असू द्या त्याचे महत्त्व सारखेच आहे, हे कल्याणकारी जीवनाचे तत्त्वज्ञान आहे.

★ ★ ★

शेती म्हणजे पावसावरील जुगार होय असे म्हणून हताश होऊन बसण्याने आता भागणार नाही. निश्चयाचे बळ असेल तर डोंगरसुद्धा हलविता येईल असे आपण म्हणतो, तर मग जमिनीला बांध, ताली का घालता येणार नाहीत ? आज शेतीचा संबंध नव्या नव्या शोधांशी, नव्यानव्या शेती करण्याच्या पद्धतीशी जर जोडायचा असेल तर नवे शास्त्र शेतीच्या धंद्याशी नेऊन भिडविण्याचे काम केले पाहिजे.

★ ★ ★

ज्यांना दुसरे काहीच करता येत नाही, समजत नाही, अशांचा शेती हा धंदा आहे; तो अडाणी लोकांचा, सामान्य लोकांचा व्यवसाय आहे असे समजले जाते, हे मोठे दुर्दैव आहे. या समजुतीमुळे आम्ही आमची आत्महत्या करून घेतली आहे. शेती हा एक अत्यंत महत्त्वाचा उद्योगधंदा किंवा व्यवसाय आहे हे गृहीत धरूनच आपण आपली औद्योगिक योजना आखली पाहिजे. शेतीशी संबंध असणारा मनुष्य हा शहाणा असल्याशिवाय शेती शहाणी होणार नाही.

★ ★ ★

पोलिस हा दुर्बलांचा स्नेही आणि दलितांचा सहाय्यकर्ता होणे हे त्याचे कर्तव्य आहे. जर लाचलुचपत थांबली नाही तर आपणाला भविष्यकाळ शिल्लक राहाणार नाही. निःपक्षपातीपणा आणि कार्याचा प्रामाणिकपणा हेच सरकारी अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे.

★ ★ ★

महाराष्ट्र राज्य मराठीभाषी असले तरी ते केवळ मराठी भाषिकांचे नाही. भाषिकराज्य हे साध्य नसून साधन आहे. मराठी भाषेचा विकास हा महाराष्ट्र

राज्याच्या निर्मितीचा एक स्वाभाविक परिपाक आहे. भाषिक राज्याची स्थापना हे साधन असून जनतेचा सर्वांगीण विकास हे साध्य आहे.

★ ★ ★

छत्रपती शिवाजींची ही प्रतिमा म्हणजे भारताची तेजस्विता, अस्मिता व स्वाभिमान याचेच प्रतीक आहे. शौर्य व धैर्य या गुणांना चारित्र्य व विधायक दृष्टी या गुणांची जोड मिळाल्यानेच शिवाजीमहाराज हे महाराष्ट्राचे भाग्यविधाते झाले.

★ ★ ★

संकटे असतील पण त्यांना सामोरे जाऊन झेलल्याशिवाय ती संपत नाहीत. त्यांना पाठ दाखविली की ती अधिकच पाठीशी लागतात. समान संधी ही सामाजिक न्यायाच्या कल्पनेतील महत्त्वाची बाब आहे., म्हणून बुद्धी असूनही केवळ पैशांच्या अभावामुळे तिला वाव मिळत नाही असे होता कामा नये.

★ ★ ★

राजकारण म्हणजे केवळ सत्तेच्या क्षेत्रात काही कारभार करणे वा निवडणुका लढविणे नसून समाजपरिवर्तनाचे ते एक साधन आहे. सामाजिक क्रांती हेच आता आपल्या सर्व सार्वजनिक जीवनाचे एकमेव उद्दिष्ट बनले पाहिजे. देशाचा विकास व समृद्धी घडवून आणण्याचे हे एक साधन आहे. सरकार हे हंगामी आहे तर योजनाबद्ध विकासाचा कार्यक्रम ही सातत्याने चालणारी कायम स्वरूपाची प्रक्रिया आहे.

★ ★ ★

लोकशाहीत संकेताला महत्त्व असते. माणसे कराराने एकत्र बांधली जात नाहीत तर भावनेने बांधली जातात. समाजवाद ही एक जीवनदृष्टी आहे. नियोजन हा एक समाजवादाकडे जाण्याचा मार्ग आहे. लोकशाही जमान्यात जनतेचे समाधान हीच राज्ययंत्रणेची कसोटी आहे.

★ ★ ★

महाराष्ट्र हा या भारताचा एक भाग आहे. आपली भारतनिष्ठा आणि महाराष्ट्रनिष्ठा या पूरक बनल्या पाहिजेत. महाराष्ट्राच्या भावनेत वाहत जाताना राष्ट्रनिष्ठेला तिळमात्र धक्का लागता कामा नये. इतकेच नव्हे तर या दोन निष्ठांमध्ये तरतम असा विचार करण्याची कधी वेळ आलीच तर राष्ट्रनिष्ठेला प्राधान्य दिले गेले पाहिजे, हे माझ्या विचारांचे सूत्र आजही कायम आहे.

★ ★ ★

उद्योगधंद्यात जर सतत कलहाचे वातावरण राहील तर उत्पादन चालू ठेवणेच मुष्किल होईल, मग वाढविण्याची गोष्ट तर सोडाच. तेव्हा मालक व कामगार या दोघांनाही न्याय्य असेल व सबंध समाजाचेही ज्याने हित होईल असा औद्योगिक

समेट आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक आहे. कारण अशा परिस्थितीतच उत्पादनाची वाढ निर्विघ्नपणे होत राहील.

★ ★ ★

इतिहासाने काही अडचणी निर्माण करून ठेवल्या असल्या तरी त्या आता आपण बाजूला सारल्या पाहिजेत. पूर्वी हिंदुस्थानचा जो इतिहास घडला त्याला तुम्ही व मी जबाबदार नाही. कारण तो इतिहास तुम्ही आणि मी, तुमच्या व माझ्या हातांनी घडविला नाही.

★ ★ ★

भविष्यकाळाकडे नजर ठेवून, बदलत्या दुनियेची पावले ओळखून त्यांमध्ये महाराष्ट्राचे, मराठी भाषेचे व मराठी भाषेला व महाराष्ट्रीयांना बरोबर घेणाऱ्या भारताचे स्थान नेमके कोठे आहे ते शोधून काढून आपल्याला यात्रा करावयाची आहे.

★ ★ ★

आत्मविश्वासाने आपली शक्ती कोणती ते आपल्याला समजले पाहिजे आणि आपल्या शक्तीबरोबरच आपल्यामध्ये जे दोष आहेत त्याचीही मोजदाद आपण आपल्या मनाशी घेतली पाहिजे आणि या दोन्हींचा हिशेब मनाशी बांधून मग आम्ही आमची पावले टाकली पाहिजेत.

★ ★ ★

भारताबरोबर महाराष्ट्र आपणाला मोठा करावयाचा आहे. भारत जगेल तरच महाराष्ट्र जगणार आहे. वाढणार आहे. आमच्या महाराष्ट्रीय परंपरेत जे जे पवित्र व उच्च असेल ते ते भारताच्या उत्थापनासाठी आम्ही देणार आहोत.

★ ★ ★

सबंध मानवी समाजाचे कल्याण हे आपले अंतिम ध्येय असून आर्थिक विकास हे ते ध्येय साध्य करण्याचे एक साधन आहे. विकासाच्या कुठल्याही योजनेमध्ये माणूस हा अतिशय महत्त्वाचा भाग आपण मानला पाहिजे. समाजातील कर्तृत्व जागे करून आपण एक कर्तृत्ववान समाज निर्माण केला पाहिजे.

★ ★ ★

भारताच्या इतर प्रदेशांनी महाराष्ट्राकडे अनेक बाबतींत गुरुत्वाच्या नात्याने पहावे, अशी त्याची योग्यता आहे. हे गुरुत्व कायम राखायचे असेल तर ज्यांनी या श्रेष्ठ स्थानाचा वारसा महाराष्ट्राला दिला त्यांच्या अतृप्त आकांक्षा तृप्त करण्याची जबाबदारी महाराष्ट्राने अंगावर घेऊन इतर प्रदेशांना आदर्श व्हावे, हेच त्याचे एकमेव अपरिहार्य कर्तव्य आहे.

★ ★ ★

आपल्या देशावर आक्रमण करून आपले स्वातंत्र्य संकटात आणण्याच्या निर्धाराने आपल्या शेजारचे काही देश प्रयत्न करीत आहेत. परंतु या देशातील पन्नास कोटी लोक मुर्दाडपणाने त्यांचे हे आक्रमण चालू देतील हे अगदी अशक्य आहे. आम्ही अगदीच काही मेलेल्या आईचे दूध प्यालेली माणसे नव्होत. आमच्यामध्येही स्वाभिमान आहे. स्वातंत्र्याचे आणि देशासंबंधीचे प्रेम तुमच्याआमच्या मनामध्ये आज इतक्या तीव्रतेने निर्माण झालेले आहे की, मरून जाऊ पण हटणार नाही.

★ ★ ★

पराकोटीच्या त्यागी वृत्तीची या देशाला आज फार गरज आहे. हिम्मतीने ताठ उभे राहून हा क्षात्रधर्म आपणास उभा करावयाचा असेल तर माणसामाणसामध्ये आपण जिद्दीची भावना निर्माण केली पाहिजे. देशाभिमानाचे आणि स्वातंत्र्याचे वेड देशाला लागते तेव्हाच तो देश आपले स्वातंत्र्य राखू शकतो हे आपण पक्के लक्षात ठेवा.

★ ★ ★

तुम्हा–आम्हांला इतिहासाची पुनरावृत्ती करावयाची नाही, तुम्हा–आम्हांला नवीन इतिहास घडवावयाचा आहे, नवीन काळातला इतिहास घडवावयाचा आहे. स्वतःचे रक्षण करण्यासाठी हिंदुस्थानला शेवटी स्वतःच्याच सामर्थ्यावर अवलंबून राहावे लागेल. मदत घेत असताना आमच्या तत्त्वाचा, आमच्या स्वाभिमानाचा आम्ही विक्रय करणार नाही.

★ ★ ★

संरक्षणाचा मूळ पाया जर कुठला असेल तर तो या देशातल्या प्रत्येक माणसाच्या मनात आपल्या देशाच्या स्वातंत्र्याबद्दल असलेले असीम प्रेम, जाज्वल्य भक्ती हा आहे. या देशाच्या एकतेचे, स्वातंत्र्यप्रियतेचे हे सामर्थ्य तुम्हा–आम्हांला कायम ठेवले पाहिजे. एवढेच नव्हे तर ते सतत वाढत राहिले पाहिजे. ही अत्यंत मूलभूत गोष्ट ज्या क्षणी आम्ही विसरू त्या क्षणी या देशाच्या संरक्षणाचा मूळ पायाच तुम्हीआम्ही उखडून टाकला असा त्याचा अर्थ होईल.

★ ★ ★

आपल्या या देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण करावयाचे असेल तर स्वातंत्र्याच्या रक्षणाकरिता लागणारी सगळी साहित्यसामग्री निर्माण करण्याचे शास्त्र, संघटना आणि साहित्ययोजना आपणास आपल्या देशातच तयार करावी लागेल. त्याशिवाय आपल्या स्वातंत्र्याला फारसा अर्थ राहणारच नाही. आत्मविश्वास हे संरक्षणाच्या शस्त्रागारातले अत्यंत महत्त्वाचे शस्त्र आहे.

★ ★ ★

हिंदुस्थानमध्ये एका जमातीचे, एका धर्माचे राज्य नाही. या देशातल्या पन्नास कोटी जनतेचे हे राज्य आहे. हे राज्य टिकले पाहिजे, राहिले पाहिजे, अशा उमेदीने या देशातील जनता आज उभी राहिली आहे. या जनतेच्या स्वातंत्र्याकडे कोणीही सहजासहजी वाकड्या दृष्टीने पाहणार नाही असा विश्वास तुम्हाआम्हाला या देशामध्ये निर्माण केला पाहिजे.

★ ★ ★

तुम्ही आम्हीसुद्धा खाजगी जीवनात उधारउसनवारीने मागून आणतो. पण केव्हा ? कधी एखाद्या वेळी अडले म्हणजे. पण सारखा उसनवारीने संसार चालला तर तो फार दिवस टिकत नाही. हिंदुस्थानातील पन्नास कोटी जनतेच्या स्वातंत्र्याचा संसार आपणास उभा करावयाचा असेल तर तुमचीआमची शक्ती काय आहे व ती कशी वाढेल याचा प्रथम विचार झाला पाहिजे.

★ ★ ★

हिंदुस्थानात अजून उघडीनागडी हिंडणारी गरिबी ही जर अशीच हिंडत राहणार असेल तर या स्वातंत्र्याला आणि आज आपण करीत असलेल्या सर्व प्रयत्नांना काहीच अर्थ राहणार नाही. आपण ही गरिबी हटविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मनाची गुलामगिरी हटविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्या समाजामध्ये प्रत्येक मनुष्य स्वाभिमानाने आपली मान उंच करून निर्भयपणे वावरू शकेल, त्याला पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळेल, त्याला आपल्या बुद्धीचा आणि शीलाचा विकास करण्याची संधी मिळेल अशा प्रकारचा समाज आपणास निर्माण करावयाचा आहे.

★ ★ ★

महाराष्ट्राचा मान आणि महाराष्ट्राची शान ज्यायोगे वाढेल असे काम करण्याची शक्ती ईश्वराने मला द्यावी यापेक्षा अधिक मोठ्या वरदानाची माझी अपेक्षा नाही. हिंदुस्थानने दिलेली हाक ऐकून त्याच्या सेवेसाठी आपण धावून गेलो नाही तर हिंदुस्थानचा भावी इतिहास आपल्याला माफ करणार नाही.

★ ★ ★

धर्म हा व्यक्ती आणि परमेश्वर यांच्यामधला संबंध आहे. हिंदू आपल्या मंदिरात परमेश्वराला आळविण्याचा प्रयत्न करतो तर मुसलमान आपल्या मशिदीत अल्लाशी संभाषण करण्याचा प्रयत्न करतो. ख्रिस्ती आपल्या चर्चमध्ये परमेश्वराला हाक मारतो तर शीख गुरुद्वारामध्ये परमेश्वराची प्रार्थना करतो. परंतु हे सर्व संपल्यानंतर, मंदिरातून, मशिदीतून, गुरुद्वारातून किंवा चर्चमधून जो माणूस बाहेर पडतो तो हिंदू नाही, मुसलमान नाही, शीख नाही आणि ख्रिस्ती नाही, तो फक्त भारतीय आहे ही भावना आपल्या मनात रुजली पाहिजे.

★ ★ ★

अलग अलग धर्म आणि अलग अलग जातिजमाती आणि भाषा यांमध्ये आम्ही जरी वाटलो गेलो तरी भारताचा प्रश्न आल्यानंतर पहिल्या प्रथम मी भारताचा, नंतर बाकीचे प्रश्न, ही भावना आम्ही आमच्या विचारामध्ये, आमच्या कामामध्ये वाढवू शकलो आणि उमेदीने, धैर्याने, आणि ईर्षेने आपल्या सगळ्या प्रश्नांना तोंड देण्याचा आम्ही प्रयत्न केला तर हिंदुस्थान हे एक पहिल्या प्रतीचे आणि मोठे प्रगत राष्ट्र म्हणून दुनियेमध्ये अभिमानाने जगू शकेल अशी माझी श्रद्धा आहे.

* * *

संकट ही एक संधी आहे. या दृष्टीने संकटाकडे पाहण्यास आपण आता शिकले पाहिजे. संकटासारखी दुसरी संधीच असू शकत नाही. संकट आले म्हणजे परमेश्वर संधी घेऊन आपल्या जवळ आला आहे असे समजावे. आलेल्या संकटावर आपण मात केली पाहिजे. त्यावर आपण आरूढ झाले पाहिजे. घोड्यावर आपण जसे स्वार होतो त्याचप्रमाणे संकटाला आपण साधन बनवून, वाहन बनवून पुढे जाण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

* * *

कुंभाराच्या चाकावर असणारे मडके पक्के नसते. कुंभाराच्या भट्टीत ते जेव्हा भाजून निघते तेव्हा ते पक्के बनते. अजूनही आमच्या कुंभाराचे चाक फिरते आहे. आमच्या देशाचे एकतेचे चाक फिरते आहे. त्यावरील मडके अद्यापि पक्के बनावयाचे आहे. देशाच्या निरनिराळ्या भागात आज जे काही घडत आहे ते याचे द्योतक आहे, निदर्शक आहे.

* * *

आपल्या राजवटीला कायद्याने राज्य करावयाचे आहे. पण निव्वळ कायद्या-करिता राज्य करावयाचे नाही. कायद्याचे राज्य हा लोकशाहीच्या कल्पनेतला मुख्य केन्द्रबिंदू आहे. कायद्याचे राज्य असलेच पाहिजे. कुणाही व्यक्तीच्या लहरीचे राज्य असता कामा नये, असा त्याचा अर्थ आहे. पण कायद्याचे राज्य हे माणसा-करिता आहे. माणसे महत्त्वाची आहेत. माणसाचे सुख महत्वाचे आहे. मानव व त्याचे व्यक्तिमत्त्व हे सर्व शासनयंत्रणेचे केन्द्र आहे.

* * *

पाण्यातल्या माशाला तहान लागणे हे जितके आश्चर्यकारक किंवा वेडे-पणाचे आहे तितकेच या विसाव्या शतकामध्ये हिंदुस्थानसारख्या अनंत साधनांनी युक्त असलेल्या देशामध्ये आम्ही गरीब आहोत असे म्हणणे वेडेपणाचे ठरणार आहे.

* * *

आम्ही स्वराज्याचा उपयोग किती जिद्दीनें, किती इर्षेने, किती योजनेने, किती सहकाराच्या भावनेने करतो यावर या देशाचे भवितव्य अवलंबून आहे. नवीन शिकलेल्या प्रत्येक माणसाने अशी प्रतिज्ञा केली पाहिजे की, मी स्वतंत्र हिंदुस्थानात जन्माला आलो आहे. मला जे हवे आहे ते मी मिळवीन, माझ्या देशाला आणि समाजाला जे पाहिजे आहे ते मी मिळवून देईन.

★ ★ ★

अमृताच्या प्राप्तीसाठी देवांनी समुद्रमंथन केले पण त्या समुद्रमंथनातून जे अमृत निघाले ते देव प्राशन करून बसले. आता आमच्यासाठी अमृतच शिल्लक राहिलेले नाही. म्हणून आता ज्ञान हेच अमृत आहे. या अमृताने तुम्हांला समर्थ बनावयाचे आहे. समाजजीवन समर्थ बनवावयाचे आहे.

★ ★ ★

ज्योतिबा फुले यांनी सामाजिक क्रांतीचा संदेश दिला. त्या संदेशातून डॉ. आंबेडकर यांच्यासारखी कर्तृत्ववान माणसे निर्माण झाली. पण महात्मा फुले फक्त माळ्यांचे, डॉ. आंबेडकर फक्त बौद्धांचे, गांधी फक्त गुजराथ्यांचे, टिळक फक्त ब्राह्मणांचे, शिवाजी फक्त मराठ्यांचे अशा प्रकारे जर या महापुरुषांच्या वाटण्या केल्या तर या हिंदुस्थानामध्ये सामाजिक क्रांती कधीच होणार नाही.

★ ★ ★

माझे धैर्य कदापि खचणार नाही, मी ज्या पिढीत वाढलो त्या पिढीवर आकाश जरी कोसळले तरी त्या कोसळलेल्या आकाशावर पाय रोवून ती उभी राहील आणि लढत देईल. स्वातंत्र्य म्हणजे एक प्रकारची वृत्ती आहे. ते एक प्रतीक आहे, ती आपली शक्ती आहे, आपल्या मनात आलेल्या विचारांचा स्वातंत्र्य हा आत्मा आहे.

★ ★ ★

पूजा ही नेहमी चांगल्या गोष्टींची, सत्याची व न्यायाची होत असते. अन्यायाचा व द्वेषाचा विजय कधीच होत नसतो. आपण हाती घेतलेले कार्य ही एक राष्ट्रीय समस्या आहे व ती राष्ट्रीय दृष्ट्या सोडविणे सर्वांचे कर्तव्य आहे, ही भावना सदैव मनात ठेवून आपण आपल्या कार्यास लागू या.

★ ★ ★ ★ ★

## जय हिंद